# शालेय व्यवस्था

म. ग्रं. सं. ठाणें
विषय शिक्षण
सं. क्र. ९३७

लेखक

ग. वि. अकोलकर

एम्. एं., एल्एल्. बी., बी. टी.

मुख्याध्यापक, न्यू हायस्कूल, नाशिक.

ना. वि. पाटणकर

एम्. ए., एम्. ईडी.

प्राध्यापक, टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणें.


REFBK-0008177

किंमत साडेतीन रुपये

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

# शालेय व्यवस्था





लेखक

**ग. वि. अकोलकर**

एम्. ए., एल्एल्. बी., बी. टी.

मुख्याध्यापक, न्यू हायस्कूल, नाशिक.

**ना. वि. पाटणकर**

एम्. ए., एम्. ईडी.

प्राध्यापक, टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणें.



REFBK-0008177



किंमत साडेतीन रुपये

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

प्रकाशक व मुद्रक
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

☆

सर्व हक्क लेखकांच्या स्वाधीन

☆

प्रथमावृत्ति
१९५४

# शिक्षक बंधुभगिनींस—

नं. दि. २८/३/५४

'शालेय व्यवस्था' हें आमचें पुस्तक आपणांस सादर करतांना आम्हांस आनंद होत आहे.

अध्यापनशास्त्र व शालेय व्यवस्था या विषयांवर मराठींत मोजकींच पुस्तकें आहेत. पण अध्यापनविषयक शास्त्रांना मातृभाषेचें माध्यम यापुढें स्वाभाविकपणेंच मिळणार असल्यानें त्यांतील एका शाखेंत पाऊल टाकण्याचा आमचा हा प्रयत्न आहे. आमच्या 'मराठीचें अध्यापन' या ग्रंथाचें शिक्षक-बंधुभगिनींनीं जसें स्वागत केलें तसें या ग्रंथाचेंहि स्वागत करतील असा भरंवसा आहे.

'शालेय व्यवस्था' म्हणजे एक तंत्र आहे, व त्यांत यांत्रिकपणाचाच भाग फार असतो अशी सामान्य समजूत आहे. पण शाळा हा एक जिवंत, वर्धिष्णु, आणि आत्माविष्कारासाठीं धडपडणाऱ्या जीवांचा 'समाज' आहे हें लक्षांत घेतलें तर त्या तंत्रामागें 'मंत्रा'चा केवढा प्रभाव असावयास पाहिजे याची कल्पना येईल. शाळा ही शैक्षणिक ध्येयांची प्रयोगभूमि असल्यानें तिच्यांतील प्रत्येक सजीव आणि निर्जीव घटक यांचें कांहीं तरी प्रयोजन असतें. त्या दृष्टीनेंच प्रस्तुत ग्रंथांतील विषयाची एकंदर मांडणी केली आहे.

गेल्या दहा वर्षांत सर्वच राष्ट्रांत शैक्षणिक ध्येयांचा व जीवनमूल्यांशीं असलेल्या त्यांच्या संबंधांचा नवीन नवीन दृष्टीनें विचार होत आहे. त्या सर्व ध्येयांचा व दृष्टिकोणांचा परिणाम प्रत्यक्ष शालेय व्यवस्थेवर व संचालनावर होणारच. आणि म्हणून प्रत्येक विषयाच्या विवेचनांत तात्त्विक बाजूवर भर देणें इष्ट वाटलें आहे. शक्य तेथें नव्या प्रयोगांकडेहि अंगुलिदर्शन केलें आहे.

आपल्या शालेय जीवनांत नवा प्राण व नवें चैतन्य आल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं, अशी आमची श्रद्धा असल्यानें ती इतरांच्या ठिकाणीं निर्माण करण्याचा हा एक आमच्या शक्त्यनुसार आमच्या शिक्षण-क्षेत्रांतील दीर्घ अनुभवाच्या आधारें केलेला विनम्र प्रयत्न आहे. तो

करतांना अनेक ग्रंथकर्त्यांचें व तज्ज्ञांचें ऋण आम्हीं मुक्तहस्तानें घेतलें आहे. त्या सर्वांचे आम्ही उपकृत आहोंत.

प्रत्यक्ष लेखनासहि अनेक स्नेही–सुहृदांनीं प्रोत्साहन दिलें. त्यांतल्यात्यांत श्री. वा. द. वसंतगडकर यांनीं हस्तलिखित वाचून बहुमोल सूचना केल्या त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें अवश्य आहे.

चित्रशाळेचें श्री. दामुअण्णा रानडे यांनीं या ग्रंथाच्या प्रकाशनाचें काम स्वेच्छेनें पत्करलें, व अत्यंत आस्थेनें, तत्परतेनें तें तडीस नेलें याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत.

—लेखक

१४ जानेवारी, १९५४

# अनुक्रमणिका


विषय — पृष्ठें

१. विषयप्रवेश — १–६

प्रास्ताविक – सुव्यवस्थेचें शास्त्र – उत्कृष्ट व्यवस्थेची कसोटी – व्यवस्थेची जुनी दृष्टि – नवा मनु आणि नवी दृष्टि – शालेय व्यवस्थेचीं विविध अंगें – साध्य व साधन यांचा विवेक.

## शिक्षणाचे शिल्पकार

२. शाळा आणि समाज — ७–१५

शिक्षणसंस्थेचें प्रयोजन – शाळेंतील संस्कारांचें स्वरूप – अनुभव आणि शिक्षण – व्यक्तिविकास आणि शीलसंवर्धन – भविष्याची घडण – सामाजिक आदर्श – शालेय समाजाच्या मर्यादा – कर्तृत्ववान् नागरिकत्वाचें शिक्षण – सामाजिक शिक्षणाचें केंद्र.

३. शिक्षक — १६–२४

प्राचीन परंपरा – मध्यंतरींचा काळ – नवयुगांतील शिक्षकांची जबाबदारी – व्यक्तिमत्त्व आणि शिक्षण – व्यक्तिमत्त्वाचे कांहीं पैलू – हक्क व जबाबदारी यांबद्दल जागरूकता – शिक्षकमंडळाचें स्वरूप – शिक्षकाचें दैनंदिन कार्य – अन्य जबाबदाऱ्या – जगण्याची कला – शिक्षक आणि सामाजिक प्रतिष्ठा.

४. मुख्याध्यापक — २५–४२

प्रास्ताविक – व्यक्तिमत्त्वाचे कांहीं पैलू ( अनुभवसंपन्नता, नेतृत्व, अध्यापनकौशल्य, कार्यक्षमता, योजनाचातुर्य, प्रगमन-

विषय पृष्ठें

शीलता, निर्णयशक्ति, खंबीरपणा व आत्मविश्वास, कल्पकता, गुणग्राहकता ) – कामकाजाचें स्वरूप आणि दिशा – शिक्षकांच्या नेमणुका – कामाची विभागणी – अध्यापनावर देखरेख व मार्गदर्शन, शिक्षकसभा – विद्यार्थ्यांचें जीवन व शिस्त – पालकांशीं संबंध – माजी विद्यार्थी – कार्यालयाची व्यवस्था – सार्वजनिक कार्य.

५. पालक आणि शाळा ४३–५१

प्रास्ताविक – सहकार्याची आवश्यकता – सहकार्याची दिशा – सहकार्याचे मार्ग – समारोप.

## साध्य आणि साधनें

६. अभ्यासक्रमार्चीं मूलतत्त्वें आणि स्थूल रूपरेषा ५२–७६

प्रास्ताविक – व्यापक स्वरूप – मूलभूत दृष्टि – नियामक आणि मार्गदर्शक तत्त्वें – अभ्यासक्रमांतील सोपानपरंपरा – प्राथमिक शिक्षण ( विषय ) – या विषयांमागील भूमिका – माध्यमिक शिक्षणक्रम – आवश्यक विषय – नीतिशिक्षणाचें स्थान – निधर्मीपणाचा अर्थ – नैतिक आणि धार्मिक शिक्षण – व्यावहारिक साधनें – लैंगिक शिक्षण – आवश्यकता – शिक्षकांची जबाबदारी – लैंगिक शिक्षणाचा तपशील – शिक्षण – पद्धति – अंतिम साध्य.

७. वर्ग-रचना ७७–८८

वर्गपद्धति – वर्गपद्धतीचा इतिहास – इयत्तावारीची सामान्य पद्धत – इयत्तावारी पद्धतीचे फायदेतोटे – या अडचणींतून मार्ग – इतर देशांत काय करतात – वर्गांचा आकार – वर्ग-पद्धतींतील एक समस्या – सहशिक्षण म्हणजे काय – प्रतिकूल मत – अनुकूल मत – निष्कर्ष.

विषय पृष्ठें

८. वेळापत्रक ८९-९९

शाळेची आदर्श वेळ कोणती – वेळापत्रकाविरुद्ध आक्षेप – तरीहि वेळापत्रक हवेंच – आदर्श वेळापत्रक ( तत्त्वें ) – आदर्श आणि व्यवहार – नमुन्याचें वेळापत्रक – स्पष्टीकरणार्थ टीपा – वेळापत्रकांचे इतर प्रकार – एक महत्त्वाची सूचना.

९. गृहपाठ १००-१०४

आवश्यकता – गृहपाठांचीं कांहीं मूलतत्त्वें – पालकांचें सहकार्य.

१०. परीक्षा १०५-११४

परीक्षांची आवश्यकता – परीक्षांचे प्रकार – परीक्षापद्धतींतिल दोष – परीक्षापद्धतींत सुधारणा – मुख्याध्यापक आणि परीक्षांची व्यवस्था.

११. शाळेची सुसज्जता ११५-१२४

वाचनालय ( महत्त्व, वाचनालयगृह, पुस्तकांची निवड, वाचनालयाचे विभाग, पुस्तकांची वर्गवारी, वाचनालयाचा उपयोग व प्रेरणा, ग्रंथपाल, आर्थिक तरतूद ) – संग्रहालय – शालेय उद्यान – दृक्-श्राव्य – शिक्षण – साहित्य.

१२. शाळेचें कार्यालय व दप्तर १२५-१३१

आवश्यकता – विद्यार्थ्यांबाबत नोंदी – शिक्षकविषयक पत्रकें– अर्थव्यवहार – स्थावर-जंगम मिळकतीचें पत्रक – पत्र-व्यवहार.

## शासन–शिस्त–चारित्र्यवर्धन

१३. वर्ग–नियंत्रण १३२-१३८

प्रास्ताविक – जुन्या कल्पना – वर्गांतील शिस्त – गैरशिस्तीचीं व गोंगाटाचीं कारणें ( सदोष भौतिक परिसर, सदोष वर्ग-

विषय पृष्ठें

रचना, विद्यार्थ्यांचीं व्यंगें, शिक्षकांचें व्यक्तिमत्त्व, सदोष गृहसंस्कार ) – नियंत्रणांचा कडकपणा.

१४. शिक्षा आणि पारितोषिकें १३९–१५४

शिक्षांची आवश्यकता – शिक्षेचें मानसशास्त्र – शिक्षचो हेतु – सुधारणानुकूल मनोवृत्ति – परिणामकारक शिक्षांचीं लक्षणें – शिक्षांचे प्रकार ( देहदंड, कानउघाडणी, उभें करणें, वर्गत्याग, स्थानबद्धता, शारीरिक परिश्रम, आर्थिक दंड, स्थानभ्रष्टता, लाभत्याग, उद्घोषण, निर्वासन ) – निदानचिकित्सा – पारितोषिकें – विधायक उत्तेजनाची गरज – पारितोषिकांचे प्रकार – सन्मान व अधिकार – कांहीं पथ्यें – आदर्श परिस्थिति.

१५. स्वयंशासन व चारित्र्यविकास १५५–१६५

प्रास्ताविक–लोकशाहीचा अर्थ–शिस्त म्हणजे काय–विद्यार्थी-समिति ( भूमिका, स्वरूप, उद्दिष्ट ) – प्रयोगाचा आरंभ व सातत्य – यंत्रणा व घटना–शिक्षक-विद्यार्थी संबंध–कार्यक्षेत्र – नियम व अंमलबजावणी – शपथविधि – शिस्तीचें स्वरूप.

१६. गुणविकास–मंडळें आणि चारित्र्य-विकास १६६–१७८

प्रास्ताविक – कांहीं आक्षेप व उचित दृष्टि – मानसशास्त्रीय आधार – नागरिकत्वाचें शिक्षण – रिकामपणासाठीं शिक्षण – कांहीं मूलभूत तत्त्वें – गुणविकास-मंडळांचे विविध प्रकार-(वाङ्मय-विहार-मंडळ, कलोपासक–मंडळ, अभ्यासपूरक-मंडळें, सेवा-पथक,समाजशिक्षण-मंडळ,सहली, क्रीडा-मंडळ)-समारोप.

शालेय परिसर आणि आरोग्य

१७ इमारत-वर्ग–वर्गांतील व्यवस्था १७९–२००

प्रास्ताविक – इमारत भाड्याची कीं स्वतःच्या मालकीची – इमारतीची जागा – आकार व आकारमान – खास वर्ग –

विषय पृष्ठें

इमारतीसंबंधीं आणखी थोडा विचार – इमारतींतील दोन महत्त्वाच्या सोयी – वर्गांची खोली ( आकार, खिडक्या, दारें, भिंती, कपाट ) – वर्गांतील फर्निचर व इतर साहित्य ( खुर्ची, टेबल, प्लॅटफॉर्म, फळा, बाकें, जोडबाकें इ.)–शिल्प व स्थापत्य.

१८. विद्यार्थ्यांचें आरोग्य २०१–२१४

प्रास्ताविक – जबाबदारी कोणाची – पूर्वतयारी – आरोग्यप्रद संवयी – सर्वसामान्य स्वच्छतेची आवड व संवय – आरोग्य-शिक्षणाचे कांहीं मार्ग ( उपदेश, चित्रें, चित्रपट, आरोग्यदिन, विद्यार्थी-प्रतिनिधि, पालक-शिक्षक-संघ, साधनांचा पुरवठा, शिक्षकांचा आदर्श ) – वैद्यकीय तपासणी – रोगांच्या सांथी व शाळांची कर्तव्यें ( पूर्व-माहिती, पूर्व-तयारी, अनध्याय. )

१९. शारीरिक शिक्षण २१५–२२१

आवश्यकता – सामान्य उद्दिष्टें – साध्य आणि साधनें –भूमिका – शाळेची जबाबदारी ( जागा, साहित्य, अभ्यासक्रम, तज्ज्ञ शिक्षक ) – कांहीं अवांतर प्रश्न ( सक्ति, गणवेष, पौष्टिक अन्न, सैनिकी शिक्षण इ. )

२०. वसतिगृह २२२–२२५

आवश्यकता – वसतिगृहाची जागा व इमारत – वसतिगृहांतील सोयी – अन्तर्गत व्यवस्था – व्यवस्थापक.

## नव्या प्रवृत्ति आणि नवे प्रवाह

२१. नव्या प्रवृत्ति आणि नवे प्रवाह २२६–२४०

बालोद्यानपद्धति – मूलतत्त्वें – पद्धत; मॉंटेसरी पद्धति – बालक-मंदिरें – दृष्टिकोण–ऐन्द्रिय शिक्षण आणि आत्मविकास–कार्य-पद्धति–समारोप; संयोजनपद्धति (प्रोजेक्ट मेथड); गेरी पद्धति;

विषय  पृष्ठ

डाल्टन योजना – पद्धतीचें स्वरूप; मूलोद्योगी शिक्षण अथवा वर्धा-योजना; अलीकडची पायरी – राजाजी-योजना.

२२. समारोप  २४१–२४३

परिशिष्ट  २४४–२५७

मुंबई राज्यांतील शैक्षणिक कारभार

प्रास्ताविक–ऐतिहासिक पर्यालोचन (पहिला कालखंड १८५४–१८८२ – दुसरा कालखंड १८८२–१९२० – तिसरा कालखंड १९२१–१९३५ – चौथा कालखंड १९३५–१९५४) – केंद्रीय सरकार आणि शिक्षण – मुंबई राज्याची स्वाययत्ता – शैक्षणिक कारभाराची यंत्रणा – शिक्षणक्रमाची सोपानपरंपरा – शिक्षणमंत्री – डायरेक्टर ऑफ एज्युकेशन – पूर्व प्राथमिक शिक्षण – प्राथमिक शिक्षण – माध्यमिक शिक्षण – माध्यमिक शालान्त - परीक्षा - मंडळ – विश्वविद्यालयीन शिक्षण.

अनुक्रम ..... पृष्ठ ..... दि. ..... ग्रं. ..... वि. ..... ८७७८ दा. क्र. .....

: १ :

# विषयप्रवेश

## प्रास्ताविक

एखाद्या कुटुंबांतील चहापानाचा व पानसुपारीचा कार्यक्रम असो, एखाद्या संस्थेचा उद्घाटन समारंभ असो, किंवा एखाद्या कारखान्याचा दैनंदिन कारभार असो, तेथें जाऊन आल्यावर जर आपल्याला प्रसन्नता लाभली असेल, तेथें टापटीप, तत्परता व दक्षता आपल्याला अनुभवावयास मिळाली असतील, तर तेथील व्यवस्थेच्या यशस्वीपणाबद्दल आपल्या तोंडून सहजच उदगार बाहेर पडतो कीं, ' व्यवस्था काय उत्तम होती ! कोठें गडबड नाहीं कीं गोंधळ नाहीं. सगळें काम कसें रेखीव नि यंत्रासारखें झपाझप चाललें होतें ! ' या अभिप्रायांत सुव्यवस्थेच्या किती तरी गुणांचा नकळत आपण उल्लेख करतों ! थोड्याशा विचारान्तीं सुव्यवस्थेच्या या अंगोपांगांचा आपणांस सहज उलगडा होईल.

## सुव्यवस्थेचें शास्त्र

समाज म्हटला कीं व्यवस्था आणि संचालन या गोष्टी आल्याच. जेथें जेथें विविध प्रवृत्तींचीं माणसें विशिष्ट हेतूनें एकत्र येतात, तेथें तेथें विविध प्रवृत्तींचा समन्वय कसा साधावयाचा, आणि संघटनेंतून निर्माण होणारी शक्ति कार्यान्वित कशी करावयाची याचा विचार करावा लागतो. अंतिम उद्दिष्टावर लक्ष ठेवून क्रमबद्ध असा आंखलेला कार्यक्रम म्हणजेच व्यवस्था. कामाची आंखणी, मांडणी व विभागणी नीट झाल्याविना, कोणीं कोणतें काम केव्हां व कसें करावयाचें हें ठरविल्यावांचून कोणतेंच कार्य पार पडणार नाहीं. म्हणूनच लहानशा क्रीडामंडळापासून तों थेट मोठमोठ्या सचिवालयापर्यंत, अथवा सामान्य व्यक्तिगत जीवनापासून तों राष्ट्रव्यापी संघटनेपर्यंत सर्वत्र व्यवस्था नि शिस्त यांवर कटाक्ष ठेवण्यांत येतो. ' शाळा ' हाहि एक ' समाज 'च असल्यानें, व समाजानें विशिष्ट ध्येयपूर्ती-

साठीं ही एक संघटना वा संस्था निर्माण केली असल्यानें तिलाहि उत्कृष्ट व्यवस्थेची, दिग्दर्शनाची व संचालनाची आवश्यकता आहे.

## उत्कृष्ट व्यवस्थेची कसोटी

आरंभीं उल्लेखिलेल्या व नित्याच्या अनुभवांतल्या 'सुव्यवस्थे'चें निरीक्षण व पृथक्करण केलें तर आपल्याला काय दिसतें ? टापटीप, तत्परता, सुबकपणा, वेळेची काटकसर, द्रव्याची बचत, आणि इतर साधनांचा मितव्यय व वाजवी उपयोग या गोष्टी प्रामुख्यानें डोळ्यांत भरतात. त्यांतून त्या त्या प्रसंगीं सौंदर्य, उल्हास व प्रसन्नता निर्माण व्हावी, व त्या त्या क्षणांच्या सामाजिक जीवनांत आनंदाचा प्रत्यय यावा हें लक्ष्य असतें. पण या गोष्टी परिणामभूत आहेत, व म्हणून व्यवस्थेच्या त्या बाह्य कसोट्या मानाव्या लागतील. ही 'यान्त्रिक' वाटणारी व्यवस्था आपोआप निर्माण झालेली नसते. ही 'व्यवस्था' प्रथम कोणाच्या तरी कल्पनेंत जन्म घेते. कोणा तरी कुशल योजकाच्या दूरगामी सौंदर्यदृष्टीचा तो आविष्कार असतो. या व्यवस्थेच्या मागें पूर्व-संकल्प आणि पूर्व-योजना असते; आणि अनेकांच्या प्रयत्नानें ती मूर्त स्वरूप धारण करते. हाताशीं असलेल्या मनुष्यांना, संस्थेच्या भिन्नभिन्न घटकांना सुसंघटित कसें करावयाचें, ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणें काम कसें करून घ्यावयाचें, याचा विचार झालेला असतो; हाताशीं असलेल्या सामग्रीचा व साधनांचा चातुर्यानें उपयोग करून, मनुष्यशक्ति व संपत्ति यांचा अपव्यय टाळून अल्पकालांत अधिक कार्य कसें होईल याकडे लक्ष पुरविलेलें असतें; आणि सर्व घटकांत संघर्ष निर्माण न होतां सलोखा, सहकार्य व सद्भावना यांचें वातावरण नांदून सर्वत्र संवादी सूर कसे निर्माण होतील, व ध्येयसिद्धि त्वरित कशी होईल यावर कटाक्ष ठेवलेला असतो. सारांश, उत्कृष्ट व्यवस्था म्हणजे रेखीवपणा आणणारी शिस्त, तत्परतेनें साधलेला मितव्यय, कुशल संघटना व हार्दिक सहकार्य, आणि चतुर योजकत्व व जागरूक नेतृत्व यांचा सुरेख संगम.

उत्कृष्ट शालेय व्यवस्थेस या सर्व गुणांची गरज आहेच.

## व्यवस्थेची जुनी दृष्टि

ज्या काळांत 'शाळा म्हणजे ज्ञानदान करणाऱ्या संस्था' एवढीच संकुचित दृष्टि होती, त्या काळांत व्यवस्थेचा विचारहि जुजबी असे. त्या

काळांत 'शाळा चालत असत, चालविण्याची गरज भासत नसे' असें म्हटलें तरी चालेल. घंटेच्या ठोक्याला शिक्षकांनीं व विद्यार्थ्यांनीं एकत्र जमावयाचें, शिक्षकांनीं आपल्या विषयाची ठराविक संथा द्यावयाची, विद्यार्थ्यांनीं घोकंपट्टी करावयाची; वार्षिक परीक्षा आली कीं पोपटपंची होई, व काल-चक्राच्या फेऱ्याबरोबर विद्यार्थी वर वर सरकत. शिक्षणक्रम संपला कीं शिक्षणाची सांगता होई. वर्ग, शिक्षक व अभ्यासपत्रकांतील विषय हा त्रिकोण जमला कीं झालें. यापलीकडे शाळा चालविण्याची दृष्टि क्वचितच जाई. फारच उत्साही शिक्षक असला तर अंतिम परीक्षेंत आपला एखादा पट्टशिष्य मोठ्या पारितोषिकाचा मानकरी कसा होईल या दिशेनें झटे. खाजगी संस्थांत सुव्यवस्थेचा विचार झालाच तर तो आर्थिक बाजूनें—कमी माणसें, अधिक काम, अधिक वेळ, कमी दाम, इ. दंडकांचा अवलंब करूनच होई. शालेय व्यवस्थेला शैक्षणिक तत्त्वांचा स्पर्श नव्हता, सामाजिक जीवनाचा गंध नव्हता.

अशा परिस्थितींत शाळेच्या यशस्वी व्यवस्थेचीं भिन्न भिन्न लोकांचीं गमकेंहि भिन्न भिन्न व प्रायः 'व्यावहारिक' असत. पालकांचा दृष्टिकोण उपयुक्ततेचा असे. फी—वह्या—पुस्तकें यांच्यासाठीं आपल्या खिशावर ताण पडला नाहीं, पाल्यांच्या डोक्यांत थेंबें थेंबें ज्ञानसंचय होत राहिला, आणि वर्षअखेर 'उत्तीर्ण' असा शिक्का त्यांच्या कपाळावर बसला कीं ते शाळेवर संतुष्ट असत. शिक्षणाधिकारी शिक्षणखात्याच्या नियमांचें शाळेकडून कर्मठवृत्तीनें परिपालन होतें कीं नाहीं हें धारवाडी कांट्यानें तोलून पाहात. तर नियामक मंडळावर असलेले जनतेचे प्रतिनिधि सटीं—सामासीं एकत्र येऊन शाळेचा संसार काटकसरीनें चाललेला दिसला, विद्यार्थी दावणीला बांधलेल्या गुरांप्रमाणें व शिक्षक ताटाखालच्या मांजराप्रमाणें विनीत आहेत असें समजलें कीं धन्यता मानीत. पण आतां हा मनु सर्वस्वीं पालटला आहे.

## नवा मनु आणि नवी दृष्टि

शिक्षण आणि शाळा यांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण बदलला आहे व बदलत आहे. शिक्षण म्हणजे अखंड जीवन-विकास ही दृष्टि सर्वमान्य झाली आहे. शैक्षणिक तत्त्वज्ञान हें व्यापक जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा अविभाज्य घटक मानलें जातें; व शाळा म्हणजे विशाल जगाची छोटीशी

प्रतिमा समजण्यांत येते. शाळा आणि समाज, शाळा आणि घर यांच्यांतील तटबंदी नाहींशी झाली आहे. शाळा हें गृहांचें विशाल स्वरूप आणि सामाजिक जीवनाचें एक प्रगमनशील व गतिमान् अंग आहे अशी दृष्टि आतां स्वीकारली गेली आहे. भावी समाजाचा घाट आणि आकार आजच्या शाळा निश्चित करणार आहेत. उद्यांचे नागरिक आजच्या शाळांतून तयार होणार आहेत. शाळेच्या विश्वाचें केन्द्र बालक आहे; आणि त्याच्या गरजा, त्याचा अनिर्बंध व अनिरुद्ध विकास हें शालेय जीवनाचें प्रेरक, नियंत्रक व मार्गदर्शक सूत्र आहे. या विचारसूत्राप्रमाणें पाहतां शाळेची व्यवस्था हा एक जिवंत, विकसनशील व सृजनक्षम असा व्यापार ठरतो.

## शालेय व्यवस्थेचीं विविध अंगें

आजच्या कोणत्याहि शाळेंत पाऊल टाकलें तरी शालेय व्यवस्थेचें बहुविध स्वरूप लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं. शाळेची इमारत व परिसर यांची आरोग्य व स्वास्थ्य या दृष्टीनें अनुकूलता राखण्याचा प्रश्न सदैव सज्ज असतो. योग्य शिक्षकांची निवड, त्यांच्या योग्यतेनुरूप कामाची वांटणी, त्यांच्यांत परस्पर सहकार्य, त्यांच्या कामावर देखरेख व मार्गदर्शन इत्यादि कामें वाट पाहातच असतात. दुसऱ्या बाजूनें अभ्यासक्रम, परीक्षा, प्रगतिपुस्तकें 'आ' पसरून उभीं असतात. विविध प्रवृत्तींच्या व पात्रतेच्या विद्यार्थ्यांना अवसर कसा मिळेल याची विवंचना चालू असते. वाचनालय, संग्रहालय, क्रीडा-विभाग इत्यादि विभागांची सुसज्जता व व्यवस्था कशी राखायची याची दखल घ्यावी लागते. समाजांत शाळेची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं व जनतासंपर्क वाढविण्यासाठीं योजना आंखाव्या लागतात. शिक्षणखात्याकडून येणाऱ्या पत्रकांचा, सूचनांचा व अहवाल-मागणीचा पत्रव्यवहार फुरसदीची वाट पाहात असतो; आणि सर्वांवर मात करण्यासाठीं, दप्तर, हिशोब व आर्थिक तोंड-मिळवणी इत्यादि गोष्टी सहनशीलतेची कसोटी पाहात असतात. अभ्यास, परीक्षा, क्रीडा व कार्यालय अशीं अगदीं मोजकींच खातीं घेतलीं तरी त्यांच्या दैनंदिन कार्याचा पसारा कांहीं कमी नसतो. या सर्वांत एकसूत्रीपणा राखावयाचा, सर्व गोष्टींची पद्धतशीर नोंद ठेवावयाची, व त्यांचें यशापयश अजमावून त्यांत अखंडता राखावयाची हें काम कमी जिकीरीचें नाहीं.

कोणतेंहि काम पद्धतशीर करावयाचें म्हटलें कीं त्याचे नियम व विशिष्ट चाकोरी वा कार्यपद्धति या गोष्टी आवश्यकच आहेत. उदाहरणार्थ, शाळेचें वाचनालय घेतलें तर त्याची व्यवस्था कशी ठेवावयाची, पुस्तकें कोणत्या तत्त्वांवर निवडावयाचीं, तें काम कोणावर सोंपवावयाचें, त्यासाठीं रक्कम किती खर्चावयाची, वाचनालयांत त्यांची नोंद कशी ठेवावयाची, विद्यार्थ्यांनीं त्यांचा उपयोग केव्हां, कसा करावयाचा, या सगळ्या बाबतींत निश्चित पद्धति हवीच्च. तीच गोष्ट अभ्यासपत्रकें, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, क्रीडाविभाग, दृक शिक्षणाचें साहित्य, छंदमंडळें इत्यादि विभागांबद्दल व खात्यांबद्दल सांगतां येईल.

पूर्वी उल्लेखिलेलीं उत्कृष्ट व्यवस्थेचीं लक्षणें शालेय व्यवस्थेंत दिसतीलच वर्षाच्या आरंभींच वर्षाचा अभ्यासक्रम आणि विविध खातीं यांचा कार्यक्रम निश्चित केला जावा. अशा पूर्वयोजनेमुळें काळाची व शक्तीची बचत तर होतेच, पण शिवाय काम स्वस्थतेनें करतां येतें, त्याच्या तपशीलाचा विचार करतां येतो; मनन—चिंतनानें त्याच्या अंगोपांगांचा संबंध लक्षांत येऊन त्याची मांडणी करतां येते. कामाची दिशा निश्चित झाली असल्यानें, कोणीं कोणतें काम करावयाचें हें ठरलें असल्यानें, कसलीच अनिश्चितता राहात नाहीं. गोंधळ घ धांवपळ टळतात. प्रत्येकाला आपापली जबाबदारी कळली असल्यानें स्वतःच्या कामाची रूपरेषा ठरवितां येते, आणि कामांत एकसूत्रीपणा व शिस्तबद्धता येते. उत्कृष्ट संचालनाचा शैक्षणिक परिणाम सर्व कामांत वक्तशीरपणा, नियमितपणा, दूरदर्शीपणा, व टापटीप हे गुण साधण्यांत, त्यांच्ची संवय लागण्यांत व्हावा. सर्व कामें, नोंदी, हिशोब, तपासणी इ. वेळच्या वेळीं व सर्वांच्या सहकार्यानें झाल्यास त्यांचा बोजा पडत नाहीं. पण इतर संस्थेप्रमाणें शाळेच्या व्यवस्थेंतहि तिचा प्राण वा गाभा म्हणून कोणती गोष्ट असेल तर व्यवस्थापकाची दृष्टि, वृत्ति व ध्येय. संस्थेच्या सर्व घटकांत, मुख्याध्यापक व शिक्षक, शिक्षक व विद्यार्थी, विद्यार्थी व मुख्याध्यापक, मुख्याध्यापक व पालक यांच्यांत परस्पर सहकार्याची वृत्ति किती आहे, कार्याबद्दलची आस्था व तळमळ किती आहे यावरच त्या संस्थेच्या कार्याची यशस्विता अवलंबून आहे. हे संबंध जितके माणुसकीचे असतील, प्रत्येकाला त्यांत स्वतःच्या विकासाला जितका अवसर असेल तितकें तें संचालन यशस्वी ठरेल. प्रत्येक गोष्ट निश्चित करतांना वर उल्लेखिलेल्या शिक्षणविषयक सूत्रांच्या आधारें त्यांची उपयुक्तता पारखून घेतली पाहिजे.

आजचा जमाना यंत्राचा व तंत्राचा आहे. आजच्या सर्वच सामाजिक संस्थांत नोंदी–दप्तरं व अनुषंगिक कारकुनी काम यांचें प्राबल्य आहे. शाळा त्याला अपवाद नाहीं. प्रत्येक गोष्ट वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासली जाणार असल्यानें, समाजापुढें सचोटीची साक्ष पटवायची असल्यानें, कागदोपत्रीं पुरावा तयार झालाच पाहिजे. यामुळें शालेय व्यवस्था म्हणजे नोंदी, तक्ते, फॉर्म व फायली यांची विविधता व समृद्धि असा समज झाला आहे. असल्या गोष्टींचें स्तोम वाढल्यास शालेय व्यवस्थेंत यान्त्रिकपणा येण्याचा धोका मोठा आहे; व त्यामुळें शाळेला कारखान्याचें स्वरूप आल्याशिवाय राहणार नाहीं. कागदी घोडे नाचविण्यांत शिक्षकांची व मुख्याध्यापकांची शक्ति खर्च होऊं लागली तर शिक्षणावरचें, बालकांच्या विकासावरचें त्यांचें लक्ष सहजच उडेल. शालेय व्यवस्थेंत असा यान्त्रिकपणा येणें, विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यांत व्यक्तिगत संबंध व स्नेहभाव न उरणें म्हणजे शैक्षणिक ध्येयांना व तत्त्वांना हरताळ फासणें होय. त्यांत माणुसकीचा ऱ्हास व समाजाचा अधःपात आहे.

## साध्य व साधन यांचा विवेक

किती झालें तरी व्यवस्था म्हणजे एक विशिष्ट कार्यपद्धति, काम करण्याची एक दिशा, ध्येयाकडे जावयाची एक सोपानपरंपरा, एक साधन. ध्येय-सिद्धीच्या दृष्टीनें साधनांचें महत्त्व असतें. त्यांचेंच अवडंबर व उदो उदो न माजवतां गरजेप्रमाणें त्यांत बदल, परिवर्तन, सुधारणा व्हायला पाहिजेत. कोणत्याहि पद्धतींत लवचीकपणा असणें हेंच श्रेयस्कर. पद्धतीचा सांचेबंदपणा ही कांहीं यशाची कसोटी नव्हे. कोणत्याहि कार्यपद्धतीची व व्यवस्थेची उपयुक्तता व यशस्विता ही व्यवस्था व कार्यपद्धति संस्थेच्या ध्येयप्राप्तीस किती उपकारक आहे हें पाहूनच ठरवावी लागेल. व्यवस्थेचा सारा बारीकसारीक तपशीलहि त्याच ध्येयधोरणाला पोषक असला पाहिजे. तेव्हां शालेय व्यवस्थेचा विचार करतांना 'शाळा' या सामाजिक संस्थेचें प्रयोजन व इतिकर्तव्यता काय, तिचें अधिष्ठान कोणतें, व सामर्थ्य कशांत आहे याचा विचार करणें अगत्याचें आहे. त्याकडेच प्रथम वळावयास पाहिजे.

• • •

: २ :

# शाळा आणि समाज

## शिक्षण-संस्थेचें प्रयोजन

शाळा अथवा शिक्षणसंस्था समाजांत कशासाठीं असतात, असा जर पालक, शिक्षक व समाजशास्ते यांना प्रश्न विचारला तर त्यांचीं व्यक्तीगणिक भिन्न व विचित्र उत्तरें मिळतील. शिक्षणानें मनुष्य सज्ञान, साक्षर, व सुशिक्षित होतो, आणि त्यामुळें त्यास समाजांत प्रतिष्ठा लाभते असें कांहीं जण उत्तर देतील; पण ही प्रतिष्ठा केवळ ज्ञानामुळें आलेली नसते, तर त्या साक्षरतेमुळें मिळणाऱ्या उच्च नोकरीनें किंवा वकिली—डॉक्टरीसारख्या उच्च गणल्या गेलेल्या व्यवसायामुळें लाभत असते, हें मनांतल्या मनांत ते जाणून असतात. याउलट श्रमजीवी वा व्यापारी पेशाचीं माणसें लेखणीबहादुरीमुळें पडणाऱ्या पोशाखीपणाच्या मोहिनीला मुलें बळी पडण्यापूर्वीच साधारण लेखन-हिशोब-वाचनावर समाधान मानून त्यांच्या 'मनगटांतला जोर' वाढविण्याच्या मार्गाला लागतात. अक्षर-ओळख करून देण्याचें व वाचनाच्या कलेंत प्रवेश मिळविण्याचें एक साधन, आणि बालकांचे बालवयाचे दिवस घालविण्याची एक सोईस्कर जागा या दृष्टीनें ते शाळेकडे पाहतात. शिक्षणशास्त्राशीं अपरिचित असलेल्या शिक्षकांना शाळा म्हणजे शिक्षणखात्यानें नेमून दिलेले विषय मुलांच्या गळीं उतरवावयाचें, आणि धाकदपटशा व दंडुका यांच्या साह्यानें त्यांच्यांत उसळी मारणाऱ्या प्रवृत्तींना शान्त बनवून नम्र, सौम्य व 'सभ्य' बनवावयाचें ठिकाण एवढेंच ठाऊक असतें. हेच विषय कां शिकवावयाचे, त्यांचा भावी जीवनांत उपयोग काय, वर्तमान जीवनाशीं त्यांचा कांहीं संबंध आहे काय, याची त्यांना कांहींच कल्पना नसते. समाजशास्ते वा सरकार यांना शिक्षणाच्या सांच्यांतून तयार होणाऱ्या 'गणां'नीं आज्ञापालनतत्पर व राज्यनिष्ठ नागरिक व्हावें असें वाटत असतें. शिक्षणानें स्वतःचा चरितार्थ चालविण्याची पात्रता यावी ही मात्र सर्वांचीच इच्छा असते. कारण तसें न झालें तर व्यक्ति समाजाला भारभूत होऊन बसेल.

चरितार्थाच्या मार्गांबद्दल आणि त्यांतील यशास्वितेबद्दलहि पुनः प्रकृतिधर्मा-प्रमाणें कल्पना बदलतात. वेगवेगळ्या लोकांच्या वेगवेगळ्या कल्पना असतात, आणि आदर्श नागरिकाची कल्पना राज्ययंत्राप्रमाणें भिन्न असते.

## शाळेंतील संस्काराचें स्वरूप

आपल्या समाजांतील आजच्या परिस्थितीचें हें चित्र आहे. शिक्षणाकडे बघण्याचा 'व्यावहारिक' दृष्टिकोण त्यांत प्रकटला आहे. तरीहि शिक्षणामध्यें कांहींएक सामर्थ्य आहे, व बालकाला समाजाचा यशस्वी घटक म्हणून स्थान मिळविण्यासाठीं त्या सामर्थ्याची गरज आहे एवढें त्यांत मान्य केलें गेलें आहे; पण त्याहून शिक्षणाचें प्रयोजन अधिक आहे याची कल्पना थोड्याफार विचार-वंतांनाच असते. आणि तें प्रयोजन म्हणजे जें कार्य घरीं करतां येणार नाहीं, जे संस्कार घरीं देतां येणार नाहींत, पण भावी जीवनाच्या दृष्टीनें समाजांत यशस्वी होण्यासाठीं जे आवश्यक असतात, ते शाळेंत मिळावेत अशी त्यांची अपेक्षा असते. म्हणजे घर आणि समाज यांना जोडणारा शाळा हा एक दुवा आहे अशी त्यांची दृष्टि असते.

शाळा हा एक समाज आहे. समाजांत कसें वागावें, चालावें याचें म्हणजे शिष्टाचाराचें शिक्षण बालकांना मिळावें; इतिहास, वाङ्मय इत्यादींतून मनावर धैर्य, प्रामाणिकपणा, निष्ठा, सत्यप्रेम वगैरे सद्गुणांचे संस्कार व्हावेत; आपली पूर्वपरंपरा कळावी, आपला देश व परदेश यांचें ज्ञान व्हावें; शास्त्रें आणि कला यांचा अल्पसा परिचय होऊन ज्ञानलालसा वाढावी; त्यांच्या अभ्यासांतून धारणा, स्मृति, अवधान, इ. मानसिक शक्तींचा परिपोष व्हावा; त्यांना चतुरस्रता बहुश्रुतता, यावी, त्यांची दृष्टि विशाल बनावी, खेळ–क्रीडा इत्यादिद्वारां त्यांच्या शारीरिक शक्तींचा विकास व्हावा, आणि अशा तऱ्हेनें शारीरिक, मानसिक, बौद्धिक व नैतिक संस्कारांतून त्यांच्या सर्वांगीण व्यक्ति-त्वाचा विकास व्हावा अशी एक अपेक्षा असते. व्यक्तिविकास हें शिक्षण-तज्ज्ञांनीं मान्य केलेलें तत्त्व आहे. फरक आहे तो ज्या दिशेनें, ध्येयानें व वातावरणांत तें साधावयाचें असतें त्या बाबतींत.

## अनुभव आणि शिक्षण

प्रत्येक संस्कार व संस्कार घडाविणारा अनुभव म्हणजे व्यापक अर्थानें शिक्षणच आहे. नव्या नव्या परिस्थितीला तोंड कसें द्यावें, तिच्यावर मात

कशी करावी, तिच्याशीं जुळतें कसें व्हावें, व तात्कालिक गरज भागाविण्यासाठीं स्वतःमध्यें कसें परिवर्तन करावें हें प्रत्येकजण पावलोपावलीं शिकत असतो. त्यांतून आन्तरिक शक्ति प्रकट होतात, आत्माविष्कार होतो, व प्रवृत्तींना वळण, आकार मिळतो. तसेंच, समाजाला इष्ट वाटणाऱ्या गोष्टी—आचार, विचार, रीतिभाती, संकेत, परंपरा यांचेहि ज्ञान घरांतून, सामाजिक व्यवहारांतून, निरीक्षणानें, अनुकरणानें, केव्हां प्रत्यक्ष उपदेशानें व शिकवणीनें सर्वच बालकें ग्रहण करतात. पण असें अनुषंगानें, सहजगत्या व योगायोगानें मिळणारें ज्ञान तोटकें असतें; अनुभव विस्कळित असतात. त्या अनुभवांची एकसूत्री गुंफण झालेली नसते. त्यांचा अर्थबोध झालेला नसतो. व्यक्तिजीवन व समाजजीवन यांतील संबंधाच्या रेषा व अंधुक पुसट असतात. प्रौढांचें ज्ञान व बालकांचें अज्ञान यांत विस्तीर्ण दरी उभी असते. समाजजीवनाच्या ओघांत बालकांना मिसळून जातां यावें यासाठीं त्यांची कुवत व पात्रता वाढायला हवी, आणि म्हणून साऱ्या अनुभवांचा जणुं अर्क वा सार व्यवस्थित रीतीनें, क्रमाक्रमानें बालजीवनाशीं गुंफीत गुंफीत त्यांच्या वाढत्या शक्तीला विकसित करील असें विशिष्ट वातावरण हवें असतें. शाळा म्हणजे असें खास प्रयत्नानें बुद्धिपुरस्सर निर्माण केलेलें वातावरण आहे.

## व्यक्तिविकास आणि शीलसंवर्धन

समाजाचें हें उद्दिष्ट व्यक्तिद्वारांच साध्य व्हावयाचें असतें. अखेर समाजाचा विकास हा समाजाच्या घटकांच्या विकासांतच अनुस्यूत आहे; आणि म्हणून व्यक्तीच्या सुप्त शक्तींचा अनिर्बंध विकास व्हावा, त्या उत्तम रीतीनें प्रफुल्लित व्हाव्यात, आणि समाजजीवन समृद्ध व्हावें हेंच श्रेयस्कर आहे. पण व्यक्तित्वाचा विकास अनिर्बंध व्हावयाचा असला तरी तो स्वैर मात्र नव्हे. व्यक्तीमध्यें उपजतच असलेल्या प्रवृत्तींना इष्ट व अनिष्ट, सामाजिक व असामाजिक वळण लागूं शकतें. व्यक्तीच्या शक्तीचा विकास समाज-जीवनांतून, व्यापक अनुभवांतून, व संकीर्ण क्रियाप्रतिक्रियांतून घडत असतो. तो समाजानुकूल, समाजहिताशीं अविरोधानें, आणि समाज-प्रगतीला पोषक व्हावा हेंच केव्हांहि इष्ट. आणि म्हणून व्यक्तिविकासांत चारित्र्य-संघटनाला वा शीलवर्धनाला विशेष स्थान दिलें पाहिजे. उच्चतर मूल्यांचा स्वीकार,

आणि धैर्यानें, निष्ठेनें त्याचा आचार यालाच समाजाच्या दृष्टीनें किंमत आहे. संसाराची शोभा केवळ पांडित्यानें वा विद्वत्तेनें वाढत नाहीं. 'मनसि, वचसि, क्रियायां च' एकरूपता राखणाऱ्या जीवनवीरांच्या निष्ठेनें व त्यागानेंच संसाराची अभंगता व अखंडता टिकली आहे. पूर्वीच्या काळीं हा चारित्र्याचा विकास ब्रह्मचाऱ्याच्या यम-नियमादि परिपालनांतून व इंद्रियजयाच्या शिक्षणांतून साधला जाई. आजच्या बदललेल्या परिस्थितींतहि सामूहिक जीवनाच्या विविध अनुभवांतून तो साधावा लागेल. शालेय जगाची ती एक मोठीच जबाबदारी आहे.

## भविष्याची घडण

व्यक्तींची चारित्र्यसंपन्नता हाच समाजाचा भविष्यकाळांतील आधार म्हणावयास हरकत नाहीं. संस्कृति-धनाचा वारसा घेतांना जरी भूतकाळाकडे तोंड वळलेलें असलें, तरी शिक्षणाचा खरा संबंध भविष्यकाळाशींच आहे. आजचीं बालकें उद्यांचे नागरिक असल्यानें त्यांची कार्यक्षमता वाढविणें व नागरिकत्वाची जबाबदारी पेलण्यास त्यांना समर्थ करणें हें शिक्षणाचें उद्दिष्ट ठरतें. नागरिकत्वाचें शिक्षण म्हणजे समाजाभिमुख वृत्तीनें केलेली सद्गुणांची जोपासना. शीलसंवर्धन आणि सद्गुणांची जोपासना हीं कांहीं उपदेशानें वा प्रवचनानें अंकुरित होत नाहींत. विशिष्ट परिस्थितींत वा प्रसंगांत होणाऱ्या मानसिक प्रतिक्रियेंतून, अनुभवांतून, सहजप्रवृत्तींच्या उन्नयनांतून तीं निर्माण होतात. त्यासाठीं प्रत्यक्ष प्रसंग, संधि हव्या असतात. शाळेंतील सर्व उपक्रमांत अशा संधि निर्माण होतील याची दक्षता घेतली पाहिजे. वर्गांतील बौद्धिक विषय असोत, क्रीडांगणावरील खेळ असोत, अभ्यासेतर कार्यक्रम असोत, वाचनालयाचा उपयोग असो वा एखाद्या शालेय कार्यक्रमांत साधी प्रेक्षकाची भूमिका असो, समाजाचे घटक म्हणून कसें वागावयाचें, जबाबदारी कशी ओळखावयाची व पार पाडावयाची, इतरांच्या इच्छांना कसा मान द्यावयाचा, त्यांची सोय कशी बघावयाची, त्यासाठीं स्वार्थाला कशी मुरड घालावयाची, मतभेद निर्माण झाला तर देवाणघेवाण करून तो कसा मिटवावयाचा याचें प्रत्यक्ष शिक्षण मिळेल हें पाहिलें पाहिजे. या दृष्टीनें शाळा ही नागरिक शिक्षणाची एक प्रयोगभूमिच आहे.

शाळेंत येणारीं बालकें विविध प्रवृत्तींचीं असतात. त्यांची मनोरचना भिन्न भिन्न असते. स्वभावधर्म वेगवेगळे असतात. विकारोर्मींची तीव्रता कमीअधिक असते. कोणी बुजरे असतात, कोणी भित्रे असतात. कोणी आक्रमक असतात, कोणी अचपळ असतात. कोणी अबोल व शान्त असतात, कोणी बडबडे व चंचल असतात. कोणाला एकच गोष्ट नीट मन लावून करावीशी वाटते. कोणाला साऱ्याच गोष्टींत चवढव करण्याची संवय असते. कोणाला खेळच आवडतात; कोणाला हस्तव्यवसायाचें आकर्षण असतें. कोणी पुस्तकी जगांत रमतात. समाजाच्या भिन्नभिन्न थरांतून हीं बालकें येतात. घरच्या चालीरीति, भाषा, आणि सामाजिक जीवनाच्या कल्पना या सर्वांचे संस्कार त्यांच्यावर झालेले असतात. शाळेचा समाज हा बहुरंगी व बहुढंगी असतो.

पण हीं मुलें म्हणजे कांहीं ओल्या मातीचे गोळे नव्हत, कीं हव्या त्या छापाचे, बुद्धीचे आदर्श 'गणपति' वा शरीरबलाचे आदर्श 'मारुति' त्यांतून निर्माण करतां येतील. प्रत्येकाचें वेगळेंपण नाहींसें करून कृत्रिम व निर्जीव एकसारखेपणा निर्माण करणें हें शिक्षणाचें ध्येय नव्हे; तर प्रत्येकाच्या व्यक्तित्वाचे स्वतंत्र पैलू कायम ठेवून, सामाजिक जीवनाच्या आणि व्यक्ति-विकासाच्या दृष्टीनें या कंगोऱ्यांत जेवढा संघर्ष येत असेल तेवढ्या कडा घासून पुसून त्यांच्यांत परस्पर संवादी व सुखमय वातावरण निर्माण करणें हें ध्येय होय. सामाजिक व्यवहारांत हट्ट–दुराग्रह चालत नाहीं, आपलेंच घोडें सारखें दामटतां येत नाहीं, कोणत्याहि गोष्टीचा मक्ता एकट्यालाच असत नाहीं. हें सर्व अनुभवानें कळावयाचें असतें. शाळेचें वातावरण अशा सामाजिक अनुभवांना पोषक ठरलें पाहिजे. वेळोवेळीं आपल्या वागणुकींत, दृष्टिकोणांत सारासार विवेकानें असे फेरबदल करावे लागतात. त्यासाठीं मनाचा लवचिक-पणा, विचारक्षमता, परिवर्तनक्षमता या गोष्टी विद्यार्थ्यांमध्यें येतील असें वातावरण हवें.

## सामाजिक आदर्श

शाळेचा सामाजिक आदर्श हा बाहेरील विशाल राष्ट्रीय वा सामाजिक जीवनापासून अलग करतां येणार नाहीं. तो आदर्श, विचारवंत वा संत समाजाचे किंवा राष्ट्राचे प्रभावी नेते निर्माण करतात. त्यांची जोपासना प्रथम शाळेंत करावयाची असते. म्हणूनच शिक्षकांना 'सामाजिक स्थापत्य-विशारद'

म्हटलें जातें. हे आदर्श जितके व्यापक, उन्नत व सखोल असतील, तितकी राष्ट्राच्या संस्कृतीची उंची वाढेल व तिचें स्वरूप भरीव होईल.

शाळेंत श्रेष्ठतम आदर्शांची जोपासना होऊन त्यावर दृढ निष्ठा बसेल, त्याविषयीं 'स्थिरभाव' निर्माण होईल, तेव्हांच समाजांतील दोषांबद्दल घृणा निर्माण होऊन त्यांचें अनुकरण टळेल. शिक्षणाच्या द्वारां आपल्याला हवी असेल तशी नवी पिढी निर्माण करतां येते याचा जगाला अनेकदां अनुभव आला आहे. ब्रिटिशांनीं एके काळीं आपल्या साम्राज्याचें संरक्षण व संवर्धन करूं शकेल अशी दमदार 'राज्यशासकां'ची पिढी आपल्या शिक्षणसंस्थांतून निर्माण केली. जर्मनीनें अतिरेकी राष्ट्राभिमानाच्या व वंशाभिमानाच्या कल्पनांनीं भारलेली व कठोर शिस्तीच्या तालमींत वाढवलेली एक तरुण पिढी रणांगणावर खडी केली, आणि शिक्षणाचा प्रभाव पर्यायानें केवढा पडतो याचें प्रत्यंतर दाखविलें. हल्लींच्या काळांत जागतिक युद्धांचा अनर्थ, त्याच्या मुळाशीं असलेली वर्णविद्वेषांची अहंकारी वृत्ति, व्यापारी जगाची असह्य चुरस, व्यक्ति-स्वातंत्र्याच्या नांवाखालीं चाललेली धनिकशाहीची वाढ व विषमता, धर्माभिमानाच्या कोत्या समजुतींतून निर्माण होणारी असहिष्णु वृत्ति, भौतिक सुखाच्या लालसेपायीं जीवनांतील उदात्त व उदार प्रवृत्तींचा होणारा नाश—इत्यादि गोष्टी पाहिल्या कीं सर्व समाजाची व शिक्षणाची नवीन पायावरच उभारणी करण्याची कशी गरज आहे याची कल्पना येते.

ही नवीन रचना सर्वांचें सहकार्य, सर्वांत बंधुभाव, सर्वांच्या व्यक्तित्वाचा आदर, सर्वांना समाजांत सारखें स्थान, सर्वांना समान संधि—थोडक्यांत समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, आणि न्याय या चतुःसूत्रीवर, सर्वोदयाच्या व्यापक भूमिकेवरच होईल. लोकशाही ही आजच्या काळाची जीवननिष्ठा आहे आणि तिचाच आदर्श शिक्षणसंस्थांनीं पुरस्कारला पाहिजे.

## शालेय समाजाच्या मर्यादा

समाज आणि घर यांच्यामधील शाळा हा एक दुवा आहे असें मागें म्हटलें आहे. त्यामुळें शाळेच्या कार्याला कांहीं मर्यादा आपोआपच पडतात. शाळेच्या बाहेर विद्यार्थ्यांच्या जीवनांतला बराच वेळ जातो, आणि त्यांत बराचसा घरीं

जातो. गृहजीवनाच्या संस्कारांना पहिलें व महत्त्वाचें स्थान आहे; आणि गृहाची जागा शाळा; कधींच घेऊं शकत नाहीं. जोंपर्यंत समाज-जीवन सुटसुटीत होतें तोंपर्यंत बालकाच्या शिक्षणाची सारी जबाबदारी घरावरच होती. पण समाज-जीवन गुंतागुंतीचें झाल्यावर व ज्ञानाचीं क्षेत्रें विस्तृत झाल्यावर घराला ती जबाबदारी पार पाडणें अशक्य झाल्यानेंच समाजपुरुषानें 'शाळा' ही संस्था निर्माण केली. या बदललेल्या परिस्थितींत शाळेनें गृहाशीं संबंध कसा राखावा याचा सविस्तर विचार पुढें होईलच.

शाळा हा एक समाज असला, व बाह्य विशाल समाजाशीं त्या समाजाला अनुसंधान राखावयाचें असलें, संवाद ठेवायचा असला, तरी या समाजाचीं कांहीं वैशिष्ट्यें आहेत. 'शाळा म्हणजे समाजाची अल्प प्रतिमा' असें विचारवंत म्हणतात, त्याचा अर्थ मर्यादित घ्यावयास पाहिजे. शाळेचें बाहेरच्या समाजाशीं साम्य एवढ्याच बाबतींत कीं, आचार-विचारांचे आदर्श, रीतिरिवाज व्यापक जीवनापासून भिन्न असणार नाहींत. व्यक्तीच्या, मग ती व्यक्ति विद्यार्थी असो वा शिक्षक असो, विकासाला भरपूर वाव मिळेल, तिची कुचंबणा केली जाणार नाहीं, विकास कुंठविला जाणार नाहीं; पण शाळेला बाह्य समाजाचें तंतोतंत अनुकरण करून चालणार नाहीं. उलट बाह्य समाजांत शिरलेले दोष भविष्यकाळांत कसे टळतील याचीच जागरूकतेनें काळजी घेतली पाहिजे. शालेय समाज व वातावरण या दृष्टीनें थोडें कृत्रिम म्हणा वा अस्वाभाविक म्हणा,राहणारच. शाळेच्या वातावरणांत विशिष्ट संस्कारांचें बाळकडूं देण्यासाठीं तें वातावरण प्रयत्नपूर्वक उच्च पातळीवर राखावेंच लागेल. म्हणूनच राष्ट्रांतील शिक्षणसंस्था राष्ट्रीय जीवनाचें महान् साधन होत आहे. राष्ट्राची आध्यात्मिक शक्ति सुसंघटित करणें, कार्याची परंपरा अखंड चालू ठेवणें, भूतकाळांतील गौरवशाली कार्य आत्मसात् करणें, आणि भविष्याबद्दलची ग्वाही देणें हें या संस्थेचें विशिष्ट कार्य आहे.

आजपर्यंतचें समाज-जीवन व राष्ट्रीय-जीवन कोणत्या तत्त्वांमुळें, शक्तीमुळें जीव धरून राहिलें, उमललें, विकसित झालें; राष्ट्रांत नांदणाऱ्या उत्कृष्ट व श्रेष्ठ परंपरांचें बीज कशांत आहे; थोर विभूतींनीं ज्या ध्येयासाठीं आपलें जीवन अर्पण केलें व आवाळून टाकलें, तीं ध्येयें कोणतीं आहेत यांचा

साक्षात्कार शाळेच्या द्वारांच समाजाला होईल. आणि आजच्या काळांत त्यांतील काय राखावयाचें व काय टाकावयाचें याचा विवेकहि तेथेंच होईल.

## कर्तृत्ववान् नागरिकत्वाचें शिक्षण

शाळांमधून विद्यार्थी बाहेर पडतांना तो चारित्र्यसंपन्न असावा हें मागें म्हटलेंच आहे. याचा अधिक विचार व त्याची दिशा पुढें येईल. पण तो कर्तृत्ववान् होण्यासाठीं कोणते विषय शाळेंत शिकविले जावेत असा मुद्दा उपस्थित होतो. त्याचा थोडक्यांत परामर्श घेतला पाहिजे.

आजपर्यंत शाळेंत केवळ बौद्धिक व पुस्तकी शिक्षणावर भर दिला गेला. पूर्वीच्या काळांत विद्वत्ता आणि व्यवहार यांची फारकतच होती, किंवा विद्वत्ता व पांडित्य हाहि एक पेशाच होता; प्राचीन धर्मग्रंथ, पुराणें, वाङ्मय व शास्त्रें यांची जपणूक करणारा वर्ग अलग होता. प्रत्यक्ष समाजधारक–पोषक असे व्यवसाय करणारे कारागीर व कलावन्त वेगळे होते. पण समाजांत विभागलेलें चातुर्वर्ण्य आतां प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं विकसित होणें हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे, आणि लोकशाही युगाचा धर्म आहे. बौद्धिक व शारीरिक सामर्थ्य, उदरंभरणाची पात्रता, व श्रमाची शक्ति व हौस यांच्या समग्र, एकरूप व समतोल विकासानेंच व्यक्तिजीवन समृद्ध व सफल होईल.


तेव्हां बौद्धिक व शारीरिक शिक्षणाला व्यावसायिक शिक्षणाची जोड किती व कशी द्यावयाची असा प्रश्न उपस्थित केला जातो. शिक्षणशास्त्रांतला अगदीं अद्ययावत् विचार म्हणजे सर्वच शिक्षण उद्योगद्वारां, कृतिमूलक असलें पाहिजे, समाजजीवनाशीं तें निगडित असलें पाहिजे. तरच मस्तक, हात आणि हृदय—बुद्धि अथवा विचारशक्ति, कौशल्य आणि भावना यांचा एकसमयावच्छेदें विकास होईल. संस्काराचें शिक्षण अथवा सांस्कृतिक शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण हें द्वैत नष्ट झालें पाहिजे.

त्यासाठीं तरी शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या विषयांना जीवनसंपर्क साधला पाहिजे. शाळेंत एखादा उद्योग शिकवण्याची सोय हवी. बौद्धिक विषयांची प्रत्यक्ष जीवनाशीं सांगड घातली जावी. जीवनांतील गरजांतून—प्रश्नांतून बौद्धिक ज्ञानाची गरज निर्माण व्हावी. व्यवसायकेंद्रें आणि शाळा यांच्यांत सहकार्य व संघटन निर्माण व्हावें. मात्र शाळेंतून खास विशिष्ट व्यवसायासाठीं

तयारी करावी असें कोणी म्हणत नाहीं. तर उत्कृष्ट व्यावसायिक शिक्षणाला लागणारी पूर्वतयारी—इंद्रियांचा कौशल्यपूर्ण उपयोग, विशिष्ट व्यवसायांकडे असलेल्या वृत्तीचा आविष्कार, अंगमेहनतीची हौस—कां व कसें जाणून घेण्याची इच्छा हीं निर्माण व्हावींत. सांस्कृतिक व व्यावसायिक शिक्षणांत मेळ साधूनच शाळा व समाज अधिक निकट येऊं शकतील.

## सामाजिक शिक्षणाचें केंद्र

शाळा व समाज यांतील अंतर भरून काढावयाचें असेल तर शाळा अथवा विद्यामंदिर हें सामाजिक शिक्षणाचें केंद्र बनावें. गांवाच्या गरजा, विकासाच्या उन्नतीच्या वांटा व दिशा ठरविणें, कृतींत उतराविणें, या बाबतींत शाळा व समाज यांच्यांत सहकार्य असावें. समाजाचें आरोग्य, विविध व्यवसाय, यांना शाळांत येणाऱ्या आधुनिक ज्ञानप्रवाहाची जोड मिळावी. समाजजीवन ज्या गोष्टींवर आधारलें आहे, त्या त्या क्षेत्रांत आपलें ज्ञान पारखून घेण्यासाठीं व सहकार्य-सेवा यांचें शिक्षण घेण्यासाठीं नव्या पिढीला संधि मिळावी. प्रौढांना आपला ज्ञानाशीं संबंध टिकविण्यासाठीं, वाचनालय, रेडिओ इ. द्वारां त्यांत भर घालण्यासाठीं शाळा हें केंद्र उपयोगी पडावें. सांस्कृतिक व मनोविनोदाच्या कार्यक्रमासाठीं समाज व शाळा एकत्र येऊन समाजाचा उत्साह व कार्यशक्ति टिकाऊ होण्यास व समाजांत नव्या उत्साहाचें वारें खेळण्यास शाळेनें साहाय्य द्यावें.



: ३ :

# शिक्षक

## प्राचीन परंपरा

विद्यादान करणाऱ्या गुरूची योग्यता व थोरवी या देशांत पूर्वी किती होती हें सामान्य जनतेलाहि परिचित आहे. गुरु म्हणजे 'साक्षात् परब्रह्म' अशी एके काळीं लोकांची श्रद्धा होती. ज्ञानार्जनाचें व विद्यादानाचें कार्य निष्काम बुद्धीनें व समाजकल्याणाच्या वृत्तीनें करणाऱ्या आचार्यांच्या चरणावर जनता श्रद्धायुक्त अंतःकरणानें नम्र होई. विद्या म्हणजे अज्ञानतिमिराचा नाश करणारी दीपज्योति, अज्ञात भविष्याचा मार्ग उजळणारी मंगल प्रभा—अशी दृष्टि असल्यानें गुरूच्या उपदेशाचा लाभ म्हणजे एक ईश्वरी वरदान वाटे. ज्या काळांत ज्ञानप्रसाराचीं साधनें अल्प होतीं, त्या काळांत पूर्वेतिहास, विद्या व कला यांची निष्ठापूर्वक जपणूक करून संस्कृतीचा प्रवाह अखंड राखणाऱ्या वर्गाबद्दल कृतज्ञता वाटणें स्वाभाविक होतें. पण त्याहिपेक्षां ज्ञानोपासनेचें कार्य ज्या निःस्वार्थ, निष्काम बुद्धीनें, निरलसतेनें व निष्ठेनें चाले, त्यांतून सामान्य जनतेला जो सदाचाराचा आदर्श मिळे, आणि रावाराजांना नैतिक जीवनाची प्रेरणा लाभे, ती बुद्धि, ती निष्ठा, ते आदर्श, आणि ती प्रेरणा जीवनोपकारक असल्यानें या ज्ञानोपासकांच्या भव्यपणाचें आकर्षण समाजाला वाटे. त्यांच्या सखोल चिंतनांतून व विचारमंथनांतून निर्माण होणाऱ्या तत्त्वांत जीवनांतील समस्या, सामाजिक विचारांचीं प्रमेयें उलगडण्याचें सामर्थ्य असे; आणि म्हणून समाजाचें वैचारिक नेतृत्व करणाऱ्या तपोधन व चारित्र्यधन मुनि–महर्षींना जनता वंदनीय म्हणूनच नव्हे—'गुरूणां गुरुः' लेखी.

शास्त्रें, विद्या आणि कला हीं संस्कृतीच्या ओघांत जन्मत असलीं तरी पर्यायानें संस्कृतिसंरक्षणाचें कार्य तींच करतात. जीवनाशीं त्यांचा निकटचा संबंध लक्षांत घेतां त्यांची गुरुकिल्ली ज्यांच्या हातीं असे, आणि नवपिढीला या प्रवाहांत आणून सोडण्याचें व तो प्रवाह संतत राखण्याचें निकट व

महनीय कार्य ज्यांच्याकडून होतें त्यांचा प्रभाव समाजावर पडणें स्वाभाविक आहे.

## मध्यंतरींचा काळ

पण कालौघांत ही दृष्टि लोपली व परंपरा लुप्त झाली, ज्ञान-विज्ञानाची जीवनाशीं फारकत झाली, आणि विद्या पांडित्याच्या महावस्त्रांत नटून पोकळ डौलानें पालखींतून मिरवूं लागली. तरीहि भारलेल्या भोळ्या जनतेनें अंध श्रद्धेनें व खोट्या आशेनें त्यांची प्रतिष्ठा कांहीं काळ मानली. पण अखेर अधःपतित झालेल्या समाजव्यवस्थेंत ज्ञान ही विक्रेय वस्तु ठरली. तिच्या प्राप्तीनें दोनचार परीक्षा देतां येतात व मानाच्या नोकऱ्या पत्करतां येतात असें दिसून आलें, जीवनमूल्यांत बदल झाला आणि समाजसूत्रें धनिकांच्या हातीं गेलीं, तेव्हां शाळेचें व शिक्षकांचेंहि महत्त्व कमी झालें. समाजयंत्र चालविणाऱ्या कारखान्याप्रमाणें शाळा हा एक कारखाना ठरला. कामाचे मोजके तास, भरपूर सुट्या, वेताचीच जबाबदारी, फावल्या वेळांत अन्य व्यवसाय करून प्राप्तींत भर टाकण्याची शक्यता, इत्यादि गोष्टींनीं हा व्यवसाय म्हणजे नवस्नातकांचें आशास्थान बनलें. दोनचार पुस्तकें वाचावयाचीं, व त्यांतील ज्ञान विद्यार्थ्यांच्या डोक्यांत उतरवून परीक्षेपर्यंत तें त्यांच्या डोक्यांत टिकवावयाचें, हीच अध्यापनाबद्दलची समजूत झाल्यानें हें काम सर्वांत सुलभ ठरलें, आणि कारकुनी नोकरी मिळाली नाहीं कीं या पेशांत पडावयाचें असा क्रम ठरून गेला. शिक्षक व्हावयाला जिणुं कोणत्याच पात्रतेची गरज लागत नाहीं असा समज बळावला, आणि 'मागतां येत नाहीं भीक, तर मास्तरकी शीक' असा भिक्षेपेक्षां निकृष्ट पण सन्मान्य उदरंभरणाचा मार्ग म्हणून हा व्यवसाय मानला गेला.

पण शिक्षणविषयक ध्येयांत, विचारप्रणालींत व अध्यापनपद्धतींत झालेल्या व होत असलेल्या आमूलाग्र क्रान्तीमुळें शिक्षकाचें कार्य, दर्जा, प्रतिष्ठा व अधिकार या बाबतींतहि नवीन विचार पुढें आले आहेत. नवयुगांतल्या शिक्षकांकडून महान् कार्याची अपेक्षा आहे.

## नवयुगांतील शिक्षकांची जबाबदारी

आजच्या युगांत शिक्षकाचें महत्त्व व प्रतिष्ठा समाजाला पुनः पटूं लागली आहे. आजचें युग वास्तविक पाहिलें तर यंत्राचें नाहीं. विचार-

कल्पनांचें हें युग आहे; आणि विचार–कल्पनांच्या प्रसाराला व प्रचाराला यंत्रानें वेग व तीव्रता आणलीं आहेत. जीवनांत विचार हा नेहमींच प्रभावी ठरत असतो. त्यामुळें दोन महायुद्धांत होरपळून निघालेल्या जगाला समाजाची रचनाच नव्या पायावर व नव्या मूल्यावर व्हावी असें वाटूं लागतांच शाळेकडे त्याची दृष्टि वळली. शाळेंतच नव्या विचाराचें बाळकडू जर बालकांना मिळेल, नव्या ध्येयाचे संस्कार त्यांच्या मनावर होतील तरच नव्या समाज-निर्मितीची आशा आहे, असें विचारवंतांना मनापासून वाटूं लागलें आहे. भारतांतहि नवभारताचा शिल्पकार म्हणून नेते शिक्षकांकडे आशेनें पाहात आहेत. शिक्षक नवविचाराचा जितका प्रसारक तितकाच निर्माताहि आहे, आणि नवसमाज-निर्मितींत त्याला अग्रस्थान आहे. शिक्षक हा 'मानव-विधाता' आहे. समाजजीवनाचें सुकाणूं त्याच्याच हातीं आहे; आणि नव्या पिढीचें नेतृत्व त्यालाच करावयाचें असतें. या गोष्टी लक्षांत घेतां शिक्षक ही व्यक्ति किती प्रभावी असली पाहिजे याची कल्पना येईल.

## व्यक्तिमत्त्व आणि शिक्षण

बालकांच्या शिक्षणांत शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाला फार महत्त्वाचें स्थान आहे. कारण "शिक्षण म्हणजे दोन व्यक्तिमत्त्वांतील परस्पर क्रिया-प्रति-क्रिया." बालकांच्या मनावर शिक्षकाचा दृष्टिकोण व चारित्र्य यांचा अगदीं नकळत ठसा उमटतोच. शिक्षक कोणताहि विषय शिकवो, त्याच्या पद्धतींत त्याचीं जीवनमूल्यें प्रकट होतातच. शिक्षकांनीं प्रत्यक्ष आचार-विषयक कल्पना दिल्या न दिल्या तरी शिक्षकांचें अनुकरण विद्यार्थी करतात. अनुकरण, सूचना, सहानुभव इत्यादि बालकांच्या मनःशक्ति सतत क्रियाशील असतात, व त्यामुळें त्यांच्या चारित्र्याचें शिक्षण चालूच असतें. त्यांच्या कोमल भाव-भावनांवर आघात होतात, त्यांत परिवर्तन होतें, व त्यांची गुंफण नव्यानव्यानें होत असते. शिक्षणाची मानसिक प्रक्रिया अति नाजुक व गुंतागुंतीची आहे, आणि म्हणून शिक्षकानें आपल्या व्यक्तिमत्त्वाबद्दल दक्ष असलें पाहिजे.

## व्यक्तिमत्त्वाचे कांहीं पैलू

व्यक्तिमत्त्व म्हणजे अमुकच गोष्ट असें कोणी सांगूं शकत नाहीं. व्यक्तीच्या ठायीं वसत असलेल्या विविध गुणांचा साकल्यानें पडणारा प्रभाव, असें

त्याचें स्वरूप सांगतां येईल. शिक्षकांच्या ठिकाणीं कोणकोणते गुण असावेत याबद्दल पाश्चात्य देशांत कांहीं संशोधन झालें आहे त्याचें सार असें : शिक्षकाच्या ठिकाणीं चापल्य असावें; त्याचा व्यासंग दृढ असावा; त्याच्या ठिकाणीं तळमळ, सहानुभूति आणि निःपक्षपाती दृष्टि यांचा प्रकर्षानें आढळ व्हावा. तसेंच शिक्षकाच्या ठिकाणीं उत्साह ओसंडत असावा. त्याचा आवाज मधुर, वृत्ति आनंदी व आशावादी असावी; आणि पुढारीपण स्वतःकडे चटकन् खेंचून घेण्याची पात्रता त्याच्याजवळ असावी. तसेंच, सौजन्य आणि प्रेमळपणा व थोडी विनोदबुद्धि यांचीहि त्याला देणगी असावी. कांहींच्या मतें शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वांत बुद्धीच्या गुणापेक्षां—हुशारी, धूर्तता, व्यासंग इत्यादींपेक्षां—त्याच्या आन्तरिक सद्गुणांना, हृदयधर्मालाच विशेष स्थान आहे. 'प्रकृत्या कल्याणी मतिः' आणि 'मधुरो वाचि नियमः' हें भवभूतीनें सज्जनांचें केलेलें वर्णन शिक्षकांच्याहि गुणांचें उत्कृष्ट वर्णन म्हणतां येईल.

शिक्षकाचें कार्य म्हणजे केवळ व्यवहार, व्यवसाय, वा पेशा नाहीं; ती एक जीवननिष्ठा आहे. समाजांतला प्रत्येक व्यवसाय प्रामाणिकपणें, नेकीनें व कर्तव्यबुद्धीनें करावयाचा असतो; व प्रत्येक व्यवसाय समाजकल्याणाला पोषक व साधनीभूत असेल तर आपल्यापरीनें पवित्रच असतो. पण शिक्षकाच्या कार्यांत सारें जीवनच घडावयाला साहाय्य करावयाचें असल्यानें जीवनविषयक मूल्यांशींच त्याचा संबंध येतो. शिक्षकाच्या कार्याचे परिणाम दूरगामी असतात. बाह्य भौतिक जीवनापेक्षां त्याचा आन्तरिक जीवनाशीं, भावविश्वाशीं अधिक संबंध येतो. त्यामुळें जीवनाला अंतिम प्रयोजन आहे, प्रत्येक व्यक्तीला कांहीं विशिष्ट कार्य आहे, तिच्या ठिकाणीं सामर्थ्यांचीं सुप्त बीजें आहेत, व त्यांचा विकास विविध दिशांनीं होणें शक्य आहे, यावर त्याची निष्ठा असली पाहिजे. मानव्यावर त्याची श्रद्धा असली पाहिजे, सत्प्रवृत्तीवर विश्वास पाहिजे, आणि त्या वृत्ति जागृत व विकासित करण्यासाठीं त्याच्याजवळ दुर्दम्य आशावाद व चिकाटीहि पाहिजेत.

या सर्व गोष्टींचा नीट उलगडा होण्यासाठीं शिक्षकाला शैक्षणिक तत्त्वज्ञानाशीं परिचय ठेवायला हवा. जीवशास्त्र व मानसशास्त्र यांच्या सिद्धान्तांची ओळख हवी. ज्या समाजांत व संस्कृतींत त्याला वावरायचें तिचा इतिहास ठाऊक हवा. आपल्या परंपरा, आचार, विचार, नवीन आन्दोलनाची दिशा,

त्यामागील प्रवृत्ति ह्याहि त्यास अवगत हव्यात. त्यासाठीं शिक्षकाचीहि वैचारिक पातळी उच्च दर्जाची हवी.

शिक्षकाला ज्या जगांत वावरायचें असतें त्या बालकांच्या जगांत त्याला विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. माता, मित्र आणि मंत्री या भिन्न भिन्न भूमिका त्याला कालपरत्वें घ्याव्या लागतात. म्हणून प्रथमतः शिक्षकाच्या ठिकाणीं सहृदयता, कल्पकता आणि गाढ सहानुभूति हे गुण प्रकर्षानें असले पाहिजेत. बालकांचीं मनें त्याला समजून घेतां आलीं पाहिजेत. 'बाल-मानस' शास्त्र त्यानें निरीक्षणपूर्वक शिकलें पाहिजे. त्यांच्या आशाआकांक्षांशीं त्याला समरस होतां आलें पाहिजे. त्याच्या मोहक आणि विलोभनीय व्यक्तित्वामुळें त्याच्याबद्दल विश्वास निर्माण झाला पाहिजे. त्याच्या प्रसन्न व सहास्य मुद्रेनें भोंवतालचें वातावरण उल्हसित व्हावें, त्याच्या आत्मविश्वासानें धीर वाटावा, आणि सहानुभूतीच्या ओलाव्यानें स्नेहाची लालसा निर्माण व्हावी. त्याच्या विद्वत्तेबद्दल आदर वाटावा, आणि त्याच्या चारित्र्याचा ठसा मनावर बिंबून त्याचा आदर्श नकळत गिरवला जावा. शिक्षकाची सस्नेह वागणूक, विद्यार्थी-जीवनांत—त्यांच्या सुखदुःखांत लक्ष घालण्याची तळमळ, त्याची सेवाशील वृत्ति, विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल कळकळ, सर्वांशीं समानतेची वागणूक, त्याची समयज्ञता आणि चातुर्य, त्याचें क्रीडा-प्रेम, त्याचे छंद—या सर्वांना विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें फार मोल आहे.

अध्यापनाच्या दृष्टीनें पाहतां शिक्षकाला स्वतःच्या आवडीच्या विषयाचें सखोल ज्ञान असणें ही पहिली पायरी झाली. पण त्याखेरीज आजूबाजूच्या व अन्य संलग्न विषयांचेंहि ज्ञान त्याला असावयास पाहिजे. शिक्षण हें कृतिशील, उद्योगकेंद्रित असावें; तरच तें जीवनोपयोगी ठरेल हें लक्षांत घऊन त्याला एखाद्या मूलोद्योगाची चांगली माहितीहि हवी; पण हें ज्ञान पुरेसें नाहीं. अध्यापनाच्या कलेंत तो निष्णात असावयास हवा. आणि ही कला पूर्व-अभ्यासानें, निरीक्षणानें व अनुभवानें त्यानें आत्मसात् केली पाहिजे. थोडी चित्रकला, थोडें अभिनयचातुर्य, कांहींशी कल्पकता, व शास्त्रीय दृष्टि या सर्वांची उत्कृष्ट शिक्षकाला गरज आहे. आपला आवाज, आपला हात, आपलें ज्ञान व आपलें व्यक्तित्व, आपलें प्रेम व प्रसंगाविशेषीं आपला रागाहि, या सर्व साधनांचा चतुराईनें उपयोग करील तोच खरा शिक्षक.

आत्मविश्वास, उद्योगशीलता आणि आत्मीयता यांच्या जोरावरच कुणालाहि उत्कृष्ट शिक्षक होतां येतें.

## हक्क व जबाबदारी यांबद्दल जागरूकता

नेमणूक होण्यापूर्वी किंवा होतांच शिक्षकानें आपल्याला व्यावसायिक जबाबदारी म्हणून वा संस्थेचे घटक म्हणून कोणत्या नियमांचें पालन करावें लागणार आहे हें समजून घ्यावें. तसेंच वेतनश्रेणी, कायमपणा इत्यादिबाबत शिक्षणखात्याचे नियम ठाऊक करून घ्यावेत, आणि रजा व इतर सवलती यांबाबत आपले हक्क विचारून घ्यावेत. नोकरी ही एक व्यावहारिक बाब आहे. तीबाबत उभयपक्षीं गैरसमज नसावा. करार स्पष्ट असावेत, व आवश्यक कागदपत्र व्हावेत. काम करतांना शिक्षकांनीं नियमांवर बोट न ठेवतां, दृष्टि ध्येयावर, तत्त्वावर असूं द्यावी; वृत्ति समंजसपणाची, सहकार्याची, तडजोडीची राखावी, हें खरें; पण ज्या गोष्टी व्यवहार म्हणून आवश्यक आहेत, त्या त्यांनीं टाळूं नयेत व अज्ञानांत राहूं नये हेंच उत्तम.

## शिक्षकमंडळाचें स्वरूप

शाळेंतील सर्व शिक्षक-वृन्दांत ऐक्य, आपलेपणा व जिव्हाळा असणें शैक्षणिक मूल्यांच्या दृष्टीनें आवश्यक आहे. सर्व शिक्षकांत खेळीमेळीचें व सहकार्याचें वातावरण असेल तरच शाळेंत नांव घेण्याजोगें कार्य दिसेल. असें वातावरण निर्माण होण्यास वयाची वाडिलकी किंवा पदवीची श्रेष्ठता आड येऊं नयेत.

पुण्यकळशा संस्थांतून आजीव-सेवक-पद्धति आढळते. आज तरी तिचें अधःपतन झालें आहे असें खेदानें म्हणावें लागतें. शैक्षणिक ध्येयांचा ध्यास, त्यागाची तयारी, तळमळ व धडाडी हीं या पद्धतीचीं खरीं वैशिष्ट्यें. सेवा व बंधुभाव हा तिचा प्राण. शिक्षकाचें जीवन ही दीक्षा आहे, या पवित्र भावनेनें, समर्पित वृत्तीनें, 'मिशनरी' दृष्टीनें ही पद्धति पूर्ववत् कार्य करील तर शाळेचें व शैक्षणिक क्षेत्राचें वातावरण बदलून जाईल. स्वतःसाठीं वेगळे नियम, वेगळ्या सवलती, राखीव जागा इत्यादि फुटीरपणा, मत्सर, यांना जन्म देणाऱ्या अनिष्ट प्रवृत्तींना आळा घालण्याची जबाबदारी पार पाडून, खऱ्या सहकार्याचें वातावरण या आजीव सेवकांनीं निर्माण केलें पाहिजे. आपल्या

शैक्षणिक संस्थांत लोकशाही प्रवृत्तींचें नवचैतन्य खेळल्याशिवाय त्यांचा तरणोपाय नाहीं. त्यासाठीं या व्यक्ति चारित्र्यवान्, निष्ठावान् व व्यासंगी हव्यात. योग्यतेनुसार काम व सवलती आणि संधीची समानता यांचा धडा त्यांनीं स्वतःच्या आचरणानें घालून द्यावा.

## शिक्षकाचें दैनंदिन कार्य

शिक्षकाला आपलें कार्य यशस्वी रीतीनें पार पाडावयाचें असेल तर आपल्या दिनचर्येची त्यानें कांटेकोर आंखणी केली पाहिजे. गृहकृत्यें, अध्यापनाची पूर्वतयारी, लेखनतपासणी, शरीरस्वास्थ्य व मनोविनोद या सर्वांची त्यानें व्यवस्थित सांगड घालायला हवी. तसेंच आपल्याकडे अध्यापनासाठीं असलेल्या विषयांची तपशीलवार विभागणी त्यानें करावयास हवी. आपला विषय रंजक, रोचक व सुलभ कसा करतां येईल, विद्यार्थ्यांना अडचणी कोणत्या येतील, त्यांना क्रियाप्रवृत्त करावयास कोठें व कसा अवसर आहे, याचाहि त्यानें आधींच विचार केलेला असावा.

आपला वक्तशीरपणा, नियमितपणा, स्वच्छतेची व टापटिपीची आवड, उद्योगशीलता व छंद या सर्वांचा विद्यार्थ्यांच्या मनावर कळत न कळत ठसा उमटून त्यांचें ते अनुकरण करीत असतात, याची योग्य ती जाणीव शिक्षकांनीं ठेवली पाहिजे. शिक्षक विद्वान् किती आहे यापेक्षां प्रामाणिक व तळमळीचा किती आहे, तो प्रांजळ व निर्मळ किती आहे, आपल्या म्हणण्याचा, कृतीचा तो किती सहानुभूतीनें विचार करूं शकतो, आणि प्रोत्साहन देऊन नवी दिशा दाखवतो यावरच विद्यार्थी त्याची किंमत करीत असतात.

## अन्य जबाबदाऱ्या

पण वर्गांतील अध्यापन एवढेंच शिक्षकाचें कार्यक्षेत्र नाहीं. अभ्यासेतर कार्यक्रम–छंदमंडळें, शालेय स्वराज्य, क्रीडांगण इ. शालेय जीवनाचीं विविध क्षेत्रें आहेत, त्यांतहि शिक्षकानें आपला योग्य तो वांटा उचलला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्यें मिसळून त्यांच्या सदसत्प्रवृत्तींचें निरीक्षण करण्याला तेथेंच खरा अवसर असतो. विद्यार्थ्यांमध्यें सहकार्य, निष्ठा, इमान, आज्ञापालन व जबाबदारीची वृत्ति यांची वाढ तेथेंच व्हावयाची असते. शिक्षकांनीं खरें मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करावयाचें असतें तें अशाच ठिकाणीं.

आजकाल प्रत्येक देशांत शैक्षणिक संघटना जोमानें कार्य करीत आहेत. शिक्षकांची व्यावसायिक प्रगति व प्रतिष्ठा वाढावी म्हणून त्या झटत आहेत. आपल्या व्यवसायाच्या उन्नतीसाठीं झटणाऱ्या वा विचार करणाऱ्या संस्थांचें सामर्थ्य शिक्षकांनीं वाढविलें पाहिजे. शैक्षणिक कार्य करणाऱ्या विविध संस्थांशीं आपले संबंध राखले पाहिजेत. शैक्षणिक जगांत येणारे नवे विचार त्यांनीं समजून घ्यावे; अध्यापनाच्या नव्या पद्धति, नवे प्रयोग यांच्याशीं परिचय राखावा, त्यांचें स्वागत करावें, आणि शक्य तर स्वतःच्या संशोधनाची त्यांत भर घालावी. स्वतःच्या कामाला यान्त्रिकता येऊं न देण्याचा व रुक्षता टाळण्याचा हाच मार्ग आहे. आपलें अनुभव व पद्धति इतरांशीं तोलून त्यांची इष्टता व उपयुक्तता पारखली पाहिजे. परिवर्तन हा जीवनाचा नियम आहे. शिक्षकानें ही वैज्ञानिक प्रगमनशील दृष्टि ठेवली नाहीं तर तो लवकरच रंजून व गंजून जाईल.

शाळेच्या बाहेरहि नागरिक म्हणून शिक्षकाला कांहीं जीवन जगतां आलें पाहिजे. कांहीं सामाजिक व सांस्कृतिक विधायक कार्यांत सामील होण्याचा व व्यवसायाच्या चाकोरींतून बाहेर पडण्याचा त्यानें कटाक्ष ठेवावा. वाचनालय, क्रीडामंडळ, नाट्यमंडळ, अभ्यासमंडळ यांत त्याला भाग घेतां आला तर सामाजिक प्रतिष्ठा वाढविण्यास तें उपकारक ठरेल.

## जगण्याची कला

शिक्षकानें जसा आपल्या दैनंदिन कार्यक्रमाचा विचार करावयाचा असतो, तसाच आपल्या विश्रान्तीचा व करमणुकीचाहि विचार करायला हवा. शिक्षकाला सदैव तरुणच राहावयाचें असतें—मनानें, विचारानें, भावनेनें. त्यासाठीं त्याला विश्रान्तीची, नित्याच्या चाकोरींतून दूर जाण्याची गरज आहे. शिक्षकांनाहि आवडीचा छंद वा कला अवगत असावी – त्यांनीं ती अवगत करून घ्यावी. मोकळ्या हवेंत खेळ, व्यायाम व फिरणें, सहली यांचाहि निदान त्यांनीं परिपाठ ठेवावा. आपल्या व्यवसायाच्या अडचणी, चिंता व जबाबदाऱ्या यांचाच ध्यास धरण्यानें व काथ्याकूट केल्यानें निष्पन्न तर कांहींच होत नाहीं, पण किती तरी सात्त्विक व निरागस आनंदाला व सुखाला आपण मुकत असतों. योग्य अभिरुचीची, रसिकतेची व सम-

तोल विचारांची संघय शिक्षक लावतील तर खिलाडू वृत्तीनें जीवन जगण्याची कला त्यांना सहज साधेल.

## शिक्षक आणि सामाजिक प्रतिष्ठा

समाजांत शिक्षकाला मानाचें स्थान नाहीं अशी ओरड आपल्या देशांत फार झाली आहे. शिक्षकाच्या कार्याची अवगणना आजवर झाली, व आर्थिक दृष्ट्या अवहेलना होत आहे हें खरें आहे. शिक्षकांच्या पेशाचें महत्त्व त्यांची आर्थिक स्थिति सुधारल्यानें वाढेल असें म्हटलें जातें. पण कांहीं अंशींच तें खरें आहे. शिक्षकांनीं स्वतःची किंमत स्वतःच्या पात्रतेनें, कष्टानें व स्वाभिमानानेंच मिळविली व राखली पाहिजे. शिक्षकांनीं पुस्तकी जगांत एकलकोंडेपणें जगून अव्यवहार्यता, चावळटपणा इत्यादींचे आरोप तरी ओढवून घेतले, किंवा लाचारी व गुंडगिरी करून आपली नैतिक पातळी कमी झाल्याचें सिद्ध केलें. परकीय राजवटीचे दुष्परिणाम म्हणून ते सोडून देऊं या. स्वतंत्र राष्ट्रांत तरी निर्भयतेची, स्वतंत्र विचाराची, स्वाभिमानी वृत्तीची व त्याचबरोबर उद्योगशीलतेची आणि सेवावृत्तीची शिक्षकांनीं कांस धरून नव्या पिढीचें नेतृत्व करण्याची आपली जबाबदारी सिद्ध केली पाहिजे. आपण समाजाचें खरेंखुरें प्रतिनिधित्व करीत आहोंत, हें त्यांनीं समाजाला पटवून द्यावें. शिक्षक विद्यार्थ्यांना नेहमीं सांगत असतात, 'लायकी सिद्ध करा, मान आपोआप मिळेल.' हाच न्याय शिक्षकाला लागू आहे. जातिवंत शिक्षक मात्र 'मानापमानयोस्तुल्यः' राहून आपल्या कार्याच्या विकासांतच संतृप्त राहील.

• • •

: ४ :

# मुख्याध्यापक

## प्रास्ताविक

शाळेच्या व्यवस्थेचें आणि संचालनाचें कार्य अतिशय जबाबदारीचें, कौशल्याचें तसेंच नाजुकहि आहे. एका बाजूनें समाजाची चिकित्सक दृष्टि, दुसऱ्या बाजूनें शिक्षणाधिकाऱ्यांची करडी नजर, एका बाजूनें बालक-शिक्षकांचे गुंतागुंतीचे स्वभाव व आशाआकांक्षा, आणि दुसऱ्या बाजूनें पालक-व्यवस्थापकांच्या आर्थिक अडचणी व अपेक्षा, अशा चारी बाजूंनीं कोंडींत सांपडलेल्या माणसासारखी शाळेच्या मुख्याध्यापकांची स्थिति असते. आणि म्हणून मुख्याध्यापक-पद विभूषित करणारी अथवा ती जबाबदारी उचलणारी व्यक्ति व्यक्तिमत्त्वपूर्ण, ज्ञानसंपन्न व चतुरस्र असली पाहिजे.

## जबाबदारींचें स्वरूप

शाळेचे मुख्याध्यापक म्हणजे शाळेचे कर्णधार. शाळेच्या व्यवस्थेचीं, नियमनाचीं व मार्गदर्शनाचीं सारीं सूत्रें त्यांच्याच हातीं असतात. शाळेंत रूढ असलेल्या परंपरांची जपणूक करण्याचें काम त्यांचेंच, आणि नवा पायंडा पाडून विकासाच्या नव्या मार्गांनीं सर्वांना पुढें नेण्याचें सामर्थ्यहि त्यांचेंच. शाळेच्या भविष्याबद्दल त्यांनाच जबाबदार धरण्यांत येतें. शाळेची बौद्धिक उंची, सामाजिक दर्जा आणि नैतिक पातळी त्यांच्याच प्रयत्नाचें फळ समजण्यांत येतें. शाळा सुंदर व आदर्श होणें न होणें हें त्यांच्याच दृष्टिकोणावर, कार्यपद्धतीवर व नीति-रीतीवर अवलंबून असतें. अनेक बालकांचें आणि पर्यायानें स्वतःचें भाग्य-भवितव्य समाजानें त्यांच्या हातीं विश्वासानें दिलेलें असतें. आणि म्हणून सर्व शालेय व्यवस्थेंत मुख्याध्यापकांचें स्थान कमानींतील मध्यच्याप्रमाणें मानण्यांत येतें.

## व्यक्तिमत्त्वाचे कांहीं पैलू

वरील प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठीं मुख्याध्यापक-पदावर असणारी व्यक्ति मोठ्या तोलाचीच असली पाहिजे. शालेय कार्य हें एक

सामुदायिक व सामाजिक कार्य आहे. ध्येयवादित्व व व्यवहार यांची त्यांत अपूर्व सांगड आहे. त्याची यशास्विता – सहकार्य व नेतृत्व, कार्यकुशलता आणि चातुर्य यांवर अवलंबून आहे. म्हणून मुख्याध्यापकांच्या ठिकाणीं अपेक्षित असलेल्या गुणांचा विचार नीट झाला पाहिजे.

**१. अनुभवसंपन्नता :**

मुख्याध्यापक होण्यापूर्वी शिक्षक व उपप्रमुख या नात्यानें काम केलेल्या व्यक्तीलाच शाळेच्या अंगोपांगांची व व्यापाची कल्पना येऊं शकेल. शिक्षक या नात्यानें काम करतांना अध्यापन-कार्याबरोबर एखादें खातें शिक्षकांना सांभाळावेंच लागतें. उपस्थिति-पत्रक, प्रगतिपत्रकें इत्यादि कामेंहि करावीं लागतात, आणि 'सेवाधर्मा'च्या 'गहनरणा'ची कल्पना आलेली असते. तसेंच शाळेच्या कामाचीं विविध खातीं, त्यांच्या कार्याचा तपशील, त्यांतील संभाव्य अडचणी इत्यादि माहिती मुख्याध्यापकांना हवी. तसेंच शालेय क्षेत्रांत वा इतरत्र सामाजिक संस्थांत कार्यवाह वा समितीचे सदस्य या नात्यानें त्यांना कामाचा अनुभव असेल तर 'प्रशासन' म्हणजे काय, संस्था कशा चालवावयाच्या असतात, दप्तराची व्यवस्था कशी चोख ठेवावी, इत्यादि गोष्टींचा त्यांना अनुभव व दृष्टि प्राप्त होईल. अनुभवसंपन्न व्यक्तीच्या ठिकाणींच धोरणीपणा, दूरदर्शित्व आणि कामाचा उरक हे गुण येऊं शकतील.

**२. नेतृत्व :**

शाळेच्या यशापयशाची जबाबदारी जरी मुख्याध्यापकांवर असली तरी ती एखाद्या संघनायकासारखी आहे. आपलें उद्दिष्ट पार पाडतांना आपल्या सहकारी (हाताखालच्या नव्हे) शिक्षकांच्या सहकार्याची त्यांना अत्यंत गरज आहे. विविध वृत्तींच्या व स्वभावांच्या, प्रौढ व सुजाण, स्थितिप्रिय व सुखासीन तर कांहीं उत्साही व पुरोगामी अशा शिक्षकांचें त्यांना नेतृत्व करावयाचें असतें. आणि म्हणून पुढारीपणाला लागणारे गुण त्या व्यक्तीनें कटाक्षानें कमावले पाहिजेत.

यशस्वी पुढाऱ्याला सर्वांना अनुकूल करून घेण्याची कला प्रथम साधावी लागते. मुख्याध्यापकांच्या कर्तृत्वावर सहकारी शिक्षकांचा विश्वास असला पाहिजे. सहकाऱ्यांचा विश्वास हाच त्यांच्या कार्याचा खराखुरा आधार.

हा विश्वास संपादन करावयाचा असेल तर त्यांनीं सहकाऱ्यांना विश्वासांत घेतलें पाहिजे. त्यांच्याशीं वरचेवर विचारविनिमय करून त्यांच्या कल्पनांचें स्वागत केलें पाहिजे. कोणीहि व्यक्ति सर्वज्ञ असूं शकत नाहीं; व एखाद्या प्रश्नाचे सर्व पैलू एकाच व्यक्तीला आकलन करतां येणें कठिण आहे हें ध्यानांत घेऊन त्यांच्या सहकार्यासाठीं त्यानें तत्पर असलें पाहिजे. असल्या सहकार्याची शिक्षणाचें उद्दिष्ट पार पाडतांना फार आवश्यकता आहे. शालेय वातावरणांत बालमनाच्या विकासाचें जें कार्य करावयाचें असतें तें शिक्षकांच्या अंध, निर्बुद्ध आणि श्रद्धाहीन आज्ञापालनानें होणार नाहीं. मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या सह-प्रयत्नांतून, त्यांनीं निर्मिलेल्या वातावरणांतून तें होत असतें. शिवाय, मुख्याध्यापकांच्या कल्पना साकार व्हावयाच्या त्या शिक्षकांच्याच द्वारें; यासाठीं मुख्याध्यापकांच्या ध्येयाशीं व विचाराशीं शिक्षक समरस झालेले असावेत. मुख्याध्यापकांची तुलना वृन्दवादनांतील ( ऑर्केस्ट्रा ) नेत्याशीं केली जाते. ते सारे कलावन्त व त्या ताफ्याचा म्होरक्या यांच्या कृतींतून एकतान व संवादी सूर प्रकट होतात.

असें सहकार्य मिळवावयाचें असेल तर माणसांना वागविण्याची व वागवून घेण्याची कला मुख्याध्यापकांना अवगत हवी. मनाचा निर्मळपणा, हृदयाचा विशालपणा, चुकांकडे क्षमाशील वृत्तीनें बघण्याची तयारी, समजूतदारपणा आणि सहृदयता हे गुण त्यांनीं कमावले पाहिजेत. मनुष्य स्खलनशील आहे, आणि चुकांच्या मुळाशीं कामचुकारपणाशिवाय अन्य कारणें असूं शकतात अशी जाणीव त्यांनीं ठेवावी; तसेंच, मनुष्यस्वभाव सुधारूं शकतो असा विश्वासहि हवा; आणि आपल्या सहकाऱ्यांना आपण उन्नत करूं शकूं अशी श्रद्धाहि त्यांनीं ठेविली पाहिजे. मतभेदाच्या प्रसंगीं कटुता निर्माण न करतां मार्ग कसा काढावा याची समयज्ञताहि त्यांच्या ठिकाणीं असावी. हेकटपणा व दुराग्रह न धरतां आपल्या चुका मान्य करून त्यांत बदल करण्याचा प्रांजलपणाहि त्यांनीं दाखवावा. कोणत्याहि प्रसंगीं मनाचा तोल न सोडतां व कार्यावरची दृष्टि ढळूं न देतां, चित्ताची शान्ति न गमावतां, धिम्मेपणानें व दमदारपणें पुढें जाण्याचें कसब त्यांच्या ठिकाणीं असावें.

शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यांत सहकार्य नांदावयास शिक्षकांशीं सहानुभूतीची वागणूक अवश्य आहे. कोणत्याहि अडचणीच्या वेळीं आपल्या

मुख्याध्यापकाचा आधार आहे, त्यांचें मार्गदर्शन विकट परिस्थितींत साहाय्यक होईल, आणि आपली इभ्रत–प्रतिष्ठा कमी होईल असें त्यांच्याकडून कधींहि वर्तन होणार नाहीं, असा विश्वास शिक्षकांना वाटावा. सर्वच शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यांत एक प्रकारचा कौटुंबिक जिव्हाळा निर्माण होईल तर त्या शालेय जीवनाच्या मधुर अनुभूति सर्वांच्या जीवनांत सुखद गोडवा निर्माण करतील.

पुढारीपणाचीं कांहीं पथ्यें आहेत, आणि तीं मुख्याध्यापकांनीं विसरूं नयेत. पुढारी हा नेकीचा व निःपक्षपाती असला पाहिजे. पक्षपाती वागणुकीचें पुढारीपणाला वावडें आहे. तसेंच हेरगिरीचें कुपथ्य आहे. आणि चहाडी-कुचाळीला आश्रय हा तर शापच आहे. त्यांतून स्वतःचा क्षुद्रपणा प्रकट होतो असें केवळ नव्हे तर इतरांच्या विश्वासाला आपण आपल्या हातानें सुरुंग लावीत असतों. या ना त्या कारणानें शिक्षकांत हेवेदावे व मत्सरभाव आढळतात. ते आपोआप नाहींसे होतील असा प्रयत्न त्यांनीं करायला पाहिजे.

तसेंच हुकुमशाही वृत्ति आपल्यांत प्रादुर्भूत होणार नाहीं याची दक्षता मुख्याध्यापकांनीं घ्यावयास पाहिजे. अत्यंत कर्तृत्ववान् माणसांना या वृत्तीचें भय असतें. मुख्याध्यापकांचें अति प्रभावी व्यक्तिमत्त्व इतरांच्या व्यक्तित्वाला मारक ठरूं नये आणि शाळेच्या यंत्रणेंतील शिक्षक हा निर्जीव 'खिळा' बनूं नये. शिक्षकांचें व्यक्तित्व जर अबाधित राहील तरच मुख्याध्यापकांची परंपरा जिवंत राहील.

शिक्षकांशीं बरोबरीच्या नात्यानें वागतांना त्यांत औदार्याची किंवा मोठेपणाची भावना मुख्याध्यापकांच्या मनाला शिवण्याचें कारण नाहीं. तसेंच, शिक्षकांशीं मोकळेपणानें वागल्यानें आपल्या प्रतिष्ठेला बाध येईल ही कल्पना चुकीची आहे. प्रतिष्ठा अंगच्या गुणानें प्राप्त होते. मुख्याध्यापकांचें पुढारीपण हें कर्तृत्वावर मिळवलेलें, त्याकडे चालत आलेलें असावें; पक्षीय राजकारणानें किंवा खुशामतीनें तें संपादन केलेलें नसावें.

### ३. अध्यापनकौशल्य

मुख्याध्यापकांना अन्य कितीहि कामें असलीं तरी त्यांनीं उत्कृष्ट अध्यापक म्हणून आपला लौकिक सदैव कायम ठेवला पाहिजे. त्यांची विद्वत्ता, व्यासंग

व अध्यापन-कौशल्य इतरांना स्फूर्तिप्रद झालं पाहिजे. मुख्याध्यापकांनीं आपण प्रथम 'शिक्षक' आहोंत हा बाणा राखावा. अमुकच वर्ग व अमुकच विषय असा आग्रहहि त्यांत नसावा. कित्येक मुख्याध्यापक केवळ सर्वोच्च वर्गाशीं संबंध ठेवण्यांत कृतार्थता मानतात. कित्येकांनीं इंग्रजी शिकविणें हा आपला खास अधिकार आजपर्यंत मानला होता. कित्येक जण वेळापत्रकांत दाखविण्यापुरतें, परीक्षेशीं साक्षात् संबंध नसलेला इंग्रजी विषयाचा भाग नाममात्र शिकवीत. याउलट खालच्या वर्गाचें कांहीं अध्यापन स्वतःकडे घेण्याचें कांहीं मुख्याध्यापकांचें धोरण स्वागतार्ह आहे. अनेक दृष्टींनीं तें उपकारक आहे. त्यामुळें शाळेंतल्या सर्व विद्यार्थ्यांशीं आरंभापासून संबंध येतो. व्यक्तिगत परिचय वाढतो. मुख्याध्यापक आपल्याला शिकवतात व ओळखतात, ही बाब विद्यार्थ्यांना गौरवाची वाटते. या विचाराचा व अभिमानाचा त्यांच्या चारित्र्यावर सुपरिणाम होऊन शिस्तीचा प्रश्न सुलभ होतो. खालच्या वर्गाला शिकाविण्यापासून हे व्यवस्थापनेच्या दृष्टीनें लाभ आहेत. तसेंच सर्वोच्च वर्गाला वेळ दिल्यानें मुख्याध्यापकांच्या व्यासंगाप्रियतेचा लाभ त्यांना होऊन त्यांच्या जीवनावर वेगळाच परिणाम होणार आहे. मधल्या इयत्तांतील विद्यार्थ्यांशीं संबंध ठेवण्याची संधीहि मुख्याध्यापकांना असतेच. ती म्हणजे शिक्षकांची अनुपस्थिति. केव्हां केव्हां शिक्षकांच्या गैरहजेरीच्या दिवशीं त्यांच्या तासावर जाऊन विद्यार्थ्यांची माहिती, त्यांचीं गुणवैशिष्ट्यें, स्वभावविशेष यांची माहिती करून घेतां येईल. प्रत्यक्ष त्या त्या विषयाचें अध्यापन न करतां त्या विषयाच्या आंवतीभोंवतींची अवांतर माहिती त्यांना देतां येईल. त्यांचें वाचन, छंद, अभ्यासपद्धति यांची चर्चा करून मार्गदर्शन करतां येईल. अशा तऱ्हेनें प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें मुख्याध्यापकांचें अस्तित्व 'सर्वस्पर्शी' असावें.

मुख्याध्यापकांनीं किती तास शिकवावें हें सांगणें कठिण आहे. कांहीं लेखकांनीं ३० तासांपैकीं २४ तास त्यांनीं अध्यापन करावें असें म्हटलें आहे. पण तें अव्यवहार्य आहे. शिक्षकांनीं प्रत्येकीं ६० मिनिटांचे २१ तास व मुख्याध्यापकांनीं ८ ते १० तास अध्यापन करावें अशी मुंबई शिक्षण-खात्याची सांप्रत अपेक्षा आहे तीच रास्त आहे. कारण अध्यापनाच्या जोडीला मार्गदर्शन, पत्रव्यवहार, भेटीगांठी व निरीक्षण या महत्त्वाच्या कामासाठीं मुख्याध्यापकांना भरपूर वेळ राहिला पाहिजे.

**४. कार्यक्षमता :**

मुख्याध्यापकांची कार्यक्षमता त्यांचा कामाचा वकूब, उरक किती आहे यावरून ठरेल. त्यांना विविध प्रकारचीं कामें उरकावीं लागत असल्यानें त्यांची पद्धतशीर आंखणी करावयास हवी. कोणत्या तासाला वर्गनिरीक्षण, कोणत्या वेळेला पत्रव्यवहार, कोणत्या वेळीं कार्यालयाचे हिशोब, कोणत्या दिवशीं क्रीडांगणाची पाहणी, कोणत्या वेळीं शिक्षक-सभा – इत्यादींचा आराखडा त्यांनीं आंखावा. सर्व वर्षाच्या व नंतर महिन्या–आठवड्याच्या सर्व कार्यक्रमाची रूपरेषा तयार असेल, आणि वागणुकींत नियमितपणा असेल तरच सर्व कामें यन्त्रासारखीं सुरळीत पार पडतील.

**५. योजनाचातुर्य :**

सर्वच कामें मुख्याध्यापकांना स्वतः करतां यावयाचीं नाहींत. तशी त्यांनीं हांव धरूं नये. कामाची सुयोग्य वांटणी हा एक महत्त्वाचा भाग आहे. कोणाकडून कोणतीं कामें करून घ्यावयाचीं हें माणसांची पारख करून त्यांनीं ठरवावें. त्यामुळें जबाबदारी विभागली जाते. सहकाऱ्यांनाहि आपणांस महत्त्व असल्याचें पटून ते उत्सुकतेनें काम करतात. शिक्षणखात्याचा पत्रव्यवहार, हिशोब अशा कांहीं महत्त्वाच्या गोष्टी स्वतःकडे घेऊन इतर अनेक कामांत त्यांनीं सहकाऱ्यांचें साह्य घ्यावें. मात्र वरचेवर देखरेख आणि चौकशी यांच्या द्वारां प्रत्येक विभागाची इत्थंभूत माहिती त्यांना असणें आवश्यक आहे.

**६. प्रगमनशीलता :**

सर्व शालेय संचालनाच्या बाबतींत मुख्याध्यापकांनीं कोणतें वैशिष्ट्य साधावयाचें असेल तर आपली प्रगमनशील वृत्ति. शालेय कार्याची प्रगति वरचेवर अजमावून नव्या मार्गांचा व पद्धतींचा अवलंब करण्याची त्यांनीं जागरूकता दाखवली पाहिजे. शिक्षकांशीं नवीन प्रयोग-पद्धतींबद्दल चर्चा करून त्यांचा उपयोग करण्यास त्यांना उद्युक्त करावें व स्वातंत्र्य द्यावें. अध्यापन-कलेंत नेहमींच फेरबदलाला व विकासाला वाव आहे हें शिक्षकांनीं मान्य केलें पाहिजे. तसेंच आपल्या सहकारी मुख्याध्यापकांशीं संबंध ठेवून अनुभवाची देवाण-घेवाण करावी. कोठें नवे प्रयोग सुरू असतील, एखाद्या संस्थेचें एखाद्या बाबतींत वैशिष्ट्य असेल तर तेथें आपल्या सहकाऱ्यांना त्याबाबत

निरीक्षण व अभ्यास करण्यास पाठवावें. तसेंच, शिक्षणविषयक चळवळींशीं परिचय राखून आपल्या विचारांत नवी नवी भर टाकावी. संतोषी वृत्ति ही प्रगतीला मारक असते, हें ध्यानांत घेऊन आपल्या अनुभवाचें भांडार समृद्ध करण्याकडे त्यांची दृष्टि असावी.

**७. निर्णयशक्ति :**

शालेय जीवनांत किती तरी प्रसंग असे येतात कीं कांहीं गोष्टींचे निर्णय तडकाफडकीं घ्यावे लागतात. शिक्षकांना एखाद्या गोष्टींत मदत हवी असते, विद्यार्थ्यांनीं कांहीं मागण्या केलेल्या असतात, अडचणी उभ्या केलेल्या असतात, कांहीं तांतडीचीं पत्रें असतात,कोणाला कांहीं सहकार्य हवें असतें, इ.इ. असे प्रसंग म्हणजे त्यांच्या धडाडीची, चातुर्याची, तत्त्वनिष्ठेची व निर्णयशक्तीची कसोटीच असते. अनुभव, मार्मिक निरीक्षण, समतोल विचार यांच्या साह्यानें असे निर्णय घेण्याची पात्रता येते. तसेंच, आपल्याजवळील साधनसामुग्रीचा कसा उपयोग करून घेतां येईल याचाहि विचार करतां आला पाहिजे. आळस व चेंगटपणा यांनीं कार्यनाश मात्र होतो. कार्याकार्याचे त्वरित निर्णय घेऊन त्यांची अंमल-बजावणीहि झटकन् झाली तर एकंदर सुव्यवस्थेवर चांगला परिणाम होतो.

**८. खंबीरपणा व आत्मविश्वास :**

एकदां निर्णय घेतला, एखादें धोरण स्वीकारलें कीं त्याला निर्धारानें चिकटून राहण्याचा खंबीरपणा मुख्याध्यापकांनीं दाखविला पाहिजे. यासाठीं त्यांच्या निर्णयामागें आत्मविश्वासाचें बळ हवें. मुख्याध्यापक एखाद्या कामाची कांहीं व्यवस्था आंखून देतात. उदा. प्रगतिपत्रकें देण्याची तारीख अमुक, विशिष्ट माहिती गोळा करण्याची वेळ अमुक; आणि शिक्षक कांहींना कांहीं अडचणी दाखवून तींत बदल करून मागतात. विद्यार्थ्यांच्या उत्तीर्ण–अनुत्तीर्णते-संबंधीं निर्णय शाळा ठरविते; व पालक सूक्तासूक्त दडपण आणून ते बदलून घेऊं पहातात. मुख्याध्यापकांनीं या गोष्टींना बळी पडतां कामा नये. घेतलेला निर्णय बदलणें याचा अर्थ पूर्वीचा निर्णय अविचाराचा, अदूरदर्शीपणाचा होता असा कबुलीजबाब होय. निर्णय सावकाश व साधकबाधक विचारानंतर घेत-लेला आहे याची त्यांना खात्री असावी, आणि मग कुणाच्याहि हातांतलें बाहुलें न बनण्याची काळजी घ्यावी. तडकाफडकीं निर्णय स्वतःची जबाबदारी ओळखूनच घ्यावयाचे असल्यानें त्यासाठीं आत्मप्रत्यय पाहिजे.

**९. कल्पकता :**

उत्कृष्ट व्यवस्था राखूं पाहणाऱ्यांच्या ठायीं कल्पकता व नवनिर्मितिक्षमता जरूर हवी. आपल्या शासनयंत्रांत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, कोणत्या उपायानें कोणते दोष दूर करतां येतील, आणि नवी घडी कशी बसेल याचा कल्पनेनें त्यांना अंदाज करतां यावा; उपाय सुचावेत; अडचणी व त्यांचें निराकरण यांचे मार्ग सांपडावेत. याच कल्पकतेला सहानुभूतीची जोड मिळाली तर कोणाच्या काय अडचणी आहेत याची जाणीव होऊन वागणुकींत प्रेमळता व माधुर्य येईल.

**१०. गुणग्राहकता :**

शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या कार्याचें गुणग्रहण व गौरव हें मुख्याध्यापकांच्या सहृदयतेचें व सौजन्याचें तसेंच मार्मिकतेचें व कार्यकुशलतेचें निदर्शक ठरेल. आपल्या श्रमाचें चीज होत आहे या जाणिवेनें श्रमभार हलका होतो व नवीन उद्योगाला स्फुरण मिळतें. मुख्याध्यापकांनीं केलेलें गुणग्रहण, काढलेले धन्योद्गार, हें शिक्षकांना आपल्या श्रमाचें न्याय्य पारितोषिक वाटत असतें. या प्रोत्साहनानें त्यांच्या कामाचा कस वाढण्याची शक्यता आहे. आपल्या सहकाऱ्यांना कार्यप्रवण व कार्यकुशल करूं इच्छिणाऱ्या मुख्याध्यापकांनीं आपल्या सहकाऱ्यांचें कोडकौतुक करणें आपलें एक कर्तव्यच मानलें पाहिजे.

## कामकाजाचें स्वरूप आणि दिशा :

मुख्याध्यापकांना आपली जबाबदारी पार पाडतांना पुढील गोष्टींचा विचार करावा लागतो—

१. अध्यापनविषयक कामाची वांटणी
२. अभ्यासेतर कार्यक्रमांचा विचार
३. शिक्षकांच्या कार्यावर देखरेख व मार्गदर्शन
४. विद्यार्थ्यांचें जीवन व शिस्त
५. पालकांशीं संबंध
६. माजी विद्यार्थ्यांचें भवितव्य
७. कार्यालयाची व्यवस्था व पत्रव्यवहार
८. सार्वजनिक कार्य

### १. शिक्षकांच्या नेमणुका

शाळा सुरू होण्यापूर्वीच पुढील वर्षासाठीं किती शिक्षक लागतील याची कल्पना मुख्याध्यापकांना आली तर फारच चांगलें. शाळेंत किती वर्ग ठेवावयाचे, किती वाढवावयाचे याच्या निर्णयावर हें कांहींसें अवलंबून आहे. नव्या नेमणुका करतांना अनेक मुद्दे विचारांत घ्यावे लागतात. कोणत्या विषयासाठीं व कोणत्या इयत्तेसाठीं शिक्षकांची गरज आहे हें पाहिलें जावें. तसेंच तज्ज्ञ शिक्षकांचें प्रमाण अधिकाधिक वाढेल व त्यायोगें शाळेची कार्यक्षमता वृद्धिंगत होईल याचाहि विचार व्हावा.

शिक्षकांची निवड व नेमणूक ही बाब व्यवस्थापकमंडळाच्या हातीं अनेकदां असते. पण मुख्याध्यापकांचें मत व अभिप्राय यांस अग्रेसरत्व मिळणें हें केव्हांहि न्याय्य ठरेल. नेमावयाच्या शिक्षकाच्या केवळ पदव्यांवरून व शैक्षणिक लायकीवरून त्याच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येत नाहीं. आणि शाळेंत काम करतांना पदवीइतकेंच अवांतर गुणांना महत्त्व आहे. बौद्धिक विषयांतील नैपुण्याबरोबरच अभ्यासेतर विषय व छंद, क्रीडा आणि कला यांत त्याचें प्रावीण्य किती, आवड किती व उत्साह किती आहे याचा विचार निवड करणारांना करावाच लागेल. तसेंच, आपल्या सध्यांच्या सहकाऱ्यांत हा कसा सामावून जाईल, आणि आपल्या ध्येयास व विचारप्रणालीस याची वृत्ति किती जुळती-मिळती आहे याचाहि अंदाज घ्यावा लागेल. तसेंच, त्याची चपलता, बोलण्याची ढब, चुणचुणीतपणा इत्यादि गुणांनीं त्याची विद्यार्थ्यांवर कशी छाप बसेल हेंहि अजमावावें लागेल. तेव्हां नेमणुकीपूर्वी शिक्षकाची मुलाखत घेणें, पूर्वानुभवाविषयीं चौकशी करणें, आणि शक्य तर दोनतीन दिवस चांचणी पाहणें या गोष्टींचा अवलंब करावयास कांहींच हरकत नाहीं.

### २. कामाची विभागणी

शाळा सुरू होण्याच्या आधीं निदान एक आठवडा तरी अभ्यासक्रमाची व अध्यापनाविषयांची शिक्षकांत वांटणी व्हावयास पाहिजे. वर्षांत कामकाजाचें दिवस किती, सुट्यांचे दिवस कोणते, परीक्षा केव्हां होणार, संमेलन-समारंभाचे दिवस व स्वरूप, या सर्वांची दिनदर्शिका आधीं तयार झालेली असावी, म्हणजे त्यांच्या आधारें आपल्या कामाची सत्रशः वा

प्रतिमासिक विभागणी करणें शिक्षकांना सुकर होईल. तसेंच आपल्याला कोणते विषय शिकवावे लागणार, त्यासाठीं लागणारीं पाठ्यपुस्तकें, संलग्न पुस्तकें, संदर्भ-ग्रंथ, आणि उपलब्ध उपकरणीं कोणतीं यांची माहिती शिक्षकांना मिळावयास हवी, म्हणजे शिक्षक आपल्या कार्याचें अंदाजपत्रक तयार करतील. त्या अंदाजपत्रकांत महिन्यांतून वा आठवड्यांतून एकूण वेळ किती मिळावयाचा, निश्चित भाग कोणता शिकवावयाचा, त्यासाठीं अवांतर पुस्तकें, चित्रें, नकाशे इ. चा उपयोग कोठें करावयाचा, विद्यार्थ्यींकडून कोणत्या गोष्टी करून घ्यावयाच्या, त्यांची चांचणी कशी घ्यावयाची, गृहपाठ–स्वाध्याय काय द्यावयाचे, या सर्वांचा विचार शिक्षकांनीं केलेला असावा. विषय-वांटणी करतांना सामान्यतः पुढील धोरणें पाळणें इष्ट असतें.—

१. वरच्या वर्गांसाठीं तज्ज्ञ व निष्णात शिक्षकांची योजना असावी.

२. अगदीं खालच्या वर्गांसाठींहि कांहीं निष्णात व मुरलेले शिक्षक असावेत.

३. ज्या वर्गांत एखादा विषय नव्यानेंच सुरू करावयाचा असेल तेथें अनुभवी शिक्षकांकडेच तो विषय द्यावा.

४. कोणावरहि त्यांना न आवडणारा विषय शिकविण्याची सक्ति करूं नये.

५. पदवीइतकीच व्यासंग व हातखंडा यांनाहि किंमत द्यावी.

### विषयशिक्षकपद्धति कीं वर्गपद्धति

एकाच शिक्षकाकडे एका वर्गाचे अधिकाधिक विषय द्यावेत कीं निरनिराळ्या तज्ज्ञ शिक्षकांची विषयानुरूप योजना व्हावी असा प्रश्न उपस्थित केला जातो. प्रत्येक पद्धतीचे विशिष्ट अवस्थेंत कांहीं फायदे आहेत. प्राथमिक शाळांत व माध्यमिक शाळांतील पांचवी, सहावी, सातवीपर्यंत कांहीं प्रमाणांत वर्गशिक्षकपद्धति इष्ट ठरते. मुलें लहान असतात. त्यांच्यावर सारखें लक्ष ठेवणारी व्यक्ति लागत असते. विद्यार्थ्यांनाहि घरांतील मातेची जागा घेणारी, प्रेमळपणें विचारपूस करणारी व्यक्ति पाठीशीं हवीशी वाटते. शिवाय या वयांत त्या त्या विषयांतील प्रावीण्यापेक्षां बालकांच्या संवयी, वागणूक व सुखदुःखें यांचेंच महत्त्व अधिक असतें. प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास कसा होत आहे याकडे शिक्षकाला विद्यार्थी अधिक काळ त्याच्या नजरेसमोर असल्यानें लक्ष देतां येतें. अध्यापनाच्या दृष्टीनें सर्व विषयांत एकसूत्रीपणा

व समतोलपणा राखणें सोपें.जातें. या पद्धतीनें आंखणी केल्यास वेळापत्रकाचें कामहि सुकर होतें.

प्रत्येक विषयाला तज्ज्ञ शिक्षक नेमण्याची पद्धति उच्च माध्यमिक अवस्थेंत लाभदायी आहे. एक तर तज्ज्ञ शिक्षकाला आपला आवडीचा विषय शिकाविण्याची संधि मिळाल्यानें आपलें अध्यापन अधिक भरदार व रसयुक्त करतां येते. आपल्या अभ्यासक्रमाची चढत्या श्रेणींत क्रमशः त्याला मांडणी करतां येते. तेच विद्यार्थी तीन वा चार वर्षें हाताखालीं येणार असल्यानें त्या विषयांत ते मागें पडूं लागल्यास त्याला तात्काळ निदान करतां येतें. आपल्या विद्यार्थ्यांचें सूक्ष्म निरीक्षण करतां येऊन त्यांच्या कुवतीप्रमाणें पद्धतींत कमीजास्त बदल करतां येतो. हुशार विद्यार्थ्यांना हाताशीं धरून अधिक पुढें नेतां येतें. अध्यापन-पद्धतींत प्रयोग करून पाहावयास अवधि सांपडतो. त्याच्या शक्तीची व वेळाचीहि पुष्कळ काटकसर होते आणि फावल्या वेळांत आपल्या ज्ञानांत भर टाकून अद्ययावत्पणा साधतां येतो. तज्ज्ञ शिक्षकानें रंगून विषय शिकवला कीं विद्यार्थ्यांच्या मनावर कांहीं विशेष छाप पडते. त्या विषयाची गोडी त्यांच्या मनांत निर्माण होते. एकाच शिक्षकाला विविध विषय शिकवावयाचे म्हटलें कीं तयारी किती करावी लागणार! आणि सर्वच विषय सारख्याच कुशलतेनें शिकाविणें जमणार नाहीं तें वेगळेंच.

### विषयसमिति

प्रत्येक विषयाची एकएक समिति नेमून त्या त्या विषयाच्या शिक्षकांनीं त्या समितींत सर्व वर्षांचा इयत्तावार अभ्यास ठरवावा. अभ्यासक्रमांतील कोणता भाग कोणत्या वर्गांत शिकवावा याची चर्चा व जरूर तर पद्धति ठरवावी. सर्व अभ्यासक्रमांत एकसूत्रीपणा आणण्यास अशा समितींचा फार उपयोग होतो.

### ३. अध्यापनावर देखरेख व मार्गदर्शन

शाळेच्या कार्याच्या बौद्धिक अंगाचाच नव्हे तर सर्वच विभागांचा दर्जा उंचावण्यास प्रभावी मार्गदर्शनाची गरज असते. मुख्याध्यापक सर्व विषयांत प्रवीण असणें शक्य नाहीं. पण शिक्षकांची कार्यपद्धति व तिचे विद्यार्थ्यांवर होणारे इष्टानिष्ट परिणाम व्यापक स्वरूपांत आकलन होण्याइतका दृष्टीचा विशालपणा व भेदकता त्यांच्याजवळ पाहिजे.

मुख्याध्यापकानीं शिक्षकांच्या कार्याचें निरीक्षण करण्याच्या पद्धतीचे विविध प्रकार संभवतात. वर्गाबाहेरून कानोसा घेण्याची व शिक्षकांना 'पकडण्याची' जुनी रीत असे. शिक्षकांविषयीं अविश्वासच त्यांतून अधिक निर्माण होतो आणि शिक्षकांनाहि अविश्वास व भीति वाटून त्यांतून ढोंगीपणा जन्मास येतो. 'निरीक्षण' म्हणजे हेरगिरी नव्हे. शिक्षक शिकवीत असतां वर्गांत शिरून शिकवलेल्या भागावर प्रश्न विचारावयाचे व शिक्षकांच्या शिकविण्याचा फोलपणा सिद्ध करावयाचा हाहि मार्ग अप्रशस्तच आहे. त्यानें शिक्षकांचा रोज मात्र अनेकदां जाण्याचा धोका असतो. वर्गांत बसून अध्यापन पाहावयाचें व त्याचें टिपण करून त्यावर शिक्षकांची सही घ्यावयाची–( अशा पुस्तकाला 'लॉगबुक' म्हणतात ) अशी एक रीत आहे. 'कायदेशीर नोटिसा बजावल्याची' भूमिका त्यांत नसेल तरच ही पद्धति इष्ट ठरेल. तिच्यापेक्षां पाठ निरीक्षणानंतर–महाविद्यालयांत करतात तशी पाठावर खेळीमेळीची–शंकासमाधानाची चर्चा झाली तर तें अधिक उचित ठरेल. शिक्षकांच्या भावना या बाबतींत फार हळुवार असतात. शिक्षकांच्या कार्यांतील दोष चारचौघांसमोर चार्चिले जाऊं नयेत. विद्यार्थ्यांसमोर तर नाहींच नाहीं. आपल्या कार्यालयांत, एकान्तांत त्याची चर्चा व्हावी. मुख्याध्यापकाच्या टीकेस विधायक सूचनांचें स्वरूप असावें. त्यांची उपयुक्तता व परिणामकारकता हीं त्या शिक्षकांना पटलीं पाहिजेत. या बाबतींत शिक्षकांचा दृष्टिकोण मोकळेपणाचा व प्रगमनशील असावा. शिक्षकांच्या अध्यापनपद्धतीवर मुख्याध्यापकांनींच नव्हे तर सहकारी शिक्षकांनींहि निर्भीड व सडेतोड टीका करण्याची प्रथा रशियांत असल्याचें सांगितलें जातें. तो उपक्रम स्तुत्य आहे. वर्गांतील विद्यार्थ्यांच्या गृहपाठाच्या व वर्गकामाच्या वह्या पाहूनहि त्यांच्या कार्याचा अंदाज करतां येतो. आणि अशी लेखनकामावरची देखरेखहि आवश्यकच असते.

**शिक्षक-सभा**

शिक्षकवर्गाला मार्गदर्शन करण्यासाठीं शिक्षक-सभा हें प्रभावी साधन आहे.या सभांचे विविध प्रकार असूं शकतील, व त्यांपुढील कार्यैंहि वेगवेगळीं राहतील.

**सर्व शिक्षकांची सभा**

वर्षाच्या आरंभीं चालू वर्षाच्या योजना व आंखलेलीं धोरणें यांचा विचार करण्यासाठीं अशा सभेचें महत्त्व विशेष आहे. शिक्षकांना आपले बेत सर्वांच्या

समोर मांडून त्यांची चर्चा करून सर्वांचें सहकार्य मिळविण्याची ती एक उत्कृष्ट संधि आहे. तसेंच कामांची विभागणी, नोंद ठेवण्यासंबंधीं सूचना, या एकदम सर्वांना देतां येतात. सत्रअखेर झालेल्या कार्याचा आढावा घेण्यासाठीं, तपासनिसांच्या अभिप्रायाची चर्चा करण्यासाठीं, परीक्षांचे यशापयशाची छाननी करण्यासाठीं, व पुढील मार्गाचें दिग्दर्शन करण्यासाठीं या सभांना महत्त्व आहे. अगदीं साध्या माणुसकीच्या दृष्टीनेंदेखील यांना महत्त्व आहे. वर्षाच्या आरंभीं दीर्घ सुटीनंतर सर्वांनीं एकत्र भेटावें, व नव्या वर्षाचा भार उचलण्यांत खांद्याला खांदा लावून परस्परांना साथ द्यावयाची आहे ही भावना हृदयांत जागवावी याला मोठा अर्थ आहे. तसेंच, सत्रअखेर सर्वांनीं एकत्र बसून पार पाडलेल्या कार्यांतील सुखदुःखांच्या स्मृति मनांत घोळवाव्या, व सुटीसाठीं एकमेकांना शुभचिंतन करावें ही गोष्ट सुहृद्भाव वाढविण्यास उपकारकच आहे.

शैक्षणिक प्रगतीसाठीं आणि शालेय सुव्यवस्थेसाठींहि अशा सभांचें महत्त्व आहे. नव्या शैक्षाणिक योजना व बेत यांची चर्चा तेथें करतां येईल. एखाद्या पुस्तकावर चर्चा व त्यांतील प्रतिपादन केलेल्या पद्धतीबद्दल विचारविनिमय करतां येईल. शिक्षकांच्या अडीअडचणी व तक्रारी यांना अशा सभेंत वाचा फोडतां येईल व त्या दूर करण्याचे मार्ग शोधतां येतील.

### मुख्याध्यापक व वर्ग-शिक्षक

या दोघांच्या मुलाखतींत त्या त्या वर्गाचे विशिष्ट प्रश्न सोडवितां येतील. एखाद्या विशिष्ट वर्गाची शिस्त, उपस्थिति, अभ्यासांतील प्रगति, गृहपाठ व पाठ्यपुस्तकें यांबाबत अडचणी यांचा विचार त्या दोघांना एकत्र करतां येईल.

### विषय-शिक्षकांच्या सभा

वर उल्लेखिलेल्या विषय-समितीच्या शिक्षकांच्या सभा नियमितपणें भरून त्या त्या विषयाच्या अध्यापनासाठीं अधिक काय करावयास हवें, कोणत्या वर्गास व विद्यार्थ्यांस अधिक वेळ दिला पाहिजे, व त्यांच्याकडून अधिक काम करून घ्यावयास पाहिजे याचा विचार त्यांत करावा. त्या विषयाशीं संलग्न असलेल्या उदा०—मातृभाषा, इंग्लिश, हिंदी, किंवा इतिहास व भूगोल, अशा सर्व शिक्षकांनीं एकत्र येऊनहि परस्परांना साहाय्यक व पूरक काम करतां येईल याचा विचार व्हावा.

याशिवाय एखाद्या तज्ज्ञांचें व्याख्यान, संमेलन-पारितोषिक-समारंभ इ. साठीं योजना आंखण्यासाठीं, सहली–सफरी व वनभोजनांचे बेत करण्यासाठीं सर्वांना एकत्र येतां येईल. सगळ्याच सभांना औपचारिक स्वरूप ठेवण्याचें कारण नाहीं. उलट अनेक सभांच्या वेळीं मुख्याध्यापकांनीं आपली अधिकाराची जाणीव बाजूस ठेवून इतरांना वाव द्यावा व श्रोत्याची भूमिका पत्करावी. यांतील कित्येक सभा व विषयांची चर्चा शाळेपासून्च्या दूरच्या वातावरणांत एखाद्या सहलीच्या निमित्तानें घेतल्या तर शाळेच्या वातावरणांत जो मनाला संकोच वाटतो, मनें दबल्यासारखीं होतात, तो संकोच व भीति दूर होऊन उबून निघालेल्या जीवांना जरा स्वातंत्र्याचें वारें लाभतें. चर्चा अधिक खुल्या दिलानें होऊं शकते. औपचारिकपणाचे पडदे दूर झाल्यानें शिक्षकांना अधिक मोकळेपणानें बोलतां येतें. विशेषतः शिक्षक व मुख्याध्यापक यांना एकमेकांच्या अंतरंगाची व दृष्टिकोणाची जवळून ओळख पटते. मानसिक दृष्ट्या एका वेगळ्याच विशुद्ध वातावरणांत गेल्याचा उत्साहप्रद असा अनुभव येतो. परस्परांतला विश्वास दुणावतो. शाळेच्या वातावरणांतला शीण, कष्ट यांचा विसर अशा वातावरणांत सहजच पडत असल्यानें पुनः उत्साहाचा प्रवाह निर्मल होतो, आशा पल्लवित होतात, आणि मंगल प्रेरणा हृदयांत उदय पावून कामाला जोम येतो.

### ४. विद्यार्थ्यांचें जीवन व शिस्त

शिक्षकांइतकेंच मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांच्या जीवनाकडे लक्ष पुरविलें पाहिजे. आपल्या शाळेंतील सर्व विद्यार्थ्यांची तोंडओळख असणें ही गोष्ट आदर्श समजली जाईल. पांचशें ते सहाशें विद्यार्थ्यांची शाळा असेल तर ही गोष्ट तितकी कठीण नाहीं. याहिपेक्षां मोठ्या शाळेंत हें दुर्घट होतें. पण मुख्याध्यापकांना वर्गप्रतिनिधि, निरनिराळ्या छंदमंडळांचे प्रतिनिधि, क्रीडाप्रमुख किंवा सदा अनियमित असणारे, खोड्या करणारे विद्यार्थी यांना समक्ष भेटण्याची संधि मिळूं शकते. प्रत्येक वर्गावर स्वतः जाण्याची संधि मिळेल तेवढी त्यांनीं घ्यावी. वर्गशिक्षकांच्या द्वारां व निरानिराळ्या समिति-सभांतून, निरनिराळ्या परीक्षांच्या निकालपत्राच्या निमित्तानें, प्रगतिपत्रकें, वर्ग-मासिकें इत्यादींच्या द्वारां शाळेंतील बहुसंख्य विद्यार्थ्यांचीं नांवें व त्यांचीं वैशिष्ट्यें माहीत करून घेतां येतील. या ज्ञानाचा विद्यार्थ्यांशीं व्यक्तिगत

परिचयाच्या दृष्टीनें व पालकांशीं संबंध जोडतांना फार उपयोग होतो. आपल्याकडे किंवा पाल्याकडे मुख्याध्यापकांचें व्यक्तिशः लक्ष आहे ही जाणीव विद्यार्थ्यांना व पालकांना मोठी सुखद वाटते. या जाणीवेचा विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें आणखीहि उपयोग होतो. त्यांच्या मनावर एक प्रकारचा दाब राहतो. आणि स्वतःच्या अभिमानामुळें, लौकिकाची चाड असल्यामुळें नकळत सदाचाराकडे प्रवृत्ति होते. वाचनालय, क्रीडांगण, सहली व छंदमंडळांचे कार्यक्रम या ठिकाणची मुख्याध्यापकांची उपस्थिति विद्यार्थ्यांना प्रोत्साहन-कारक ठरते.

विद्यार्थि-वर्गांत मुख्याध्यापकांविषयीं भीतियुक्त आदराची नव्हे तर भक्तीची भावना निर्माण व्हावी. त्यांच्या मतांची, राग-लोभाची त्यांना पर्वा वाटावी. व्यक्तिगत अडचणींचा निरास करून घेण्यासाठीं आपण निःशंकपणें मुख्याध्यापकांकडे जावें व पोट उकलून त्यांच्याशीं बोलावें असें स्नेहशील व्यक्तित्व मुख्याध्यापकाचें असलें पाहिजे. आणि मुख्याध्यापकांच्या भेटीनंतर आपला भार हलका झाला, आसरा लाभला, नवी दृष्टि मिळाली अशी प्रतीति विद्यार्थ्यांना आली पाहिजे. मातेचें वात्सल्य अधिक समंजसपणा, पित्याचा जिव्हाळा आधिक मोकळेपणा, मित्राची तळमळ आधिक अचूक मार्गदर्शन या गोष्टी मुख्याध्यापकांच्या सान्निध्यांत विद्यार्थ्यांना अनुभवास मिळतील. स्वतःच्या शुद्ध आचरणाचा, मधुर भाषणाचा, सामाजिक प्रतिष्ठेचा, मार्मिक व अंतरंगाचा ठाव घेणाऱ्या सहृदय दृष्टीचा प्रभाव जर मुख्याध्यापकांना पाडतां आला तर त्यांना विद्यार्थ्यांचा जो विश्वास, स्नेह, भक्ति लाभेल त्यांतून मिळणाऱ्या आनंदाला व समाधानाला सीमा नाहीं.

विद्यार्थ्यांचें चारित्र्य अशा वातावरणांत जें सहज घडविलें जाईल तें हजारों उपदेशांनीं घडणार नाहीं. आपण शाळा सोडतांना बरोबर जीवनभर पुरेल अशी एक अवीट आनंदाची शिदोरी बरोबर नेत आहोंत असें विद्यार्थ्यांना वाटणें यासारखें दोघांचें भाग्य नाहीं. विद्यार्थ्यांनीं आयुष्यभर कृतज्ञतेनें आणि गौरवानें मुख्याध्यापकांची बाळगलेली स्मृति हेंच त्यांच्या कार्याचें खरें फळ.

### ५. पालकांशीं संबंध

बालकांच्या शिक्षणांत पालकांचें सक्रिय सहकार्य हा महत्त्वाचा घटक आहे. त्यांच्या पाठिंब्याविना शाळेचें कार्य लटकें व लंगडें ठरतें. विद्यार्थ्यांच्या

जीवनांत विशेषतः पौगण्डदशेंत असे क्षण येतात कीं शाळा, शिक्षक, मुख्याध्यापक व संवगडी हींच त्यांचीं निष्ठास्थानें बनतात. शाळेंत मिळणाऱ्या संधि व स्वातंत्र्य यांना घरचें वातावरण पूरक व पोषक नसेल तर घरावरची श्रद्धा उडते. जीवन अस्थिर होतें. ही गोष्ट अनिष्ट आहे. बौद्धिक प्रगतीइतकेंच व शारीरिक आरोग्यापेक्षांहि अधिक महत्त्व या भावजीवनाला आहे. पालकांना या गोष्टीचें क्वचितच महत्त्व वाटतें. नवी पिढी व जुनी पिढी यांचा सततचा झगडा गृहजीवनांत आढळतो. अशा वेळीं दोहोंमध्यें स्नेहशील साचिवाची भूमिका मुख्याध्यापकच पार पाडूं शकतात. विद्यार्थ्यांच्या अस्थिर भडकलेल्या जीवनाला सुस्थिर बनावेण्याचें कार्य ते करूं शकतात. त्यांत पालकांचें सहकार्य त्यांनीं मिळविलें पाहिजे. प्रौढ विद्यार्थ्यांना शाळेंत मिळणारें स्वातंत्र्य हा जुन्या पिढीला ढिलाईचा व दौर्बल्याचा भाग वाटतो. अशा वेळीं 'प्राप्ते तु षोडशे वर्षे' या जुन्या नीतीची आठवण मुख्यतः मुख्याध्यापकच सोनाराच्या कौशल्यानें करून देऊं शकतील. एवढें कर्तृत्व त्यांच्या ठिकाणीं जरूर हवें.

पालकांच्या सहकार्याचें महत्त्व व तें संपादन करावयाच्या दिशा यांचें सविस्तर विवेचन पुढें येईलच.

### ६. माजी विद्यार्थी

मुख्याध्यापकांना माजी विद्यार्थ्यांशीं संबंध राखतां आला तर ती गोष्ट संस्थेच्या दृष्टीनें अत्यंत मोलाची आहे. माजी विद्यार्थी म्हणजे संस्थेच्या शक्तीचा जिवंत झराच होय. त्यांचें संस्थेवरील प्रेम ही मोठी शक्ति आहे. संस्थेच्या कार्याची ती एक चालती बोलती जाहिरात होय. शिक्षणसंस्थांचें कार्य हें एक सतत परंपरेनें करावयाचें कार्य आहे. त्यासाठीं जनतेची सहानुभूति व विश्वास हीं संपादन केलीं तर संस्थेचें वैचारिक कार्य जोमानें पार पाडण्यास मदत होईल. मुख्याध्यापकांनीं शाळेंतून नुकत्याच बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना कामधंदा किंवा उच्च शिक्षण यासंबंधीं मार्गदर्शन व सक्रिय साहाय्य केलें तर शालेय जीवनांत प्रस्थापित केलेले संबंध अधिक दृढ होतील. शाळेंतून बाहेर पडलेल्या व जीवनाच्या विविध क्षेत्रांत कर्तृत्व व नांव कमावलेल्या विद्यार्थ्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष गौरव शाळेंत झाला तर शाळेच्या परंपरेचा अभिमान विद्यार्थ्यांत सहजच निर्माण होईल. शाळेच्या

संमेलनाव्यतिरिक्त अन्य प्रसंगांनींहि माजी विद्यार्थ्यांचे शाळेशीं संबंध राहतील अशी यंत्रणा निर्माण करतां येईल. माजी विद्यार्थ्यांचा संघ, त्यांना शाळेच्या क्रीडांगणावर सवलती, निरनिराळ्या व्यवसायांबद्दलची माहिती देण्यासाठीं त्यांचीं व्याख्यानें इत्यादि निमित्तानें त्यांचें दळणवळण चालूं ठेवतां येईल. पाश्चात्य देशांत शाळेला मातृस्थानीं मानून तिजविषयीं भक्ति विद्यार्थी सतत मनांत बागवितात. पण तसें व्हावयास शाळेचें कार्य व जिव्हाळा हीं जिवंत व प्रभावी पाहिजेत.

### ७. कार्यालयाची व्यवस्था

शाळेच्या कार्यालयाची व्यवस्था म्हणजे केवळ दप्तराची व्यवस्था नाहीं. कारकूनमंडळी ती सहज ठेवूं शकतात. कामाची एक विशिष्ट पद्धत लावून देण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची आहे. आपला वेळ शाळेच्या कारणीं अधिक लागावा यासाठीं दप्तर तपासण्याचें एक तंत्र व नियमपध्दति मुख्याध्यापकांनीं ठरवून टाकावी. पण कार्यालयाचा उपयोग शैक्षणिक रीतीनें कुशल मुख्याध्यापक करून घेऊं शकतील. कार्यालयांतून बाहेर जाणारें टपाल – पत्रव्यवहार हा एक महत्त्वाचा भाग आहे. पालक व संस्थेचे साहाय्यक-आश्रयदाते, तसेंच इतर नागरिक यांच्याशीं संबंध जोडण्याचें तें एक साधन आहे. कार्यालयाच्या पत्रव्यवहारांत यांत्रिकपणापेक्षां तळमळ आणि नियमांच्या चाकोरीपेक्षां सौजन्य व आतिथ्य या गोष्टी दिसाव्यात. माणुसकीची, भलेपणाची व सभ्यतेची बागणूक हें तिचें वैशिष्ट्य असावें. कार्यालयांत ठेवावयाचे हिशोब, शाळेची मालमत्ता, वार्षिक निकालपत्रें व इतर कागदपत्र यांबाबत मुख्याध्यापकांच्या खास जबाबदाऱ्या असतात. त्यांतील हिशोबावर देखरेख तर दररोज पाहिजे; आणि इतर बाबतींत मासिक वा त्रैमासिक तपासणी श्रेयस्कर ठरते.

पत्रव्यवहारांतील तत्परता हा एक महत्त्वाचा भाग आहे. आजच्या व्यापारी युगांत त्याचें महत्त्व आहे. शिक्षण-खात्याचा वा अन्य पत्रव्यवहार तत्परतेनें पार पाडल्यास त्या त्या लोकांचें कामकाज आपण सुकर करतों व त्यांची नकळत सहानुभूति मिळवीत असतों.

अनेक मुख्याध्यापकांना विविध प्रकारचे तक्ते निर्माण करून कार्यालयाचा व्याप वाढविण्याची हौस असते. प्रगतीचें मोजमाप आंकडे-शास्त्राच्या साह्यानें घेण्याची पद्धति निघाल्यापासून या गोष्टींना महत्त्व आलें आहे.

प्रगतीचा आढावा भिन्नाभिन्न दृष्टिकोणांतून घेण्यास व संशोधनकार्यास त्यांचें महत्त्वाहि आहि; पण शिक्षकांचें कारकुनी काम किती वाढवावयाचें याचाहि विचार त्यांनीं करावा.

शिक्षणखात्याशीं करावयाच्या पत्रव्यवहारांत एक गोष्ट मुख्याध्यापकांनीं साधणें आवश्यक आहे. शिक्षणाधिकाऱ्यांना आपले विचार व अनुभव निर्भयपणें कळविण्याची संधि या वेळीं त्यांनीं जरूर घ्यावी. मुख्याध्यापकांचा अनुभव हा प्रत्यक्ष, जिवंत व रसरशीत असतो. शिक्षणाधिकाऱ्यांच्या कल्पक ध्येयवादाला त्याची जोड मिळणें आवश्यक आहे.

### ८. सार्वजनिक कार्य

एवढ्या सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्यावर सार्वजनिक जीवनाशीं मुख्याध्यापकाला संबंध ठेवतां येईल काय? त्यांनीं ठेवावा काय? या प्रश्नांना उत्तर होकारार्थीच आहे. आजपर्यंतच्या विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळें कदाचित् शाळांना व मुख्याध्यापकांना स्वतःच्या भोंवतीं विशिष्ट तटबंदी उभारावी लागली असेल (पण त्यांतहि वाट काढणारे मुख्याध्यापक होतेच); पण त्याचा परिणाम शाळेचें जीवन एकांगी व संकुचित होण्यांत आणि शिक्षकांना समाजांत गौण स्थान मिळण्यांत झाला. साहित्य, समाज-शिक्षण, आरोग्य इत्यादि अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आहेत कीं ज्या द्वारां जनतेच्या व्यापक शिक्षणाचें कार्य सतत चालवावयाचें असतें. शाळा हा समाजाचा एक हातापायासारखाच अविभाज्य अवयव आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे मुख्याध्यापकांनीं अशा कार्यांत केवळ समरसच व्हावयाचें नसून नेतृत्वहि करावयाचें आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. लहान गांवांत अशा कार्यांना फार मोठी संधि आहे. पण अशा सार्वजनिक कार्यांत मुख्याध्यापकांनीं आपली भूमिका निःस्पृह मार्गदर्शकाची व कुशल संयोजकाची ठेवावी.

सारांश, मुख्याध्यापक म्हणजे उत्साहाचा व स्फूर्तीचा झरा, नवकल्पनांचें उगमस्थान, मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ, उद्योगशीलतेची मूर्ति, सहानुभूति, स्नेह, आणि सौजन्य यांचें माहेरघर. प्राचीन ऋषिपरंपरेचा आणि आजच्या पाश्चात्य संशोधकवृत्तीचा त्यांच्या ठिकाणीं सुंदर संगम असावा. मग शाळेच्या आणि त्या द्वारां समाजाच्या जीवनांत सत्य-शिव-सुंदराचा आविष्कार व्हावयाला आरंभ झालाच म्हणून समजावें.

● ● ●

अनुक्रमांक ९५५५५३
दिनांक ...
क्रमांक ६३४...
नॉ. दि. २८/३/५४

: ५ :

# पालक आणि शाळा

## प्रास्ताविक

राष्ट्राच्या जीवनांत कुटुंबसंस्थेचें स्थान असाधारण आहे. सामाजिक व व्यक्तिगत जीवनाला कुटुंबसंस्थेनें जशी स्थिरता आणली आहे तसाच नव्या पिढीच्या संगोपनाचा व शिक्षणाचा भार तिनें सांभाळला आहे. 'कुटुंब म्हणजे नागरिक सद्‌गुणांची शाळा' असें विचारवंत मानीत आले आहेत. राष्ट्रांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनांत जरी मोठमोठीं स्थित्यंतरें घडून आलीं असलीं तरी शिक्षणाच्या व्यवहारांत कुटुंबाचें हें महत्त्व कोणत्याच प्रकारें कमी झालेलें नाहीं. राजसत्तेच्या व सरंजामी पद्धतीच्या युगांत बालकांच्या शिक्षणाची जबाबदारी कुटुंबावर होती तीच आजच्या लोकशाहीच्या व यांत्रिक पद्धतीच्या, वा साम्यवादी विचारसरणीच्या व विभक्त-कुटुंब-पद्धतीच्या युगांतहि आहे. किंबहुना ती तसूभर अधिक वाढली आहे. आणि याचें कारण, शिक्षण म्हणजे विद्याग्रहण असा संकुचित अर्थ आतां कोणी मान्य करीत नाहीं. शिक्षण हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा अखंड व व्यापक असा व्यापार आहे; आणि त्यांत मनावर होणाऱ्या संस्कारांना व ते संस्कार ज्यांतून घडतात त्या अनुभवांना फार मोठें स्थान आहे. हे संस्कार कौटुंबिक जीवनांतील लहानसहान प्रसंगांतून पदोपदीं घडत असतात; म्हणून गृहजीवनाला व गृहसंस्कारांना शिक्षणांत महत्त्वाचें स्थान आहे.

## सहकार्याची आवश्यकता

बालकांच्या जीवनाचा बराचसा भाग घरच्या वातावरणांत जातो. घरांतील लहानथोर व्यक्तींचें सान्निध्य, परस्पर संबंध व त्यांतून निर्माण होणाऱ्या क्रिया प्रतिक्रिया यांचा व्यक्तित्वाच्या घडणींत फार मोठा वांटा असतो. घरांतील वडील माणसांचे आचारविचार, श्रद्धा आणि समजुती, मतें आणि पूर्वग्रह-

या सर्वांचे परिणाम बालकांवर होत असतात. कौटुंबिक स्वास्थ्य आणि कलह यांतून त्यांच्या भावनिक जीवनाला स्थिरता लाभते किंवा तडे जातात. बालकांच्या आकांक्षा, धडपडी व उद्योग यांना घरांतून अवसर किती मिळतो, सहानुभूति किती लाभते, आणि प्रतिबंध किती होतो, यावर त्यांचें व्यक्तित्व आणि चारित्र्य कसा आकार घेईल हें अवलंबून असतें. घरांतील व्यक्तींचे मायापाश, त्यांच्यावरील विश्वास, आणि त्यांचा वाटणारा आधार यांमुळें बालकांच्या मनावर कुटुंबाची एक दृढ पकड असते. अत्यंत संस्कारक्षम वयांत संस्कारांचीं असंख्य पुटें चढून जणूं त्यांचें एक अभेद्य कवचच त्यांच्याभोंवतीं निर्माण झालेलें असतें. म्हणून नवीन संस्कारांचा अति मंद गतीनें व अति स्वल्प परिणाम होत असतो. हें गृहाचें महत्त्व लक्षांत घेऊन शाळेला आपलें ध्येय व कार्य यशस्वी करण्यास गृहाचें सहकार्य कटाक्षानें घेतलें पाहिजे.

बालकांना शिक्षण देणाऱ्या म्हणजेच त्याच्या नैसर्गिक प्रवृत्तींना वळण लावून त्यांचें उन्नयन करणाऱ्या पालक व शिक्षक या दोन्ही घटकांत जितकें निकट सहकार्य असेल तितकें बालकाचें जीवन सुस्थिर होईल. विद्यार्थि-दशेंत बालकांचें भावजीवन चंचल असतें. विविध प्रवृत्ति विविध दिशांना व्यक्तीला खेचीत असतात. सभोंवतालचे सामाजिक नियम व शिष्टाचार यामुळें अनेकदां कोंडमारा होत असतो. अशा वेळीं त्यांच्या सृजनशक्तीचा विकास तर कुंठित होणार नाहीं, आणि भोंवतालच्या परिस्थितीशीं जुळवून घेतां येईल असें शिक्षण त्यांना द्यावयाचें असतें. प्रत्येक बालकाचे स्वभाव-विशेष, निरानिराळ्या प्रसंगींच्या प्रतिक्रिया, मनाची ठेवण, आवडीनिवडी व संवयी, आणि घरचें वातावरण यांचें पूर्ण ज्ञान असल्याशिवाय शिक्षकाला आपलें कार्य करतां येणार नाहीं. पालकाचा निकट परिचय झाला व विश्वास जडला तरच हें कार्य सुलभ होईल.

आणखी एका गोष्टीसाठीं शाळेला पालकांचें सहकार्य मिळणें आवश्यक आहे. शालेय जगांत शिक्षणविषयक नव्या नव्या गोष्टी येत असतात; प्रगती-साठीं नव्या नव्या योजना आंखल्या जातात. कांहीं नवीन प्रयोग सुरू करण्यांत येतात. या योजनांचा संबंध केवळ व्यक्तिशः बालकांच्या जीवनाशींच असतो असें नाहीं. त्यांचे परिणाम दूरगामी असतात, व व्यापक समाज-

जीवनाशीं त्या निगडित असतात. पालकांना जर त्यांचें रहस्य आकलन झालें नाहीं तर त्यावर घरांत व चारचौघांत टीका होऊं लागते. अनेकदां ही टीका गैरसमजावर आधारलेली असते. केव्हां केव्हां परंपरेच्या निष्ठेंतून व नवीनाच्या अज्ञानांतून ती जन्म पावते. असल्या टीकेमुळें बालकांची, विशेषतः समंजस विद्यार्थ्यांची या नव्या योजनांकडे व प्रयोगांकडे बघण्याची दृष्टि विकृत व पूर्वग्रहदूषित होते. ही गोष्ट मोठमोठ्या योजना, बदल व ध्येयें याबद्दलच घडते असें नव्हे तर शालेय व्यवस्थेंतील लहान लहान योजना व घटना, पद्धति व नियम याबाबतहि पालकांची कुरकूर चालू असते. शिक्षण आणि शिक्षकांचा पेशा हा एक तज्ज्ञांचा प्रान्त आहे. आणि त्याच्या कार्यावर टीका करावयाची झाल्यास ती जरा जपून केली पाहिजे. या गोष्टीची जाणीव सर्वच पालकांना असते असें नाहीं. बालकांच्या शारीरिक आणि बौद्धिक प्रगतीसाठीं, शीलसंवर्धनासाठीं, व त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोण निकोप, व्यापक व विशाल बनविण्यासाठीं जे विविध उपक्रम आरंभिले जातात, मार्ग स्वीकारले जातात, त्यांचें यथायोग्य मूल्य जर पालकांना समजलें नाहीं तर त्यांच्याकडून या गोष्टींची व प्रयत्नांची हेळसांड वा हेटाळणी होते, आणि शाळेचे श्रम व्यर्थ जातात. विद्यार्थ्यांसाठीं जे जे प्रयत्न शाळेला करावयाचे असतात, त्यांत पालकांनीं सहभागी होऊन आपला वांटा उचलणें आवश्यक आहे. इतकेंच नव्हे तर शाळेच्या कार्याची व प्रयत्नाची सहानुभूतिपूर्वक जोपासना त्यांनीं केली पाहिजे. असें व्हावयास पालकवर्ग जाणता, सुबुद्ध व आस्थेवाईक असावयास हवा. पालकांचें सहकार्य मिळविण्याच्या प्रयत्नांत, पालकांना सुशिक्षित करण्याच्या प्रयत्नाचा आपोआप अंतर्भाव होतो. स्वच्छता आणि आरोग्य, आहार, विहार व धर्मनीति यांविषयीं पालक आपल्या कल्पना मुलांवर लादीत असतात. त्या पद्धतींत अनेक दोष असतात. हें त्यांना समजावून देणें इष्ट आहे. पालकांचें सहकार्य हें आपल्या उद्दिष्टाच्या प्राप्तीचें एक प्रभावी साधन आहे हें मान्य केलें कीं त्या सहकार्याचा लाभ होण्यासाठीं झटणें शाळेचें क्रमप्राप्त कर्तव्य ठरतें.

## सहकार्याची दिशा

कांहीं कांहीं गोष्टी दिसावयाला अत्यंत क्षुल्लक असतात; पण शाळेच्या अंतिम कार्याच्या दृष्टीनें त्यांनाच महत्त्व असतें. बालकांची नियमित उप-

स्थिति ही अशीच एक बाब आहे. बालकांना वक्तशीरपणाचें वळण लावणें ही जबाबदारी प्रामुख्यानें घराचीच आहे. तसेंच, बालकांच्या दैनंदिन उपस्थितींत खंड न पडेल, व त्यामुळें मागें पडण्याचा धोका आपोआपच टळेल अशी सावधगिरी ठेवणें हें पालकांचेंच काम आहे. कांहीं सण, समारंभ, धार्मिक उत्सव, व लग्नकार्यासारखे प्रसंग—यामुळें विद्यार्थी शाळेंत अनुपस्थित राहतात. पण त्याची पालकांना फारशी फिकीर नसते. सरकारी कचेरींतल्या नोकरांना या बाबतींत जी शिस्त पाळावी लागते व जेवढ्या सवलती मिळणें संभवनीय आहे त्याच आपण अपेक्षाव्यात अशी जाणीव वास्तविक पालकांनीं ठेवावयास हवी. तसेंच बालकांचें शारीरिक स्वास्थ्य ही बौद्धिक विकासाची पहिली पायरी आहे हें ध्यानांत घेऊन त्यांच्या आरोग्याकडे लक्ष पुरविण्याची कामगिरी पालकांनीं बजावली पाहिजे. गृहपाठासाठीं नेमून दिला जाणारा अभ्यास आपले पाल्य किती पार पाडतात, त्यासाठीं त्यांच्या गरजा काय आहेत, अडचणी कोणत्या आहेत याची दखल पालकांनीं घेणें आवश्यक आहे. तसेंच अभ्यासेतर कार्यक्रम शाळेंत कोणते व कसे पार पाडले जातात याचीहि त्यांना माहिती असणें इष्ट आहे. थोडक्यांत आपले पाल्य ज्या शाळेंत शिकतात, तिची कार्यपद्धति, नियम व ध्येय-धोरणें यांची पालकांना नीट कल्पना असली पाहिजे. ही माहिती त्यांना करून देणें व त्यांच्यांत जबाबदारीची जाणीव निर्माण करणें हें आजच्या परिस्थितींत शाळेचेंच काम आहे.

## सहकार्याचे मार्ग

शाळा व पालक यांच्यांत स्नेहभाव व घनिष्ठ संबंध निर्माण करण्याचे विविध मार्ग आहेत. शालेय जीवनांत पालकांशीं स्नेहभाव निर्माण करण्याच्या विविध संधि सहज चालून येतात व कांहीं निर्माण करतां येतात. त्यांचा फायदा करून घेण्याची दृष्टि मात्र मुख्याध्यापकांना व शिक्षकांना असली पाहिजे. यांतील महत्त्वाचे मार्ग पुढीलप्रमाणें सांगतां येतील —

१. पालकांच्या भेटी व मुलाखती.
२. बालकांच्या प्रगतीबद्दल मासिक अहवाल.
३. शाळेंत होणारे विविध कार्यक्रम व समारंभ.

४. शाळेचें नियतकालिक व इतर अहवाल.

५. शाळेचें स्नेहसंमेलन.

६. पालक-दिन.

७. शिक्षक-पालक-संघ.

८. ग्रामसुधार, समाज-शिक्षण-दिन यांसारखे कार्यक्रम.

### १. भेटी व मुलाखती

पालकांच्या भेटीचे व मुलाखतीचे प्रसंग वरचेवर येणें ही गोष्ट हितावह आहे. पण तिला किती मुख्याध्यापक राजी होतील हा प्रश्नच आहे. आपल्या आजच्या आर्थिक जीवनाच्या धकाधकींत ही गोष्ट तितकीच दुरापास्तहि आहे. पण लहान गांवांत व लहान शाळेंत तरी मुख्याध्यापकांचा व वर्ग-शिक्षकांचा पालकांशीं परिचय असणें हिताचें ठरेल. निदान विद्यार्थ्याला शाळेंत प्रथम दाखल करतांना तरी पालकांनीं शाळेंत आलें पाहिजे, असा दंडक असावा. कित्येक शाळांत पालकांच्या भेटीचें स्वरूप अगदीं औपचारिक असतें. वर्ग-शिक्षकांच्या व पालकांच्या भेटीहि मुख्याध्यापकांच्या अनुमतीनें व त्यांच्या देखरेखीखालीं होतात. हा सोवळेपणाचा अतिरेक वाटतो. इंग्लंडमध्यें कांहीं दिवशीं शाळेंत येऊन शाळेचें कामकाज कसें चालतें हें पाहण्याची पालकांना मुभा असते. रशियांत पालक वर्गांत पाठीमागें बसून पाठाचें अवलोकन करूं शकतात, व त्याबाबत आपल्या शंकाहि शिक्षकांना विचारूं शकतात. पण पालकांशीं स्नेहसंबंध याचा अर्थ फाजील सलगी व स्वतःचा बोज गमावून बसणें हाहि नव्हे. लहानशा गांवांत हा धोका संभवतो;आणि शिक्षक—मुख्याध्यापक पक्ष-पाताच्या आरोपाचे धनी होतात. आपली प्रतिष्ठा राखूनच स्नेहसंबंध प्रस्थापित करावयाचे असतात ही गोष्ट शिक्षकांनीं विसरतां कामा नये. पालकांच्या भेटी-गांठीचा उद्देश त्यांचा दृष्टिकोण समजावून घेणें, आपल्या शैक्षणिक कार्यांत त्यांचा अडथळा येणार नाहीं, उलट सहयोग मिळेल अशी त्यांची भूमिका बनाविणें, व संस्थेविषयीं सहानुभूति व आपलेपणा त्यांना वाटेल असें वातावरण निर्माण करणें हाच होय. मुख्याध्यापकांच्या व कांहीं पालकांच्या विविध क्षेत्रांत भेटीगांठी होण्याचा संभव असतो. त्याचा फायदा त्यांना घेतां आला पाहिजे.

### २. मासिक प्रगतीचा अहवाल

प्रत्येक विद्यार्थ्यांचें प्रगतिपत्रक दरमहा पालकांकडे नियमितपणें पाठविण्याचा परिपाठ सर्व शाळा पाळतात. त्यांत फीची व उपस्थितीची नोंद असते, आणि विषयवार विद्यार्थ्यानें मिळवलेले गुण व क्रमांक यांचें टिपण असतें. वर्षांतून कधींकाळीं वैद्यकीय तपासणी झाली तर तिचेंहि वृत्त या पत्रकद्वारां पालकांना कळवण्यांत येतें. वर्षअखेर संभाव्य वर्षफलाची आगाऊ सूचनाहि यांतून पालकांना देण्याची कांहीं मुख्याध्यापकांची प्रथा आहे. पालक बहुधा विनतक्कार व नैमित्तिक भाग म्हणून त्यावर सही देऊन मोकळे होतात.

पण विद्यार्थी अभ्यासांत कच्चे असतील तर त्यासाठीं शाळा वा शिक्षक काय करीत आहेत, किंवा पालकांनीं काय करावयाचें योजिलें आहे हें परस्परांना समजतेंच असें नाहीं. मागासलेपणाची कारणमीमांसाहि नीट होत नाहीं. वैद्यकीय तपासणीनंतर उपचार-योजनेविषयीं पालक या ना त्या कारणानें उदासीनच असतात. शाळांकडूनहि त्या बाबतींत हालचाल क्वचितच होते. अभ्यासेतर विषयांत – क्रीडा, छंद इत्यादींत विद्यार्थ्यांची प्रगति किती आहे, व त्याच्या वागणुकीचें व चालचलणुकीचें स्वरूप काय आहे, थोडक्यांत चारित्र्यसंगठनाच्या दृष्टीनें त्याचा विकास कसा होत आहे याबाबत उभयपक्षीं मुग्धता व औदासीन्यच आढळतें ! वास्तविक मासिक अहवालाच्या निमित्तानें या सर्वांचा परामर्श घेतला जावयास पाहिजे, व पालक–शिक्षकांत विचार-विनिमय व्हावयास पाहिजे.

### ३. नियतकालिकें–उत्सव–समारंभ इ.

शाळेंत साजरे होणारे उत्सव व समारंभ, शाळेचीं नियतकालिकें व संस्थेचे अहवाल यांच्याद्वारां पालकांशीं स्नेहसंबंध प्रस्थापित करतां येतील. शाळेंत निरनिराळे दिन साजरे केले जातात; विविध प्रकारचे सामने होतात; बोलपट–चित्रपट दाखविले जातात; स्नेहसंमेलन साजरें केलें जातें. या सर्व प्रसंगीं पालकांना निमंत्रण करून शाळेचे विविध उपक्रम त्यांच्या कानावर घालतां येतात. गांठलेला प्रगतीचा टप्पा आणि संपादिलेलें यश त्यांच्या निदर्शनास आणतां येतें. अशा प्रसंगांसाठीं पालकांचें सहकार्यहि अनेकदां मिळवावें लागतें. त्यांचा यथोचित गौरव व्हावा, तसेंच आपल्या पाल्याचा

होत असलेला गौरव पाहण्यांत पालकांनीं धन्यता वाटते, हेंहि लक्षांत घेऊन त्यांची सहानुभूति वृद्धिंगत केली पाहिजे.

### ४. पालकदिन

स्नेहसंमेलनास जोडून किंवा स्वतंत्रपणें पालकदिन साजरा करणें हा पालकांमध्यें शाळेविषयीं आत्मीयता निर्माण करण्याचा एक उत्कृष्ट मार्ग आहे. एकेका वर्गाच्या वा इयत्तेच्या विद्यार्थ्यांच्या पालकांस निमंत्रित करावयाचें, त्या त्या वर्गांतील विद्यार्थ्यांचें लेखनकार्य, हस्तव्यवसायांतील वस्तु, चित्रकलेंतील कृति या सर्वांचें प्रदर्शन भरवून शाळेंत काय करून घेतलें जातें, याचा प्रत्यक्ष परिचय करून द्यावयाचा, व्यायामविषयक प्रात्यक्षिकें दाखवावयाचीं, शाळेंतील भूगोल, शास्त्र इत्यादि विभागांतील उपकरणांचें व साधनांचें प्रदर्शन किंवा प्रायोगिक दर्शन घडवावयाचें, आणि शेवटीं विद्यार्थ्यांतर्फे करमणुकीचा कार्यक्रम करवून रसपानाच्या कार्यक्रमानें निरोप द्यावयाचा, अशी त्याची योजना असावी. मांडलेल्या प्रदर्शनाच्या सर्व विभागांत विद्यार्थ्यांनींच पालकांना 'आपल्या शाळे'चा परिचय करून द्यावा व निरोपापूर्वी मुख्याध्यापकांनीं शाळेच्या आणि पालकांच्या कडून असलेल्या अपेक्षांबद्दल निवेदन करावयाचें अशी प्रथा पाडावी. या निमित्तानें पालकांना शाळेंत बराच वेळ घालवितां येतो, शाळेचें कामकाज जवळून पाहण्याची संधि मिळते. शिक्षकांना व मुख्याध्यापकांना पालकांची व्यक्तिशः ओळख करून घेतां येते, आणि त्यांच्या पाल्यांविषयीं पालकांच्या आशाआकांक्षा व अडचणी समजावून घेतां येतात. वस्तुस्थितीची त्यांना जाणीव करून देऊन सावध करतां येतें.

### ५. शिक्षक–पालक संघ

वरील सर्व मार्गांचें आपापल्यापरीनें महत्त्व असलें तरी शिक्षक–पालक यांच्या संबंधाला नित्यता व दृढता आणण्याचें उत्कृष्ट साधन म्हणजे शिक्षक व पालक यांचा संमिश्र संघ हेंच होय. छोट्या गांवांत असे संघ स्थापणें कठिण जाऊं नये. संघाचें अध्यक्षपद मुख्याध्यापकांकडे असावें; आणि कार्यवाहाची जबाबदारी एखाद्या उत्साही पालकांनीं सांभाळावी, अशी व्यवस्था करतां येईल. मासिक वा द्वैमासिक सभांमध्यें शाळेच्या आर्थिक अडचणींचा

नव्हे तर बालकांसंबंधीं अडचणींचा, त्यांना पुरवावयाच्या कामाचा, त्यांचें आरोग्य, संवयी इत्यादींचा विचार व्हावा.


असल्या संघांचे किंवा समित्यांचे तीन प्रमुख फायदे इतर देशांत अनुभवास आले आहेत. ( १ ) शिक्षक व पालक यांमधील वैचारिक अंतर भरून निघतें. ( २ ) बालकांच्या व एकंदर समाजाच्या शैक्षणिक कार्यांत आपलीहि कांहीं जबाबदारी आहे याची पालकांना जाणीव होते. ( ३ ) शैक्षणिक क्षेत्रांत येणारे नवे नवे विचारप्रवाह पालकांना समजावून देतां येतात.

पालक-शिक्षकांमध्यें जर खरोखर सहकार्य निर्माण झालें, तर बालकांच्या शिक्षणाचें कार्य अधिक जोमानें व यशस्वी रीतीनें करतां येईल. आपल्या पाल्यांची शाळा ही ' आपली ' संस्था आहे, जनतेची आहे, इतकी आत्मीयता त्यांच्यांत निर्माण व्हायला पाहिजे. शिक्षक व मुख्याध्यापक जर आपल्या कार्यांत प्रवीण असतील व तत्त्वनिष्ठ असतील तर पालकांकडून ढवळा-ढवळ होईल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. जेव्हां संस्थेचे माजी विद्यार्थीच पालक झाले असतील तेव्हां पालकांची सहानुभूति मिळविणें हें काम सोपें होतें.

आपल्या आजच्या परिस्थितींत पालकसहकार्याचा प्रश्न खेड्यांत व शहरांत भिन्न भिन्न दिशांनीं हाताळावा लागेल. शहरांत – विशेषतः मोठ्या शहरांत बालकांना गृहजीवन असें उरलेलेंच नाहीं. मोकळी हवा, भरपूर जागा, खेळाचीं विविध साधनें, सामाजिक जीवन, करमणुकीचीं साधनें इत्यादि अनेक गोष्टींमुळें विद्यार्थी शाळेंतच अधिक रमतात. खेड्यांतून शहरांत येणाऱ्या विद्यार्थ्यांना आपण एका नव्याच जगांत प्रवेश केल्यासारखा वाटतो. शहरांतील पालक सुशिक्षित असतात. बालकाचें घरांतील जीवन शिस्तबद्ध व भावना-विकासाच्या दृष्टीनें सुखद व्हावें यांचें महत्त्व त्यांना पटवून देणें सोपें आहे. खेड्यांतील जनतेला शाळा ग्रामविकासाचें केन्द्र आहे हें पटवून व तसा विश्वास निर्माण करूनच त्यांची सहानुभूति मिळविली पाहिजे. नव्या समाजविकास-योजनांत व प्रकल्पांत गांवकरी आपली शाळेची इमारत स्वतः बांधून देत आहेत ही फार अनुकूल घटना आहे. तिचा उपयोग करून घ्यायला पाहिजे.

## समारोप

पाश्चात्य देशांत पालकांचें सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न कसोशीनें केला जातो. रशियांत विद्यार्थ्यांचे गृहपाठ व दैनंदिन जीवन यांकडे पालक लक्ष देत नसतील तर कामगार-संघटनांमार्फत त्यांच्यावर दडपण आणण्यांत येतें. विद्यार्थ्यांच्या घरीं जाऊन पालकांच्या भेटी—मुलाखती घेणें व पालकांच्या मनोरचनेचा व एकंदर घरांतील वातावरणाचा अभ्यास करणें हें शिक्षक आपल्या कर्तव्याचा भाग मानतात. इंग्लंड-अमेरिका या देशांत 'शालेय सेवा' या नांवानें पालकांचा व शाळेचा संबंध जोडण्यांत येतो. या आधुनिक तंत्रांचा शिक्षकांनीं परिचय करून घ्यावयास पाहिजे. विद्यार्थ्यांच्या घरीं जाण्यांत शिक्षकांनीं कमीपणा मानण्याचें कांहींच कारण नाहीं. फक्त आपल्या दर्जाला व स्वाभिमानाला बाध न आणतां सुजाण मित्राची भूमिका त्यांना घेतां आली पाहिजे.



: ६ :

# अभ्यासक्रमाचीं मूलतत्त्वें व स्थूल रूपरेखा

## प्रास्ताविक

वर्षाच्या आरंभीं मुख्याध्यापकांनीं विषयशिक्षकांकडून अभ्यासपत्रकें तयार करून घ्यावीं असें मागें म्हटलें आहे. पण शाळेंत शिकविण्यासाठीं कोणते विषय निवडावेत, त्या निवडीसाठीं गमक काय, त्याच्या मुळाशीं दृष्टि कोणती, हें सर्व शिक्षकांना ठाऊक असावयास पाहिजे. अमुक एक विषय कां शिकवावयाचा, बालकाच्या किंवा समाजाच्या दृष्टीनें त्याचें काय महत्त्व आहे, हें समजल्याशिवाय तो कसा शिकवावा हें शिक्षकांना ठरवितां येणार नाहीं. यासाठीं अभ्यासक्रम कोणत्या तत्त्वांवर ठरविले जातात किंवा ठरविले जावेत याचा स्थूल मानानें विचार करणें आवश्यक आहे.

## व्यापक स्वरूप

अभ्यासक्रम म्हणजे शिकविण्याकरितां निवडलेले विषय, आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या व समाजाच्या गरजांच्या पूर्ततेसाठीं त्यांच्या साहाय्यानें क्रमशः ज्ञान द्यावयाचें असा अर्थ सर्वसाधारणपणें घेतला जातो. " आपल्या ध्येयानुरूप 'विद्यार्थ्याची मूर्ति' घडविण्याचें शिल्पकाराच्या हातांतील एक साधन " असेंहि त्याचें वर्णन केलें जातें. परंतु शिक्षणाचें व्यापक स्वरूप लक्षांत घेऊन शिक्षणाच्या सामाजिक अंगावर भर देणारे शिक्षणशास्त्रज्ञ 'अभ्यासक्रम' याचाहि विस्तृत अर्थ आतां करूं लागले आहेत. शालेय जीवनांत विद्यार्थ्यांच्या मनावर आणि वागणुकीवर संस्कार करून त्यांना वळण लावणारे, त्यांत परिवर्तन घडाविणारे जे जे प्रसंग आणि कार्यक्रम असतात, त्या सर्वांचा 'अभ्यासक्रम' या सदरांत ते समावेश करूं इच्छितात. यासाठींच परंपरागत बौद्धिक विषय हेच अभ्यासक्रमाचे विषय न मानतां, वर्ग, वाचनालय, प्रयोगशाळा, छंदमंडळें, क्रीडांगण, इतकेंच नव्हे तर शिक्षक – विद्यार्थ्यांचे वैयक्तिक संपर्काचे प्रसंग – या

सर्वांतून मिळणाऱ्या अनुभवांच्या समग्रतेचा अभ्यासक्रमांत अंतर्भाव व्हावा असें भारतसरकारनें दुय्यम शिक्षणांचा सर्वांगीण विचार करण्याकरितां इ. स. १९५२ सालीं नियोजिलेल्या मुदालियार समितीनें आपल्या अहवालांत सुचाविलें आहे व तें अगदीं सयुक्तिक आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाच्या विविध कक्षा व पैलू यांवर परिणाम करून त्यांच्या व्यक्तित्वाचा आविष्कार करणारें समग्र शालेय जीवन हा अभ्यासक्रमाचा भाग आहे.

## मूलभूत दृष्टि

विद्यार्थ्याला कोणते विषय शिकवावेत याचें उत्तर एका अर्थानें अगदीं सोपें आहे. विद्यार्थ्यानें कसें बनावें, त्यानें पुढें काय करावें, त्याच्याकडून समाजाच्या – राष्ट्राच्या अपेक्षा काय आहेत, या प्रश्नांच्या उत्तरावर त्या प्रश्नाचें उत्तर अवलंबून आहे. आपली जुनी समाजव्यवस्था पाहतां घरांतून, वाडिलांकडून किंवा व्यवसायसंघांतून दिलें जाणारें शिक्षण कोणतें होतें व तें तसें कां होतें, याचा उलगडा या दृष्टीनें सहज होतो. बालकाच्या स्वाभाविक प्रवृत्तींना, त्याच्या घडपडीला महत्त्व देऊन अभ्यासक्रम आंखावा, कीं समाजाच्या गरजा, सांस्कृतिक वारसा, इत्यादींच्या संरक्षण – संवर्धनासाठीं तो असावा यावर पाश्चात्य देशांत रणें माजलीं होतीं. तसेंच, अभ्यासाच्या विषयांत सांस्कृतिक विषयांना प्राधान्य असावें, भौतिक, शास्त्रीय विषयांना अग्रस्थान द्यावें, कीं औद्योगिक व्यवसायालाच महत्त्व असावें यावरहि अनेक तट एके वेळीं पडले होते. पण व्यक्ति आणि समाज यांच्या जीवनांत समन्वय साधण्याचा विचार मान्य झाल्यापासून अभ्यासक्रमाच्या गाभ्यांत या तिन्हींचा समन्वय व समवाय साधण्यावर विचारवंतांचा आतां कटाक्ष आहे.

## नियामक आणि मार्गदर्शक तत्त्वें

अभ्यासक्रमांतील विविध विषय व त्यांचा तपशील आंखतांना पुढील तत्त्वें नियामक आणि मार्गदर्शक म्हणून ग्राह्य झालीं आहेत:—

### १. ध्येय आणि उद्दिष्टें यांची बैठक

शाळा ही समाज व राष्ट्र यांच्या जीवनांतील एक महत्त्वाची संस्था असल्यानें जीवनविषयक तत्त्वज्ञानांतून निर्माण झालेल्या शैक्षणिक दृष्टीचा व विचारप्रणालीचा प्रथम विचार झाला पाहिजे, हें अभ्यासक्रम-निर्मितीचें

आद्य सूत्र होय. प्रत्येक राष्ट्राचें तत्त्वज्ञान त्याची सांस्कृतिक परंपरा, भौतिक परिस्थिति, तत्कालीन गरजा यांतून निर्माण होतें. राष्ट्राला ज्या वृत्तीचे चारित्र्यसंपन्न, कार्यकुशल, व सुसंस्कृत नवनिर्मितिक्षम नागरिक हवे असतात, त्या वृत्तींचा, कौशल्यांचा व संस्कारांचा प्रभाव अभ्यासक्रमांत दिसणें ही निकडीची बाब आहे.

## २. विविधता आणि लवचीकपणा

विद्यार्थ्याविद्यार्थ्यांमध्यें व्यक्तिगत भेद असतात, त्यांचे पिंड भिन्न असतात, अभिरुचि, मनाची ठेवण यांत अंतर असतें, हें लक्षांत घेऊन वेगवेगळ्या प्रकारच्या विषयांचा अभ्यासक्रमांत अंतर्भाव करावयास पाहिजे. सर्वच विद्यार्थी सर्व तात्त्विक विषय आकलन करण्यास बौद्धिक दृष्ट्या समर्थ नसतात. पुस्तकी ज्ञानावरील किंवा विशिष्ट विषयांवरील भर अनेकांच्या विकासास प्रतिरोधक होतो. अत्यंत बुद्धिमान् असून केवळ गणिताचा अभ्यास झेपला नाहीं म्हणून उच्च शिक्षणास मुकलेले हरिभाऊ आपटे किंवा राम गणेश गडकरी समाजांत किती तरी आढळतात. उलट, भाषाविषय झेपत नसलेले पण गणित व शास्त्र यांत तल्लख बुद्धि असलेले विद्यार्थीहि कमी नसतात. तेव्हां न आवडणारा किंवा न झेपणारा विषय सर्वांवर लादण्यांत काय अर्थ ?

शिवाय बौद्धिक गरजांबरोबरच शारीरिक, भावनात्मक, सामाजिक व सौंदर्यात्मक अशाहि विद्यार्थ्यांच्या गरजा व भुका असतात. म्हणून अनुभवांची विविधता हीच जीवनाला पोषक ठरते. तेव्हां समृद्ध जीवनाचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा यासाठीं विविध विषय व कार्यक्षेत्रें शाळेनें पुरवावींत यावर आज सुधारलेल्या राष्ट्रांत भर दिला जातो. पुस्तकी विषयांइतकेंच छंदमंडळें, गुणविकासवर्ग इत्यादि अभ्यासेतर कार्यक्रमाला आतां शाळांतून महत्त्व येऊं लागलें आहे तें यासाठींच. बौद्धिक प्रगति साधारणच असलेले पण गायन, चित्रकला, अभिनय इत्यादि गुणांत प्रामुख्यानें चमकणारे विद्यार्थी शिक्षकांना परिचित असतात. महत्त्वाच्या जीवनोपयोगी विषयांचें कांहीं ठराविक प्रमाणांत ज्ञान घेतल्यावर आवडीच्या व स्वभावानुकूल विषयांत प्रावीण्य मिळविण्याला व त्यांतून व्यक्तिविकास साधण्याला शाळेंत प्रत्येक विद्यार्थ्याला अवसर मिळाला पाहिजे.

अभ्यासक्रमाच्या लवचीकपणाचा आणखीहि एका दृष्टीनें अर्थ करतां येतो. अभ्यासक्रम हें शिक्षणाच्या ध्येयप्राप्तीचें एक साधन आहे असें वर सांगितलें आहेच. पण शिक्षणाचें ध्येय हें इतर कोणत्याहि क्षेत्रांतील ध्येया-प्रमाणेंच स्थिर असूं शकत नाहीं, तें नेहमींच प्रगमनशील असतें. उदाहरणार्थ, निरक्षर समाजांतील शिक्षणाचें ध्येय प्रारंभीं मुख्यतः साक्षारता-प्रसार असें असेल. त्या ध्येयाच्या पूर्तीच्या दृष्टीनेंच अभ्यासक्रम आंखला जाईल, क्रमिक पुस्तकांची रचना करावी लागेल; शिक्षणपद्धति, शाळेच्या इमारती, उपकरणें इत्यादि साहाय्यक गोष्टींची तरतूदहि तें ध्येय शक्य तितक्या कमी कालावधींत साध्य करण्याच्या दृष्टीनें करावी लागेल. समाज साक्षर झाल्यानंतर पुढें प्रगति करण्याच्या दृष्टीनें शिक्षणाचा कस वाढविणें, नागरिकत्वाचें शिक्षण देणें, असें ध्येय ठरवावें लागेल, व त्याप्रमाणें अभ्यासक्रमादि साधनांत बदल करावा लागेल. राष्ट्राची सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थिति बदलतांच शिक्षणाच्या ध्येयांत कसा तात्काल बदल करावा लागतो त्याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आपला भारत देश होय. ब्रिटिशांच्या अंमदानींतील कारकून बनविण्याचें शिक्षणाचें ध्येय आतां बदलून स्वतंत्र देशाचा उत्कृष्ट नागरिक तयार करण्याच्या दृष्टीनें शिक्षणाच्या ध्येयांत बदल करण्याचे देशांत जे प्रयत्न चालू झाले त्यांचा इतिहास ताजाच आहे.

तेव्हां समाजाच्या प्रगतीबरोबर किंवा समाजांतील स्थित्यंतराबरोबर जर शिक्षणाचें ध्येयच बदलणार असलें तर त्याला साधनभूत अभ्यासक्रमहि बदलला पाहिजे हें ओघानेंच येतें.

कालानुरूप होणाऱ्या परिस्थिति-भिन्नत्वाप्रमाणेंच स्थलभिन्नत्व, किंवा विद्यार्थ्यांच्या आकलनशक्तींतील भिन्नत्व, किंवा शिक्षकांच्या अध्यापन-कौशल्यांतील भिन्नत्व यांवरहि अभ्यासक्रमाची रचना अवलंबून असते. त्यामुळें कोणत्याहि राष्ट्रांत, कोणत्याहि काळीं, कोणत्याहि अवस्थेंतील समाजा-करितां अभ्यासक्रम ठराविक सांच्याचा, सर्वांनीं सारख्याच निष्ठेनें आणि कांटेकोरपणानें अवलंबिला पाहिजे असा असतां उपयोगी नाहीं. परिस्थिति-भिन्नत्वाप्रमाणें अभ्यासक्रमांत कमीजास्त बदल करण्याची मुभा शाळांना असावयास पाहिजे. मध्यवर्ती सत्तेनें—म्हणजेच देशांतील प्रचलित सरकारनें देशाच्या गरजा सामान्यत्वानें पाहून अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करावा

व प्रत्यक्ष शिक्षण देणाऱ्या संस्थांनीं म्हणजे शाळांनीं त्यांतील तत्त्वांस बाध न येईल अशा रीतीनें त्या अभ्यासक्रमांतील तपशिलांत स्थानिक गरजेप्रमाणें जरूर तर बदल करावा. असा अभ्यासक्रमांतील लवचीकपणा एकंदर शिक्षणाच्या प्रगतीच्या दृष्टीनें उपयुक्त ठरतो. सर्वांकरितां ठराविक सांच्याचा अभ्यासक्रम आंखण्यानें विचारवंतांची प्रगति खुंटते, व शिस्तीच्या दृष्टीनें, एकसूत्रीपणाच्या दृष्टीनें तें योग्य दिसलें तरी त्यानें देशाचें अंतिम नुकसानच होतें.

### ३. चढता क्रम, समकेंद्रपद्धति, पण एकसूत्रीपणा

मुलांच्या वाढत्या वयाबरोबर त्यांचें आकलन सामर्थ्य सामान्यतः वाढतें असतें; त्या दृष्टीनें अभ्यासक्रम आंखतांना तो इयत्तावारीनें चढत्या क्रमाचा असावा हें साहजिकच आहे. पण अमुक एक कल्पना संपूर्णपणें लहान वयांत कळणारच नाहीं म्हणून ती कल्पना पूर्णपणें प्रौढ विद्यार्थि-वर्गाकरितां राखून ठेवावयाची असें मात्र होतां उपयोगी नाहीं. कोणतीहि कल्पना घेतली तर तीमधील जेवढा भाग ज्या वयांत कळेल तेवढा त्या वयांत शिकवावयाचा, व त्यांतील क्लिष्ट, कठीण भाग पुढील काळाकरितां राखून ठेवावयाचा व अशा रीतीनें हळूहळू बालकांच्या आकलनशक्तीचें वर्तुळ जसजसें वाढेल तसतसें त्यांच्या ज्ञानाचें, त्यांच्या अनुभवांचें वर्तुळहि वाढवीत जावयाचें हीच समकेंद्रपद्धति अभ्यासक्रमांत अवलंबावी. उदाहरणेंच घेऊन सांगावयाचें म्हणजे, विशेषणांनीं विशेष्यांचा अर्थ स्पष्ट होण्यास, केव्हां मर्यादित होण्यास कशी मदत होते हें उदाहरणांनीं स्पष्ट करून, 'विशेषण' ही व्याकरणांतील कल्पना नऊ-दहा वर्षांच्या बालकांना समजावून सांगतां येईल. पण विशेषणांचे विविध प्रकार, त्यांतील सूक्ष्म भेद इत्यादि गोष्टी प्रौढ विद्यार्थ्यांकरितां राखून ठेवाव्या. विभक्तींच्या प्रत्ययांचा वाक्यरचनेच्या कामीं कसा उपयोग होतो तें व्याकरणाच्या अध्यापनाच्या प्रथमावस्थेंत समजावून सांगतां येईल. पण कारकविभक्ति, उपपदविभक्ति इ. कल्पना प्रौढ विद्यार्थ्यांकरितांच ठेवाव्या. पृथ्वीचा आकार किती मोठा आहे, भरती–ओहोटीचे फायदे-तोटे काय इ. कल्पना लहान वयांत समजूं शकतील. पण पृथ्वीचा आकार गणितशास्त्राच्या साहाय्यानें कसा निश्चित करतां येतो, किंवा भरती–ओहोटी कशी होते हें त्या वेळीं न सांगतां पुढें सांगितलें तरच समजेल.

पण समकेन्द्रपद्धति म्हणजे विस्कळितपणा मात्र नव्हे. कोणत्या वयांत, कोणत्या कल्पना, किती मर्यादेपर्यंत स्पष्ट करतां येतील तें मानसशास्त्राच्या साहाय्यानें ठरवून अभ्यासक्रमांत एकसूत्रीपणा आणावयास हवा. नाहीं तर कित्येक वेळां त्याच त्याच कल्पना पुनः पुनः समजाविल्या जातील, किंवा कांहीं गोष्टी समजावून द्यावयाच्या राहून जातील.

अभ्यासक्रमांत एकसूत्रीपणा आणखीहि एका अर्थानें हवा. अभ्यासक्रम म्हटला म्हणजे विविध विषय डोळ्यांपुढें येतात. वास्तविक विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावयाचें म्हणजे त्यांना भावी आयुष्याची तयारी करण्यास उपयुक्त होतील असे अनुभव मिळण्याची व्यवस्था शाळेनें करावयाची. शिक्षण म्हणजे अनुभव असेंच कित्येक शिक्षणशास्त्रज्ञ म्हणतात, हें मागें सांगितलें आहेच. पण हे अनुभव देण्यास साधन म्हणून भाषा, गणित, शास्त्र, कला, खेळ इत्यादि विषयांचें साहाय्य घ्यावें लागतें. त्यामुळें अभ्यासक्रम म्हणजे हे विषय असें स्थूलपणानें म्हणावें लागतें.

या विविध विषयांचें अभ्यासक्रमांतील स्थान काय हा विचार याच प्रकरणांत पुढें केला आहे. पण त्यांच्यांत एकसूत्रीपणा असण्याची आवश्यकता मात्र येथेंच चर्चिली पाहिजे. हे विषय म्हणजे ज्ञानाचीं, अनुभवाचीं साधनें होत. वास्तविक ज्ञान हें सलग, एकजिनसी, असें असूनहि आपण त्याचे कप्पे पाडतों, व एका कप्प्याला भाषा असें नांव देतों, दुसऱ्याला इतिहास, तिसऱ्याला शास्त्र, चवथ्याला खेळ असें म्हणतों. अध्यापनाच्या सोयीच्या दृष्टीनें हें अवश्य असलें तरी शिक्षकांनीं त्या सर्व विभागांच्या मागें असणारी एकजिनसी ज्ञानाची कल्पना विसरतां कामा नये, व एका विषयाचा दुसऱ्या विषयाशीं कांहींच संबंध नाहीं अशी भूमिका स्वीकारूं नये. कांहीं कांहीं कल्पना तर अशा असूं शकतात कीं त्या कोणत्या विषयाचा भाग हें ठराविणें अशक्य होतें. 'सुएजचा कालवा' हा इतिहासाचा भाग होईल, भूगोलाचा भाग होईल, अर्थशास्त्राचा भाग होईल, राज्यनीतिशास्त्राचाहि भाग होईल. कोलंबसाच्या सफरींचा वृत्तांत इतिहास-शिक्षकाला सांगावा लागतो, भूगोलांतहि त्याचा समावेश होतो. हें सर्व अनिवार्यच आहे. तेव्हां निरानिराळ्या विषयांचा शक्य तेथें स्वतंत्रपणें विचार न करतां अनेक विषयांचे ते निरानिराळे पैलू आहेत हें ध्यानांत ठेवूनच विचार व्हावा.

ह्या एकसूत्रीपणा अभ्यासक्रमाच्या रचनेंतच स्पष्ट व्हावा. त्या दृष्टीनें आतां अभ्यासक्रम विषयवारीनें न आंखतां विषयांचे गट करून आंखतात. उदाहरणार्थ, 'सामाजिक शास्त्र' असा गट करून त्यांत इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादि अनेक विषयांचा समावेश करतात. 'भौतिक शास्त्र' या गटांत पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र, खगोलशास्त्र, प्राणिशास्त्र, गणितशास्त्र अशा विषयांचा समावेश करतात.

### ४. कृतिमूल आणि ज्ञानमूल

अभ्यासक्रम ठरवितांना आणखी एका दृष्टीनें विचार करावयास हवा. विद्यार्थ्यांची आवडनिवड आणि त्यांची कुवत हीं वयाबरोबर बदलत असतात. अमूर्त ज्ञानाची उपासना लहान वयांत शक्य नसते. धांवावें, खेळावें, हिंडावें, ओरडावें,—किंवा याला हात लाव, तें पाड, हें मोड, तें फेंक अशी वृत्ति ह्या वयांत सामान्यतः असते. या हालचालींचा, धडपडींचा निषेध न करतां त्या नैसर्गिक प्रवृत्तीच आहेत हें लक्षांत घेऊन शिक्षणाच्या कामीं त्यांचा जास्तींत जास्त उपयोग कसा करून घेतां येईल तें अभ्यासक्रम रचणारांनीं पाहा. म्हणजेच ह्या वयांतील मुलांकरितां अभ्यासक्रम हा शक्य तों कृतिमूल असा असावा. हात आणि पाय यांचा जास्तींत जास्त चांगला उपयोग त्यांना कसा करावयास लावितां येईल तें पाहावें. पुस्तकांच्या साहाय्यानें शिकवावयाचे विषय त्यांच्या अभ्यासक्रमांत प्रत्यक्षतः न आणितां शक्य तों त्यांचा अभ्यास कृतिमूल असावा. हल्लीं मुंबई राज्यांत प्राथमिक शाळांकरितां ही अभ्यासक्रमाची किंवा खरें म्हटलें तर अध्यापन-पद्धतीची व्यवस्था करण्यांत आली आहे ती याच भूमिकेवरून. मुलांना सूतकताई, वर्गसफाई, सुतारकाम, बागकाम, कागदकाम, असे हस्तव्यवसाय करावयास लावावयाचे, आणि त्यांच्याच द्वारां त्यांची जिज्ञासा तृप्त करून त्यांना शिक्षण द्यावयाचें अशी ती पद्धत आहे. बाल-मानसशास्त्राला धरूनच ती पद्धत आहे याबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं.

विद्यार्थी जसजसे प्रौढ होत जातील तसतशी त्यांची विचारशक्ति वाढत जाते. केवळ हें करा, तें आणा, अशा दुसऱ्यांनीं सांगितलेल्या कृतींनीं किंवा आज्ञांनीं त्यांचें समाधान होत नाहीं. हें कां करावयाचें असा प्रश्न त्यांच्या

मनांत निश्चित उद्भवणार. त्या प्रश्नाचें उत्तर मिळाल्याशिवाय त्यांचें पाऊल पुढें पडणार नाहीं, त्यांचे हात कामाला लागणार नाहींत. याचाच अर्थ असा कीं त्यांचेकरितां आंखावयाचा कार्यक्रम म्हणजे अभ्यासक्रम हा ज्ञानमूल असा असावयास पाहिजे. ज्ञानाची तृष्णा या वयांत वाढत्या प्रमाणांत असते. ती तृप्त करणारा अभ्यासक्रम त्यांचेकरितां असावा लागतो.

**५. समाजजीवनाशीं संबद्धता**

समाजजीवनाचें स्वरूप कळून त्यांत सहभागी होण्यासाठीं आणि त्यांतील आपला वांटा उचलण्यासाठीं विद्यार्थ्यांनीं तयार व्हावयाचें असल्यानें शालेय अभ्यासक्रमाचा, कार्यक्रमांचा व अनुभवांचा समाजजीवनाशीं संबंध राखला पाहिजे; समाजाचें केवळ सांस्कृतिकच जीवन नव्हे तर व्यावसायिक जीवनहि विचारांत घेतलें पाहिजे. हस्तव्यवसायांच्या कलांचा अंतर्भाव याच दृष्टीनें अभ्यासक्रमांत व्हावयास हवा. समाजाची उभारणी अर्थोत्पादक व्यवसायांवर आहे; हे व्यवसाय समाजजीवनाचा कणा बनले आहेत. स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार त्यांत भिन्नता असेल, पण त्यांपैकीं कोठल्या तरी व्यवसायांत आपल्याला पदार्पण करावयाचें आहे, अशी स्पष्ट जाणीव विद्यार्थ्यांना – विशेषतः प्रौढ विद्यार्थींना असावी. त्या व्यवसायांचा विद्यार्थ्यांना स्थूल परिचय असणें, व सर्वांत समान असणाऱ्या कांहीं मूलभूत कौशल्यांत त्यांची प्रगति होणें ही दृष्टि अभ्यासक्रम आंखतांनाच ठेवावयास हवी. व्यक्तीची कार्यक्षमता आणि समाजाची गरज यांचा मेळ बसला पाहिजे. आपला परिसर, शेजार आणि समाज यांच्यांत मिळून मिसळूनच जगतां येतें ही जाणीव त्यांतून व्यक्तीला व्हावी. आपली पात्रता व नैसर्गिक घडण कोणत्या व्यवसायासाठीं आहे यांचेंहि आकलन त्यांतून होईल. ही शेवटली गोष्ट समाजांत ज्याला त्याला आपल्या आवडीनुसार व पात्रतेनुसार व्यवसाय मिळविण्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

शाळेंतील वातावरण, शाळेंतील कार्यक्रम, शाळेंतील एकंदर जीवन व अनुभव बाह्य विशाल जगांतील वातावरण-अनुभव यांपेक्षां कांहीं निराळें असेल तर शालेय जीवनांतील विद्यार्थ्यांचा काळ फुकट गेला असें होईल. कारण शाळेंतील त्याची तयारी बाह्य जगतांत मानानें, स्वावलंबनानें जगण्यास त्यांस समर्थ करणार नाहीं. शाळेंत शिकलेल्या गोष्टींचा आयुष्यांत उपयोग

नाहीं, आणि आयुष्यांत जें साधावयाचें त्याची तयारी शाळेंत झाली नाहीं, असेंच होणार. समजा, विद्यार्थी मुंबईसारख्या शहरांत शिकावयास ठेवलेला आहे, आणि शिक्षण संपल्यावर त्याला आयुष्य काढावयाचें आहे तें एखाद्या शेतकीप्रधान खेड्यांत. मुंबईचें शहरी शिक्षण त्याला खेड्यांतील त्याच्या जीवनांत कितीसें उपयोगी पडणार ? सध्यां आपल्या शिक्षणपद्धतींत जो मुख्य दोष समजला जातो तो हाच होय. विद्यार्थी शाळा-कॉलेजांतून अभ्यासक्रम आटोपून, परीक्षा यशस्वी रीतीनें उत्तीर्ण होऊन खऱ्या आयुष्यांत पदार्पण करतात आणि तेथील भिन्न वातावरण पाहून भांबावून जातात, व जें शिकलों तें या जीवनांत कांहींच उपयोगाचें नाहीं असें पाहून निराश होतात. तेव्हां अभ्यासक्रम म्हणजे केवळ ठराविक विषय असें समजूं नये. ज्ञानार्जनाचीं साधनें म्हणून कांहीं विषयांचा अभ्यास हवा हें खरें. पण केवळ ज्ञान म्हणजे सर्वस्व नव्हे. ज्या क्षेत्रांत आयुष्य व्यतीत करावयाचें त्या क्षेत्रांतील ज्ञान, त्या क्षेत्रांतील विविध तऱ्हेचे अनुभव यांचा अभ्यासक्रमांत समावेश व्हावा.

### ६. रिकामपणची तरतूद

मनुष्य हा केवळ उदरंभर प्राणी नाहीं. तसें त्यानें असणें हें त्याच्या सुसंस्कृतपणाचें लक्षण नव्हे. केवळ बौद्धिक प्रगतीची कदर केल्यानें व व्यवसायाची दिशा दाखविल्यानें शिक्षणाचें कार्य संपत नाहीं. आजच्या यांत्रिक युगांत विश्रांतीचा वेळ कसा घालवावयाचा हा एक नवीन, बिकट प्रश्न निर्माण झाला आहे; तोहि शिक्षणानें सोडविला पाहिजे. रिकामपणच्या कामगिरींतच व्यक्तीची अभिरुचि व सुसंस्कृतता हीं प्रकट होतात. यासाठीं विद्यार्थ्यांना विविध विषयांचे सच्छंद जडविणें, व अशा तऱ्हेनें आनंदप्राप्तीचीं साधनें त्यांच्या हातीं देणें ही शाळेची जबाबदारी आहे. शालेय जीवनांतील रुक्षता तर त्यामुळें जाऊन तें प्रसन्न व उल्हासपूर्ण होईलच, पण विद्यार्थ्यांच्या विविध सुप्त शक्तींचे स्रोत मोकळे होऊन खळखळां वाहूं लागतील. त्यांचें मानसिक आरोग्य त्यामुळें टिकून त्यांना सुखी जीवनाचा आस्वाद घेतां येईल.

## अभ्यासक्रमांतील सोपानपरंपरा

वरील तत्त्वांनुसार विद्यार्थ्यांकरितां जो अभ्यासक्रम आंखावयाचा त्यांत पूर्वप्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत एक सोपानपरंपरा तयार

होते. प्राथमिक शिक्षण सर्व घटकांना अवश्य मानून विनामूल्य व सक्तीनें देण्यांत यच्चयावत् नागरिकांना कांहीं सर्वसामान्य शिक्षण असणें इष्ट आहे हें तत्त्व सर्व राष्ट्रांत मान्य झालें आहे. वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत द्यावयाच्या शिक्षणांत एकान्तिक पारंगतता—एकाच विशिष्ट विषयांत तरबेज होणें ही दृष्टि ठेवणें इष्ट नाहीं. इतकेंच नव्हे तर माध्यमिक शिक्षणाच्या पहिल्या दोनतीन वर्षांतहि अनेक विषयांची तोंडओळख व स्थूल दर्शन होऊन बहुश्रुतता व चतुरस्रता प्राप्त व्हावी अशीच दृष्टि ठेवण्याकडे सर्वांचा कल आहे. पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या या सोपानपरंपरेंत अभ्यासक्रमाची उभारणी समकेंद्रपद्धतीवर असणें केव्हांहि इष्ट होय. एका अवस्थेंतून दुसऱ्या अवस्थेंत शिरतांना एकदम नवे विषय, नवे प्रकार येऊन विद्यार्थ्यांना भांबावल्यासारखें होऊं नये.

## प्राथमिक शिक्षण ( विषय )

आपल्या प्राथमिक शिक्षणांत मूलोद्योग-पद्धतीचा स्वीकार झाल्यापासून त्या अभ्यासक्रमाची उभारणी बालकाचें भौतिक जग, सामाजिक विश्व, आणि त्याचे हस्तव्यवसाय या तीन केंद्रांना धरून करण्यांत आली आहे. त्यास अनुसरून त्या अभ्यासक्रमांत पुढील विषयांचा समावेश झाला आहे.

( १ ) सामान्यविज्ञान—पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र आणि प्राणिशास्त्र यांचा बालकांच्या परिसरांतील वस्तु व प्रसंग यांच्या निरीक्षणांतून स्थूल परिचय.

( २ ) समाजपरिचय — इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र.

( ३ ) मूलोद्योग — स्थानिक परिस्थित्यनुसार एखाद्या उत्पादक व्यवसायाचें ' कां ' व ' कसें ' या दृष्टीनें ज्ञान.

( ४ ) मातृभाषा.

( ५ ) गणित.

( ६ ) कला — चित्रकला, गायन.

( ७ ) शारीरिक शिक्षण — आरोग्य.

## या विषयांमागील भूमिका

प्राथमिक शाळांतील महत्त्वाचे विषय म्हणजे लिहितां वाचतां येणें आणि साधें गणित – हिशोब करतां येणें. व्यावहारिक दृष्ट्या हे तीन विषय किती मोलाचे आहेत हें विस्तारानें सांगावयास नकोच. लिहितां येणें म्हणजे स्थळ-काळाची मर्यादा झुगारून आपले विचार दुसऱ्यास सांगतां येण्याचें सामर्थ्य मिळविणें. वाचतां येणें म्हणजे ज्ञानाच्या तिजोरीची गुरुकिल्लीच हातीं येणें होय. त्या दृष्टीनें आपल्या देवनागरी लिपीसारखी सोइस्कर लिपि जगांत दुसरी कोणतीच नाहीं. एकदां मूळाक्षरें आलीं, त्यांच्या बाराखड्या करण्याची युक्ति समजली, आणि जोडाक्षरें कशीं बनतात हें कळलें कीं मराठींतील कोणतेंहि पुस्तक वाचतां येतें. अर्थात् त्यांतील मजकूर कळण्यास बुद्धीची वाढ आणि अनुभवांची प्रगल्भता अवश्य असतात. पण इंग्रजीसारखी स्पेलिंगाची अडचण भासत नाहीं.

ज्ञानप्राप्तीचें साधन म्हणून सोप्या अंकगणिताचें फारच महत्त्व आहे. बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार ही चतुःसूत्री म्हणजे सबंध गणितशास्त्राचा एका अर्थानें पायाच होय. यावर प्रभुत्व मिळविलें म्हणजे नेहमींच्या व्यवहारांतील हिशेबादिकांची गरज भागते. गणितशास्त्रांतील जास्त मौलिक ज्ञान मिळवावयाचें असेल तरीहि यांचा आधार उपयुक्त होतो. आणि म्हणूनच अनेक देशांत अनेक शतकें प्राथमिक शिक्षण म्हणजे लिहिणें, वाचणें, सोपें गणित करतां येणें ही त्रयीच समजत असत.

अलीकडे समाजरचना झपाट्यानें बदलत आहे, जीवन एका तऱ्हेनें गुंतागुंतीचें, अवघड असें होत आहे. त्यामुळें शिक्षणाच्या व्यवस्थेंतहि बदल करावा लागत आहे. प्राथमिक अवस्थेंतील शिक्षण जन्माला पुरत नाहीं, जास्त शिक्षण घ्यावें तर तें परवडत नाहीं, सोयीच्या अभावीं मिळत नाहीं, अशी स्थिति होऊं लागली आहे. त्यामुळेंच प्राथमिक अवस्थेंतहि आणखी कांहीं विषयांचा समावेश करणें भाग पडलें. इतिहास, भूगोल, निसर्गाचें अध्ययन इ. विषयांचा समावेश प्राथमिक शाळांतील अभ्यासक्रमांत करण्यांत आला. पण यांना स्वतंत्र विषय म्हणून स्थान मिळतांच वाजवीपेक्षां जास्त महत्त्व मिळूं लागून त्या विषयांचा अभ्यास वाढला, अपेक्षा वाढल्या, पुस्तकें तयार झालीं, पुस्तकांची घोकंपट्टी होऊं लागली. म्हणून अलीकडे या सर्व

विषयांना प्राथमिक शाळांतील पहिल्या तीन इयत्तांतून एकत्रित असें स्थान देण्यांत आलें आहे. 'सामान्यज्ञान' असा अभ्यासक्रमांत विषय आणून त्यांत इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, निसर्गाचें अध्ययन इ. क्षेत्रांतील महत्त्वाच्या बाबींचा समावेश करण्यांत आला आहे; व हा अभ्यास पुस्तकांच्या साहाय्यानें न शिकवितां सहली, गोष्टी, निरीक्षण, हस्तव्यवसाय इत्यादि साधनांनीं पुरा करावा अशी अपेक्षा ठेवली आहे.

विद्यार्थ्यांचा विशेष कल कोठें आहे तें शोधून काढण्याकरितां आणि शक्य तर त्या कलाला कांहींसा वाव देण्याकरितां संगीत, चित्रकला, शिवण-काम अशांसारखे विषय प्राथमिक शाळेंतून शिकविले जातात. आरंभींच्या काळांत ते विषय सर्वांनाच सक्तीचे करण्यास हरकत नसावी. त्यांत ज्यांची विशेष प्रगति दिसेल, विशेष आवड दिसेल त्या मुलांना व मुलींना ते विषय पुढें दुय्यम शाळांत आधिक परिश्रमपूर्वक अभ्यासतां येतील.

खेळांचा समावेश अभ्यासक्रमांतच करावयास हरकत नाहीं. शरीराची वाढ होण्याचा हा काळ असतो. शरीराला सुश्लिष्ट असा आकार देण्या-करितां नसला तरी शरीराची वाढ योग्य प्रकारें व्हावी, सर्व स्नांयूना योग्य ती संचलनशक्ति मिळावी, आणि सामान्यतः आरोग्य राखतां यावें याकरितां व्यायामाची गरज असते. हा व्यायाम पूर्वीच्या काळीं तालीमखान्यांतील दंड, बैठका, मल्लखांब इत्यादिकांच्या साहाय्यानें देण्यांत येत असे. या कार्यक्रमांना प्राथामिक अवस्थेंत स्थान द्यावें किंवा नाहीं असा वाद पुढें निर्माण झाला. हे कार्यक्रम बालांच्या बाबतींत उपयोजूं नयेत; कारण त्यायोगें शरीरावर फाजील ताण पडतो, व मनालाहि त्यांत आकर्षण वाटत नाहीं. तेव्हां खेळांच्या साहाय्यानेंच शरीरवाढीचें कार्य साधावें असें सुचविण्यांत आलें व तेंच आतां मान्य झालेलें आहे. खेळांत खेळ म्हणून मुलें रमतात व अप्रत्यक्ष रीत्या व्यायामाचें कार्यहि साधतें. मात्र खेळांचा अतिरेक होणार नाहीं हें पाहावें लागतें.

प्राथमिक शाळांतील सूतकताई, सुतारकी, कागदकाम इ. हस्तव्यव-सायांचा मागें उल्लेख केला आहे. ज्ञानेंद्रियांबरोबरच कर्मेंद्रियांना कामाला लावणें हें या हस्तव्यवसायांनीं साधतें. अर्थात् हेच व्यवसाय त्यांनीं पुढें करावयाचे आहेत अशी त्यांच्या अभ्यासक्रमांतील अंतर्भावाच्या मागें भूमिका

नसून ज्ञानेंद्रियांच्यरोबरच्च कर्मेंद्रियांना कामाला लावणें हें या हस्तव्यवसायांनीं – मूलोद्योगांनीं साधतें ही दृष्टि आहे. म्हणून मूलोद्योग – मग ते कोणतेहि असोत—हे विषय नसून खरोखर शिक्षणाची एक पद्धत आहे असें मानावयास हवें.

माध्यमिक शिक्षण आणि प्राथमिक शिक्षण यांच्यामधला दुवा म्हणजे इयत्ता पांचवी, सहावी, सातवी. या अवस्थेंत मागील विषयांचाच अभ्यास विस्तृत व्हावा, आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या विविध शाखा व मानवाचे विविध उद्योग यांच्याशीं सामान्य व स्थूल परिचय व्हावा हाच हेतु डोळ्यांसमोर असणार. कुठल्या तरी विषयांत विशेष प्रावीण्य हें उद्दिष्ट येथें नाहीं. प्रत्येक बालकाला संस्कृतिधनाचा जो थोर वारसा उपभोगावयाचा आहे, त्या संस्कृतिधनाचें स्वरूप तरी काय हें त्यास कळावें, आणि त्या ज्ञानाच्या जोरावर यांतील कोणत्या शाखेंत आपली गति आहे, आपण त्यांत शक्त्यनुसार भर घालूं शकूं, परंपरा राखूं शकूं हें त्यास जाणतां यावें, हींच या कालांत साधावयाचीं प्रमुख उद्दिष्टें होत. या अवस्थेंत तपशील निश्चित करतांना फार कांटेकोर दृष्टि ठेवावी लागेल. जीवनाला आवश्यक अशाच मूलभूत गोष्टींचें, तत्त्वांचें ज्ञान, व बालकांची आकलन-शक्ति आणि त्यांचे नैसर्गिक जिव्हाळ्याचे विषय यांचा समन्वय झाला पाहिजे. या अवस्थेच्या अखेर आपली विशिष्ट आवड व शक्ति ओळखण्याची त्यांची तयारीहि व्हावी यासाठीं पुढील विषयांचा अंतर्भाव अभ्यासक्रमांत होतो—

१. भाषा– मातृभाषा व राष्ट्रभाषा.
२. समाजपरिचय– इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र.
३. सामान्यविज्ञान.
४. गणित.
५. कला– चित्रकला व संगीत.
६. मूलोद्योग.
७. शारीरिक शिक्षण.

## माध्यमिक शिक्षणक्रम

प्राथमिक शिक्षण संपवून विद्यार्थी माध्यामिक शाळांत प्रवेश करतात, त्या वेळीं त्यांच्या आवडीनिवडींना बरेंचसें निश्चित स्वरूप प्राप्त झालेलें असतें. कांहीं

विशिष्ट व्यवसायांना अनुकूल अशा वृत्तींचा व शक्तींचाहि प्रादुर्भाव झालेला असतो. या कालांत विविध प्रवृत्तींच्या विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या नैसर्गिक कलांना अधिक परिपक्व स्वरूप मिळण्याला उपकारक असें वातावरण हवें. त्यासाठीं अनेक प्रकारचे विषय ठेवून त्यांच्यांतून कांहीं निवडण्याला त्यांना अवसर देणें अगत्याचें आहे. तसेंच, या विद्यार्थ्यांची वयोवस्था लक्षांत घेतां आपण लवकर पोटाच्या व्यवसायाला लागावें अशी एक जाणीव त्यांच्यामध्यें निर्माण होऊं लागते. तिची योग्य बूज करावयाची म्हणजे अभ्यासक्रमाला व्यावसायिक वळण अवश्य पाहिजे. सर्वसामान्य शिक्षणाबरोबरच एखाद्या व्यवसायाच्या शिक्षणास लागणारी मानसिक पूर्वतयारी होईल अशी त्यांत तरतूद असावी. या दृष्टीनें माध्यमिक शिक्षणांत खूपच विविधता, लवचिकपणा, व जीवनसंपर्क हे गुण प्रामुख्यानें असावेत. माध्यमिक शिक्षणाचें स्वरूप 'व्यापक शिक्षणा'चें (जनरल एज्युकेशन) असावें असा राधाकृष्णन्-समितीचा अभिप्राय आहे. पण या 'व्यापक शिक्षणां'त सांस्कृतिक विषय, भौतिक शास्त्रें, व व्यावसायिक विषय यांचा समावेश व्हावा असें त्याचें स्पष्टीकरण केलेलें आहे. मागें उल्लेखिलेल्या मुदलियार-समितीनें सुचविलेली योजना पुढीलप्रमाणें आहे—

**आवश्यक विषय :**

अ. १. मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा, किंवा मातृभाषा आणि अभिजात भाषा मिळून एक संमिश्र विषय.
२. पुढीलपैकीं कोणतीहि एक भाषा—हिन्दी, इंग्रजी, अभिजात भाषा, अथवा आधुनिक भारतीय भाषा.

आ. १. समाजशास्त्रें (इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र इ.)
२. सामान्य शास्त्रें—गणिताचा त्यांतच अंतर्भाव होतो.

इ. एखादा मूलोद्योग वा व्यवसाय.

ई. पुढील सात विभागांपैकीं कोणत्याहि एकांतील तीन विषय. प्रत्येक विभागांत ४ पासून ७ पर्यंत विषय आहेत.
१. सांस्कृतिक विषय.
२. भौतिक शास्त्रें.
३. तान्त्रिक विषय.

४. व्यापारी विषय.
५. शेतीविषयक.
६. ललितकला.
७. गृहविज्ञान.

या सर्वांच्या तपशिलांत येथें शिरण्याची जरुरी नाहीं. या भिन्न भिन्न विषयांचें प्रयोजन काय आहे तें स्थूलमानानें मात्र शालेय-व्यवस्थेच्या दृष्टीनें ठाऊक असावें म्हणून त्यांचें विवरण करण्याचें योजिलें आहे.

**१. भाषाविषय**

माध्यमिक शिक्षणाच्या कक्षेंत केवळ चांगलें बोलणें, लिहिणें, वाचणें, एवढींच भाषा-शिक्षणाचीं उद्दिष्टें नाहींत. सर्व शिक्षणाचें व जीवनाचें भाषा हें माध्यम असल्यानें सुस्पष्ट विचाराचें तें साधन आहे. व्यक्तित्वाचा आविष्कार त्यांतून होतो. लोकशाही समाजांत यशस्वी नागरिकाला आपले विचार, मतें परिणामकारक मांडतां येणें आवश्यकच आहे. या दृष्टीनें भाषेला फार मोठें सामाजिक मूल्य आहे. उत्कृष्ट साहित्याचा चारित्र्यवर्धनांत फार मोंठा वांटा आहे. हृदय उदार वृत्तींनीं विशुद्ध करण्याला भाषाच साहाय्यभूत होते. तेव्हां उत्कृष्ट पुस्तकांचें जेवढें विपुल, सखोल व आवडीनें, रसग्राही दृष्टीनें वाचन होईल तितके विपुल संस्कार घडतील व मतें पुष्ट होतील.

मातृभाषेव्यतिरिक्त अन्य भाषांचा उपयोग बराचसा व्यावहारिक आहे. लेखनापेक्षां भाषण व वाचन आणि सारग्रहण यावरच भर अधिक पाहिजे.

**२. सामाजिक शास्त्रें**

इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादींच्या ज्ञानानें मानव आणि निसर्ग, व्यक्ति आणि समाज, व्यक्ति, कुटुंब आणि राष्ट्र या सर्वांचें जीवन कसें परस्परांशीं निगडित झालें आहे, सहकार्याच्या धाग्यानें तें कसें गुंफलें गेलें आहे, परस्परांत देवाण–घेवाण कोणती झाली आहे, मानवानें परिस्थितीवर मात कशी केली आहे, आपलें जीवन समृद्ध करण्यासाठीं कोणती धडपड चालविली आहे, परिस्थितीनुसार व ज्ञानवृद्धि होतांच राहणी, वेष, गृहव्यवस्था यांत परिवर्तनें कशीं घडाविलीं आहेत, आपल्या राष्ट्राचा सांस्कृतिक वारसा कोणता, इतर मानवसमाजांचें आपण कोणतें ऋण लागतों, आणि जग जाति–राष्ट्राभिमानाच्या संकुचित मर्यादा ओलांडून एक-विश्व–

एकराष्ट्राच्या कल्पनेकडे प्रगति करीत आहे, मानवाचें मोठेपण त्याच्या विध्वंसक शक्तींत नसून विधायक, रचनाशील, सृजन-प्रवृत्तींत व सामर्थ्यांत आहे, याचा प्रत्यय विद्यार्थ्यांना येणें ही व्यापक दृष्टि या विषयांच्या अंतर्भावाच्या मुळाशीं आहे.

**३. भौतिक शास्त्रें**

आजचें जग विज्ञानाधिष्ठित आहे. व्यक्तिगत आरोग्य, अन्न यांपासून तों समाजाच्या विविध गरजा भागविणाऱ्या प्रचंड कारखान्यांपर्यंत विविध शास्त्रें, त्यांतील सत्यें, सिद्धान्त व नियम यांनीं आपलें जीवन सुनियंत्रित, सुस्थिर व सुखी बनवण्याचा मानवानें यत्न चालविला आहे. त्या शास्त्रीय तत्त्वांचें स्थूल ज्ञान, त्यांचें जीवनांतील स्थान व ज्ञानपूर्वक परिपालन करतां येणें, याशिवाय आज माणसाला घडपणें जगतां येणार नाहीं. प्रत्येक गोष्टीकडे प्रयोगशीलतेनें बघणें, तिचें निरीक्षण करणें, तिच्यामागील नियम समजावून घेणें ही वैज्ञानिक दृष्टि आहे. तिच्यांत बुद्धीचा, विचारशक्तीचा विकास आहे. आपल्या वैयक्तिक जीवनांतील साधे प्रसंग, आणि परिसरांतील विविध घटना यांच्या निरीक्षण–परीक्षणाची चिकित्सक दृष्टि जोपासणें हा जीवनांतील आनंद चतुराईनें भोगण्याचा राजमार्ग आहे. आपल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष विनियोग करून ज्ञानाचें सामर्थ्य अजमावण्याला त्यासारखें साधन नाहीं.

टी. एच्. हक्स्ले या तत्त्वज्ञान्यानें 'उदार शिक्षण' (लिबरल एज्युकेशन) घेतल्यानें मानवाच्या विविध शक्तींचा कसा विकास व्हावा, याचें सुंदर चित्र रेखाटलें आहे. त्याचें म्हणणें असें कीं, उदार शिक्षणामुळें शरीर सकस व सतेज बनून, आपल्या इच्छेनुसार वांकवितां यावें, आणि शरीराला झेपणारें कोणतेंहि काम सहजतया पार पाडतांना आनंदाचा अनुभव यावा. विचार व तर्क या दोन्ही शक्ति कोणत्याहि गुंतागुंतीच्या प्रश्नांतून वाट काढण्याला समर्थ बनाव्यात, त्यांना धार यावी, आणि एखाद्या वाफेच्या एंजिनाप्रमाणें कोठेंहि त्यांचा उपयोग करतां यावा; मन भौतिक शास्त्रांतील ज्ञानानें समृद्ध व चतुरस्र असावें; अंतःकरणांत उत्साहाचें, विजिगीषेचें वारें सळसळत असावें; आणि दृढ इच्छाशक्तीच्या अंकुशानें मनोविकार काबूंत राहावेत; सदसद्-विवेकबुद्धीचें स्वामित्व त्यानें पत्करलेलें असावें; निसर्गांतील आणि मानव-कृतींतील सौंदर्यावर त्याची भक्ति असावी. सर्व नीच, क्षुद्र गोष्टींचा तिटकारा वाटावा, आणि आत्मौपम्यबुद्धीनें त्यानें जगाकडे पाहावें.

## नीति-शिक्षणाचें स्थान

विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांत धार्मिक व नैतिक शिक्षणाला कोणतें स्थान द्यावें ? वेळापत्रकांत त्याला तास असावा काय ? या शिक्षणाची गरज तर या ना त्या प्रसंगीं सर्वांनाच जाणवते. या प्रश्नाचा थोडक्यांत परामर्श घेऊं या.

भारतीय राज्यघटनेच्या कलम १९, २१, व २२ (२) मध्यें या-बाबतचीं सामान्य तत्त्वें नमूद केलीं आहेत. प्रत्येक नागरिकाला धार्मिक आचार-विचार-प्रसाराचें, त्याच्या सदसद्विवेकबुद्धीप्रमाणें वागण्याचें स्वातंत्र्य दिलेलें आहे; आणि म्हणूनच कोणत्याहि धर्मपंथासाठीं वा धर्मासाठीं कर देण्याची सक्ति कोणाहि नागरिकावर केली जाणार नाहीं, आणि कोणत्याहि संस्थेंत धार्मिक शिक्षणाची तरतूद करण्यांत येणार नाहीं असें घटनेनें उद्-घोषित केलें आहे. धर्माच्या नांवावर आणि धर्माच्या विकृत रूढीमुळें या देशांत आजवर जे अनर्थ झाले, त्यामुळें ही तटस्थपणाची भूमिका घेणें क्रमप्राप्त झालें.

## निधर्मीपणाचा अर्थ

याचा अर्थ धर्मांचा उच्छेद नव्हे, तर 'सर्वधर्मसमानत्वा'ची व्यापक सहिष्णु भूमिका आहे. पण विशिष्ट धर्मपंथांना घटनेनें आश्रय दिला नसला तरी संरक्षण सर्वच धर्मांना दिलें आहे. भारतीय लोकशाहीनें न्याय, समता, बंधुभाव या तत्त्वांना प्राणभूत तत्त्व मानलें असून त्यांचें पालन करण्याची प्रतिज्ञा केली आहे. भारतीय संस्कृतींत धर्म म्हणजे विशिष्ट आचार वा राहणी असा अर्थ नसून, विशिष्ट तत्त्वावरील श्रद्धेपेक्षां आचार व चारित्र्य यांत प्रकट होणाऱ्या तत्त्वांना, अंतःकरणाच्या वृत्तीला प्राधान्य दिलें आहे. 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति' अशी उदार दृष्टि राखली असून, सदाचार, सत्य, प्रेम, भूतदया, अभय इत्यादि नैतिक गुणांना अग्रस्थान दिलें आहे. एकाच समुद्राकडे जाणाऱ्या भिन्न भिन्न नद्यां-प्रमाणें भिन्न भिन्न पंथ एकाच ईश्वराकडे जातात. सदाचाराची व नीतीची शिकवण सर्व धर्मांची एकच आहे. गांधीजींनीं वर्धा–शिक्षण–योजनेंत धर्म-शिक्षणाला स्थान दिलें नाहीं, याचें कारण धर्मविषयक दुराग्रहांचे दिसून आलेले दुष्परिणाम व धर्म शब्दाचा घेतला जाणारा संकुचित अर्थ. पण सर्व धर्मांची

सारखीच श्रेष्ठता, बंधुभाव, सहकार्य व प्रेम, आणि विशेषतः न्याय हें सर्वांना शिकवलें पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. स्वतःच्या प्रामाणिक कष्टानें जगायला मनुष्य शिकेल तर तो वृत्तीनें 'धार्मिक' बनेलच.

## नैतिक आणि धार्मिक शिक्षण

धार्मिक शिक्षणाऐवजीं नैतिक सद्‌गुणांचें शिक्षण दिलें म्हणजे पुरे, असें आज कित्येक मानतात. त्यावर राधाकृष्णन् समितीनें असें म्हटलें आहे कीं, निष्ठा, धैर्य, शिस्त आणि त्याग या 'नैतिक' गुणांचा दोन्ही प्रकारच्या कार्याकडे उपयोग होऊं शकतो. जेव्हां या गुणांचें प्रयोजन उच्चतर असेल तेव्हांच ते नैतिक ठरतात. ते स्वतःसिद्ध नैतिक नाहींत. यासाठींच अंतिम जीवनमूल्याचा निकष आवश्यक ठरतो; म्हणून 'अध्यात्मिक शिक्षणा'ची परंपरा मोडावी असें समितीला वाटलें नाहीं. ब्रिटनमध्यें सर सिरील नॉर्वुड यांच्या अध्यक्षतेखालीं माध्यमिक शिक्षणाचें भवितव्य ठरविण्यासाठीं नेमल्या गेलेल्या समितीचे उद्‌गारहि या समितीनें नमूद केले आहेत. 'सत्यं, शिवं, सुंदरं' या ध्येयाची दखल शिक्षणाला घ्यायलाच पाहिजे.

## व्यावहारिक साधनें

हृदयाची ही 'धार्मिक'ता वा 'आध्यात्मिक'ता कशी जोपासावयाची हा शालेय व्यवस्थेचा खरा प्रश्न आहे. पाठ्यपुस्तकें नेमून, व्याख्यानें देऊन अथवा परीक्षा घेऊन हें कार्य व्हावयाचें नाहीं. ती वृत्ति अंतरंगांत, रोम-रोमांत भिनून जीवनाचा 'स्वभाव' बनावयाला पाहिजे. अंतःकरणांत सद्‌-भावना निर्माण होणें, उदात्त हेतूंची प्रेरणा होणें आणि त्यांतून नैतिक, मानसिक व शारीरिक संवयी बनत जाणें हाच खरा मार्ग. त्यासाठीं शाळेचें सारें वातावरण 'अध्यात्मिक' हवें. प्रेमभावनेनें प्रस्फुरित असा आचार, सर्वांच्या कल्याणाची तळमळ, प्रामाणिकपणें श्रमांची उपासना, आणि सुंदर अभिजात ललितकृतींचा आणि साहित्याचा सहवास, वैयक्तिक आचाराचा जिवंत आदर्श, यांनींच हें वातावरण तयार होईल. अल्पवयांत वीर-पुरुषांच्या चरित्रांतून हे संस्कार होऊं शकतील, व प्रौढ वयांत, साधुसंत, थोर हुतात्मे यांच्या जीवननिष्ठेनें ते स्फुट व दृढ होतील; पण त्याविषयींची आवड प्रत्यक्ष गुरुजनांच्या तळमळींतूनच निर्माण होईल.

## लैंगिक शिक्षण

लैंगिक शिक्षणाचा समावेश आपल्याकडील शाळांतून–आणि महाविद्यालयांतूनहि–अद्यापि झाला नाहीं, आणि तो लौकर होईल असेंहि वाटत नाहीं. पाश्चिमात्य देशांनीं–विशेषतः अमेरिकेनें त्या शिक्षणाचें महत्त्व ओळखून विविध मार्गांनीं तें शिक्षण प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील विद्यार्थींना द्यावयास सुरुवात केली आहे. तद्देशीय समाजाची विशिष्ट घडण जरी यास कारणीभूत झाली असली, व आपल्या भारतांतील समाजाची घडण पाश्चिमात्य समाजाच्या घडणीहून बरीच भिन्न असली तरी एकंदर शिक्षणक्षेत्रांत लैंगिक शिक्षणाच्या महत्त्वाविषयीं जे विचारप्रवाह वाहात आहेत ते लक्षांत घेतां येथें आपणहि त्या प्रश्नाचा विचार करणें इष्ट होईल.

### आवश्यकता

ज्या सहजप्रेरणा मानवाच्या आचारविचारांना कारणीभूत होतात त्यांमध्यें लैंगिक प्रेरणा ही सर्वांत जास्त प्रबळ अशी प्रेरणा आहे. तिच्यावर मानवानें ताबा ठेवला नाहीं किंवा तिला योग्य मार्गानें वाव दिला नाहीं तर मानव तिचा अंकित होतो व त्यांत त्याचा आणि ज्या समाजाचा तो घटक असतो त्याचा अधःपात होतो. अति प्राचीन काळच्या मानवाची अशी परिस्थिति होती. लैंगिक प्रेरणेच्या आहारीं जाऊन त्यानें जुलूमजबरदस्ती, चोरी, खून अशांसारखे किती अनन्वित प्रकार केले त्याची इतिहासांत साक्ष मिळते. या प्रकारांनीं समाजरचनेला स्थैर्य येईना; आणि आईबाप, भाऊबहीण अशांसारखीं नातींहि माणूस जुमानीना; व बुद्धि असूनहि पशुत्वाच्या पातळीवरून वर येईना. हें पाहून विचारवंतांनीं लग्नसंस्था निर्माण केली, व लैंगिक प्रेरणेला एक पवित्र असें वळण देऊन समाजाची घडी नवीन तऱ्हेनें बसविली. ही लग्नसंस्था समाजाला उपयुक्त झाली असली, व सर्व सुसंस्कृत लोकांनीं ती आज हजारों वर्षें मान्य केली असली तरी मनुष्यांतील पशुत्व अजूनहि पूर्णपणें नाहींसें झालेलें नाहीं; व लैंगिक गुन्हे झालेले आपण वर्तमानपत्रांतून नेहमीं वाचतों; इतकी ही प्रेरणा प्रबळ असते. तेव्हां समाजाला स्थैर्य यावयाचें असेल, समाजाची घडी विस्कळित व्हावयाची नसेल, तर भावी समाजाचे घटक जे आजचे विद्यार्थी त्यांना या प्रेरणेची जबरदस्त शक्ति, त्या प्रेरणेवर जय मिळविण्याची गरज,

त्या प्रेरणेनें आपल्यावर मात करूं नये म्हणून आपण घ्यावयाची खबरदारी, ती खबरदारी न घेतल्यास येणारे धोके, आणि ती प्रेरणा मानवी समाजाचें सातत्य टिकविण्याच्या दृष्टीनें उपयुक्त असल्यामुळें मानवानें तिला आपल्या कल्याणाच्या दृष्टीनें द्यावयाचें वळण—या सर्वांची माहिती असावयास हवी.

शिवाय शिक्षण हें केवळ बुद्धिविकासाकरितां नसून तें विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास कारणीभूत झालें पाहिजे, हें तत्त्व मान्य केल्यानंतर विद्यार्थ्याच्या बौद्धिक विकासाबरोबरच त्याचा शारीरिक विकास झाला पाहिजे, त्याची नैतिक पातळी उंच झाली पाहिजे, त्याची अध्यात्मिक प्रगति झाली पाहिजे, त्याचें सौंदर्य-समीक्षणाचें, रसग्रहणाचें सामर्थ्य वाढलें पाहिजे, इत्यादि गोष्टी ओघानेंच येतात. लैंगिक शिक्षणाचा शारीरिक विकासाशीं आणि नैतिक निष्ठेशीं जो घनिष्ठ संबंध आहे तो लक्षांत घेतां तें शिक्षण न देणें म्हणजे विद्यार्थ्यांच्या विकासांत अपूर्णता ठेवणें असाच अर्थ होतो. तसें होऊं नये म्हणून शिक्षण-योजनेंत लैंगिक शिक्षणाचा समावेश करणें अवश्य आहे.

या प्रश्नाचा आणखी एका दृष्टीनें विचार करतां येईल. आपल्या देशांत लैंगिक प्रेरणा व लैंगिक व्यापार यांना एक तऱ्हेचें गूढपणाचें आणि कांहींसें अपवित्रपणाचें असें स्वरूप आलेलें आहे. मुलांपासून या गोष्टी गुप्त ठेवावयाच्या, त्यांनीं त्यासंबंधीं जिज्ञासा दाखविल्यास त्यांना रागावून गप्प करावयाचें, अशी भलतीच जिज्ञासा दाखविली हा मोठा गुन्हा केला अशी त्यांची कल्पना करवून द्यावयाची, किंवा मुलें लहान असतील तर त्यांच्या लैंगिक प्रश्नांना खोटीं, काल्पनिक, गैरसमज वाढविणारीं, बुद्धीला न पटणारीं अशीं उत्तरें देऊन त्यांचें तात्पुरतें समाधान करावयाचें, अशी आपल्याकडे पद्धत आहे. कुटुंबांत एखाद्या बालकाचा जन्म झाला म्हणजे तें बालक आलें कोठून, कोणीं आणून दिलें, किंवा घरांतील स्त्रीची मासिक पाळी आली असतां ती बाजूला कां बसते, तिला कां शिवावयाचें नाहीं, अशा प्रश्नांना काय उत्तरें दिलीं जातात तें सर्वांच्या परिचयाचें आहेच.

पण मुलांना अशीं खोटीं उत्तरें दिल्यानें, किंवा त्यांना रागावून गप्प बसविल्यानें, अथवा 'मोठा होशील तेव्हां कळेल' असें म्हणून त्यांचा प्रश्न डावलल्यानें आपण त्यांतून सुटतों असें मात्र नव्हे. आपलीं उत्तरें खोटीं होतीं

हें मूल थोडें मोठें झाल्यानंतर समजूं शकतें, व आपल्याविषयींचा त्यांचा आदर कमी होतो. गप्प बसवून आपण त्यांची जिज्ञासा नाहींशी करूं शकत नाहीं. त्यांचे समवयस्क मित्र, लैंगिक वाङ्मय, चित्रपटसृष्टींतील लैंगिक प्रसंग, रस्त्यांतून चाललेले पशुपक्ष्यांचे लैंगिक व्यापार इत्यादि मार्गांनीं त्यांना लैंगिक ज्ञान मिळतच असतें. आणि विशेष वाईट म्हणजे हें गुप्तपणानें, भीत भीत मिळविलेलें ज्ञान अनेकदां विकृत स्वरूपाचें असतें. त्या अर्धवट, चुकीच्या ज्ञानानें मुलांचें कल्याण व्हावयाच्याऐवजीं अकल्याण होण्याचाच जास्त संभव असतो.

तेव्हां साहजिकच असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, जर मुलांना हें ज्ञान या नाहीं त्या मार्गानें मिळणारच असेल तर त्यांना तें सरळ मार्गानें, त्यांच्या मनांत लैंगिक विकृति उत्पन्न होणार नाहीं अशा रीतीनें, शास्त्रशुद्ध पद्धतीनें कां देऊं नये ? तसें आपण तें दिल्यास पुढील आयुष्यांतील किती तरी धोक्यांपासून आपण त्यांना वांचवूं शकूं.

## शिक्षकांची जबाबदारी

मुलांना लैंगिक शिक्षण द्यावयाचें असें मान्य केल्यानंतर तें कोणीं द्यावयाचें असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. या बाबतींत सर्वांत जास्त अधिकारी व्यक्ति म्हणजे मुलांचे आईबाप. त्यांतल्या त्यांत वडिलांपेक्षां आईवर मुलांचा जास्त विश्वास असतो, आईशीं बोलतांना त्यांना जास्त मोकळेपणा वाटतो, म्हणून आईनेंच हें शिक्षण द्यावयास हवें. पण आईला अशा विषयांसंबंधीं मुलांशीं बोलण्यांत एक तऱ्हेचा अवघडपणा वाटतो. शिवाय हें शिक्षण मुलांना देतांना कोणती पद्धत अवलंबावी हिचेंहि तिला पुरें ज्ञान नसतें. म्हणून आपल्या देशांतच नव्हे तर अगदीं इंग्लंडसारख्या पाश्चिमात्य देशांतील सुशिक्षित स्त्रियांनींहि या बाबतींत सहकार्य करण्याचें नाकारलेलें आहे. कुटुंबाचे डॉक्टर वेळेच्या अभावीं हें काम करूं शकत नाहींत. उपाध्याय, पुराणिक, प्रवचनकार, देवळांतील पुजारी वगैरे धर्मनेत्यांनीं हें काम पत्करावें तर लोकांची धर्मावरील श्रद्धाच कमी झालेली, आणि या धर्मनेत्यांची समाजावरील पकडहि अनेक कारणांमुळें कमी झालेली. तेव्हां शेवटीं या अवघड कामाची जबाबदारी शिक्षकांनीं पत्करणें ओघानेंच येतें. ज्या देशांत हें

शिक्षण दिलें जातें त्या देशांत तें मुख्यतः शिक्षकांकडूनच दिलें जातें. मात्र हें शिक्षण देणाऱ्या शिक्षकांविषयीं विद्यार्थ्यांच्या मनांत आदराची भावना हवी; त्यांच्याविषयीं विद्यार्थ्यांना विश्वास वाटला पाहिजे. शिक्षकांताहि मुलांविषयीं सहानुभूति आणि कळकळ व आत्मविश्वास हे गुण असावयास पाहिजेत. ज्ञानवृद्ध, वयानें पोक्त, विवाहित असे शिक्षक या कामास योग्य असतात. ते शास्त्र शिकवणारे शिक्षक असले तर अधिकच बरें होतें.

## लैंगिक शिक्षणाचा तपशील

लैंगिक शिक्षणाचा इयत्तावार आराखडा जरी या ठिकाणीं स्थलाभावीं देतां आला नाहीं तरी तो थोडक्यांत दिग्दर्शित मात्र करावयास हवा. अगदीं प्राथमिक शाळेंतील अल्पवयी विद्यार्थ्यांपासून तों थेट विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांप्रत, इतकेंच नव्हे तर शिक्षण पुरें होऊन गृहस्थाश्रमांत प्रवेश केलेल्या आणि संसाराची व मुलाबाळांची जबाबदारी पत्करण्यास तयार झालेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच हें शिक्षण द्यावयास हवें. त्या दृष्टीनें विद्यार्थ्यांचें वय, आकलनशक्ति, जिज्ञासा इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊन सामान्यतः पुढील क्रमानें हा विषय हाताळला जावा.—

( १ ) मानवी शरीराची रचना. शरीराचे निरानिराळे अवयव व त्यांचें मानवी जीवनाच्या दृष्टीनें उपयुक्त कार्य. बालकाचा जन्म—स्थूल माहिती.

( २ ) खास मुलींकरितां—मासिक पाळी; आरोग्याच्या दृष्टीनें घ्यावयाची काळजी.

( ३ ) विशेषतः मुलांकरितां—हस्तमैथुनाचे परिणाम; विशेषतः भावनात्मक परिणाम.

( ४ ) लैंगिक प्रेरणा ताब्यांत ठेवण्याची आवश्यकता.

( ५ ) कुटुंबसंस्था—कुटुंबांतील प्रत्येक घटकाचें कार्य व जबाबदारी; कौटुंबिक जीवनाचें महत्त्व.

( ६ ) लग्नसंस्था—इतिहास, सामाजिक व आर्थिक आणि नैतिक दृष्टीनें गरज. बालकाचा जन्म—शास्त्रीय दृष्टीनें माहिती; लग्नाविरहित स्त्री-पुरुषसंबंधापासून होणारे तोटे; वेश्याव्यवसाय.

( ७ ) लैंगिक गुप्त रोग कोणते, ते कसे होतात, टाळावे कसे, हे रोग जडल्यास उपाययोजना कोणती ?

प्रौढ विवाहित तरुणांकरितां—

( ८ ) लग्नाचा शारीरिक दृष्ट्या विचार—मातृपद आणि पितृपद यांची थोरवी व जबाबदारी.

( ९ ) लहान मुलांचें मानसशास्त्र.

(१०) मुलांची शारीरिक वाढ कशी होते ?

(११) लैंगिक शिक्षणाचें महत्त्व; त्याच्या पद्धति; लैंगिक विषयाचें शास्त्रशुद्ध ज्ञान देणारे ग्रंथ, मासिकें, चित्रपट इत्यादींची माहिती.

## शिक्षणपद्धति

लैंगिक शिक्षण कसें द्यावें हा प्रस्तुत ग्रंथाचा विषय होत नसला तरी सामान्यतः याविषयीं मराठींतील शिक्षणविषयक ग्रंथांत क्वचितच माहिती असते हें लक्षांत घेऊन, आणि लैंगिक शिक्षणाचा विचार थोडक्यांत कां होईना पूर्ण व्हावा म्हणून येथें या पद्धतीचें थोडक्यांत निदर्शन केलें तर तें अनाठायीं होणार नाहीं असें वाटतें.

पहिली ध्यानांत ठेवावयाची गोष्ट म्हणजे, हा अभ्यासक्रमांतील एक विषय आहे असें विद्यार्थ्यांना वाटूं देऊं नये. कारण मग त्या विषयासंबंधीं कांहीं विशेष तऱ्हेचें कुतूहल त्यांच्या मनांत निर्माण होतें, व त्या विषयाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि विकृत होते; शुद्ध ज्ञानाची दृष्टि राहात नाहीं. त्या दृष्टीनें हा विषय वेळापत्रकांत दाखवूं नये, त्याचा अभ्यासक्रम मुलांपुढें ठेवूं नये, व शिकविण्याकरितां क्रमिक पुस्तकेंहि नेमूं नयेत. इतर विषय शिकवितांना जी संधि मिळेल ती घेऊन हें शिक्षण द्यावें. वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, आरोग्यशास्त्र, गृहजीवनशास्त्र, शरीररचनाशास्त्र, इतिहास, भूगोल, वाङ्मय, नागरिकशास्त्र, खेळ इत्यादि विषय शिकवीत असतांना या विषयाचें शिक्षण देण्याची संधि सहज मिळूं शकते.

इतर विषय शिकवितांना हें शिक्षण जातां जातां द्यावयाचें याचा अर्थ मात्र तें विस्कळितपणें, प्रसंग आला म्हणजे एकदम आठवण होऊन द्यावयाचें

असा नव्हे. त्यामागें पूर्ण विचाराअंतीं आधींच तयार केलेली योजना हवी. कोणत्या इयत्तेंत, कोणत्या विषयाचा, कोणता भाग शिकवितांना कोणती संधि मिळेल याचा पूर्ण विचार होऊन, टिपणें ठेवून ही योजना शिक्षकांनीं आपल्या मनश्चक्षूपुढें तयार ठेवावी. वाटल्यास स्वतांच्या मार्गदर्शनाकरितां त्याचा लेखी आराखडा तयार करावा, व अशा तऱ्हेनें या शिक्षणांत सुसंबद्धता आणावी. विद्यार्थ्यांना मात्र वाटावें कीं, जातां जातां प्रसंग आला म्हणून शिक्षकांनीं ही माहिती आपणांस दिली.

यावरून ओघानेंच येतें कीं, हें शिक्षण मुख्याध्यापकांनीं किंवा शिक्षकांनीं विद्यार्थ्यांना एकेकटे बाजूला आपल्या कचेरींत अथवा कार्यालयांत बोलावून गुप्तपणाचा आव आणून न देतां सर्व वर्गाला एकत्रित असेंच द्यावें. मात्र शाळा संमिश्र असेल तर मुलेंमुली एकत्र असतांना कांहीं मुद्दयांची चर्चा करतां येणार नाहीं. म्हणून अशी माहिती सांगतांना ती त्यांना वेगवेगळ्या ठिकाणीं द्यावी. तरीहि आपणांस या विशिष्ट चर्चेकरितां वेगवेगळें केलें आहे अशी त्यांस कल्पना येतां उपयोगी नाहीं. ज्या वेळीं खेळ, गृहजीवनशास्त्र अशांकरितां मुलेंमुली वेगळ्या केल्या जातात त्या वेळीं ही माहिती मुलांमुलींना पृथक्पणानें द्यावी.

लैंगिक शिक्षण देतांना माहिती शास्त्रशुद्ध व निःसंदिग्ध हवीच, पण ती माहिती देतांना शिक्षकांनीं वापरावयाची भाषाहि शुद्ध, स्वच्छ, अश्लीलपणापासून अलिप्त अशी असावी. ही माहिती देतांना शिक्षकांस अवघडल्यासारखें वाटतां उपयोगी नाहीं. इतर विषय शिकवितांना जो मोकळेपणा वाटतो तोच हा विषय शिकवितांनाहि वाटत आहे असें शिक्षकांनीं विद्यार्थ्यांस दाखविलें पाहिजे. शिक्षकांचा मोकळेपणा गेला कीं विद्यार्थ्यांची दृष्टि विकृत झालीच म्हणून समजावें.


पाश्चिमात्य देशांतील कांहीं शाळांत ससे, डुकरें, कोंबड्या असे प्राणी शालेय प्राणिसंग्रहांत मुद्दाम पाळले जातात; त्यांचे लैंगिक व्यापार लहान मुलांना मोकळेपणानें पाहूं देतात; व त्यांची जिज्ञासा जागृत होतांच या लैंगिक व्यवसायाची माहिती शास्त्रशुद्ध रीतीनें देतात. अर्थात् आपल्याकडील शाळांतून हें तूर्त तरी शक्य दिसत नाहीं.

लैंगिक शिक्षण देण्याचें कार्य शाळांतून मुख्यतः जरी शिक्षकांनींच करावयाचें असलें तरी त्यास पूरक म्हणून इतर कार्यक्रमहि ठेवतां येतात. शाळेंतील. डॉक्टरांना वैद्यकीय तपासणीच्या वेळीं अशी माहिती देतां येईल; आदरणीय व्यक्तींनीं शाळेस भेट दिली तर त्यांचेकडून या विषयासंबंधीं चार शब्द मुलांना ऐकवितां येतील, नभोवाणीवर या विषयावर तज्ज्ञांचीं भाषणें ठेवून मुलांना, प्रौढांना हें शिक्षण देतां येईल; आदरणीय सुशिक्षित पालकांचें सहकार्य मिळवितां येईल, आणि या विषयावरील शैक्षणिक चित्रपटांचाहि उपयोग करतां येईल. Secrets of Life हा चित्रपट या दृष्टीनें मुलें, मुली, पालक, शिक्षक, सर्वांनींच एकत्र बसून पाहण्यासारखा आहे.

## अंतिम साध्य

या सर्व प्रकारांचा उपयोग करून साधावयाचें अंतिम साध्य कोणतें ? लैंगिक शिक्षण देऊन जगाची नीतिमत्ता सुधारतां येईल, जगांतील वेश्या-व्यवसाय कमी होईल, किंवा लैंगिक रोगांचें प्रमाण एकदम कमी होऊन जग सुखी होईल असें कोणी म्हणत नाहीं. पण या बाबतींतील अज्ञानामुळें होणाऱ्या मुलांमुलींच्या चुका कमी होतील; त्याचा त्यांच्या नीतिमत्तेवर व आरोग्यावर कांहींसा परिणाम होईल; आणि निदान लैंगिक प्रश्नांकडे पाहण्याची त्यांची दृष्टि विकृत राहणार नाहीं असा शिक्षणशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे. आणि म्हणूनच शालेय अभ्यासक्रमांत या विषयाचा प्रत्यक्ष नसला तरी अप्रत्यक्ष समावेश व्हावा असें ते सुचवितात.

• • •



# : ७ : वर्गरचना

## वर्गपद्धति

बालकमंदिरांत जाणाऱ्या सहा वर्षें वयाच्या खालील कांहीं थोड्या मुलांचा विचार बाजूला ठेवला तर प्राथमिक शाळेंतील चार वर्षें आणि माध्यमिक शाळेंतील सात वर्षें असा एकूण अकरा वर्षांचा काळ म्हणजे शालेय जीवन होय. अलीकडे मुंबई राज्यांत इयत्ता पांचवी, सहावी आणि सातवी यांचा अभ्यासक्रम एकच आंखण्यांत आला आहे, व तो अभ्यास प्राथमिक शाळेंत किंवा माध्यमिक शाळेंत विद्यार्थ्यांच्या सोयीप्रमाणें पुरा करतां येतो; पण एकूण शालेय जीवन अकरा वर्षांचेंच असतें. या काळांत विद्यार्थ्यांनीं पुरा करावयाचा अभ्यास सोयीस्कर अशा अकरा विभागांत वांटण्यांत आलेला असून दर वर्षीं एका इयत्तेंत (वर्गांत) अभ्यास करून तो विद्यार्थ्यांनीं अकरा वर्षांच्या काळांत पुरा करावयाचा असतो. हा वर्गांतील अभ्यास विद्यार्थ्यांनीं एकएकट्यानें करावयाचा नसून तो इतर समवयस्क विद्यार्थ्यांबरोबर वर्गांत एकत्र शिकून पुरा करावयाचा असतो. अशा एका वर्गांत शाळेच्या सोयी-प्रमाणें सुमारें ४०—५० विद्यार्थी असतात. दर वर्षीं नेमलेला अभ्यास पुरा झाला कीं नाहीं हें वार्षिक परीक्षा घेऊन ठरविलें जातें. ज्याचा वर्षाचा नेमलेला अभ्यास पुरा झालेला आढळतो त्याला वर्षअखेर वरच्या वर्गांत घातलें जातें. ज्याचा अभ्यास अपुरा वाटतो त्याला पुन्हां एक वर्ष त्याच वर्गांत राहून तो अभ्यास पुरा करावा लागतो. या एकंदर पद्धतीला वर्गपद्धति असें म्हणतात.

## वर्गपद्धतीचा इतिहास

अगदीं प्राचीन काळीं आपल्या देशांत हल्लींच्या पद्धतीच्या शाळा नसत. मुलानें वडिलांचा धंदा पुढें चालवावयाचा अशी सामान्य प्रथा असल्यामुळें

वडिलांच्या धंद्याचें शिक्षण मुलाला घरच्या घरीं प्रत्यक्ष रीतीनें, अनुभवानें, संवयीनें आपोआपच मिळत असे. ज्यांना वेदाध्ययन किंवा शस्त्रास्त्रांचा उपयोग अशा विषयांत विशेष प्रावीण्य मिळवावयाचें असेल त्यांना गुरूच्या आश्रमांत निदान एक तप तरी राहून अध्ययन करावें लागे. त्या ठिकाणीं गुरुगृहींचीं सर्व कामें करून प्रत्यक्ष त्यांच्या मार्गदर्शनाखालीं किंवा त्यांनीं तरवेज केलेल्या शिष्यांच्या हाताखालीं अध्ययन करावें लागे. त्या आश्रमांत गुरूच्या सवडीप्रमाणें, सोयीप्रमाणें अध्ययन चाले. आतां अध्ययन पुरें असें गुरूनें सांगितलें म्हणजे शिष्य स्वगृहीं परत येऊन गृहस्थाश्रमांत प्रवेश करी. मध्ययुगीन काळांत या पद्धतीला अधिक व्यवस्थित स्वरूप प्राप्त झालें, व तक्षशिला, नालंद अशा ठिकाणीं उच्च शिक्षणाकरितां मोठमोठीं विश्वविद्यालयें स्थापन झालीं. अलीकडच्या विश्वविद्यालयांपेक्षां तीं थोडीं निराळीं वाटलीं तरी उच्च शिक्षणाचीं तीं केंद्रेंच असत. विद्यार्थ्यांना त्या ठिकाणीं वसति-गृहांतच राहून ठराविक अभ्यास पुरा करावा लागे.

समाजांतील प्रत्येक व्यक्तीला कांहीं विशिष्ट प्रकारचें शिक्षण मिळालेंच पाहिजे, – नव्हे तो त्या व्यक्तीचा हक्कच आहे, ही कल्पना या सर्व काल-खंडांत नव्हती. जीवनकलह विशेष तीव्र झालेला नसल्यामुळें तशा शिक्षणाची त्या काळीं गरजहि भासली नाहीं. पुढील ऐतिहासिक काळांत एकंदर जीवनालाच निराळें वळण लागलें. मोंगल साम्राज्य व दक्षिणेकडील विजापूर वगैरे ठिकाणीं स्थापन झालेलीं मुसलमानी राज्यें यांच्या स्थापनेमुळें आणि वाढत्या वैभवामुळें सामाजिक घडी बदलून गेली, व केवळ जीवन-मरणाचाच प्रश्न महत्त्वाचा होऊन बसला. प्रत्येक प्रौढ व्यक्तीस स्वधर्म-रक्षण आणि स्वकीयांचें प्राण-रक्षण याकरितां शस्त्राचा उपयोग करतां येण्याचेंच शिक्षण अवश्य बनलें. त्यामुळें मराठेशाहीच्या ऐन धामधुमीच्या किंवा नंतरच्या पेशवेकालीन कांहींशा स्थैर्याच्या काळांतहि सर्वांकरितां आधुनिक पद्धतीचें शिक्षण ही कल्पना नव्हती.

ही कल्पना प्रथम आपल्याकडे ब्रिटिश राज्याबरोबर आली असें म्हणावयास हरकत नाहीं. लिहितांवाचतां येणें व सोपे हिशेब गणित करतां येणें, एवढें तरी प्रत्येकास आलेंच पाहिजे, व तसें शिक्षण देण्याची जबाबदारी प्रस्थापित सरकारची आहे; त्याकरितां सरकारनें शाळा स्थापन केल्या पाहिजेत, असें

तत्त्व प्रथम मान्य झालें व तदनुसार प्रथम कांहीं शाळा स्थापन झाल्या. शाळा थोड्या, विद्यार्थी थोडे, विषय थोडे, त्यामुळें ते शिकविण्याकरितां वर्ग, क्रमिक पुस्तकें, विशेष पद्धति यांची फारशी गरज नाहीं, असा आरंभींचा काळ होता. एखाद्या शिक्षकानें विद्यार्थी गोळा करावयाचे, त्यांना स्वतः किंवा प्रौढ विद्यार्थ्यांच्या साहाय्यानें शिकवावयाचें, त्याकरितां गांवकऱ्यांनीं शिक्षकांस धान्यादि रूपानें बिदागी द्यावयाची अशी पद्धत असे. खेड्यांतून अशा "तात्या पंतोजी शाळा" असत व त्यांचेमार्फत शिक्षणाचें कार्य बिनबोभाट चाले. मोठ्या गांवांतून आणि शहरांतून जास्त व्यवस्थित शिक्षण देण्यांत येई. पण तेथेंहि अनेकदां एखादे दुसरे शिक्षक व त्यांचे मदतनीस विद्यार्थी यांचेकडून सर्व विद्यार्थ्यांचें एकत्र शिक्षण चाले. वर्गपद्धति अशी फारशी नसे.

ही परिस्थिति अलीकडील ६०-७० वर्षांत पूर्णपणें बदलली. जीवनकलह हळूहळू तीव्र स्वरूपाचा होऊं लागल्यामुळें विद्यार्थ्यांनीं शिकलेच पाहिजेत अशा विषयांची संख्या वाढली. केवळ अभ्यासक्रमांतील विषय वाढवूनहि शिक्षण पुरें होत नाहीं हें लक्षांत येऊन वादविवाद, सहली, खेळ इत्यादि अवांतर कार्यक्रमहि शालेय कार्यक्रमांत समाविष्ट करावे लागले. आणि कांहीं विशिष्ट वयापर्यंत सरकारनें शालेय शिक्षण सर्वांना सक्तीचें आणि विनामूल्य केलेंच पाहिजे असें ठरल्यानंतर शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या झपाट्यानें वाढली; शिक्षकांची संख्या तदनुसार वाढवावी लागली; शिक्षणपद्धतीहि बदलाव्या लागल्या; आणि शाळेंतील सर्व विद्यार्थ्यांना एखाद्याच शिक्षकानें एकत्र शिक्षण द्यावयाचें ही कल्पना बाजूस सारून विद्यार्थ्यांची त्यांच्या अभ्यासांतील तयारीप्रमाणें वर्गवारीनें गटवारी करणें भागच पडलें. दर वर्गाचा (इयत्तेचा) अभ्यास एका वर्षांत पुरा करावयाचा, वार्षिक परीक्षेनंतर विद्यार्थी वरच्या वर्गांत घालावयाचा कीं नाहीं हें ठरवावयाचें इत्यादि वर्गपद्धति अशा तऱ्हेनें शालेय कार्यक्रमांत आली.

## इयत्तावारीची सामान्य पद्धत

शाळेंत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्याला कोणत्या इयत्तेंत बसवावयाचें तें खरोखर त्याच्या अभ्यासांतील (बौद्धिक) तयारीवर अवलंबून असणार. पण प्रत्येक विद्यार्थ्याची अशी तयारी तपासून पाहून त्याची इयत्ता ठरविणें

सोयीचें होऊं शकत नाहीं. म्हणून सामान्य पद्धत अशी ठरली गेली कीं विद्यार्थी सहा वर्षांचा झाला म्हणजे त्यानें प्राथमिक शाळेंत प्रवेश करावा. त्या वेळीं त्याचा कांहींच अभ्यास झालेला नसणार. त्यानंतर त्यानें शालेय जीवनांतील अकरा वर्षांत पुरा करावयाचा अभ्यास त्याच्या कुवतीप्रमाणें अकरा भागांत विभागून प्रत्येक भाग त्यानें एका वर्षांत ( एका इयत्तेंत ) पुरा करावयाचा. एक वर्ष–एक इयत्ता हें वर्गवारीचें सामान्य तत्त्वच म्हणावयास हरकत नाहीं. या वर्गांत त्यानें आपल्या बरोबरीच्या सुमारें ४० विद्यार्थ्यांसह त्या इयत्तेचा अभ्यास करावयाचा.

## इयत्तावारी पद्धतीचे फायदे–तोटे

आर्थिक दृष्ट्या ही पद्धत सोयीची होते; कारण चाळीस पन्नास विद्यार्थ्यांना एका वेळीं एकच शिक्षक शिकवूं शकतात. प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या कुवतीप्रमाणें, तयारीप्रमाणें, आवडीप्रमाणें शिकवावयाचें म्हटलें तर विद्यार्थ्यागणिक एक असे शिक्षक नेमावे लागतील. तें अशक्यच होय.

शिवाय अभ्यासक्रमांतील कांहीं कांहीं विषय असे असतात कीं ते एकेकट्या विद्यार्थ्याला शिकविण्यापेक्षां अनेक विद्यार्थ्यांना एकत्र करून शिकवले तर भावना जागृत करण्याच्या दृष्टीनें अधिक परिणामकारक होतात. उदाहरणार्थ, शिवाजीची आग्र्याहून सुटका, बाजी प्रभूचा पावन खिंडींतील पराक्रम, किंवा अगदीं आधुनिक काळांतील १९४२ ची 'चले जाव' चळवळ असे इतिहासांतील रोमांचकारी प्रसंग वर्गांत शिकवावयाचे असतील तर वर्गांत जितके जास्त विद्यार्थी तितकें शिकवणें जास्त परिणामकारक होतें. कधींकधीं तर इतिहास किंवा भाषा-विषयांतील कांहीं भाग ( पोवाडा किंवा तत्सम काव्य ) शिकवावयाचें असेल तर एका इयत्तेच्या सर्व तुकड्या एकत्र आणून बहुसंख्य विद्यार्थ्यांना शिकविणें अधिक योग्य ठरतें. कवायतीच्या वेळीं तर एखाद्या वर्गांतील तीस चाळीस विद्यार्थी एकत्र आणून त्यांची कवाईत घेण्यापेक्षां सबंध शाळेंतील विद्यार्थी एकत्र आणणें व त्यांची सामुदायिक कवाईत घेणें किती परिणामकारक होतें तें नित्य अनुभवाचें आहे. आठशें—हजार विद्यार्थ्यांच्या सामुदायिक संचलनाचें, हालचालींचें दृश्य प्रेक्षकांना नेत्रदीपक तर होतेंच पण त्या संचलनांत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्फूर्तिदायकहि होतें.

वर्गपद्धतीचा आणखी एक मोठा फायदा अमूर्त असल्यामुळें चटकन् नजरेला आला नाहीं तरी होतो. तो म्हणजे कुमार-दशेंतील बालकांची एक मानसिक भूक त्यानें भागाविली जाते—एक गरज पुरवली जाते. अल्पवयीन मुलांना एकलकोंडेपणाचें जीवन आवडत नाहीं. समवयस्क संवगड्यांत राहावें, खेळावें, बागडावें; त्यांच्याबरोबर अभ्यास करावा. प्रसंगीं त्यांच्यावर प्रेम करावें, राग धरावा, भांडावेंहि, आणि पुन्हां सर्व विसरून एक व्हावें ही कुमारांची वागण्याची पद्धत. हा त्यांचा एक प्रकारचा त्या काळांतील स्थायी-भावच. याला पोषक असें वातावरण वर्गांत मिळतें; आणि म्हणूनच एकदां शाळेची गोडी लागली म्हणजे मुलें घरीं राहावयाला खुषी नसतात. शाळेच्या वेळाच्या आधीं तीं घरून निघतील, मधल्या सुटींत घरीं न जातां शाळेंतच रमतील, संध्याकाळीं शाळा सुटल्यानंतरहि तीं तेथेंच थोडा वेळ रेंगाळतील, किंवा मित्रांबरोबर त्यांच्या घरीं जातील. सुटीच्या दिवशींहि त्यांचा पाय घरांत ठरत नाहीं. शाळेचें हें आकर्षण वर्गपद्धतीमुळें समवयस्क अनेक मुलें अध्ययना-करितां एकत्र आणण्यामुळेंच निर्माण होतें, व मुलांच्या मानसिक वाढीला तें अनुकूल ठरतें.

अनेक विद्यार्थ्यांत राहून त्यांच्याबरोबर शिकण्यानें विद्यार्थ्यांचा अहंभाव नाहींसा होतो. केवळ आपल्या एकट्याचा, एकट्याच्या सोयीचा विचार त्याला करतां येत नाहीं. आपण वर्गांतील अनेक मुलांपैकीं आहोंत, त्यांच्या सोयी-गैरसोयीहि आपणांस पाहिल्या पाहिजेत हा विचार त्यास करावाच लागतो. पुढील जीवनांत समाजांत कसें वागावयाचें याचें तें एक प्रकारें शिक्षणच होय.

या इयत्ता—पद्धतीचा आणखी एक मोठा फायदा होतो. वर्गांत अनेक विद्यार्थी असल्यामुळें एक तऱ्हेचें अहमहमिकेचें, चढाओढीचें वातावरण साहजिकच निर्माण होतें. दुसऱ्यापेक्षां आपण अधिक अभ्यास करूं, वरचा क्रमांक मिळवूं, पारितोषिकें मिळवूं, अशी ईर्षा विद्यार्थ्यांत निर्माण होते. त्यामुळें व्यक्तीची, वर्गाची आपोआपच प्रगति होते. या ईर्षेला आपमतलबी-पणाचें, स्वार्थाचें, द्वेषाचें वळण लागत नाहीं अशी मात्र शिक्षकानें दक्षता घ्यावयास हवी.

मात्र या पद्धतींत कांहीं अडचणीहि आहेत. एकाच वर्गांत हुशार, सामान्य आणि अभ्यासांत कमी दर्जाचे असे विद्यार्थी असल्यामुळें त्यांना एकत्र शिकवितांना शिक्षकांची व त्यामुळें विद्यार्थ्यांची कुचंबणा होते. हुशार विद्यार्थ्यांकडे पाहून शिक्षणपद्धति ठरवावी, तर बाकीच्या मुलांची गैरसोय होते; त्यांची सोय पहावी, त्यांना समजेल अशा पद्धतीनें शिकवावें तर हुशार विद्यार्थ्यांच्या कालाचा अपव्यय होतो, व त्यांना उगाच रेंगाळत राहावें लागतें. सर्व विद्यार्थ्यांची आकलन-शक्ति सारखी नसल्यामुळें ही सर्वांचीच कुचंबणा होते.

शिवाय वर्षाच्या शेवटील परीक्षेंत कांहीं विषयांत अनुत्तीर्ण झाल्यास विद्यार्थ्यास पुन्हां त्याच इयत्तेंत वर्षभर राहावें लागतें, व ज्या विषयांची तयारी एकदां झाली असेल, ज्या विषयांत तो उत्तीर्णहि झाला असेल त्या विषयांचाहि अभ्यास पुन्हां उगीचच करावा लागतो. अनुत्तीर्ण विषयांचीच नुसती तयारी करण्यास सबंध वर्ष लागणार नाहीं. कदाचित् तीनचार महिन्यांतहि ती होऊं शकेल. पण वार्षिक परीक्षा वर्षांतून एकदां व्हावयाची; त्यामुळें ती परीक्षा पुन्हां येईपर्यंत त्याला पूर्वीच्याच वर्गांत काळ काढावा लागतो. विद्यार्थ्यांच्या अमूल्य आयुष्यांतील कांहीं काळाचा तो अपव्ययच होय.

या सर्वांचा परिणाम असा होतो कीं, शाळेला हळूहळू कारखान्याचें स्वरूप येऊं लागतें. व्यक्तिशः विद्यार्थ्यांशीं शिक्षकांचा फारसा संबंध येत नाहीं; केवळ पुस्तकी व घोकंपट्टीचें शिक्षण दिलें जातें व घेतलें जातें. विद्यार्थ्यांचे स्वभावविशेष लक्षांत घेण्यास शिक्षकांस सवड होत नाहीं; त्यांच्या चारित्र्य-विकसनास साहाय्य करावें तर तें जमत नाहीं. विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र वृत्तीला वाव मिळत नाहीं, व विद्यार्थी एका सांच्याचे – एक छापाचे तयार होतात.

## या अडचणींतून मार्ग

या अडचणींतून निघण्याचा एक मार्ग सुचविला जातो. एखाद्या इयत्तेंत १००–१२५ विद्यार्थी असतील तर त्यांच्या हुशारीप्रमाणें त्यांच्या दोन अगर तीन तुकड्या पाडावयाच्या. एका तुकडींत हुशार विद्यार्थी, दुसरींत सामान्य विद्यार्थी, आणि तिसरींत निकृष्ट दर्जाचे विद्यार्थी घालावयाचे. या तीन तुकड्यांना शिकवतांना त्या त्या तुकडींतील विद्यार्थ्यांना अनुरूप अशी शिक्षणपद्धति शिक्षकांना वापरतां येते, व विद्यार्थी आपल्या आकलनशक्तीच्या

नैसर्गिक वेगाप्रमाणें प्रगति करूं शकतो. अभ्यासक्रमाच्या तपशीलांतहि थोडा बदल ठेवून हुशार विद्यार्थ्यांकडून जास्त अभ्यास करवून घेतां येईल. या तुकड्यांतील विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित ठेवली तर त्यांच्याकडे वैयक्तिक लक्ष देणेंहि शिक्षकांना शक्य होईल, व ज्याच्या अंगीं जे गुण असतील त्यांच्या विकसनास साहाय्य करतां येईल.

हा मार्ग योग्य दिसला तरी त्यांतहि अडचणी आहेतच. लहान शाळांतून विद्यार्थी कमी असतात. एका इयत्तेंत कधीं कधीं २५–३० किंवा फार तर ४० विद्यार्थी असतात; त्यांच्या तुकड्या कशा पाडतां येतील ? तुकडींतील विद्यार्थ्यांच्या संख्येला कांहीं मर्यादा येणारच. लहान तुकडी आर्थिक दृष्ट्या परवडणार नाहीं.

शिवाय अशी वर्गवारी शिक्षणशास्त्राला धरूनहि होणार नाहीं. कनिष्ठ दर्जाचे विद्यार्थी एकाच तुकडींत ठेवले तर आपण कनिष्ठ दर्जाचे, आपली प्रगति फारशी होणारच नाहीं, अशी एक तऱ्हेची न्यूनगंडाची बाधा त्यांना निश्चित होणार. त्याउलट हुशार मुलांच्या तुकडींतील सर्व विद्यार्थ्यांना आपण फार हुशार, आपल्याला सर्व कांहीं येतें अशी अहंगंडाची बाधा होणार. दोन्हीहि वाईटच. त्यापेक्षां एका वर्गांत कांहीं हुशार, कांहीं मध्यम, व कांहीं निकृष्ट विद्यार्थी ठेवले तर हुशार मुलांप्रमाणेंच आपणहि प्रगति दाखवूं या अशी ईर्षा मध्यम व निकृष्ट मुलांत उत्पन्न होऊन त्यांची अभ्यासांत प्रगति होणें शक्य आहे.

इयत्तावार पद्धतीचे हे फायदे–तोटे लक्षांत घेऊनच मुख्याध्यापकाला आपलें एकंदर धोरण आंखावें लागतें, व वर्गपद्धति आणि व्यक्तिगत लक्ष यांचा समन्वय साधावा लागतो.

## इतर देशांत काय करतात ?

वर वर्णन केलेली अडचण केवळ आपल्याच देशांत भासत नाहीं. पाश्चिमात्य देशांतहि ही अडचण आहेच. त्यांनीं त्यांतून मार्ग काढला आहे तो असा :

विद्यार्थ्याला शाळेंत प्रथम प्रवेश देतांना केवळ त्याचें वय पाहावयाचें नाहीं. त्याचें मानासिक वय ( Mental Age ) म्हणजे मनाची झालेली वाढ

लक्षांत घ्यावयाची, त्याची अभ्यासाची कुवत आणि विषयांची, खेळांची, आवडनिवड लक्षांत घ्यावयाची, त्याची पूर्ण वैद्यकीय तपासणी करावयाची- त्याची घरची परिस्थिति लक्षांत घ्यावयाची, त्याच्या स्वभावांतील गुण, दोष लक्षांत घ्यावयाचे, आणि त्याला त्याच्या समान असणाऱ्या मुलांबरोबर शिक्षणाची संधि मिळेल अशी वर्गवारी करावयाची; ही त्यांची पद्धत. पण एवढ्यानेंहि भागत नाहीं. एखादा विद्यार्थी प्रथम हुशार वाटतो, पण तो पुढें मागासलेला ठरतो. एखादा विद्यार्थी प्रथम निकृष्ट वाटतो, पण पुढें त्याची हुशारी लक्षांत येते. तेव्हां ही एकदां केलेली वर्गवारी कायम न ठरवितां दर वर्षीं—शक्य तर दर सहामाहीला पुन्हां बदलावयाची. त्यामुळें निकृष्ट मुलांनाहि हुशार मुलांच्या वर्गांत जाण्याची शक्यता—ईर्षा उत्पन्न होते, व सर्वांची प्रगति होऊं शकते. मात्र हें साधण्याकरितां वर्ग अमुक एक मुलांचाच असला पाहिजे हें बंधन कांहींसें टाळावें लागतें.

## वर्गाचा आकार

वर्गाच्या आकाराचें म्हणजे वर्गांत किती विद्यार्थी असावेत याचें बंधन आपल्याला ( आणि इतरत्राहि ) पाळावें लागतें. फार लहान वर्ग असला— अगदीं १५।२० विद्यार्थ्यांचा – तर तो उत्तमच. त्यामुळें प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीकडे शिक्षकांस वैयक्तिक लक्ष पुरवितां येईल. पण आर्थिक दृष्ट्या असा वर्ग परवडत नाहीं. कॉलेजांत १००—१५० विद्यार्थ्यांचा वर्ग असतो. तेथें व्याख्यानदृष्टीनेंच मुख्यतः शिकविलें जातें. पण तें शाळेंत अयोग्य. या सर्व गोष्टींचा विचार करून सामान्यतः ३० ते ४० विद्यार्थ्यांचा वर्ग असणें योग्य असें तूर्त तरी म्हणतां येईल. एवढ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे वर्गांत जातीनें लक्ष देणें, त्यांच्या वह्या वगैरे वेळच्या वेळीं तपासून त्यांना व्यक्तिशः मार्गदर्शन करणें हें शिक्षकांस शक्य होईल. शाळांनाहि एवढ्या आकाराचा वर्ग परवडेल असें वाटतें.

## वर्गपद्धतींतील एक समस्या

शालेय विद्यार्थ्यांची त्यांच्या बौद्धिक प्रगतीनुसार इयत्तावारी लावावयाची व शक्य तों एकाच लायकीचे, कुवतीचे विद्यार्थी शिक्षणाकरितां एकत्र एका वर्गांत ठेवावयाचे, हें तत्त्व जेव्हां शाळा संपूर्णपणें मुलांची अथवा संपूर्णपणें

मुलींची असते तेव्हां कांहींसें अंमलांत आणतां येतें. पण जेथें शाळा संमिश्र असतात—म्हणजे मुलें आणि मुली यांना एकाच शाळेंत शिकावें लागतें त्या वेळीं वर्गांतील विद्यार्थ्यांची विभागणी कशी करावयाची असा प्रश्न उपस्थित होतो. सर्व मुलें एका वर्गांत व सर्व मुली दुसऱ्या वर्गांत असें करतां येत नाहीं; कारण बरोबर एका पूर्ण वर्गाइतकीच मुलांची किंवा मुलींची संख्या असेल, किंवा नेहमींच राहील, असें नाहीं. तेव्हां वर्ग लहानमोठे झाले तरी चालतील ( मग त्यांत आर्थिक नुकसान किती कां होईना ) पण मुलांमुलींचे वर्ग स्वतंत्र ठेवावे, कीं संमिश्र वर्ग तयार करावे ? संमिश्र वर्ग टेवले तर त्यांत कांहीं अडचणी—नैतिक धोके आहेत काय ?

हा प्रश्न प्राथमिक शाळांत विशेष जाचक होत नाहीं. कारण मुलें मुली वयानें लहान असतात, स्त्रीपुरुषभेदाची त्यांना नीटशी कल्पना नसते; व त्यामुळें लैंगिक भावना उद्दीपित होण्यासारखी परिस्थिति नसते. शिवाय त्या वयांतील सर्वांकरितां एक सांच्याचाच अभ्यासक्रम असतो. लिहितां वाचतां येणें, सोपे हिशोब, गाणित करतां येणें एवढीच त्या वयांतील सर्व मुलांकडून अपेक्षा असते. आणि पद्धति कृतिमूल—जणूं काय खेळच. त्यामुळें घरीं जशीं मुलें एकत्र खेळतात तशींच शाळेंत खेळतील—म्हणजेच शिकतील. त्यामुळें या शाळांतून संमिश्र वर्ग ठेवावे लागले तरी विशेष कांहीं बिघडत नाहीं.

महाविद्यालयीन उच्च शिक्षणाच्या बाबतींतहि ही अडचण विशेष भासत नाहीं. तेथें तरुणांकरितां विद्यालयें निराळीं स्थापावयाचीं व तरुण मुलींकरितां निराळीं स्थापावयाचीं हें आर्थिक दृष्ट्या अशक्यच. शिवाय मुलेंमुली दोन्ही प्रौढ झालेलीं असतात, वयांत आलेलीं असतात व त्यांना स्वतांचें हिताहित, जबाबदारी कळण्यासारखी असते. त्यामुळें उच्च शिक्षणाकरितां स्थापावयाच्या महाविद्यालयांत मुलेंमुली एकत्र शिकलीं तर त्याबद्दल कोणाची फारशी तक्रार येणार नाहीं. खरी अडचण भासते ती माध्यमिक शिक्षणसंस्थांतून.

## सहशिक्षण म्हणजे काय ?

माध्यमिक शाळांतून सहशिक्षण योग्य कीं अयोग्य या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी ' सहशिक्षण ' या शब्दाचा अर्थ थोडा स्पष्ट केला पाहिजे. हल्लीं महाविद्यालयीन वर्गांतून किंवा कांहीं माध्यमिक शाळांतून मुलांच्याच वर्गांत मुलींना प्रवेश देऊन त्यांच्याकरितां एका बाजूचीं बाकें राखून ठेवलेलीं

असतात. शिक्षक आपापले विषय अशा संमिश्र वर्गाला शिकवतात. केवळ मुलेंमुली एकाच वर्गांत असतात म्हणून त्याला सहाशिक्षण म्हणतां यावयाचें नाहीं; सर्व शालेय कार्यक्रमांत म्हणजे वर्गांतील अभ्यासांत, खेळांत, सहलींत वगैरे सर्वत्र मुलांमुलींनीं आपण मुलगा किंवा मुलगी आहोंत हें विसरून मोकळेपणानें भाग घ्यावयाचा, अगदीं मिळून मिसळून वागावयाचें हें सहशिक्षण होय. असें सहशिक्षण माध्यमिक शाळांतून द्यावें काय ?

## प्रतिकूल मत

सहशिक्षणाला प्रतिकूल असणारे आपल्या मताच्या पुष्टयर्थ पुढील कारणें सांगतात :—

( १ ) वयाचें दहावें ते अठरावें वर्ष या काळांत मुलांमुलींच्या शरीररचनेंत झपाट्यानें बदल होत असतो. मुलींची वाढ पंधराव्या सोळाव्या वर्षी पूर्ण होऊन त्या तरुणी बनतात, तर मुलगा वयाच्या वीस एकवीस वर्षानंतर तारुण्यांत प्रवेश करूं लागतो.

या वयांत मुलांमुलींचीं वजनें व उंची वाढण्याचा वेगहि भिन्न असतो, व त्यांच्या रक्तांतील तांबड्या पेशींचें प्रमाणहि भिन्नाभिन्न असतें.

या सर्वांचा परिणाम असा होतो कीं, एकाच वयाच्या मुलांमुलींत सारखेंच शारीरिक सामर्थ्य असूं शकत नाहीं. मुलांपेक्षां मुली अशक्त असतात.

( २ ) या वयांतील मुलांमुलींमध्यें मानसशास्त्रदृष्टयाहि फरक असतात. मुलांमुलींच्या बौद्धिक सामर्थ्यांत फरक नसला तरी ज्या विषयांत अमूर्त विचाराचें प्राधान्य असतें ( उदा० गणित, शास्त्र ) त्यांत मुलींपेक्षां मुलांची गति जास्त चालते. याउलट भाषा, इतिहास अशांसारख्या विषयांत मुलांपेक्षां मुलींची गति अधिक आढळून येते.

तसेंच या वयांतील मुलें मुलींपेक्षां जास्त चौकस, जास्त क्रियाशील, मनानें जास्त कणखर अशीं असतात, तर मुली मुलांपेक्षां जास्त एकलकोंड्या, जास्त लाजाळू असतात. तसेंच त्या जास्त कष्टाळू, जास्त हळव्या मनाच्या असतात. एखाद काम कष्टाचें, जिकिरीचें असलें तर मुलें तें करण्याची टाळाटाळी करतील; पंण मुली तशी टाळाटाळ करणार नाहींत.

त्यामुळें मुलांना आवडणारे विषय, छंद, क्रीडाप्रकार हे मुलींना या वयांत आवडणाऱ्या विषयांपेक्षां, छंदांपेक्षां निराळे असतात.

( ३ ) नैतिक दृष्टया या वयांतील सहाशिक्षण धोक्याचें आहे. कारण या वयांत लैंगिक प्रवृत्तींची जाणीव व्हावयास लागते; व त्याचे परिणाम अनिष्ट होण्याचा संभव असतो.

( ४ ) संमिश्र वर्गांत मुलांना हवा तो मोकळेपणा राहात नाहीं; त्यांत फाजील लाजाळूपणा येऊं लागतो. उलट मुलींना अशा वर्गांत जास्त सवलती मिळतात, व त्यांमधील स्त्रीत्वाच्या नाजुक भावना नाहींशा होऊन त्या पुरुषी बनूं लागतात.

( ५ ) स्त्रीपुरुषांची शरीर-रचनाच निसर्गानें भिन्न भिन्न प्रकारची ठेवली आहे, व त्यामुळें त्यांचें जीवितकार्यहि भिन्न भिन्न आहे. पुरुषानें कष्ट करून द्रव्यार्जन करावें, व स्त्रीनें घरीं राहून संसाराची सुव्यवस्थित मांडणी करावी असाच निसर्गाचा हेतु दिसतो. जर जीवितकार्य भिन्न असेल तर त्याकरितां तयारी म्हणून घ्यावयाचें शिक्षणहि भिन्न भिन्न प्रकारचें असलें पाहिजे. अर्थात् तें भिन्न भिन्न ठिकाणींच दिलें पाहिजे.

## अनुकूल मत

सहाशिक्षणाला अनुकूल असणाऱ्यांना हीं कारणें पटत नाहींत. त्यांचें थोडक्यांत म्हणणें असें कीं, शरीररचना भिन्न म्हणून मुली या वयांत मुलांपेक्षां अशक्त असतात हें मान्य, पण त्याकरितां उत्तम उपाय म्हणजे खेळांच्या, व्यायामाच्या वेळीं मुलेंमुली विभक्त करावीं. बौद्धिक विषय एकत्र शिकवावयास काय हरकत आहे ?

मानसिक दृष्टया मुलांमुलींत फरक आहेत हें खरें. पण म्हणूनच सहशिक्षण अवश्य आहे. मुलेंमुली एकत्र शिकलीं तर त्यांना एकमेकांचे गुण घेतां येतील, अवगुण टाकून देतां येईल. चिकाटी, कष्टाळूपणा, जबाबदारीनें काम करणें इत्यादि गुण मुलींपासून मुलांनीं घ्यावे, व चौकसपणा, क्रियाशील स्वभाव, अशांसारख्या गोष्टी मुलांकडून मुलींनीं घ्याव्या. तें एकमेकांच्या स्वभावपरिपोषाला पूरकच होईल. वर्गांत मुली आहेत म्हणून मुलें जर दबकून वागूं लागलीं, अवाच्यपणा कमी करूं लागलीं तर तें इष्टच होईल.

सहशिक्षणांत नैतिक धोका आहे हें फारसें खरें नाहीं. घरीं नाहीं का या वयांतील भाऊबहिणी कुटुंबांत एकत्र राहात ? त्या ठिकाणीं जसें आई-बापांचें अस्तित्व त्यांना मार्गदर्शनास उपयुक्त असतें तसें वर्गांत शिक्षकांचें असावें. नीतिमान् शिक्षक, मनाला प्रसन्नता देणारा शालेय परिसर, उपयुक्त अभ्यासक्रम, आणि शिक्षणाच्या आदर्श पद्धति असतील तर मुलांमुलींचा ओढा अनैतिक वर्तनाकडे जाईलच कसा ?

स्त्रीपुरुषांचें जीवितकार्य भिन्नभिन्न आहेच असें म्हणतां यावयाचें नाहीं. ज्याची जशी पात्रता तसें त्याला जीवनांत कार्य करण्यास मिळावें. एखादा रेम्याडोक्या, निरक्षर पुरुष गडी किंवा आचारी नाहीं का होत ? तसेंच एखादी बुद्धिमान् कर्तबगार स्त्री राजकारण किंवा समाजकारण किंवा शास्त्रीय संशोधन नाहीं का करीत ? मग स्त्रीपुरुषांना भिन्नभिन्न शिक्षण कशाला ? आणि एकच शिक्षण द्यावयाचें असेल तर तें एकत्र कां देऊं नये ?

## निष्कर्ष

सहशिक्षणासंबंधींच्या या दोन्ही मतांत इतकें तथ्य आहे कीं यांतील अमुक एक बाजू पूर्णपणें खरी असें म्हणतांच येत नाहीं. सांप्रत अशी सामान्य समजूत आहे कीं प्राथमिक शाळांत सहशिक्षणाला हरकत नसावी; विश्वविद्यालयीन शिक्षणांत आर्थिक दृष्टीनें सहशिक्षण ठेवावेंच लागेल; पण माध्यमिक शाळांतून सहशिक्षण शक्य तों असूं नये. ज्या ठिकाणीं मुलांच्या आणि मुलींच्या अशा स्वतंत्र शाळा चालण्यापुरती मुलींची संख्याच नसेल तेथें आर्थिक दृष्टीनें विचार करून संमिश्र शाळा असल्यास हरकत नाहीं. मात्र मुलांमुलींमधील नैसर्गिक भिन्नता लक्षांत घेऊन त्यांच्याकरितां अभ्यासक्रमांत कांहीं विशेष बदल मात्र करावे.

• • •

: ८ :

# वेळापत्रक

प्रत्येक शाळेंत – मग ती शाळा प्राथमिक असो वा माध्यमिक असो, मुलांची असो, मुलींची असो वा संमिश्र असो, खेड्यांतील असो वा शहरांतील असो, प्रामुख्यानें बौद्धिक विषय शिकवणारी असो कीं तांत्रिक विषयांचें शिक्षण देणारी असो, प्रत्येक शाळेंत प्रत्येक वर्गांत वेळापत्रक असतें. त्या त्या वर्गांत कोणता विषय कोणत्या तासाला, किती मिनिटें, कोणते शिक्षक शिकाविणार हें त्या वेळापत्रकांत दाखविलेलें असतें. वर्गांतील एकंदर अध्यापन त्या वेळापत्रकाप्रमाणें चालतें. वेळापत्रक म्हणजे एका अर्थानें शाळेचें घड्याळच. तें जितकें व्यवस्थित असेल तितकें शाळेचें काम व्यवस्थित चालणार. या वेळापत्रकाचा विचार शाळेची आदर्श वेळ कोणती या विचारावर खरोखर आधारावा लागेल.

## शाळेची आदर्श वेळ कोणती ?

या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें म्हणजे आपल्या देशांत सामान्यपणें शाळेची जी वेळ असते ( दुपारीं ११ ते सायंकाळीं ५ ) ही आदर्श वेळ नाहीं हें प्रथमच स्पष्ट केलें पाहिजे. कारण ती वेळ उन्हाची असते. तसेंच अकरा वाजतां जेवून शाळेंत जावयाचें म्हणजे शारीरिक दृष्ट्या त्रासदायक आणि आरोग्यदृष्ट्या अहितकारक तर असतेंच पण मानसिक दृष्ट्याहि ती वेळ अभ्यासास सोयीची नसते. दुपारीं चार वाजण्याच्या सुमारास तर मानसिक उत्साहाचा पारा शून्यावर येतो असें प्रयोगशास्त्रज्ञ म्हणतात, आणि तसा प्रत्यक्ष अध्यापनाच्या वेळीं अनुभवहि येतो.

त्याउलट सकाळीं ७॥ ते १०॥ ही वेळ कोणत्याहि बौद्धिक कामाकरितां विशेष चांगली असते. त्या वेळीं शरीर प्रसन्न, मन प्रसन्न आणि आजूबाजूचें वातावरणहि प्रसन्न अशी स्थिति असल्यामुळें अभ्यासास मोठा हुरूप वाटतो, हें शनिवारीं सकाळीं शाळा असली म्हणजे प्रत्ययास येतेंच.

तेव्हां सकाळचे तीन तास बौद्धिक विषयांचें अध्यापन करावें; नंतर घरीं जाऊन जेवावें, विश्रान्ति घ्यावी, कांहीं बैठे खेळ खेळावे, सच्छंद असतील तर त्यांचा व्यासंग करावा अथवा गृहपाठ तयार करावे, तों दुपारचे दोन वाजतात. थोडा फराळ करून पुन्हां अडीच वाजतां शाळेंत जावें; चित्रकला, संगीत, शिवणकाम, हस्तव्यवसाय, बागकाम – किंवा भाषा, इतिहास, भूगोल यांसारखे मेंदूला त्या मानानें कमी शीण देणारे विषय शिकावे; साडेपांच वाजतां घरीं जाऊन शक्य तर कांहीं खाऊन क्रीडांगणावर जावें; तेथें अंधार पडेपर्यंत विविध खेळ खेळावे, व्यायाम घ्यावा, आणि मग घरोघर जावें; हा शालेय कार्यक्रम खरोखर आदर्श होय. आपल्याकडील खेड्यांतील प्राथमिक शाळांतून असा कार्यक्रम चालू आहे. पाश्चिमात्य देशांतहि शाळेची वेळ सामान्यतः अशीच ( सकाळीं ९ ते १२ व दुपारीं १ ते ४, आणि नंतर खेळ ) असते.

पण ही शाळेची वेळ चांगली असली तरी आपल्याकडील सध्यांच्या शहरी वातावरणांत ती सुरू करणें तूर्त तरी शक्य दिसत नाहीं. कारण शाळा घरापासून अनेकदां फार अंतरावर असते ( कित्येकदां विद्यार्थ्यांना परगांवीं असलेल्या शाळेंत आगगाडीनें, बसनें जावें लागतें ), त्यामुळें मधल्या वेळीं जेवावयास घरीं येणें जमत नाहीं. आणि पाश्चिमात्य देशांप्रमाणें शाळेंत अथवा शाळेजवळच्या उपाहारगृहांत रोजचें मधलें जेवण घेणें परवडत नाहीं. त्यामुळें सकाळ – दुपार अशी दुबार शाळा भरविणें कितीहि चांगलें असलें तरी व्यवहार्य होत नाहीं; आणि दुपारीं ११ ते सायंकाळीं ५ अशीच सामान्यतः शाळेची वेळ ठेवावी लागते आणि याच वेळांतील शालेय कार्यक्रमाचें वेळापत्रक तयार करणें भाग पडतें.

## वेळापत्रकाविरुद्ध आक्षेप

वर्षाच्या आरंभीं वर्गांचीं वेळापत्रक तयार करावयाचीं व त्यांप्रमाणें दैनंदिन शिक्षणाचें कार्य चालवावयाचें ही पद्धत अनेक वर्षें आपल्याकडील आणि परदेशांतीलहि शाळांतून चालू आहे. या पद्धतीवर अलीकडे जो आक्षेप घेतला जातो त्याचा प्रथम विचार करून मगच वेळापत्रकाच्या शिक्षणपद्धतींतील स्थानासंबंधीं व उपयुक्ततेसंबंधीं सविस्तर चर्चा करणें योग्य होईल. वेळापत्रकाविरुद्ध जो मुख्य आक्षेप घेतला जातो तो असा कीं, यामुळें अध्यापनांत एक तऱ्हेचा यांत्रिकपणा, कृत्रिमपणा येतो. वर्षाचा एकूण अभ्यास ठरवावयाचा, त्या

अनुरोधानें दर सहामाहींत, तिमाहींत, महिन्यांत, आणि त्याच्याहि पुढें जाऊन दर आठवड्यांत किती अभ्यास संपवावा लागेल याचा अंदाज करावयाचा; व मग त्या मानानें दररोज, दररोजच्या शालेय तासांत किती अभ्यास संपवावा लागेल, त्याचें कोष्टक करून तेवढा अभ्यास त्या त्या तासांत संपविण्याची तयारी ठेवावयाची, असा वेळापत्रकाचा अर्थ होतो. पण शिक्षक हे यंत्र नसल्यामुळें आणि विद्यार्थी निर्जीव बाहुल्या नसल्यामुळें दर तासांत योजिलेला अभ्यास संपतोच असें नाहीं. पण तासाच्या शेवटीं घंटेचे टोल पडले म्हणजे शिक्षकाला आपलें शिकविणें एकदम थांबवावें लागतें. कारण आपल्या विषयाच्या तासाला आरंभ करण्यास तयार होऊन पुढील तासाचे शिक्षक वर्गाबाहेर उभे असतात. एखादा काव्याचा पाठ चालू असावा, शिक्षक आणि विद्यार्थी त्या काव्यांत अगदीं रमलेले असावेत, आणि इतक्यांत तास संपल्याचा टोल पडावा, म्हणजे सर्वांचाच मोठा विरस होतो. याउलट तासाचा विषय संपलेला असावा, पण तास संपलेला नाहीं म्हणून शिक्षकांना उरलेला वेळ वर्गांत कसा काढावा असें संकट पडतें. नवीन विषय सुरू करावा तर उरलेल्या वेळांत तो संपणारा नसतो. आणि मग केवळ घंटेची वाट पहात वर्गाला वेळ काढावा लागतो. या सर्व प्रकारांमध्यें शिक्षकाचें लक्ष विद्यार्थ्यांपेक्षां शिकवावयाच्या विषयावर, आणि ज्या वेळांत तो संपवावयाचा त्या वेळेवरच अधिक केंद्रित होतें; आणि विशेष म्हणजे वर्गांतील विद्यार्थी बुद्धीनें व तयारीनें सारख्याच दर्जाचे नसल्यामुळें ठराविक मिनिटांत ठराविक भाग शिकवावयाचा हें बंधन शिक्षकांस जाचक होतें. म्हणून वेळापत्रक असूंच नये; वर्षांत पुरा करावयाचा अभ्यास त्या काळांतच पण विद्यार्थी आणि शिक्षक यांनीं आपापल्या सोयीप्रमाणें पुरा करावा असें सुचविलें जातें. किंवा इतकी सवलत ठेवल्यास तिचा दुरुपयोग होईल असें वाटत असल्यास वेळापत्रकांत विषय आणि पोटविषय (मराठी–व्याकरण, मराठी गद्य—इ.) न दाखवितां भाषा, ‡ शास्त्रें, हस्तव्यवसाय अशा तऱ्हेचे विषयांचे स्थूल गट निर्दिशित करावे; आणि त्या त्या

---

‡ भाषा या शब्दांत मातृभाषा, संस्कृतसारखी अभिजात भाषा, राष्ट्रीय भाषा हिंदी, इंग्रजीसारखी परकी भाषा – या सर्वांचा समावेश करावयाचा. शास्त्रांत पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र इ. शास्त्रें व गणित या सर्वांचा समावेश करावयाचा.

त्तासांत भाषेपैकीं, शास्त्रांपैकीं कोणता विषय व त्याचा कोणता पोटभाग किती प्रमाणांत घ्यावयाचा तें त्या त्या शिक्षकानें ठरवावें. असा लवचिकपणा वेळापत्रकांत ठेवल्यास शिक्षकांची व विद्यार्थ्यांची कुचंबणा होणार नाहीं, असें कांहींचें म्हणणें आहे. कांहींना वाटतें, एवढ्या लवचिकपणानेंहि भागणार नाहीं. त्याऐवजीं पाश्चिमात्य देशांतील कांहीं शाळांतून आढळणारी डाल्टन पद्धति § हींच अवलंबली तर वेळापत्रकाचें आपण माजवलेलें स्तोम कमी होईल असें त्यांना वाटतें.

## तरीहि वेळापत्रक हवेंच

या आक्षेपांतील आणि सूचनांतील तथ्य मान्य केलें तरीहि वेळापत्रक हें अवश्य असावें असेंच पूर्ण विचाराअंतीं म्हणावें लागेल. यार्ची कारणें अशीं:—

### १. आर्थिक निकड

प्रत्येक विद्यार्थ्याची कुवत, आवडीनिवडी, जिज्ञासा इत्यादि लक्षांत घेऊन त्याला स्वतंत्रपणें कोणत्या वेळीं, कोणता विषय, किती वेळ, कोणत्या पद्धतीनें शिकवावयाचा हें ठराविणें योग्य खरें. पण असें व्यक्तिशः एकेक विद्यार्थ्याला शिकविणें आर्थिक दृष्ट्या कोणत्याच राष्ट्राला कधींच शक्य नाहीं. शिक्षणाकरितां शाळांतून एकेका वर्गांत ३०—४० क्वचित् ५० विद्यार्थीहि एकत्र आणावे लागतात. त्या सर्वांच्या कुवती, जिज्ञासा वगैरे सामान्यपणें लक्षांत घेऊनच त्यांना शिकविण्याची एकंदर व्यवस्था करावी लागते. ही व्यवस्था जास्तींत जास्त फलदायी होण्याकरितां सर्वांना सामान्यपणें सोयीचें असणारें वेळापत्रक उपयुक्त ठरतें.

### २. वेळेचें नियोजन

जीवनांतील कोणतीहि गोष्ट पद्धतशीरपणें, वेळच्या वेळीं व्यवस्थित करावयाची म्हणजे माणसाला आपलें वागणें अगदीं कांटेकोरपणाचें, रेखीव ठेवावें लागतें. चोवीस तास आणि बाराहि महिने अशा तऱ्हेनें वागण्याचा माणसाला निसर्गतःच कंटाळा वाटतो. वेळापत्रकाच्या बंधनामुळें निदान शालेय जगांत तरी विद्यार्थी आणि शिक्षक यांचें वागणें ( म्हणजे अध्ययन आणि अध्या-

§ या पद्धतीची सविस्तर माहिती पुढें स्वतंत्र प्रकरणांत दिली आहे.

पन ) हें व्यवास्थित, पद्धतशीर होऊं शकतें. वेळेचें – वक्तशीरपणाचें महत्त्व सर्वांना कळतें.

### ३. सुव्यवस्था व समतोलपणा

अमुक दिवशीं अमुक मिनिटें अमुक विषय शिकवावयाचा हें बंधन वेळा-पत्रकामुळें येतें. त्याचा एक सुपरिणाम असा होतो कीं, अभ्यासक्रमांतील एखाद्या विषयाला शिक्षकाच्या आवडीनिवडीप्रमाणें आणि पूर्वतयारीप्रमाणें मिळणारें कमीजास्त महत्त्व नाहींसें होऊन प्रत्येक विषयाला त्या त्या विषया-प्रमाणें शाळेनें ठरवून दिलेलें महत्त्वच शिक्षकांना द्यावें लागतें; आणि त्या सर्वांत एक प्रकारचा समतोलपणा राखला जातो.

## आदर्श वेळापत्रक

वेळापत्रक हें शिक्षणाचें एक साधन म्हणून जास्तींत जास्त उपयुक्त व्हावयाचें असेल तर तें तयार करणारानें पुढील गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावयास हवें.—

### १. विषयांचें तारतम्य

अभ्यासक्रमांतील विषयांना दर आठवड्यांत तास द्यावयाचे ते योग्य प्रमाणांत द्यावयास हवे. हें प्रमाण त्या विषयांचें महत्त्व आणि तो विषय समजण्यास किती कठीण अगर सोपा आहे यांवर अवलंबून असावें. विषय किती महत्त्वाचा तें ठरवितांना ज्या विद्यार्थ्यांना तो शिकवावयाचा त्यांचाहि विचार करावयास हवा. उदाहरणार्थ, मुखवाचन हा प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या आवडींत विशेष महत्त्वाचा विषय होईल; कारण त्या काळांत मुखवाचनाची कला विद्यार्थी नव्यानेंच शिकत असतात. म्हणून प्राथमिक शाळांतून त्या विषयास अधिक तास द्यावयास पाहिजेत. माध्यमिक शाळांतून मुखवाचनाला स्वतंत्र असे तास वेळापत्रकांत ठेवण्याची गरज नाहीं. भाषेच्या अध्ययनाच्या तासांतच योग्य त्या वेळीं योग्य त्या प्रमाणांत मुखवाचन घेतां येईल.

### २. कालमर्यादा

वेळापत्रकांतील तास किती मिनिटांचा असावा तेंहि पाहिलें पाहिजे. पूर्वी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतून सर्व वर्गांना सर्व तास ६० मिनिटांचे

असत. एवढा दीर्घ काळ एकाच ठिकाणीं बसून एकच विषय शिकणें ( किंवा शिकवणेंहि ) कंटाळवाणें होई. त्यामुळें विश्रान्ति घेण्यांत, गप्पा मारण्यांत वगैरे कांहीं वेळ आपोआपच खर्च होई. आतां ही परिस्थिति बदलली आहे. सामान्यतः माध्यमिक शाळांतून ३५ पासून ४५ मिनिटांपर्यंत वेग-वेगळे तास असतात.

वास्तविक मुलांचें वय, त्यावर अवलंबून असणारें त्यांचें अवधानसामर्थ्य, आणि निरनिराळे विषय शिकवितांना येणारा कमीजास्त मानसिक शीण ( थकवा ) लक्षांत घेऊन या तासांची रचना व्हावयास पाहिजे. प्राथमिक शाळेंतील आणि माध्यमिक शाळांतील पहिल्या तीन इयत्तांतील विद्यार्थ्यांचीं वयें, आणि त्या वयानुसार येणारीं त्यांच्या वागण्यांतील अस्थिरता, व एकाच विषयावर ( किंवा कार्यक्रमांत ) फार वेळ लक्ष केंद्रित करण्याची त्यांची अक्षमता लक्षांत घेऊन त्यांचेकरितां ठेवावयाचे तास ३०-३५ मिनिटांचे असे लहान हवेत. आणि जसजशीं तीं मुलें प्रौढ होत जातील, मनावर आणि शरिरावर त्यांचा जसजसा जास्त ताबा येऊं लागेल तस-तसा तास मोठा ४०–४५ मिनिटांचा व्हावयास हवा. गणितासारखे कांहीं विषय शिकतांना सामान्य विद्यार्थ्यांना ते क्लिष्ट वाटतात, व म्हणून त्या विषयावर त्यांच लक्ष फार वेळ केंद्रित होऊं शकत नाहीं. त्यामुळें ते तास लहान ठेवून त्यांची आठवड्यांतील संख्या वाढविणें सोयीचें होतें. चित्रकला, शास्त्र, हस्तव्यवसाय अशांसारख्या विषयांत प्रात्यक्षिक कार्य असल्यामुळें त्या विषयांत मात्र सामान्यतः विद्यार्थ्यांचें लक्ष बराच वेळ टिकतें; म्हणून त्यांकरितां ठेवावयाचे तास थोडे मोठे किंवा लहान अस-ल्यास दोन तास लागोपाठ ठेवणें सोयीचें होतें.

### ३. विषयांचें काठिण्य व क्रम

वेळापत्रकांत कोणत्याहि एका दिवशीं तासांचा क्रम कोणत्या तऱ्हेनें लावाययाचा हेंहि पाहणें अवश्य आहे. अभ्यासक्रमांत सामान्यतः असणारे विषय शिकतांना विद्यार्थ्यांना त्या विषयांच्या कठिणतेप्रमाणें कमी-जास्त प्रमाणांत मानसिक थकवा येतो. या बाबतींत पाश्चिमात्य शिक्षणशास्त्रज्ञांनीं प्रयोग करून कोणत्या विषयांनीं किती थकवा येतो हें शोधून काढलें आहे. त्यांच्या मतें सर्वांत जास्त मानसिक थकवा गणित शिकतांना येतो. त्यानंतरचे

उतरते क्रम ( इंग्रजीसारखी ) परकीय भाषा, ( संस्कृतसारखी ) अभिजात भाषा, शास्त्रीय विषय, मातृभाषा, इतिहास-भूगोल, नागरिकशास्त्र, चित्रकला, हस्तव्यवसाय, शिवणकाम अशा तऱ्हेनें लागतात. सर्वांत कमी थंकंवा शालेय संगीत शिकतांना येतो.

हें सर्व लक्षांत घेऊन वेळापत्रकाची रचना अशी केली पाहिजे कीं जास्त थकवा आणणारे विषय वेळापत्रकांत एकापाठोपाठ एक असे येतां कामा नयेत.

### ४. मानसिक उत्साहाची भरती-ओहोटी

कठीण विषय शिकण्याकरितां आठवड्यांतील कोणते दिवस सोयीचे आणि त्या दिवसांतील कोणते तास सोयीचे असाहि विचार करतां येतो. रविवारीं सुटी असल्यामुळें विद्यार्थ्यांचा तो दिवस खेळण्यांत, सहलींत, करमणुकीचे कार्यक्रमांत, किंवा निदान घरकामांत अथवा गप्पागोष्टींत जातो. त्या दिवशीं अभ्यास करण्याची वृत्ति सामान्यतः कमीच असते. मनाची ही वृत्ति सोमवारीं शाळेंत जातांनाहि कांहीं प्रमाणांत शिल्लक असते. त्यामुळें विशेष क्लिष्ट विषयांचा अभ्यास करण्यास सोमवार अनुकूल नसतो.

रविवारची सुट्टी, गंमती इत्यादींचा विसर हलकेहलके मंगळवारपासून पडूं लागतो व अभ्यासांत मन रमूं लागतें. ही मानसिक अवस्था सामान्यतः गुरुवार-शुक्रवारपर्यंत टिकते. त्यामुळें आठवड्यांतील ते तीन-चार दिवस अभ्यासास बरे असतात. कठीण विषयांचा अभ्यास या अवधींत होणें बरें.

शुक्रवार दुपारपासून शनिवारची अर्ध्या दिवसाची आणि रविवारची सबंध दिवसाची सुट्टी इकडे लक्ष जाऊं लागतें, आणि हळू हळू अभ्यासाकडून मन बाजूला सरूं लागतें. म्हणून या दोन दिवसांत सोपे विषय वेळापत्रकांत ठेवणें हिताचें होतें. त्यांतल्या त्यांत शनिवारीं शाळा सकाळीं असल्यास मात्र त्या दिवसाचे पहिले एक दोन तास अभ्यासाला विशेष उपयुक्त असतात. कारण सकाळच्या प्रसन्न वातावरणामुळें विद्यार्थी एकतऱ्हेनें उल्हसित असतात.

### ५. बौद्धिक व हस्तव्यवसायाचे विषय

दिवसाचा कोणता तास कोणत्या विषयाच्या अध्ययनाला चांगला असाहि विचार व्हावयास पाहिजे. आपल्याकडे सामान्यतः शाळांची वेळ सकाळीं

११ ते सायंकाळीं ५ अशी असते. सकाळीं विद्यार्थी जेवून शाळेंत यावयास निघतात; कांहींना घाईनें जेवण उरकावें लागतें, कांहींना पळतपळत शाळेंत यावें लागतें. कोणेताहि ऋतु असला तरी दुपारची अकराची वेळ म्हणजे उन्हाची. तेव्हां शाळा सुरू होतांच पहिला तास थोडासा आळसांत जाणें साहजिकच आहे. त्यानंतर दुसरा–तिसरा हे तास अभ्यासाला चांगले. ते दोन तास अभ्यास झाला कीं मनाला आणि शरीरालाहि शीण येणारच. मग १५-२० मिनिटांची छोटी सुटी असणें इष्ट. त्या सुटींत खेळून, पाणी पिऊन, इकडे तिकडे हिंडून विद्यार्थी ताजेतवाने होतात. त्यामुळें सुटीपुढील तास अभ्यासाला अनुकूल असतो. पांचव्या तासाला पुन्हां शीण येऊं लागतो. मग मोठी सुटी येते. त्या वेळीं खाऊनपिऊन, घरीं जाऊन येऊन विद्यार्थी पुन्हां ताजे होतात. म्हणून सुटीपुढील तास कठिण विषयाच्या अध्ययनाला योग्य असा असतो. पुढला म्हणजे शेवटचा सातवा तास सर्व दिवसांत अभ्यासाच्या दृष्टीनें निकृष्ट असतो. विद्यार्थी मनानें आणि शरीरानेंहि थकलेले असतात. त्यांचें लक्ष घराकडे किंवा खेळाच्या मैदानाकडे लागलेलें असतें. अशा वेळीं चित्रकला, हस्तव्यवसाय, संगीत अशांसारखे बुद्धीला कमींत कमी ताण देणारे विषय ह्या तासांत शिकविणें सोयीचें होतें.

### ६. शिक्षकांची सोय

याशिवाय वेळापत्रकांतील विषयांच्या क्रमांत विविधता साधणें ( म्हणजे गणित-शास्त्रें, चित्रकला–हस्तव्यवसाय, इतिहास–भूगोल–नागरिक शास्त्र असे एकाच तऱ्हेचे विषय लागोपाठ न येऊं देणें), वर्गशिक्षक-पद्धतींत शिक्षकांना सतत बोलण्याचे तास लागोपाठ येऊं नयेत म्हणून भाषा–इतिहास–भूगोल असा विषयांचा क्रम येऊं न देतां भाषा–गणित–इतिहास——अशासारखा विषयांचा क्रम साधणें, शिक्षकांना आठवड्यांत मोकळे असणारे विश्रान्तीचे तास एकाच दिवशीं पुष्कळ आणि कांहीं दिवशीं मुळींच नाहींत अशी त्यांची विभागणी न होतां, दररोज त्यांना एक किंवा दोन तास मोकळे राहतीलच अशी त्यांच्या कामाची वांटणी वेळापत्रकांत योजणें या गोष्टीहि महत्त्वाच्या आहेत.

## आदर्श आणि व्यवहार

वर उल्लेखिलेल्या तत्त्वांनुसार शाळांतील वेळापत्रकांची रचना होणें इष्ट असलें तरी तें सर्वस्वीं शक्य मात्र होईलच असें नाहीं. त्या बाबतींत मुख्य

अनुक्रम १५५५५३
विषय ... नि. ...
फा. ६७८
नं. डि. २७/३५४

| तास | ार | वेळ | |
|---|---|---|---|
| | न | ७-२० ते | ७-३० |
| १ | म | ७-३० ते | ८-१० |
| २ | त | ८-१० ते | ८-५० |
| | - | ८-५० ते | ९-१० |
| ३ | ी | ९-१० ते | ९-५० |
| ४ | ग्रा | ९-५० ते | १०-३० |
| | ी | — | |
| ५ | | | |
| ६ | | | |
| ७ | | | |

( शा.

अडचणी येतात त्या तीन. शिक्षक, भूगोल–चित्रकला–शास्त्र यांसारख्या विषयांना मिळणाऱ्या मोजक्या खोल्या, आणि भूगोल–शास्त्र यांसारख्या विषयांचें मर्यादित शिक्षण–साहित्य, या त्या तीन अडचणी होत. समजा, असें वाटलें कीं, बुधवारचा तिसरा तास भूगोल शिकविण्यास चांगला आहे. तर त्या वेळीं एखाद्या दुसऱ्या इयत्तेलाच तो भूगोलाकरितां देतां येईल. कारण शाळेंत भूगोलशिक्षक थोडेच असावयाचे; भूगोलाचा स्वतंत्र वर्ग असल्यास तो एकच असावयाचा, आणि नकाशे, गोल इ. साहित्य एका वेळीं एखाद्या दुसऱ्या वर्गाला पुरेल एवढेंच असावयाचें.

तसेंच व्यायाम-शिक्षक, चित्रकला-शिक्षक, संस्कृत-शिक्षक, हस्तव्यवसाय-शिक्षक यांची संख्याहि मर्यादित असल्यामुळें त्या त्या विषयांना नेहमीं योग्य तेच तास दिले जातील असें नाहीं. शास्त्राचे शिक्षक एखादे दुसरेच असावयाचे, व त्यांना तीन-चार इयत्तांनाहि शास्त्र शिकवावें लागणार; त्यामुळें त्या विषयालाहि आदर्श तास देणें अशक्य होतें. मुख्याध्यापक आणि पर्यवेक्षक यांना कचेरींतील कामें असतात, व देखरेख, मार्गदर्शन करावयाचें असतें. त्यांच्याकरितां कांहीं विशिष्ट तास (उदाहरणार्थ: पहिला, तिसरा किंवा पांचवा) मोकळे ठेवावेच लागतात. कांहीं शिक्षक पूर्ण वेळ काम करणारे नसतात. कोणी अकरा ते दोनच कामें करतात, कोणाची नेमणूक फक्त दुपारच्या तीन-चार तासांपुरतीच असते. या सर्वांची सोय पाहावीच लागते. त्यामुळें वेळापत्रक तयार करतांना इतर शिक्षकांना जे तास रिकामे राहतील तेच द्यावे लागतात; त्यांतच लेखनासाठीं, चित्रकलेसाठीं, शास्त्रीय प्रयोगांसाठीं वरच्या वर्गांत सलग दोन तास द्यावे लागतात. तेव्हां या सर्व अडचणी लक्षांत घेऊन वेळापत्रक अशा तऱ्हेनें तयार व्हावें कीं वर उल्लेखिलेल्या तत्त्वांपैकीं जास्तींत जास्त तत्त्वें विचारांत घेतलेलीं असावीं. असें एका वर्गाचें वेळापत्रक सोबत करून दाखविलें आहे.

## स्पष्टीकरणार्थ टीपा

(१) सोमवार ते शुक्रवार दररोज सात तास; शनिवारीं चार तास. पहिले चार तास प्रत्येकीं चाळीस मिनिटांचे; शेवटले तीन तास प्रत्येकीं पस्तीस मिनिटांचे.

( २ ) दररोज अभ्यासास सुरुवात होण्यापूर्वी सामुदायिक प्रार्थना अथवा मुख्याध्यापकांचें महत्त्वाचें निवेदन.

( ३ ) पहिल्या दोन तासांनंतर २० मिनिटांची छोटी सुट्टी; चार तासांनंतर ४५ मिनिटांची मोठी सुट्टी.

( ४ ) तासांची विषयवार वांटणी पुढीलप्रमाणें :—

मराठी ८; गणित ६; इतिहास ३; भूगोल २ + १ निरीक्षण; शास्त्र २ + १ निरीक्षण; नागरिक शास्त्र २ + १ प्रात्यक्षिक; हिंदी ३; चित्रकला २; हस्तव्यवसाय ३; सामान्यज्ञान २; वक्तृत्व, पाठान्तर, सहली ( आलटून पालटून ) २; बागकाम १; एकूण तास ३९.

( ५ ) शाळा मुलींची असल्यास हस्तव्यवसायाचे ३ तास आणि बाग-काम १ तास यांऐवजीं शिवण २ तास आणि संगीत २ तास ठेवतां येतील.

## वेळापत्रकांचे इतर प्रकार

वर्गाचें वेळापत्रक हें मुख्य वेळापत्रक होय. त्याशिवाय सर्व शिक्षकांचें काम एकत्र दाखविणारें वेळापत्रक, प्रत्येक दिवशीं प्रत्येक तासाला कोणते शिक्षक मोकळे आहेत हें दाखविणारें वेळापत्रक, भूगोल-शास्त्र-चित्रकला इत्यादि विषयांच्या खास वर्गांचें ( म्हणजे विशिष्ट तासाला कोणत्या खोलींत कोणता वर्ग आहे हें दाखविणारें ) वेळापत्रक, खेळांचें वेळापत्रक, गृहपाठांचें वेळापत्रक,—इत्यादि उपयुक्त आहेत. त्यायोगें शाळेंत चालणाऱ्या विविध कार्यक्रमांची कल्पना एकसमयावच्छेदेंकरून येऊन एकंदर कामाला योग्य ती शिस्त लागते.

## एक महत्त्वाची सूचना

वेळापत्रकांविषयीं एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट मुख्याध्यापकांनीं नेहमींच ध्यानांत ठेवावयाची असते; ती ही कीं, हीं सर्व वेळापत्रकें (विशेषतः वर्गांचीं वेळापत्रकें ) शाळा सुरू होण्यापूर्वीच तयार असावीं; व एकदां वर्षारंभीं जीं वेळापत्रकें तयार करण्यांत आलीं असतील त्यांत शक्य तों वर्षभर बदल होऊं नये. या गोष्टींकडे दुर्लक्ष झालें तर वर्षारंभींच कामांत शिथिलता निर्माण

होते, व तिचा विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्याहि मनावर मोठा नैतिक परिणाम होतो. कामाविषयींची गंभीरताचं नाहींशी होते. तेव्हां 'ज्या कामाचा आरंभ चांगला झाला आहे तें काम अर्धें यशस्वी झालेंच आहे असें समजावें' या अर्थाची इंग्रजी म्हण लक्षांत घेऊन मुख्याध्यापकांनीं शाळेंतील वेळापत्रकें वेळेवर तयार ठेवावीं, शिक्षकांना तीं आधींच दाखवून ठेवून त्यांना त्यांच्या कामाची कल्पना देऊन ठेवावी; आणि अशा तऱ्हेनें वर्षाच्या कार्याला सुव्यवस्थित प्रारंभ करण्याची तयारी करून ठेवावी, व ही एकदां व्यवस्थित बसलेली घडी बिघडूं देऊं नये म्हणून वेळापत्रकांत वरचेवर बदल करण्याचें टाळावें.

• • •

: ९ :

# गृहपाठ

## आवश्यकता

शाळेंतील अभ्यासाला पूरक असा अभ्यास विद्यार्थ्यांनीं घरीं करावा ही अपेक्षा शिक्षकांची आणि शाळाचालकांची असते, व ती योग्यच आहे. या गृहपाठांची आवश्यकता पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल :—

अननुभवी शिक्षकांची एक नेहमींची तक्रार असते कीं, वर्षांतून पुरा करावयाचा अभ्यासक्रम फार मोठा असतो; व नवीन पद्धतीनें ( म्हणजे शिक्षकानें स्वतः फारसें न शिकवितां प्रश्नोत्तरें, चित्रें, चर्चा इत्यादींच्या साहाय्यानें मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांस स्वतः शिकण्यास मदत करणें या पद्धतीनें ) शिकविल्यास तो अभ्यासक्रम ठराविक मुदतींत पुरा होऊं शकत नाहीं.

या बाबतींत या नवशिक्या शिक्षकांची थोडी गैरसमजूत झालेली असते. नव्या पद्धतीनें शिकवावयाचें म्हणजे अभ्यासक्रमांतील प्रत्येक भाग आणि पोटाविभाग वर्गांतच प्रश्नोत्तरांच्या साहाय्यानें शिकविला पाहिजे असें नव्हे. वर्गांत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना कांहीं भाग घरींच अभ्यासावयास दिला म्हणजे अभ्यासक्रम पुरा होण्यास अडचण पडणार नाहीं. वाचन-पुस्तकांतील एका लघुनिबंधाचा वर्गांत पूर्ण अभ्यास झाला म्हणजे लघुनिबंधाचा अभ्यास कसा करावयाचा तें विद्यार्थ्यांना समजतें. मग त्याच पुस्तकांतील इतर लघुनिबंधांचा अभ्यास त्यांनीं घरीं करावयास काय हरकत आहे ? प्रत्येक धड्याचा अभ्यास अथपासून इतिपर्यंत वर्गांतच होण्याची गरज नाहीं. हीच पद्धत इतिहास, भूगोल इत्यादि अभ्यासक्रमांतील इतर विषयांनाहि लागू पडेल. उदाहरणार्थ, देशाच्या नैसर्गिक सीमांचा देशाच्या जीवनावर कसा परिणाम होतो तें भारताच्या सीमांच्या अभ्यासाच्या वेळीं वर्गांत संपूर्ण अभ्यासिलें म्हणजे फ्रान्स, स्वित्झर्लंड, अफगाणिस्तान वगैरे

दा. क्र. ९७७ १०१

कोणत्याहि इतर देशांच्या अभ्यासाच्या बाबतींत त्या मुद्द्यांची संपूर्ण चर्चा पुनः वर्गांत व्हावयास नको. या बाबतींत शिक्षकांनीं द्यावयाची मुख्य काळजी ही कीं, केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणें विद्यार्थी हा अभ्यास घरीं करतात कीं नाहीं हें पुढील तासाला पाहणें; आणि ज्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन अपुरें पडल्यामुळें नवीन भाग घरीं अभ्यासूनहि समजला नाहीं त्यांना अधिक मार्गदर्शन करणें. अशा तऱ्हेनें गृहपाठ दिले गेले तर अभ्यासक्रमांतील बराचसा भाग वर्गांत पुनः संपूर्णरीत्या शिकवण्याची गरजच भासणार नाहीं.

केवळ अभ्यासक्रम वेळींच संपण्याकरितां म्हणून गृहपाठ हवेत असें नाहीं; गृहपाठांना शिक्षणदृष्ट्या इतरहि महत्त्व आहे. वर्गांत शिक्षकांनीं शिकविलेला भाग दीर्घ काल स्मरणांत राहावा याकरितां विद्यार्थ्यांना घरीं गेल्यानंतर त्याची आवृत्ति करणें अवश्य असतें. शिवाय वर्गांत शिक्षकांनीं व्यक्तिशः न समजावून दिल्यामुळें न समजलेला अथवा अर्धवट समजलेला भाग घरीं स्वयंप्रयत्नानें समजूं शकतो.

प्रौढ विद्यार्थ्यांच्या बाबतींत तर गृहपाठ विशेषच उपयुक्त ठरतात. कारण त्यायोगें मनाची एकाग्रता साधण्यास आणि आत्मविश्वास वाढण्यास त्यांना साहाय्य होतें, व कोणतेंहि काम चिकाटीनें करण्याचें त्यांना आपोआप वळण लागतें. शिक्षणशास्त्रांतील एक महत्त्वाचें प्रमेय असें आहे कीं, मार्गदर्शनाकरितां विद्यार्थी शिक्षकांवर अवलंबून राहण्याचें जितक्या लौकर टळेल, व स्वतःच्या शिक्षणाच्या बाबतींत तो जितक्या लौकर स्वावलंबी होईल तितकें उत्तम. त्या दृष्टीनें वर्गांत होणाऱ्या अभ्यासाची त्यानें आगाऊच घरीं तयारी करणें उपयुक्त ठरतें.

## गृहपाठाचीं कांहीं मूलतत्त्वें

गृहपाठांनीं खरोखरीच शैक्षणिक कार्य साधावयाचें असेल तर ते विशिष्ट तत्त्वांनुसार द्यावयास पाहिजेत. तीं तत्त्वें पुढीलप्रमाणें होत :—

( १ ) अल्पवयीन मुलांना गृहपाठ मुळींच देऊं नयेत. इंग्लंडमध्यें अशी प्रथा आहे कीं, बारा वर्षांखालील विद्यार्थ्यांना घरीं करावयास अभ्यास मुळींच द्यावयाचा नाहीं. ही प्रथा योग्यच आहे. कारण या वयांच्या मुलांना अवश्य तेवढा अभ्यास वर्गांत सहज करून घेतां येतो. वर्गांतील अभ्यासा-

नंतर त्यांना घरीं कसली जरुरी असेल तर भरपूर विश्रांति, झोप, खेळ आणि खाणें यांची. शिवाय घरीं शिक्षक प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यास जवळ नसतांना स्वतंत्र रीतीनें अभ्यास करण्याची पात्रता या लहान मुलांना आलेली नसते आणि अशा मार्गदर्शनाच्या अभावीं तीं चुकीच्या मार्गानें जाण्याचा संभव असतो. फार तर पुस्तकांतील चित्रें पहा, कांहीं चित्रें जमवा, कांहीं वस्तूंचे नमुने गोळा करा, एखाद्या प्राणिसंग्रहालयांत जाऊन तेथील प्राण्यांच्या गंमती पहा—अशा तऱ्हेचे आकर्षक, जणुं खेळच असे गृहपाठ वर्गांत शिकवून झालेल्या विषयांच्या अनुरोधानें देण्यास हरकत नाहीं. त्यामुळें रिकामपणच्या वेळेचा सदुपयोग करण्याचें शिक्षणहि त्यांना आपोआप मिळतें.

( २ ) गृहपाठ द्यावयाचे ते असंदिग्ध भाषेंत स्पष्ट असे द्यावेत. नक्की काय करावयाचें आहे हें कळणें अवश्य असतें. नाहीं तर नसते गैरसमज होतात. एका विद्यार्थ्याला वाटतें कविता पाठ करावयास सांगितली, दुसऱ्यास वाटतें कविता नुसती वाचून येण्यास सांगितली, आणि मग वर्गांत उगीच घोळ पडून वेळ फुकट जातो. असें होऊं नये म्हणून इयत्ता सातवीपर्यंत गृहपाठ फळ्यावर लिहून द्यावे, व विद्यार्थ्यांना ते उतरवून घेण्यास सांगावें.

( ३ ) गृहपाठ फार कठीण असूं नयेत, तसेच फार सोपेहि असूं नयेत. फार कठीण गृहपाठ विद्यार्थ्यांना करतां न आल्यास कामाविषयीं त्यांना कंटाळा, तिटकारा येऊं लागतो. शिवाय आपल्याला हें येत नाहीं त्या अर्थी आपण कमी दर्जाचेच आहोंत असा न्यूनगंडाहि त्यांचेमध्यें निर्माण होण्याचा संभव असतो. फार सोप्या गृहपाठांनीं कोणतेंच शिक्षणकार्य होत नाहीं.

( ४ ) गृहपाठ योग्य त्या प्रमाणांत द्यावे. घरीं तासन् तास अभ्यास केला तरी संपत नाहीं अशा गृहपाठांनीं अभ्यासाविषयीं एक तऱ्हेचा तिटकारा विद्यार्थ्यांच्या मनांत उत्पन्न होण्याचा संभव असतो. याउलट पांचदहा मिनिटांत उरकून टाकतां येईल इतका कमी अभ्यासहि गृहपाठ म्हणून देऊं नये. गृहपाठ कधीं कमी, कधीं जास्त, असें होऊं नये म्हणून प्रत्येक वर्गाचें गृहपाठाचें वेळापत्रकच तयार करणें बरें.

( ५ ) गृहपाठांत विविधता असावी. गृहपाठ म्हणजे केवळ लेखी अभ्यास अशी कल्पना आहे ती चुकीची आहे. पुढील पाठाची तयारी, शिकून मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग, पाठान्तर, आवृत्ति आणि शिकलेल्या विषयांसंबंधीं

अवान्तर ज्ञानप्राप्ति—असे गृहपाठांचे मुख्य प्रकार मानले तरी त्यांत विविधता हवीच. दुसऱ्या दिवसाच्या पाठांतील कठीण शब्दांचे अर्थ कोशांतून काढून आणणें, वर्गांत शिकविण्यांत आलेले शब्द पाठ करणें, काव्याचें आणि सुंदर गद्य उताऱ्यांचें पाठान्तर, झालेल्या धड्याचें मुखवाचन, होणाऱ्या धड्याचें मनोगत वाचन व त्यांतील मुख्य कल्पनांचें आकलन, इतिहास–भूगोलाच्या पाठांकरितां नकाशांचे आराखडे काढून आणणें, किंवा वर्गांत शिकून झालेला भाग नकाशांत भरून आणणें, निसर्गाच्या अभ्यासाकरितां निरीक्षण करणें, अभ्यासाशीं संलग्न अशा स्थळांना भेटी देऊन माहिती गोळा करणें, ऐतिहासिक, भौगोलिक किंवा निसर्गशास्त्रविषयक वस्तु संग्रहित करणें, चित्रें काढणें, वर्गांत झालेलीं किंवा होणारीं गाणितांतील उदाहरणें सोडवून आणणें, शुद्धलेखन लिहून आणणें, कित्ता गिरवून आणणें, वर्गांत शिकवून झालेला भाग घरीं पुन्हां वाचून त्याची उजळणी करणें, सुप्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखती घेऊन त्यांच्याकडून माहिती मिळाविणें, संदर्भ-ग्रंथांचा उपयोग करून त्यांतून माहिती मिळाविणें, वर्तमानपत्रें, मासिकें इ. चाळून त्यांतील उपयुक्त माहितीचीं कात्रणें तयार करणें, शास्त्राच्या तासांना शिक्षकांनीं सुचविलेले प्रयोग स्वतः घरीं करून पाहणें, हस्तव्यवसायाच्या तासांत शिकलेल्या गोष्टी घरीं करणें, अभ्यासाव्यतिरिक्त वादविवाद, मासिकें, सहली इत्यादि अवान्तर कार्यक्रम शाळेंत चालतात त्या कार्यक्रमांची पूर्वतयारी घरीं करणें,—अशी किती तरी विविधता गृहपाठांत आणतां येईल व आणावी.

( ६ ) गृहपाठ दिल्यानंतर त्याप्रमाणें विद्यार्थ्यांनीं ते तयार केले आहेत कीं नाहींत हें शिक्षकांनीं दररोज पाहिलें पाहिजे. लेखी गृहपाठ स्वतः तपासणें किंवा वर्गांतील विद्यार्थ्यांच्या साहाय्यानें ते तपासणें अवश्य आहे. पाठान्तर झालें कीं नाहीं, मुखवाचन कितपत समाधानकारक झालें आहे, सांगितलेले नकाशे काढले कीं नाहीं या सर्व गोष्टींकडे शिक्षकांचें अवधान हवें; हें केलें नाहीं तर गृहपाठ ही दिखाऊ गोष्ट होईल, व हळूहळू विद्यार्थी गृहपाठ तयार करून आणण्याची टाळाटाळ करूं लागतील. तशा गृहपाठांपासून शिक्षणविषयक कोणताहि फायदा होणार नाहीं.

गृहपाठांसंबंधीं एक महत्त्वाचा मुद्दा असा कीं वर्गांतील सर्व विद्यार्थ्यांना एकाच तऱ्हेचे गृहपाठ द्यावे कीं विद्यार्थ्यांची अभ्यासांतील तयारी व त्याची

बौद्धिक कुवत पाहून प्रत्येक विद्यार्थ्याला निरनिराळे गृहपाठ द्यावे ? सामान्य दर्जाच्या विद्यार्थ्याकडून गणितांतील चार उदाहरणें सोडवून आणण्याची अपेक्षा ठेवली तर अतिशय हुशार विद्यार्थ्यानेंहि तेवढाच अभ्यास घरीं केला तर चालेल कीं आपल्या मगदुराप्रमाणें अधिक अभ्यास त्याच्याकडून अपेक्षावा ?

तात्त्विक दृष्ट्या प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणें गृहपाठ देणें, विशेषतः बुद्धिमान् विद्यार्थ्याच्या बुद्धिसामर्थ्याला एक तऱ्हेचें आव्हान मिळेल, व स्वतःचें वैशिष्ट्य, कौशल्य दाखविण्यास त्यास अवसर मिळेल असे गृहपाठ देणें ही आदर्श परिस्थिति. पण वर्गपद्धतीनें शिकवावयाचें,–तीस चाळीस विद्यार्थ्यांना एका शिक्षकानें एकत्र एका वेळीं शिकवावयाचें, या पद्धतीमुळें– गृहपाठ सर्वांना एकाच प्रकारचे देणें अवश्य होतें.

## पालकांचें सहकार्य

गृहपाठाच्या बाबतींत पालकांचें सहकार्य अवश्य मिळविलें पाहिजे. नाहीं तर विद्यार्थ्यांची इच्छा असूनाहि त्यांना ते पुरे करतां येणार नाहींत. गृहपाठाकरितां सोयीस्कर जागा लागते. शांतता किंवा एकान्त यांची गरज असते; तसेंच पुस्तकें, वह्या, शाई, पेन्सिल इत्यादि सामुग्रीहि लागते. ती पालकांनीं पुरविली पाहिजे. मुलांमुलींनीं आईवडिलांना घरकामांत साहाय्य केलें पाहिजे हें खरें; पण हें घरकाम अभ्यासाच्या आड येऊं न देण्याची खबरदारी आईवडिलांनीं घेतली पाहिजे. त्याकरितां गृहपाठाच्या वेळापत्रकाची प्रत पालकांना शाळेनें आगाऊच पाठवून द्यावी, व आपल्या मुलांना दररोज किती वेळ घरीं अभ्यास करावा लागेल याची त्यांना पूर्ण कल्पना वेळींच देऊन ठेवावी. घरचें काम आणि शाळेचा अभ्यास यांत संघर्ष निर्माण होऊं लागला तर शिक्षक आणि पालक यांनीं एकत्र येऊन मोकळ्या मनानें चर्चा करावी, व त्यांतून मार्ग काढावा. हें फारसें कठीण नाहीं. कारण मुलाचें कल्याण व्हावें हींच शिक्षक आणि पालक या दोघांची इच्छा असते.

● ● ●

: १० :

# परीक्षा

## परीक्षांची आवश्यकता

शिक्षणाच्या एकंदर योजनेमध्यें परीक्षांना एक विशिष्ट स्थान आहे. विद्यार्थ्यांची अभ्यासांतील प्रगति समाधानकारक आहे किंवा नाहीं, आणि त्यांना शिकविण्याकरितां आपण योजली असलेली पद्धति कितपत यशस्वी झाली आहे, हें ठरविण्याकरितां शिक्षकांना आणि मुख्याध्यापकांना परीक्षा हें एक उत्तम साधन आहे. परीक्षा म्हटली म्हणजे विद्यार्थ्यांमध्यें चढाओढ आलीच. त्यामुळें परिश्रमानें अभ्यास करून आपल्या अंगचे गुण प्रकट करावेत असें प्रोत्साहन त्यांना परीक्षांमुळें साहजिकच मिळतें. पालकांनाहि परीक्षा उपयुक्त वाटतात. कारण त्यामुळें आपल्या पाल्याची प्रगति त्यांस कळूं शकते व फी म्हणून आपण देत असलेल्या पैशाचा मोबदला योग्य तऱ्हेनें आपल्या पाल्याच्या पदरांत पडत आहे कीं नाहीं हें त्यांस समजतें. शिक्षणखातेंहि शाळांच्या परीक्षांचे निकाल पाहून त्यांचें शिक्षणाचें काम चालावें तसें चाललें आहे कीं नाहीं तें जाणूं शकतें.

## परीक्षा–प्रकार

परीक्षांचे प्रकार अनेक आहेत. प्रश्न देऊन त्यांचीं उत्तरें ठराविक वेळांत लिहावयास सांगणें ही लेखी परीक्षा; तोंडी प्रश्न विचारून चांचणी घेणें ही तोंडी परीक्षा; शास्त्र, चित्रकला, हस्तव्यवसाय, अशा विषयांमध्यें कांहीं प्रत्यक्ष प्रयोग करावयास सांगणें, वस्तु तयार करावयास सांगणें, व त्यावरून त्या त्या विषयांतील विद्यार्थ्यांच्या प्रगतीची कल्पना करून घेणें हा परीक्षेचा तिसरा प्रात्यक्षिक किंवा प्रायोगिक प्रकार होय. लेखी, तोंडी किंवा प्रात्यक्षिक परीक्षा शाळेंतल्या शाळेंत शिक्षक घेऊं शकतात, किंवा शालान्त परीक्षेसारख्या सार्वजनिक परीक्षेच्या वेळीं बाहेरचे परीक्षक नेमून ही परीक्षा घेतां येते: पहिल्या प्रकारच्या परीक्षेस शालान्तर्गत परीक्षा म्हणतां येईल तर दुसरा प्रकार

बाह्यपरीक्षा होय. महत्त्वाची शालान्तर्गत परीक्षा म्हणजे वर्षाच्या शेवटीं येणारी वार्षिक परीक्षा होय. या परीक्षांच्या निकालावरून विद्यार्थ्यांची वर्षां-तील प्रगति कळते, व त्यांना वरच्या वर्गांत घालावयाचें कीं नाहीं तें ठरवितां येतें. याशिवाय अनेक शाळांतून सहामाही परीक्षा, तिमाही परीक्षा, मासिक परीक्षा किंवा साप्ताहिक परीक्षाहि घेतल्या जातात.

या सर्व परीक्षांतून गुणपद्धति अवलंबण्यांत येते. प्रत्येक विषयाच्या संबंध प्रश्नपत्रिकेला वेळेनुसार ५० किंवा १०० गुण असतात. विद्यार्थ्यांनीं लिहि-लेल्या ( किंवा तोंडीं सांगितलेल्या ) उत्तरांना शेंकडा ३५ गुण मिळाले कीं सामान्यतः तो त्या विषयांत उत्तीर्ण समजला जातो. शेंकडा ३५ पेक्षां कमी गुण मिळविणारा विद्यार्थी त्या विषयांत अनुत्तीर्ण होतो. जास्तींत जास्त गुण मिळाविणारा विद्यार्थी उत्तम समजला जातो.

## या परीक्षापद्धतींतील दोष

परीक्षांचे जे प्रकार आपण पाहिले त्यांत लेखी परीक्षा हा सर्वांत महत्त्वाचा प्रकार समजला जातो. त्या पद्धतींत बरेच दोष आहेत असे आक्षेप घेतले जातात. ते आक्षेप असेः—

### १. अपूर्णता

आधुनिक कल्पनेप्रमाणें विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगति होण्यास मदत करणें हें शिक्षणाचें ध्येय आहे. पण लेखी परीक्षांच्या साहाय्यानें त्याच्या बौद्धिक प्रगतीचीच माहिती मिळूं शकते. शीलसंवर्धनाच्या बाबतींत त्याची प्रगति किती, शारीरिक विकास किती झाला, सौंदर्य-समीक्षणाचें त्याचें सामर्थ्य किती वाढलें, देशाचा भावी नागरिक या दृष्टीनें इतरांशीं सहकार्यानें, सहानु-भूतीनें वागण्याची त्याची क्षमता किती वाढली आहे, इत्यादि बाबतींतील माहिती लेखी परीक्षांनीं फारशी मिळत नाहीं. तेव्हां सामान्य परीक्षांच्या साहाय्यानें विद्यार्थ्यांच्या प्रगतीची येणारी कल्पना अपूर्ण असते.

### २. आत्मनिष्ठता व विषमता

शिवाय लेखी परीक्षेचे वेळीं (आणि कांहीं अंशीं तोंडी परीक्षेच्या वेळींहि) बऱ्याच गोष्टी परीक्षकावर अवलंबून असतात. कांहीं परीक्षक उत्तरें कडक रीतीनें तपासणारे असतात, तर कांहीं गुणांची खैरात सढळ हातानें करतात.

कांहीं उत्तर-पत्रिका काळजीपूर्वक तपासतात, तर कांहीं त्या घाईघाईत कशा तरी तपासून टाकतात व सुटकेचा निःश्वास सोडतात. उत्तर-पत्रिकेंतील एखादा मुद्दा एखाद्या परीक्षकाला फार आवडेल, व तो त्यास भरपूर गुण देईल; तर दुसऱ्या परीक्षकाला त्या मुद्द्याचें महत्त्व फारसें वाटणार नाहीं. एखाद्याला हस्ताक्षर, टापटीप आवडेल तर दुसऱ्याला उत्तरांतील विचार व त्यांची मांडणी यांना महत्त्व द्यावें असें वाटेल. निबंधासारख्या प्रश्नांत तर हें वृत्ति-वैचित्र्य विशेषच दिसून येतें. एकाच विद्यार्थ्यानें लिहिलेला निबंध दहा परीक्षकांनीं तपासला तर एखाद्याला तो विशेष आवडून तो त्यास भरपूर गुण देईल, तर दुसऱ्यास त्या निबंधाला पांचदहा गुण द्यावे असेंहि वाटणार नाहीं. कोणत्याहि दोन परीक्षकांचे गुण सारखेच पडलेले आढळणार नाहींत. अशा तऱ्हेनें परीक्षा पुष्कळ अंशीं व्यक्तिसापेक्ष असतात; त्यामुळें विद्यार्थ्याच्या प्रगतीचें यथायोग्य मूल्यमापन या परीक्षांनीं होतेंच असें नाहीं.

### ३. अनिश्चितता व दैवाधीनता

प्रचलित परीक्षापद्धतीमध्यें एक तऱ्हेनें नशिबाचा भागाहि असतो असें म्हणावयास हरकत नाहीं. वर्षभर चांगला नियमित अभ्यास करावा आणि वार्षिक परीक्षेच्या वेळीं आजारी पडल्यामुळें परीक्षेला बसतां येऊं नये, व तें वर्ष फुकट जावें असें केव्हां केव्हां होतें. अभ्यासक्रमांतील बहुतेक भागाचा चांगला अभ्यास करावा, पण कांहीं अडचणीमुळें थोडा भाग अभ्यासलेला नसावा; आणि परीक्षेच्या वेळीं नेमके न अभ्यासलेल्या भागावरच प्रश्न यावे व परीक्षा हुकावी. किंवा याउलट नशीब बलत्तर असेल तर अभ्यास थोडाच झालेला असावा व नेमके त्या भागावरच बहुतेक प्रश्न यावे व परीक्षेंतून सहीसलामत सुटावें, असें केव्हां केव्हां होतें. केव्हां परीक्षेची जागा बदललेली, अपरिचित, असल्यामुळें विद्यार्थी भांबावतो, व ऐन वेळीं त्यास कांहीं आठवतच नाहीं व तयारी उत्तम असूनाहि त्याला वर्ष गमवावें लागतें. कधीं परीक्षेंतील यश विद्यार्थ्याच्या लिहिण्याच्या वेगावरहि अवलंबून राहतें. तयारी चांगली, प्रश्न सोपे, पण सबंध उत्तरपत्रिका वेळेच्या अभावीं सोडवून होत नाहीं म्हणून गुण कमी असा प्रकार होतो. शालान्त परीक्षेसारखी महत्त्वाची सार्वजनिक परीक्षा असते त्या वेळीं विद्यार्थ्यास सबंध परीक्षेंत उत्तीर्ण होण्याकरितां त्यानें निवडलेल्या परीक्षेच्या सर्व विषयांत

सामान्यतः एकाच वेळीं उत्तीर्ण व्हावें लागतें. कांहीं विद्यार्थ्यांच्या बाबतींत ही अडचण फारच मोठी असते. त्यामुळें अनेक वर्षें परीक्षेला बसून आलटून पालटून कांहीं विषयांत उत्तीर्ण तर इतर विषयांत अनुत्तीर्ण झाल्यामुळें सबंध आयुष्यांत संपूर्ण परीक्षा उत्तीर्ण होऊं शकले नाहींत असे अनेक विद्यार्थी आढळतात.

### ४. ज्ञानलालसेला तिलांजलि

परीक्षांना अवास्तव महत्त्व दिल्यामुळें एकंदर अध्ययनाकडे परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीनेंच पाहिलें जातें व साहजिकच पोपटपंचीला–अर्थहीन पाठान्तराला महत्त्व येतें. ज्ञान मिळविण्याकरितां शिकावयाचें ही कल्पनाच त्यामुळें विद्यार्थ्यांना महत्त्वाची वाटत नाहीं; व प्रश्नांचा अंदाज बांधावयाचा, तेवढीच तयारी करावयाची ही वृत्ति बळावत जाते. विद्यार्थ्यांच्या सृजनशक्तीला वाव मिळावा, त्यांचें स्वतंत्र विचार करण्याचें सामर्थ्य वाढावें, याला ही वृत्ति मारक होते.

### ५. अभ्यासक्रमाला व शिक्षणपद्धतीला सासुरवास

प्रचलित परीक्षा-पद्धतीचा अभ्यासक्रमावर आणि शिक्षणपद्धतीवरहि अनिष्ट परिणाम झालेला दिसतो. परीक्षा घेतां येईल असे विषयच अभ्यासक्रमांत समाविष्ट करतां येतात. एखादा विषय महत्त्वाचा असला व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनें तो अभ्यासक्रमांत येणें अवश्य असलें तरी तो शिकवावा कसा, त्याची परीक्षा कशी घेतां येईल ही अडचण वाटून तो डावलला जातो, किंवा अभ्यासक्रमांत समाविष्ट होऊनहि अयोग्य पद्धतीनें शिकविला जातो. उदाहरणार्थ, नागरिकशास्त्र हा विषय खरोखरी पुस्तकांच्या साह्यानें शिकवावयाचा नसून त्याचें शिक्षण प्रत्यक्ष आचरणानेंच द्यावयास हवें. आणि विद्यार्थ्याला हें शास्त्र कळलें आहे, तो उत्तम नागरिक होण्याच्या मार्गावर आहे हें त्याच्या वर्तनांत दिसलें पाहिजे. पण मग त्या विषयाची परीक्षा – आणि तीहि लेखी परीक्षा – कशी घेतां येणार ? तेव्हां तो विषय पुस्तकाच्या साह्यानेंच शिकवावयाचा, त्या विषयावर कोणताहि प्रश्न विचारला तरी त्याचें सुसंबद्ध लेखी उत्तर कसें द्यावें हें विद्यार्थ्यास शिकवावयाचें हीच शिक्षणपद्धति शिक्षकांना अवलंबावी लागते. त्यामुळें त्या विषयाचें खरें शिक्षण मिळत नाहीं. 'नागरिक शास्त्र' या विषयांत पहिल्या क्रमांकाचे

गुण मिळविणारा विद्यार्थी त्या शास्त्रांतील मूलभूत प्रमेयेंहि प्रत्यक्ष आचरणांत पायाखालीं तुडवितांना दिसतो तो याचमुळें.

### ६. वेळेचा आणि पैशाचा अपव्यय

प्रचलित परीक्षापद्धतीमुळें वेळेचा आणि द्रव्याचा किती अपव्यय होतो तें पहावयाचें असल्यास सध्यांची माध्यमिक शिक्षणांतील शालान्त-परीक्षा पहावी. परीक्षा मार्च महिन्यांत असली तरी तिचे वेध आदल्या वर्षाच्या डिसेंबरपासून लागतात. पूर्वपरीक्षा, नंतर त्या परीक्षेचा निकाल त्या निकालाप्रमाणें विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षेकरितां निवड, नंतर त्यांचे अर्ज भरून घेणें, फी गोळा करणें, इत्यादि कार्यक्रम एक महिना चालतो. तो आटोपतांच विद्यार्थ्यांचें शालेय अध्ययन जवळ जवळ बंदच होतें. मार्चमध्यें परीक्षा असली तरी परीक्षक निवडणें, प्रश्नपत्रिका काढवून घेणें, त्या छापण्याची व्यवस्था करणें, विद्यार्थ्यांची परीक्षेकरितां बसण्याची व्यवस्था करणें; त्यांच्या उत्तरपत्रिका परीक्षकांकडे पाठविण्याची व्यवस्था करणें, त्या तपासून आल्या म्हणजे निकालपत्रक तयार करणें, तें छापून प्रसिद्ध करणें, त्या पत्रकांत चुका असतील तर त्या दुरुस्त करणें इत्यादि कामांना वर्षांतील जवळ जवळ सहासात महिने लागतात. म्हणजे परीक्षामंडळाला हें परीक्षेचें कार्य ( वर्षांतून दोनदां ही परीक्षा असल्यामुळें ) वर्षभर सारखें पुरतें. शालेय परीक्षांतहि या कामांत असाच वेळ जातो. त्यांतून साप्ताहिक परीक्षा, मासिक परीक्षा, तिमाही परीक्षा इत्यादि अनेक परीक्षा असल्या म्हणजे अध्यापनापेक्षां तेंच काम अधिक महत्त्वाचें, अधिक वेळ घेणारें होऊन बसतें. आणि या सर्व परीक्षा -यंत्रणाला पैसा किती लागतो याचा तर अंदाज करणेंच कठीण जाईल.

### परीक्षा-पद्धतींत सुधारणा

हें सर्व खरें असलें तरी शिक्षणयोजनेंतून परीक्षापद्धतीची आजिबात हकालपट्टी करतां येईल असा काळ अद्यापि या देशांत किंवा इतरत्रहि आला नाहीं. शिक्षणशास्त्रज्ञांचें म्हणणें असें कीं परीक्षापद्धतींत दोष आहेत—विशेषतः लेखी परीक्षांतून निवडक प्रश्न देऊन त्यांचीं निबंधवजा सविस्तर उत्तरें लिहिण्यास सांगण्याच्या पद्धतींत—दोष आहेत हें खरें. पण विद्यार्थ्यांच्या प्रगतीचें मूल्यमापन करण्याचें अधिक प्रभावी व परिपूर्ण साधन जोंपर्यंत उपलब्ध नाहीं, तोंपर्यंत या

परीक्षा-पद्धतीचाच आपण उपयोग करून घेतला पाहिजे. त्याकरितां या पद्धतींत कांहीं सुधारणा सुचविल्या जातात त्या अशा—

( १ ) बहुसंख्य विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घ्यावयाची असेल त्या वेळीं परीक्षकांनीं एकत्र विचारविनिमय करून अपेक्षित आदर्श उत्तरें लिहून काढावीं, किंवा त्यांच्यांतील विशेष अनुभवी परीक्षकानें तीं लिहून द्यावीं, व त्या उत्तरांनुसार विद्यार्थ्यांच्या उत्तरांना कसे गुण द्यावयाचे याची योजना आंखावी. सर्व परीक्षक त्या योजनेप्रमाणें गुण देतात किंवा नाहीं तें पर्यवेक्षकानें कांहीं उत्तरपत्रिका चाळून पाहून तपासावें. ज्यांच्या उत्तरपत्रिका या योजनेनुसार तपासल्या जात नसतील त्यांना तसें सुचवावें. §

( २ ) लेखी परीक्षेंत विचारावयाचे प्रश्न निबंधवजा न ठेवतां ज्यांचीं उत्तरें व्यक्तिनिरपेक्ष व वस्तुनिष्ठ असतील असे काढावे. म्हणजे त्यांचीं उत्तरें कोणत्याहि व्यक्तीनें तपासलीं तरी गुण सारखेच पडतील, व उत्तरपत्रिका तपासण्याचें काम यांत्रिक स्वरूपाचें राहून परीक्षकांचा वेळ बराच वांचेल.

या व्यक्तिनिरपेक्ष प्रश्नांचे कांहीं नमुने पुढें दिले आहेत.—

**भूगोल**

पुढील विधानांपैकीं कांहीं बरोबर आहेत, कांहीं चूक आहेत. जीं बरोबर असतील त्यांपुढें √ अशी खूण करा; चुकीचीं असतील त्यांपुढें × अशी फुली करा.

( अ ) नागपूर कलकत्त्याच्या पूर्वेस आहे.
( आ ) खानदेशांत कापूस पिकतो.
( इ ) मुंबईची लोकसंख्या १० लक्ष आहे.
( ई ) शोण नदी गंगेला मिळते.

**इतिहास**

पुढील वाक्यांतील रिकाम्या जागीं कंसांत सुचविलेल्या शब्दांपैकीं योग्य शब्द घालून वाक्यें पूर्ण करा.

---

§ मुंबई राज्यांतील शालान्त परीक्षेच्या बाबतींत अशी पद्धत अवलंबिली जाते. पर्यवेक्षकांना 'मॉडरेटर' म्हणतात. प्रश्नपत्रिका काढणारें मंडळ परीक्षकांना व पर्यवेक्षकांना अपेक्षित उत्तरांची कल्पना लेखी व तोंडी देतें.

( अ ) प्लासीची लढाई इ. स. ..... मध्यें झाली ( १७६१ : १८५७ : १९०१ : १७५७ : )

( आ ) नेपोलियनचा पराभव ..... या ठिकाणीं झाला. ( पानिपत; बार्लिन; वाटर्लू; रोम.)

( इ ) ..... हा राघोबाचा मुलगा असल्यामुळें नाना फडणवीसास तो दृष्टीसमोर नको असें वाटे. ( प्रतापराव, बाजीराव, हंबीरराव, सवाई माधवराव ).

( ई ) मोडकळीस आलेल्या ..... राज्याला रणजितसिंहानें सांवरून धरलें. ( पंजाबच्या, बंगालच्या, उदेपूरच्या, कनोजच्या ).

## शास्त्र

पुढील गोष्टींचें कंसांत दिलेल्या विधानांतून योग्य कारण निवडा.

( अ ) पेटलेल्या पणतीवर कांचेचा पेला उपडा ठेवला म्हणजे तिची ज्योत विझते. कारण ..... ( कांच पारदर्शक असते; ज्योतीला जळण्यास पुरेसा प्राणवायु मिळत नाहीं; पणतींत तेल असतें. )

( आ ) झाडावरून तुटलेलें फळ वर न जातां खालीं पडतें; कारण..... ( फळ पिकलेलें असतें; फळ गोड असतें; पृथ्वी त्यास आपल्याकडे आकर्षून घेते; फळ वाटोळें असतें. )

## व्याकरण

योग्य जोड्या लावा.—

| | |
|---|---|
| नामें | विशेषणें |
| बुद्धि | विद्वत्तापूर्ण |
| फळ | निवडक |
| पाणी | काळी |
| माणूस | गोड |
| पागोटें | तीक्ष्ण |
| माती | रिकामटेकडा |
| सैनिक | भलेंमोठें |
| भाषण | थंड |

या तऱ्हेच्या परीक्षापद्धतींत प्रारंभीं उल्लेखिलेले फायदे असले तरी त्यांत कांहीं दोषहि आहेत. असे प्रश्न काढण्यास परीक्षकांना वेळ जास्त लागतो; प्रश्नपत्रिका छापण्यास खर्च जास्त लागतो; आणि कित्येकदां प्रश्न फार सोपे निघतात. शिवाय विद्यार्थ्यांना बरोबर उत्तरें माहीत नसलीं तरी अंदाजानें दिलेलीं कांहीं उत्तरें बरोबर येण्याचा संभव असतो व त्यामुळें पात्रतेपेक्षां अधिक गुण त्यांस मिळतात. शिवाय अर्जित ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्याला करतां येतो कीं नाहीं तें पाहतां येत नाहीं. तसेंच या नव्या तऱ्हेनें सर्वच विषयांवरील प्रश्न सर्वच इयत्तांकरितां काढतां येतील असेंहि नाहीं.

त्यामुळें असें सुचविलें जातें कीं, कांहीं प्रश्न जुन्या पद्धतीचे ( म्हणजे लांब संपूर्ण उत्तरांची अपेक्षा करणारे ) काढावे आणि कांहीं प्रश्न या नव्या पद्धतीचे काढावे. दोन्ही पद्धतींचा योग्य समन्वय साधल्यास परीक्षापद्धतींतील नेहमींचे कांहीं दोष थोड्या प्रमाणांत टाळतां येतील.

( ३ ) केवळ वार्षिक परीक्षेच्या निकालावर विद्यार्थ्यास वरच्या वर्गांत घालावयाचें कीं नाहीं हें न ठरवितां संबंध वर्षांत घेतलेल्या साप्ताहिक, मासिक, त्रैमासिक, सहामाही वगैरे सर्व परीक्षांतील त्याची प्रगति पाहून त्याच्या वार्षिक प्रगतीचें मूल्यमापन करावें. इतकेंच नव्हे तर त्यानें वर्षभर केलेला वर्गांतील अभ्यास व गृहपाठ, अभ्यासेतर कार्यक्रमांत घेतलेला भाग, त्याचें वर्तन यांचीहि बारकाईनें नोंद वर्षभर करावी, व नोंद समाधानकारक असेल तर केवळ वार्षिक परीक्षेचा विशेष विचार न करतां त्यास वरच्या वर्गांत घालावें. मात्र वार्षिक परीक्षेंत उत्तम गुण पण वर्षभर अभ्यास मुळींच केलेला नाहीं अशा विद्यार्थ्याची वर्षांतील प्रगति समाधानकारक मानूं नये.

( ४ ) वार्षिक परीक्षेच्या प्रश्नपत्रिका काढतांना निबंधवजा सात आठ प्रश्नांचींच उत्तरें पुरींशीं न मानतां सर्व अभ्यासक्रमावर आधारलेले लहान लहान असे अनेक – वेळीं ४०–५० प्रश्न काढावे, व त्यांचीं छोटीं छोटीं उत्तरें अपेक्षावीं; म्हणजे विद्यार्थ्यांनीं सर्व अभ्यास पुरा केला आहे कीं कांहीं भाग गाळलेला आहे हें जाणतां येतें.

( ५ ) लेखी परीक्षांइतकेंच महत्त्व तोंडी परीक्षांना द्यावें. यायोगें जी चांचणी लेखी परीक्षेंत करतां येत नाहीं ती करतां येते.

( ६ ) विद्यार्थ्यांच्या प्रगतीचें मूल्यमापन करावयाचें तें शंभरांपैकीं किती गुण त्यानें मिळविले यावर केलें जातें. पण ही गुण देण्याची पद्धति सदोष आहे. एखाद्या विद्यार्थ्याला शंभरपैकीं चाळीस गुण मिळाले व दुसऱ्यास एकेचाळीस मिळाले, तर त्यांच्या उत्तरांमधील निश्चित कमीजास्तपणा कोणता तें सांगणें कठीण आहे. पहिल्याला चाळीसच गुण कां, एकोणचाळीस कां नाहींत, आणि दुसऱ्यास एकेचाळीस कां, चाळीस कां नाहींत याचें समाधानकारक उत्तर परीक्षकांना देतां यावयाचें नाहीं. म्हणून असे गुण देण्याची पद्धत बंद करून शेरे देण्याची पद्धत अवलंबणें अधिक युक्त. इ. स. १९५३ च्या मुदलियार समिति अहवालांत* अशी स्पष्ट सूचना केली आहे. त्यांनीं अ, ब, क, ड, ई असे पांच प्रकारचे शेरे सुचविले आहेत. अ म्हणजे उत्तम; ब म्हणजे चांगला; क म्हणजे उत्तीर्ण होण्यास जेमतेम पात्र; ड म्हणजे उत्तीर्ण होण्यास पात्र नाहीं; ई म्हणजे अगदींच निकृष्ट दर्जाचा – निश्चित अनुत्तीर्ण असा विद्यार्थी. अशी शेऱ्यांची पद्धत गुणपद्धतीपेक्षां अधिक समंजसपणाची होय.

( ७ ) कोणत्याहि परीक्षेंत विद्यार्थ्यानें एकाच वेळीं सर्व विषयांत उत्तीर्ण झालें पाहिजे अशी अपेक्षा न ठेवतां विषयवारीनें – किंवा विषयांच्या गटानें त्यास उत्तीर्ण होण्याची सवलत असावी.§

लेखी परीक्षांसंबंधीं एक महत्त्वाची सूचना करावीशी वाटते ती ही कीं, शालान्तर्गत परीक्षांच्या उत्तरपत्रिका शिक्षकांनीं शक्य तितक्या लौकर– परीक्षांतील प्रश्नांची विद्यार्थ्यांची स्मृति ताजी आहे तोंपर्यंत तपासाव्या, काळजीपूर्वक तपासाव्या, आणि त्या विद्यार्थ्यांना परत देतांना त्यांतील गुण-दोषांची चर्चा करावी. चुकीचीं उत्तरें चुकीचीं कां तें समजावून सांगावें, आणि उत्तम उत्तरें वर्गांत वाचून दाखवून किंवा वर्गाबाहेरील सूचनाफलका-

---

* दुय्यम शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्याकरितां ही समिति भारत सरकारच्या शिक्षण-खात्यानें नेमली होती. श्री. मुदलियार हे त्या समितीचे अध्यक्ष होते.

§ अशी सवलत कांहीं अंशीं मुंबई राज्यांतील शालान्त परीक्षेच्या बाबतींत दिली जाते, पण ती अपुरी वाटते. कारण त्या सवलतीचा फायदा मिळण्याकरितां विद्यार्थ्यांस कोणत्याहि विषयांत नेहमीं उत्तीर्ण होण्यास लागणारे शेंकडा ३५ गुण मिळवून भागत नाहीं, तर शेंकडा ५० गुण मिळवावे लागतात.

वर तीं लावून ठेवून त्यांतील गुणांचें अनुकरण करण्यास विद्यार्थ्यांस प्रोत्साहन द्यावें. कांहीं प्रश्नांचीं आदर्श उत्तरें शिक्षकानें स्वतः लिहून विद्यार्थ्यांपुढें ठेवावीं. कांहीं विद्यार्थ्यांना प्रश्नांचीं उत्तरें पुनः लिहावयास सांगावींत.

वरील सूचना तात्रडतोब अमलांत आणण्यासारख्या आहेत. तसें केल्यास आपल्याकडील परीक्षापद्धति सुधारतां येईल, व त्यायोगें परीक्षांचें 'बंड' मोडेल, व परीक्षापद्धतीपासून होणारे फायदे निश्चित मिळूं शकतील.

## मुख्याध्यापक आणि परीक्षांची व्यवस्था

शालेय व्यवस्थेच्या दृष्टीनें: परीक्षांच्या बाबतींत मुख्याध्यापकांचीं कांहीं कर्तव्यें असतात. वर्षांतील सर्व परीक्षांचा सविस्तर कार्यक्रम त्यांनीं वर्षारंभींच तयार केलेला असावा. या कार्यक्रमाची पूर्ण कल्पना विद्यार्थी आणि पालक यांना दिलेली असावी. परीक्षांचें महत्त्व काय, वरच्या वर्गांत विद्यार्थ्यांना घालतांना कोणत्या कसोट्या लाविल्या जातील याची कल्पनाहि त्यांना आगाऊच दिलेली असावी. पूर्ण विचार करून एकदां दिलेला निकाल पुन्हां फिरविला जाणार नाहीं हेंहि स्पष्ट केलेलें असावें.

शिक्षकांकडून काढून घेतलेल्या प्रश्नपत्रिकांची चिकित्सा मुख्याध्यापकांनीं स्वतः किंवा शाळेंतील अनुभवी तज्ज्ञ शिक्षकांकरवीं करावी. तसेंच तपासलेल्या उत्तरपत्रिकांची तपासणी पर्यवेक्षकांकडून करवून घ्यावी; म्हणजे विद्यार्थ्यांच्या बाबतींत सहसा अन्याय होणार नाहीं. आणि परीक्षा व त्यांवर अवलंबून असणारी विद्यार्थ्यांची बढती या बाबतींत असें धोरण असावें कीं – विद्यार्थ्यांचा उत्साहभंग होऊं नये. दिवसेंदिवस अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचें प्रमाण कमी कमी होत जावें. विद्यार्थ्यांनीं नियमित शाळेंत यावें, त्यांना शिक्षकांनीं उत्तम पद्धतींनीं शिकवावें, विद्यार्थ्यांनीं मनःपूर्वक अभ्यास करावा, आणि वर्षाच्या शेवटीं प्रत्येक वर्गांतील सर्वच्या सर्व विद्यार्थी परीक्षेंत उत्कृष्ट यश मिळवून वरच्या वर्गांत जावे—हेंच आपल्या शालेय व्यवस्थेच्या यशस्वीपणाचें गमक मुख्याध्यापकांनीं समजावें.

• • • –

: ११ :

# शाळेची सुसज्जता

शालेय व्यवस्थेचें एक प्रधान उद्दिष्ट शाळेंतील अध्ययन आणि अध्यापन सुकर, सुलभ आणि परिणामकारक व्हावें हेंच असल्यानें, शाळेचें परिसर आणि इमारत यांच्याइतकेंच महत्त्व शाळेच्या सुसज्जतेला आहे. त्याकडे शिक्षक–मुख्याध्यापकांचें सदैव लक्ष असलें पाहिजे. अध्ययन आणि अध्यापन म्हणजे केवळ शिक्षकांचें अस्खलित वक्तृत्व, विद्यार्थ्यांना दिपविणारा वाग्गंगेचा ओघ नव्हे, कीं विद्यार्थ्यांचें अर्थहीन पठन वा पोपटपंची नव्हे. प्रत्येक विषयाचा जीवनांत उपयोग काय व तो कसा होतो हें शिक्षकांनीं समजावून सांगावयाचें असतें. विद्यार्थ्यांच्या केवळ तर्कशक्तीवर अथवा कल्पनाशक्तीवर भिस्त न ठेवतां त्यांचे डोळे, कान, हात इत्यादि साऱ्याच कर्मेंद्रियांची व ज्ञानेंद्रियांची मदत घेऊन आपला विषय त्यांच्या मनावर ठसवावयाचा असतो. तसेंच, वर्गांतील अध्यापन हें केवळ दिशा दाखविणारें, विषयाची तोंड-ओळख करून देणारें असतें; पुढील मार्ग विद्यार्थ्यांनीं स्वावलंबनानें आंखावयाचा असतो. या दृष्टीनें शाळा या 'पाठ'-शाळा म्हणण्यापेक्षां 'प्रयोग'-शाळा स्वरूपाच्याच अधिक व्हाव्यात याकडे आजकाल जास्त लक्ष दिलें जातें. विद्यार्थ्यांना अध्ययन–अध्यापनाचे वेळीं स्वतःच काम करावयास लावावयाचें म्हटलें कीं अनेक उपकरणांची वा साधनांची गरज निर्माण होते. तसेंच कांहीं विषयांच्या अध्यापनांत उपकरणांची गरज मोठीच असते; त्यांचा येथें थोडक्यांत परामर्श घ्यावयाचा आहे.

## वाचनालय

### १. महत्त्व

वाचनालय हें शाळेचें वैभवस्थान समजलें जातें. त्याचें महत्त्व अनेक परींनीं सांगतां येईल. वर्गांत शिकविल्या जाणाऱ्या विषयाच्या अध्यापनाची परिपूर्ति वाचनालयांतच होणार, आणि जीविताशीं संबंध त्या द्वारांच जोडला जाणार. वर्गांत

विषय समजावून दिल्यावर त्या बाबतींत अधिक ज्ञान मिळविण्याची जिज्ञासा अनेक विद्यार्थ्यांना होते ( व व्हावयास पाहिजे ). तिची तृप्तता वाचनालयांत होऊन तें एक प्रगतीचें, विशाल क्षेत्रांत विद्यार्थ्यांना नेण्याचें साधन बनलें पाहिजे. आज जगांत ज्ञानाचें प्रत्येक दालन कसें समृद्ध होत आहे, आपलें राष्ट्र व इतर राष्ट्र यांत किती अंतर आहे, आपल्या पूर्वजांचा वारसा काय आहे, आणि आज जग कोणीकडे जात आहे—या सगळ्या गोष्टींची कल्पना देऊन दृष्टि फांकाविण्यास, मन प्रगल्भ करण्यास, मनाला उद्‌बोधन व चेतना देण्यास वाचनालयासारखें ठिकाण नाहीं. " ज्ञानाचें तें सदावर्त " आहे. मनोरंजनाच्या दृष्टीनें तर त्याची महती अधिकच आहे. कारण उत्कृष्ट पुस्तकांपासून मनोरंजनाबरोबर सात्त्विक संस्कारहि घडतात. वाचन हें निरागस व मधुर आनंदप्राप्तीचें सुलभ साधन आहे. उत्कृष्ट पुस्तकें हातीं पडतांच विद्यार्थी तहानभूक, शुद्ध-बुद्ध विसरतात; नव्या जगांत प्रवेश करतात; अफाट शक्तीचा, साहसाचा अनुभव घेतात. आज बाहेरच्या जगांतील सदोष व असत्प्रवृत्तींस पोषक अशा मनोविनोदांपासून विद्यार्थ्यांचें रक्षण करावयाचें असेल तर वाचनालयाचें आकर्षण प्रभावी ठरलें पाहिजे. शिवाय, आपल्या विद्यार्थ्यांची कौटुंबिक स्थिति आत्यंतिक निकृष्ट दर्जाची असते हें लक्षांत घेतां, घरच्या संस्कारांची उणीव भरून काढावयास आणि घरालाहि सुशिक्षित करावयास शाळेचें वाचनालय समर्थ बनूं शकेल.

### २. वाचनालय-गृह

शाळेच्या मुख्य इमारतींतच पण जरा बाजूला शाळेचें वाचनालय असेल तर फारच चांगलें. वाचनालयाचें दालन ही मनांत भरणारी, आकृष्ट करणारी अशी प्रसन्न वातावरणाची जागा असावी. भरपूर उजेड, खेळती हवा, स्वच्छ व अभ्यासानुकूल बैठक, ग्रंथकार व संशोधक यांचीं छायाचित्रें, निसर्गाचे रमणीय देखावे इत्यादींनीं सजवलेल्या भिंती—असें तेथील रमणीय वातावरण असावें. आपला फुरसदीचा व खेळाव्यतिरिक्त वेळ कोठें घालवावयाचा असेल तर तो याच जागीं असें विद्यार्थ्यांना वाटलें पाहिजे.

### ३. पुस्तकांची निवड

शाळेंत घ्यावयाच्या पुस्तकांची निवड ही कसोशीनें व्हावी. त्यासाठीं कांहीं शिक्षकांची समिति असणें चांगलें. घेतलेलें प्रत्येक पुस्तक विद्यार्थ्यांना

वा शिक्षकांना कसें पूरक वा उपकारक होणार आहे हें निश्चित ठरलें पाहिजे. त्यासाठीं तें आधीं वाचलेलें असावें; प्रकाशक अथवा विक्रेते यांच्या भिडेखातर वा पुस्तकाच्या बहिरंगावर तें निवडलेलें नसावें. आपल्या शाळांची आर्थिक परिस्थिति लक्षांत घेतां पुस्तकावर खर्च केलेली रक्कम ही उधळपट्टी ठरतां कामा नये.

### ४. वाचनालयाचे विभाग

शाळेंतील वाचनालयाचे सोयीच्या दृष्टीनें पुढील विभाग कल्पितां येतील.—

**( १ ) शिक्षक-ग्रंथागार**

( अ ) पाठ्यपुस्तकें;
( आ ) संलग्न पाठ्यपुस्तकें;
( इ ) विविध विषयांवरील ग्रंथ;
( ई ) शिक्षणशास्त्रावरील ग्रंथ;
( उ ) संदर्भ ग्रंथ—अत्यंत मौल्यवान् ग्रंथ, कोश, नकाशे इत्यादि. यांची जपणूक मोठ्या काळजीनें झाली पाहिजे. हे ग्रंथ शाळेंतून हालवले जाऊं नयेत.

अशा पांच विभागांत शिक्षकांसाठीं घेतलेल्या पुस्तकांची विभागणी करून व्यवस्था ठेवतां येईल.

**( २ ) वर्ग-वाचनालय**

प्रत्येक वर्गासाठीं त्यांतील विद्यार्थ्यांचीं वयें व बौद्धिकविकास, प्रवृत्ति व आवडी या गोष्टी लक्षांत घेऊन हा संग्रह बनवावा. हीं पुस्तकें विद्यार्थ्यांना घरीं नेतां यावींत. वेळच्या वेळीं नेणें-आणणें, व तीं नीट हाताळणें या गोष्टी विद्यार्थ्यांनीं शिकल्या पाहिजेत.

**( ३ ) सामान्य वाचनालय**

आपल्या अभ्यासाला पूरक होतील अशीं विविध विषयांवरील निवडक पुस्तकें विद्यार्थ्यांना उपलब्ध झालीं पाहिजेत. निरानिराळ्या क्रमिक पुस्तकांत अधिक अभ्यासासाठीं मार्गदर्शन केलेलें असतें. तें नीट पाहून तेथें सुचविलेलीं पुस्तकें या विभागांत संग्रहित करतां येतील. विविधता हेंच या विभागाचें मुख्य सूत्र असावें.

### (४) गरीब विद्यार्थी-साहाय्यक विभाग

शाळेंतील अनेक विद्यार्थ्यांना पुस्तकें घेणें आर्थिक दृष्टया शक्य होत नाहीं. वरच्या वर्गांत जाणाऱ्या व शाळेंतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांकडून त्यांचीं पुस्तकें उसनवार वा धर्मार्थ घेऊन हा विभाग तयार केल्यास बऱ्याच विद्यार्थ्यांची गरज भागेल.

### (५) नियतकालिक-विभाग

शाळेंत येणारीं वर्तमानपत्रें, मासिकें, साप्ताहिकें यांचें स्वतंत्र दालन असावें. त्यांची नोंद स्वतंत्र व्हावी. मासिकांचे अंक वर्षअखेर एकत्र बांधले जावेत. वर्तमानपत्रें हीं कात्रणांसाठीं उपयोगी पडावींत.

## ५. पुस्तकांची वर्गवारी

वाचनालयाचे शिक्षकवाचनालय व विद्यार्थीवाचनालय असे विभाग करून नवें येणारें प्रत्येक पुस्तक त्यांत नोंदलें जावें. त्यानंतर त्याची विशिष्ट विभागांत वर्गवारी व्हावी. वाचनालयाचा नीट उपयोग व्हावयास पुस्तक हातालगत व सुलभ असलें पाहिजे. त्यासाठीं निश्चित वर्गवारी हाच मार्ग आहे. प्रत्येक पुस्तकावर शाळेचें नांव, दाखल केल्याची तारीख, सामान्य क्रमांक व विभाग-क्रमांक या गोष्टी नमूद केल्या जाव्यात. तसेंच, प्रत्येक पुस्तकांत पुस्तकाचा लेखक, प्रकाशक, किंमत, व वाचावयास नेणाराचें नांव यांचें कार्ड ठेवल्यास पुस्तक कोणी वाचावयास नेलें आहे याचा उलगडा तात्काळ होतो.

## ६. वाचनालयाचा उपयोग व प्रेरणा

वाचनालयाचा उपयोग कसा करून घ्यावयाचा, व अधिक वाचनाची प्रेरणा कशी द्यावयाची याचा सर्व शिक्षकांनीं बुद्धिपुरःसर विचार करावयास पाहिजे. वर्गवाचनालयांतील पुस्तकांशीं शिक्षक चांगले परिचित असावेत. जरूर त्या संदर्भीचें टिपण त्यांच्याजवळ तयार असावें. आपल्या विषयविवेचनाच्या ओघांत त्याकडे विद्यार्थ्यांचें लक्ष वेधावें. शाळेंत आलेल्या नव्या पुस्तकांचा अल्पपरिचय फलकावर लिहितां येईल. वर्तमानपत्रांतील अभिप्रायांचीं कात्रणें कांचफलकांत लावतां येतील. 'कोठें काय वाचाल?' असें सदर शाळेंत प्रमुख जागीं किंवा वाचनालयांत चालवितां येईल. वाचन-छंद असणारांचें स्वतंत्र मंडळ शाळेंत निर्माण करून कसें वाचावें, टिपणें कशीं करावींत,

संदर्भ कसे बघावेत, विषयसूचीचा उपयोग कसा करावा यांचें शिक्षण त्यांना देतां येईल. शाळेंत होणारे उत्सव-समारंभ, वक्तृत्व-स्पर्धा, निबंध-स्पर्धा यासाठीं वेगवेगळ्या पुस्तकांचा उपयोग करण्याची संधि, सवलत देऊन योग्य मार्गदर्शन शिक्षकांनीं केलें पाहिजे. इतर सर्व संवर्यीप्रमाणेंच ही एक संवय लावणें व रिकामपणाचा आणि सुट्यांचा सदुपयोग करण्याचें शिक्षण शिक्षकांनीं देणें ही महत्त्वाची शैक्षणिक कामगिरी आहे.

विद्यार्थी काय व कसें वाचतात यावर शिक्षकांनीं लक्ष ठेवल्यास त्यांच्या मनाचा कसा विकास होत आहे हें सहजच ध्यानीं येईल. विद्यार्थ्यांनीं वाचलेल्या पुस्तकांची नोंद आपल्या वहींत करून ठेवावी. त्यांतील सुंदर उतारे व सुभाषितें यांचें संकलन करावें. हल्लीं पुरवणी वाचनासाठीं निघणाऱ्या पुस्तकांना स्वाध्याय दिलेले असतात, व पुस्तकाच्या अभ्यासाची दिशाहि सूचित केलेली असते. त्यांचाहि उपयोग करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिलें पाहिजे. विद्यार्थ्यांना शक्य झालें तर वाचलेल्या पुस्तकावर छोटे अभिप्राय, रसग्रहणें लिहिण्यासहि उत्तेजन द्यावें. वाचनाची अभिरुचि आणि ज्ञानलालसा निर्माण केल्यावांचून केवळ पाठ्यपुस्तकांवर अवलंबून राहण्याची संकुचित वृत्ति सुधारणार नाहीं.

वाचनालयाचा उपयोग नागरिक-सद्गुणांचे वर्धनासाठीं करून घेतां येईल. सार्वजनिक मालमत्तेबद्दलचा आदर, प्रत्येक पुस्तकाबद्दल आपुलकीची भावना, आपली पाळी येईपर्यंत शांत राहणें, वेळेवर पुस्तकें परत करून इतरांची गैरसोय न करणें, वाचनालयाच्या दालनांत स्तब्धतेचा भंग न करणें व इतरांच्या आनंदांत व्यत्यय न आणणें, या गोष्टी शिष्टाचार व नागरिक-सद्गुण या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत, व त्या विद्यार्थिदशेंतच अंगीं बाणल्या पाहिजेत.

### ७. ग्रंथपाल

प्रत्येक शाळेला तज्ज्ञ ग्रंथपाल असावा. नाहीं तर ज्या शिक्षकांकडे ग्रंथपालाचें काम असेल त्यांनीं त्या बाबतींत शिक्षण घेऊन यावें, आणि वाचनालयाच्या कामाकडे लक्ष देण्यास भरपूर वेळ त्यांना मिळावा. ग्रंथपालाचें काम अत्यंत जबाबदारीचें असल्यानें ही व्यक्ति मनापासून वाचनाची हौस असणारी व ज्ञानलालस असावयास पाहिजे. वाचनालयांत येणाऱ्या प्रत्येक पुस्तकाचा विषय त्याला ठाऊक असावा. कोणत्या विद्यार्थ्यांनीं काय वाचावें

याचें मार्गदर्शन त्याला करतां यावें. अमुक विषयावर उपयुक्त माहिती कोठें मिळेल हें त्याला सांगतां यावें. वाचनालयाचें दप्तर सांभाळण्याची व पुस्तकांची देवाणघेवाण करण्याची कारकुनी हें कार्य महत्त्वाचें असलें तरी गौण आहे. त्याचें खरें कार्य म्हणजे वाचनालय हें एक विद्यार्थ्यांच्या आकर्षणाचें केंद्र बनविणें. वाचनालयांत अभ्यासाचें, बौद्धिक आनंदाचें व उत्साहाचें वारें खेळविणें ही त्याची कामगिरी होय.

### ८. आर्थिक तरतूद

आपल्या शाळेचें वाचनालय व ग्रंथागार सतत समृद्ध कसें होईल याची योजना सहकाऱ्यांच्या सल्ल्यानें मुख्याध्यापकांनीं आंखावी. त्यासाठीं दर वर्षी किती पैसा खर्च करावा हें ठरवावें. नको झालेलीं, फाटलेलीं पुस्तकें बाजूस काढून अडगळ कमी करावी. शाळेच्या अर्थसंकल्पांत मोठ्या प्रमाणावर तरतूद करणें अशक्य असतें. गांवांतील सधन व सुशिक्षित नागरिकांकडून अर्थरूपानें वा पुस्तकरूपानें देणग्या मिळवून त्यांचा शाळेशीं संबंध जोडावा, शहरांतील इतर शाळांशीं सहकार्याचे संबंध राखून महत्त्वाच्या शिक्षकोपयोगी पुस्तकांची देवाण-घेवाण झाली तर फारच चांगलें. वाचनालयांतील संग्रह म्हणजे जिवंत ओघ असणें, आणि त्याचा आकंठ आस्वाद सर्वांना मिळणें हीच त्याची सार्थकता.

## संग्रहालय

शाळेचें पदार्थ-संग्रहालय म्हणजे हंसत खेळत ज्ञानार्जन करण्याचें साधन. विद्यार्थ्यांच्या संचयप्रवृत्तीला योग्य चालना त्यामुळें देतां येतें; तिला वळण लावतां येतें. मार्मिक व डोळस निरीक्षणाची जोड तिला देऊन विद्यार्थ्यांत शास्त्रीय ज्ञानाविषयीं कुतूहल, आवड व कल हीं संग्रहालयें निर्माण करतात.

प्रत्येक वर्गाचें अलग संग्रहालय करण्यापेक्षां सर्व शाळेचें एक संग्रहालय असावें. भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र, उद्भिज्जशास्त्र – असे जागेच्या सोयीनुसार लहानमोठे त्याचे विभाग असले कीं शास्त्रीय ज्ञानाच्या शाखांचा सहजच विद्यार्थ्यांना बोध होतो. पदार्थसंग्रहालयाची मांडणी सुबक असावी. प्रत्येक पदार्थाचें नांव, जात, प्रकार इत्यादि निदर्शक चिठ्ठ्या त्या त्या ठिकाणीं असाव्यात. पदार्थसंग्रहालय म्हणजे 'प्रदर्शन' ही भावना विद्यार्थ्यांची वा शिक्षकांची नसावी. पदार्थसंग्रहालयांतील वस्तूंचा

प्रत्यक्ष पाठांत उपयोग करून घेतला जावा. चित्रकला, सामान्यविज्ञान, भूगोल, इतिहास, व क्वचित् वाङ्मय – या सर्व विषयांत त्यांचा उपयोग होऊं शकेल. केवळ शाब्दिक वर्णनावर न विसंबतां पदार्थांचें दर्शन हें अधिक परिणामकारक ठरेल. पदार्थसंग्रहालयांतील वस्तु सर्वत्र आढळणाऱ्या असण्याऐवजीं त्या दुर्मिळ व नावीन्यपूर्ण असणें अधिक महत्त्वाचें म्हणून निवडीच्या बाबतींत थोडा चोखंदळपणा ठेवलाच पाहिजे. पदार्थाच्या कृत्रिम प्रतिकृति व रेखाचित्रें यांच्यापेक्षां विद्यार्थ्यांनींच जमविलेल्या संग्रहांतील वस्तूंचा उपयोग जर पाठांत झाला तर विद्यार्थ्यांना गौरव वाटून अर्जित ज्ञानाबद्दल जिव्हाळा वाटेल. आपण आणून दिलेल्या वस्तु अडगळींत पडत नाहींत, त्यांची दखल घेऊन ज्ञानसाधन म्हणून उपयोग होतो असें दिसल्यास विद्यार्थी हौसेनें नवे नवे मजेदार व अद्भुत नमुने आणून देतील. पदार्थसंग्रहालयाच्या एकूण व्यवस्थेंत विद्यार्थ्यांना जेवढें सहभागी करून घेतां येईल तेवढें घ्यावयास पाहिजे.

सामान्यतः पुढीलप्रमाणें वस्तूंचा संग्रह पदार्थसंग्रहालयांत असावाः—

१. निरनिराळ्या प्रकारचे दगड, माती, शंख, शिंपले.
२. बीं, पानें, फुलें व धान्यें; लोंकर, कापूस, रेशीम इ.
३. पिसें, घरटीं, कोश, अंडीं.
४. धातु, नाणीं, भांडीं, पोस्टाचीं तिकिटें.
५. पक्षी, प्राणी यांचे सांगाडे व भुसा भरलेले नमुने.
६. हस्तकौशल्याचे नमुने.
७. परदेशांतील जीवनोपयोगी वस्तु.

## शालेय उद्यान

आजकालचें शहरी वातावरण व शालेय जगांतील पुस्तकांचा अतिरेक यामुळें आपण निसर्गाचेच एक घटक आहोंत, निसर्गावर आपलें जीवित अवलंबून आहे, आणि निसर्गांत अमाप सौंदर्य भरलेलें असून ती आनंदाची खाण आहे, या गोष्टींचा आपल्याला विसर पडत चाललेला आहे. वर्धा-शिक्षण-पद्धतीनें शिक्षण निसर्गाच्या जवळ नेण्याचा केलेला उपक्रम ही या दृष्टीनें स्पृहणीय क्रांति होय. वर्धा-शिक्षणांत शेतीचा अंतर्भाव केल्यामुळें

होणारे विविध लाभ आचार्य भिसे यांनीं पुढील शब्दांत सुंदर रीतीनें वर्णिले आहेत.—

" सौंदर्य-समीक्षेची व आनन्दानुभवाची दृष्टि जरी सोडली, तरी या शिक्षणानें मुलांच्या विकासाला अवश्य असणारे अनेक गुण वाढीस लागतील. मुलांची निरीक्षणशक्ति सूक्ष्म बनेल. एखादें हातीं घेतलेलें कार्य अडचणींस न जुमानतां शेवटपर्यंत चिकाटीनें चालविण्यासाठीं लागणारी तितिक्षा व धिमेपणा त्यांच्या स्वभावांत येइल. प्रत्येक गोष्टींत कार्यकारणभाव पाहूं लागल्यामुळें त्यांची विचारशक्ति तर्कयुक्त होईल. अनेक बाबींचें वर्णन करण्याची जरुरी पडल्यामुळें ते बहुभाषी बनतील. शाब्दिक वर्णनाला चित्र-कलेची जोड द्यावी लागणार असल्यानें त्यांना चित्रकलेंतहि कौशल्य संपादतां येईल. वनस्पतींची व प्राण्यांची जोपासना करावी लागणार असल्यामुळें ते हलगर्जीपणा टाकून देऊन कार्यदक्षता, टापटीप, वक्तशीरपणा, नेमस्तपणा, काटकसर हे गुण शिकतील. त्यांची चौकसबुद्धि जागृत झाली म्हणजे ते अधिकाधिक चिकित्सक होतील. §

वरील उताऱ्यांत एकाच विषयांतून इतर विषयांशीं सहयोग व अनुबंध साधण्याची दृष्टि दिलेली आहे. आजच्या अभ्यासक्रमांत ती आणणें आवश्यक आहे. या दृष्टीनें प्रत्येक शाळेला स्वतःचें उद्यान असणें कसें आवश्यक आहे याची कल्पना येईलः—

वरील उताऱ्यांत दिग्दर्शित केलेले लाभ करून घ्यावयाचे म्हणजे बागेची आंखणी आणि जोपासना विद्यार्थ्यांवर सोंपाविली पाहिजे. तेथील शिक्षकांनीं व्यवस्था कशी ठेवावयाची यांचें मार्गदर्शन केलें पाहिजे. त्यासाठीं पुढील कार्यपद्धति मार्गदर्शक ठरेल.

१. विद्यार्थ्यांचे गट पाडून त्यांच्या स्वाधीन जमिनीचा एक एक तुकडा सोंपवावा.

२. जमिनीची मशागत, नांगरणी, निंदणी, इत्यादि कामें त्यांनींच करा-वींत. निरनिराळ्या अवजारांचा उपयोग त्यांनीं माहीत करून घ्यावा.

---

§ जीवन-शिक्षण, पृ. १०७.

३. निरनिराळें ऋतुमान, हवामान, आणि जमिनीचा प्रकार व खतपाणी या सर्वांच्या आधारें कोणतीं फळझाडें, फुलझाडें लावावयाचीं किंवा बीं पेरावयाचें यांची चर्चा व्हावी.

४. बीं-पेरणीपासून वा कलम-रोपणापासून परिणत अवस्था येईपर्यंत वाढ-विकासाची व स्थित्यंतरांची नोंद, शक्य तर सचित्र, त्यांनीं ठेवावी.

५. एकूण झालेला खर्च, खर्च केलेला वेळ यांचेंहि टिपण त्यांनीं करावें. वस्तूंचा विनिमय केला असेल तर त्याचीहि नोंद असावी.

६. सामान्य-ज्ञान, भूगोल इत्यादि विषयांचें अध्यापन शक्य असेल तेव्हां प्रत्यक्ष बागबगीच्यांत व्हावें.

७. फुलाफळांचा विनामूल्य खाजगी उपयोग करून घेण्याचा मोह सर्वांनींच कटाक्षानें टाळावा. शिक्षकांनीं या बाबतींत आदर्श घालून द्यावा.

पुष्कळ शाळांत बगीचे असतात. त्यांवर भरपूर खर्चहि होतो, पण केवळ शोभा व विलासिता म्हणूनच. बागेंत जाण्याची व पान-फुलांना हात लावण्याची विद्यार्थ्यांना सक्त मनाई असते आणि या प्रतिबंधांतून माळी व विद्यार्थी यांच्यांत सदैव झगडे चालू असतात. ही सारी प्रथा व पद्धति अनिष्ट आहे. बाग विद्यार्थ्यांनीं परिश्रमानें तयार केली असेल, तर तिच्याबद्दल आत्मीयता व आदर त्यांना सहजच वाटेल, व संयमाचा गुण अंगीं बाणेल. "वस्तूंचा विकास होतांना त्यांच्या दर्शनांत आनंद आहे" असें रवीन्द्रनाथांनीं म्हटलें आहे. फळाफुलांचा आनंद हा उच्च सदभिरुचीचा निदर्शक आहे. त्याची जोपासना व्हायला पाहिजे. आणि शालेय जीवनांत हा आनंद स्वतःच्या परिश्रमांतून निर्माण करून विद्यार्थ्यांनीं अनुभवला तर श्रमाच्या प्रतिष्ठेचें मोल वेगळें शिकवावें लागणार नाहींच.

## दृक्-श्राव्य-शिक्षण-साहित्य

कोणताहि विषय सुलभ व आकर्षक करावयाचा म्हणजे केवळ शाब्दिक स्पष्टीकरणावर भागत नाहीं. हुशार शिक्षक नेहमींच फळा, नकाशे, आकृत्या यांचा उपयोग करीत आले आहेत आणि आपल्या पाठांत जीव, चैतन्य व आनंद आणण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो. आजच्या यांत्रिक युगांत या साधनांत झपाट्यानें वाढ होत आहे. स्थिर चित्रें व चलच्चित्रपट

दाखविण्याचीं विविध साधनें निर्माण झालीं आहेत. 'मॅजिक लँटर्न', स्थिर व गतिमान् चित्रें दाखविणारे 'प्रोजेक्टर' व 'एपिडायास्कोप' हीं त्यांत प्रमुख आहेत. रेडिओ आणि ग्रामोफोन हीं श्राव्य शिक्षणाचीं साधनें आहेत. समाजांत झपाट्यानें ज्ञानप्रसार करणें एवढेंच त्यांचें कार्य उरलें नसून शालेय शिक्षणांत त्यांचा प्रवेश झाला आहे.

हीं साधनें म्हणजे केवळ करमणूक या दृष्टीनें त्यांकडे बघण्याचा काल संपला आहे. प्रत्यक्ष अध्यापनांत त्यांचा कसा व केव्हां उपयोग करावा याबद्दल प्रयोगसिद्ध तत्त्वें शिक्षकांपुढें मांडलीं जात आहेत; तीं आत्मसात् करावयास हवींत.

दृक्शिक्षण वा श्राव्यशिक्षण यांचीं साधनें उपयोजिण्यापूर्वी त्यांची आवश्यकता भासली पाहिजे; विषयाचें प्राथमिक ज्ञान झालें पाहिजे. चित्रपट-दर्शनानंतर विद्यार्थ्यांनीं काय ऐकलें व पाहिलें, त्यांचे परस्पर संबंध काय, यावर प्रश्नोत्तरें व चर्चा झाली पाहिजे. त्यावर विद्यार्थ्यांना गृहपाठ-स्वाध्याय द्यावयास हवेत.

हीं आधुनिक उपकरणीं सर्वांच्या आटोक्यांत येतील, व वेळोवेळीं त्यांना नवनवें साहित्य पुरवलें जाईल याबाबत शिक्षणखातें दक्षता घेत आहे. शाळांनीं आपल्या शिक्षकांपैकीं कोणास तरी या विषयाचें प्रायोगिक व तांत्रिक ज्ञान प्राप्त करून घेण्याची संधि द्यावी. कोणत्या विषयांत कोणत्या साधनांचा, चित्रांचा उपयोग होईल, कोणतीं चित्रें उपलब्ध आहेत, रेडिओवर काय कार्यक्रम आहेत, ग्रामोफोनच्या कोणत्या ध्वनिमुद्रिका मिळूं शकतात वा संग्रहास आहेत, यांची माहिती सर्व शिक्षकांस मिळेल अशी व्यवस्था हवी.

दृक्-शिक्षणाचीं साधनें म्हणजे केवळ यांत्रिक उपकरणींच नव्हेत. हस्तनिर्मित प्रतिकृति, रेखाचित्रें, कारखान्यांना भेटी, शेत-मळ्यांतील व लेण्यांच्या सहली या सर्वांचा त्यांत अंतर्भाव होतो. वेगवेगळ्या वयाच्या विद्यार्थ्यांना वेगवेगळे 'प्रकल्प' किंवा संयोजन विषय देऊन शिक्षकांच्या देखरेखीखालीं असें साहित्य निर्माण करतां येईल. त्या सर्वांची निगा राखणें व प्रत्यक्ष अध्यापनांत त्यांचा उपयोग होतो हें पाहणें हें व्यवस्थेचें अंग आहे.

● ● ●

: १२ :

# शाळेचें कार्यालय व दप्तर

## आवश्यकता

कोणतीहि संस्था म्हटली कीं तिला कार्यालय व दप्तर या गोष्टी असावयाच्याच. संस्थेची घटना व नियमावलि, तिच्या आर्थिक व्यवहाराची नोंद, आणि तिच्या कार्याची प्रगति दाखविणारीं व माहिती देणारीं अहवाल-पुस्तकें, सभांचीं इतिवृत्तें, व पत्रव्यवहाराची आवक-जावक वही एवढ्या गोष्टी कमींत कमी पाहिजेत. त्याशिवाय संस्थेला स्थैर्य नाहीं, इतिहास नाहीं व सातत्य नाहीं. शाळेलाहि ही गोष्ट लागू आहे.

शाळेच्या दप्तराचें स्वरूप शाळेच्या कार्याप्रमाणें विविध असणार हें उघड आहे. शाळेच्या दप्तराचें महत्त्व केवळ शाळेच्या दृष्टीनेंच आहे असें नव्हे. शाळा हा समाजाचा घटक आहे, सामाजिक प्रगतीचें साधन आहे; आणि लोकाश्रयावर चालणारी ती एक सार्वजनिक संस्था आहे. तेव्हां ती जनतेला विविध प्रकारें जबाबदार असते. तसेंच, सरकारचें साहाय्य शाळेला मिळत असल्यानें व नियंत्रण पत्करावें लागत असल्यानें सरकारी अधिकाऱ्यांनाहि ती जबाबदार असते. त्याचप्रमाणें ज्या विद्यार्थ्यांसाठीं शाळेचें अस्तित्व आहे, त्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक प्रगतीचा इतिहास, त्यांच्या शारीरिक विकासाचा क्रम, त्यांतील अडचणी व त्यांचें आरोग्य याबाबत माहिती, विद्यार्थ्यांच्या संवयी, त्यांचे कल, त्यांनीं विविध विषयांत व कलांत मिळविलेलें प्रावीण्य हें सारें शाळेजवळच आढळावयाचें. या इतिहासावर त्यांचें भवितव्य अवलंबून आहे. पालकांच्या दृष्टीनें त्याला मोल आहे. शाळेंतील शिक्षक व इतर नोकर यांच्या व्यावसायिक, आर्थिक बाजूचें दप्तर ही व्यवहाराची बाब असून तिला कायदेशीरहि महत्त्व आहे. शिक्षणक्षेत्रांत काय प्रगति होत आहे, संस्था किती वाढत आहे, पालकांची स्थिति कशी आहे, इत्यादि संशोधन करावयाचें झाल्यास, व त्यावरून भविष्याचे अंदाज व योजना करावयाच्या

झाल्यास शाळेंतील दप्तरांचेंच साहाय्य घ्यावें लागेल. अशा तऱ्हेचे अहवाल, सरकार वरचेवर प्रसिद्ध करतें. ही आंकडेवार माहिती पुरविणें शाळांनाच शक्य आहे.

सारांश, शाळेंतील दप्तराला शैक्षणिक, सामाजिक व कायदेशीर महत्त्व असून उत्कृष्ट, चोख आणि अद्ययावत् दप्तर ही शाळेच्या कार्यक्षमतेची कसोटी आहे. अशी दप्तर-व्यवस्था ही शाळेच्या नैतिक सामर्थ्यांत भर घालते व जनतेचा आणि सरकारचा विश्वास संपादन करते. शालेय व्यवस्थेच्या दृष्टीनें दप्तर-व्यवस्था ही मुख्याध्यापकांची खास जबाबदारी व कर्तव्य आहे. संस्था जितकी मोठी तितका दप्तराचा व कार्यालयाचा व्याप मोठा. मुख्याध्यापक त्यांत बुडून जाण्याचा संभव अधिक, म्हणून नियमितपणा व विनियंत्रण या दोन्हींचा त्यांनीं अवलंब करावयास पाहिजे. विनियंत्रणानें मुख्याध्यापकांची जबाबदारी संपते असें मात्र नाहीं. शाळेच्या दप्तराची उपयुक्तता ही दप्तरांतील नोंदी किती बिनचूक व संपूर्ण आहेत यावरून ठरविली जाईल. म्हणून प्रत्येक नोंदीची सत्यता पारखून घ्यावी लागते. तसेंच, पाहिजे असेल तेव्हां ताबडतोब जर शाळेंतून माहिती मिळूं शकत नसेल तर तें दप्तर केवळ भारभूतच ठरेल. यासाठीं वेगवेगळ्या जागा, कप्पे, कपाटें, वह्या इत्यादि गोष्टी असणें, त्यांवर आंतील विषयांच्या नांवाची चिठ्ठी असणें, त्यांना क्रमांक देणें, शक्य तेथें अनुक्रमणिका ठेवणें, – इत्यादि तपशीलाच्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. शाळेच्या दप्तराची सुरक्षितता हा महत्त्वाचा भाग असून शाळेच्या आवाराबाहेर तें न नेण्याची कटाक्षानें दक्षता घेतली पाहिजे.

शाळेच्या सुव्यवस्थेच्या दृष्टीनें दप्तरांतील कांहीं नोंदी महत्त्वाच्या आहेत त्यांचा क्रमशः विचार करूं.

## १. विद्यार्थ्यांबाबत नोंदी

### (क) प्रवेश-पुस्तक (जनरल रजिस्टर)

शाळेंत प्रविष्ट झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याची पहिली नोंद या पुस्तकांत ठेवावी लागते. त्यावरून आतांपर्यंत शाळेंत एकूण विद्यार्थी किती आले व किती आहेत हें समजूं शकतें. विद्यार्थ्यांनीं शाळा केव्हां सोडली याचीहि नोंद त्यांत असल्यानें सामाजिक संशोधनाला त्याचा उपयोग होऊं शकेल; पण

मुख्यतः त्यांत नमूद केलेली विद्यार्थ्यांची जन्मतारीख, जन्मस्थळ, व जात यांना कायदेशीर मान्यता असते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. या नोंदी पूर्वीच्या शाळेंतील दाखल्याच्या आधारें किंवा पालकांनीं दिलेल्या माहितीच्या आधारें भरावयाच्या असतात. पूर्वीची शाळा सरकारमान्य असली पाहिजे; आणि शाळा दुसऱ्या राज्यांतील असेल तर त्यांतील शिक्षणाधिकाऱ्यांचा अनुमति-दर्शक शिक्कामोर्तब त्या दाखल्यावर झाला असला पाहिजे. सर्व नोंदी शाईनें केलेल्या व सुवाच्य असाव्यात; आणि दुरुस्त्यांच्या ठिकाणीं मुख्याध्यापकांची सही असावी. विद्यार्थी शाळा सोडून जातांच त्याची नोंद त्याच्या नांवापुढें व्हावी, व त्याचें खातें बार व्हावें. तो विद्यार्थी पुनः आल्यास त्याला नवीन क्रमांक मिळेल. हजेरीपटावरून नांव काढलें कीं प्रवेशपुस्तकांतून त्याचें नांव कमी झालें पाहिजे.

या पुस्तकांत पुढील सदरें असतात :

१. अनुक्रमांक, २. संपूर्ण नांव, ३. जात, ४. जन्मस्थल, ५. जन्म-तारीख, ६. कोणत्या शाळेंतून आला, ७. दाखल झाल्याची तारीख, ८. कोणत्या इयत्तेंत दाखल, ९. शाळा सोडल्याची तारीख, १०. कोणत्या इयत्तेंत शिकत होता, ११. प्रगति, १२. वर्तणूक, १३. शाळा सोडण्याचें कारण १४. शेरा (दाखला – नंबर – फी बाकी – इ. इ.)

### (ख) मासिक-उपस्थिति-पत्रक

या पत्रकांत विद्यार्थ्यांच्या दैनंदिन उपस्थितीची नोंद असते. विद्यार्थ्याचा नियमितपणा त्यावरून समजतो. विद्यार्थ्याचा अनियमितपणा पालकांच्या कानावर घालून विद्यार्थी अभ्यासांत मागें पडत असल्यास त्याचें निदान करतां येतें. या नोंदींना कायदेकोर्टांत महत्त्व आहे. तसेंच, सरकारी शिष्यवृत्त्या, फी–सवलती इत्यादि मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती शाळेला आवश्यक असते; शिक्षणखात्याला ती पुरवावी लागते. त्यावरून उपस्थितीची मासिक सरासरी अजमावतां येते. विद्यार्थ्यांच्या फीचा हिशोब याच पत्रकांत असतो; त्यामुळें त्याला व्यावहारिक महत्त्व विशेष आहे. फीबाबत सर्व नोंदी शिक्षकानीं वेळच्या वेळीं व अचूक ठेवणें व, महिनाअखेर सर्व हिशोब – घेतलेली फी व कार्यालयांतील भरणा जुळणें ही शिक्षकांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

### ( ग ) वैयक्तिक-नोंद-पत्रक

उपस्थिति—पत्रकांत जन्मतारीख, रजिस्टर नंबर, जात इ. सदरें असतात. तीं दरमहा भरावयास नकोत म्हणून कांहीं शाळा त्याला पूरक असें वैयक्तिक नोंदींचें पुस्तक ठेवतात. इतर आवश्यक माहितीहि त्यांत नमूद करून घेतां येते. यांत प्रामुख्यानें पुढील सदरें हवींत.

( १ ) रजिस्टर नंबर, ( २ ) जन्मतारीख, ( ३ ) संपूर्ण नांव, ( ४ ) पालकांचें नांव, ( ५ ) पालकांचा पत्ता, ( ६ ) पालकांचा व्यवसाय, ( ७ ) शाळा सोडल्याची तारीख, ( ८ ) शेरा.

विद्यार्थ्यांच्या पालकांशीं संबंध ठेवण्यास त्याचा उपयोग होतो. वर्षाच्या आरंभीं एकदां हा तक्ता तयार केला कीं काम भागतें. शिक्षकांचें कारकुनी काम कमी होतें. विद्यार्थी वरच्या वर्गांत गेला कीं हीं सदरें पुन्हां एकदां तपासून पुढील शिक्षकांना नव्या पुस्तकांत नोंद करून घेतां येते.

### ( घ ) गुण-पत्रकें

विद्यार्थ्यांच्या सर्व तऱ्हेच्या चांचण्या, परीक्षा, त्यांचें लेखन इत्यादींमध्यें त्यांनीं मिळाविलेले गुण यांत नमूद केलेले असतात. पांच ते सात वर्षें पुरेल असें हें पुस्तक असलें तर वेळोवेळीं त्या विद्यार्थ्यांची प्रगति काय होती हें ताडून पाहतां येतें. विशेषतः वर्षअखेर निर्णय टरावितांना त्याचा विशेष उपयोग होतो.

### ( च ) विद्यार्थ्यांचें प्रगति-पुस्तक

विद्यार्थ्यांची मासिक प्रगति, उपस्थिति, इत्यादि माहिती पालकांना दर-महा वा ठराविक अंतरानें देण्यासाठीं हें पुस्तक आवश्यक असतें. फी-नोंदहि त्यांत देण्याची प्रथा आहे. तसेंच वैद्यकीय तपासणीचा अहवाल त्यांद्वारां पालकांना कळवितां येतो. पालकांना हें पुस्तक विद्यार्थी दाखवितात व त्यावर त्यांची सही घेतात, हें पाहणें महत्त्वाचें आहे. या पुस्तकांत केवळ परीक्षांतील प्रगतीची नोंद असते. विद्यार्थ्यांच्या संवयी, सामाजिक आचार, विविध छंदांतील प्रावीण्य, वाचनालयादि संधींचा त्यांनीं घेतलेला फायदा, समाज-सेवेंत उचललेला वांटा व त्यांच्या अंगीं आढळणारीं वैगुण्यें इत्यादींची यथातथ्य नोंद त्यांत होणें आवश्यक आहे, असें सर्वांचें मत होऊं लागलें आहे.

### ( छ ) वैद्यकीय तपासणी-पत्रक

प्रत्येक विद्यार्थ्याची शारीरिक तपासणी व्हावी व तिचा वृत्तान्त पालकांना कळावा याची दक्षता बहुतेक पुढारलेल्या शाळा घेतात. त्या पत्रकाचा नमुना शिक्षणखात्यानें निश्चित केलेला आहे. शाळा बदलतांना विद्यार्थ्यांबरोबर तो तत्का गेला तरच त्याची उपयुक्तता वाढणार आहे.

## शिक्षकविषय

### ( अ ) उपस्थिति-पत्रक

शिक्षकांच्या दैनंदिन उपस्थितीचें पत्रक शाळेंत असावें लागतें. शाळेंत येतांच शिक्षकांनीं त्यावर आपली स्वाक्षरी करावयाची असते. कांहीं शाळांत आल्याची वेळहि नमूद करण्यांत येते. त्याच्या आधारें रोजची व्यवस्था मुख्याध्यापकांना लावतां येते. रजेची नोंद केली जाते.

### ( आ ) अध्यापन-निरीक्षण-पत्रक

प्रत्येक शिक्षकाच्या अध्यापनाचें मुख्याध्यापकांनीं निरीक्षण करावें, त्यांना सूचना द्याव्यात, आणि त्यांच्या अध्यापनाचा दर्जा वाढविण्यास मदत करावी. ही मुख्याध्यापकांची जबाबदारी असल्यानें त्यांनीं जें निरीक्षण-कार्य केलें असेल त्याची नोंद या पुस्तकांत करावयाची असते. त्या त्या शिक्षकांना बोलावून आपला अभिप्राय त्यांच्या नजरेस आणावा, व त्यावर त्यांची सही घ्यावी अशी शिक्षणखात्याची अपेक्षा असते.

### ( इ ) सेवा-पत्रकें ( सर्व्हिस बुक )

शाळेंतील प्रत्येक सेवकाची ( शिक्षक, कारकून, शिपाई इ. ) वैयक्तिक व व्यावसायिक नोंद या पुस्तकांत ठेवली जावी. सेवकाचें संपूर्ण नांव, पत्ता, शिक्षण, व्यावसायिक पात्रता, जन्मतारीख, नोकरीचा आरंभ, वेतनश्रेणी, वेतनवाढीच्या तारखा, प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम, रजा, इत्यादि सर्व माहितीची नोंद या पत्रकांत वेळच्या वेळीं करण्यांत यावी. शिक्षकांच्या वैयक्तिक दृष्टीनें व शाळेच्याहि दृष्टीनें हीं सेवापत्रकें महत्त्वाचे दस्तऐवज असतात.

सेवकाच्या कामाचा दर्जा, कामाचा वक्तशीरपणा, उरक, हौस, इत्यादि व्यावसायिक गुण व चारित्र्य यांबद्दलच्या नोंदी या पत्रकांत असल्यामुळें तो

'गोपनीय' असा दस्तऐवज असतो व म्हणून त्यांतील नोंदी काळजीपूर्वक व्हावयास पाहिजेत.

## अर्थव्यवहार

शाळेच्या अर्थव्यवहाराच्या नोंदींचें महत्त्व विशद करून सांगावयास पाहिजे असें नाहीं. जमाखर्च सुव्यवस्थित असणें केवळ सचोटीच्या दृष्टीनेंच महत्त्वाचें नाहीं. अवास्तव, अनावश्यक खर्च टाळण्यास, काटकसर साधण्यास, आणि कार्यक्षमता टिकविण्यास तो एक उत्तम साधन आहे. जमाखर्च वेळच्या वेळीं मांडले जाणें, पावत्या देणें व घेणें, त्या नीट सांभाळणें या गोष्टी जमाखर्चांत बिनचूकपणा राखण्यास उपयोगी पडतात. सार्वजनिक संस्थांना आपले हिशोब सरकारमान्य तपासनीसांकडून तपासून मान्य करून घ्यावे लागतात, व शिक्षणखात्याचे अधिकारीहि ते पाहतात. जमाखर्चाच्या दस्तऐवजांत खालील भाग महत्त्वाचे आहेत :

१. रोजखर्डा व रोजकीर्द;

२. खतावणी;

३. पगार-पत्रकें;

४. पावती-पुस्तकें;

५. बिलें व पावत्या;

शाळेच्या फीमध्यें शिक्षण-फी व सत्र-फी असे दोन भाग सध्यां रूढ आहेत. त्यांचा वेगळा हिशोब ठेवावा लागतो. तसेंच, सरकारकडून मिळणाऱ्या रकमांच्या नोंदी वेळच्या वेळीं व पद्धतशीर व्हाव्यात.

## स्थावर-जंगम-मिळकतीचें पत्रक

शाळेंतील फर्निचर – बाकें, खुर्च्या, कपाटें, तसेंच, प्रयोगशाळांतील उपकरणीं, चित्रकला-विभाग, हस्तव्यवसायाचा विभाग, भौगोलिक विभाग इत्यादींतील साधनें, वाचनालयांतील पुस्तकें इत्यादि जड-जंगम वस्तु शाळेच्या मालकीच्या असतात. त्यांची वेळोवेळीं नोंद करून शाळेच्या मालकीच्या सामानसुमानाची मोजदाद ठेवावयास पाहिजे. अधून मधून त्यांची तपासणी व्हावी व मोडतोड झालेल्या वस्तूंची दुरुस्ती केली जावी.

## पत्रव्यवहार

शाळेला येणारें प्रत्येक महत्त्वाचें पत्र संग्रहित करून ठेवलेलें असावें; त्याकरितां पत्र येतांच त्यावर आवक-क्रमांक घालून तें योग्य फायलीमध्यें टांचलें जावें. तसेंच शाळेकडून जाणाऱ्या प्रत्येक महत्त्वाच्या पत्राची एक प्रत जावक–क्रमांक घालून शाळेच्या दप्तरीं योग्य फायलीमध्यें टांचलेली असावी. पुढील पत्रव्यवहाराच्या सोयीकरितां या दोन्ही प्रकारच्या फायली उपयुक्त असतात. पत्रव्यवहाराच्या या फायली विषयवारीनें तयार केलेल्या असाव्या. म्हणजे शिक्षणखात्याकडून येणारीं पत्रें एका फायलींत, पालकांकडून येणारीं पत्रें दुसऱ्या फायलींत, अशी त्यांची वर्गवारी केलेली असावी. पत्रव्यवहाराकरितां लागणाऱ्या टपालखर्चाची नोंदहि एका स्वतंत्र बारानिशींत असावी. तसेंच गांवांतल्या गांवांत कोणाला पत्रें पाठवावयाचीं असतील तर तीं पोस्टानें न पाठावितां शाळेच्या शिपायाबरोबर पाठवावीं व त्यांची पोंच आणण्याकरितां एक स्वतंत्र वही असावी.

: १३ :

# वर्ग-नियंत्रण

## प्रास्ताविक

शालेय व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे शालेय वातावरणांतील व विद्यार्थि-जीवनांतील शिस्त. शालेय वातावरणांतच काय पण इतरत्राहि सुव्यवस्था राखावयाची असेल व कार्याला अनुकूल असें वातावरण निर्माण करावयाचें असेल तर कांहीं बंधनांची गरज असते. शालेय जीवनांत व वातावरणांत असे नियम करण्याची सत्ता व अधिकार मुख्याध्यापक व शिक्षक यांना आहे,—असला पाहिजे. समाज म्हटला कीं अशी शासक—व्यक्ति असावयाची हें ठरलेलेंच. मुख्याध्यापकांनीं वा शिक्षकांनीं आपला अधिकार गाजवून नियमांचें परिपालन घडाविणें व सुव्यवस्था राखणें यालाच ' शासन ' वा नियंत्रण असें म्हणतात. विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं नियमांचें परिपालन करण्याच्या गुणाला ' शिस्त ' अशी संज्ञा देतात.

गुरु—शिष्य या द्वंद्वांतील ' शिष्य ' हा शब्द ज्या ' शास् ' धातूपासून बनला आहे. त्या धातूला ' नियमन करणें ' व ' ज्ञान देणें ' असे दोन्ही अर्थ आहेत. कदाचित् विद्यार्थ्यांच्या स्वाभाविक उच्छृंखल प्रवृत्तींचें नियमन केल्याशिवाय ज्ञानदानाचें कार्य अशक्य आहे ह्याची जाणीव त्याच्या मुळाशीं असेल. सु-नियंत्रित आचारवान् व सु-संस्कृत व्यक्तीला ' शिष्ट ' म्हणत अथवा ' वि—नीत ' म्हणत, याचेंहि कारण हेंच. आपल्या प्राचीन विचारसरणींत ज्ञान व आचार यांचा समन्वय असल्यानें शासन, शिस्त व चारित्र्य यांचा मेळ व एकरूपता राखलेली होती.

नियंत्रण म्हटलें कीं नियमभंगाबद्दल शिक्षा ही आलीच. शिवाय सामुदायिक शिक्षण अथवा वर्गपद्धति हा आजच्या शिक्षणपद्धतीचा एक भाग असल्यानें ' वर्गानियंत्रण ' ही एक नवी गरज निर्माण झाली आहे. वास्तविक पाहिलें तर वर्ग, शालेय वातावरण, व बाहेरील जीवन या ठिकाणीं

विद्यार्थ्यांची असणारी वागणूक एकाच आन्तरिक प्रवृत्तींतून निर्माण झालेली असते, व तिचें नियामक सूत्र एकच असावयास पाहिजे. असें असलें तरी वागणुकीला प्रवृत्त करणाऱ्या उत्तेजना विविध असतात, व नियमनाचे मार्ग भिन्न संभवतात, हें लक्षांत घेऊन विवेचनाच्या सोयीसाठीं या विषयाचा विचार पुढील चार भागांत करण्याचें योजिलें आहे.—

१. वर्ग-नियंत्रण आणि वर्गातील शिस्त.

२. शिक्षा आणि पारितोषिकें.

३. शासन आणि स्वयंशासन – नवी दृष्टि.

४. शिस्त आणि नागरिकत्वाचें शिक्षण – छंदमंडळें.

या विवेचनाकडे वळण्यापूर्वी शिस्तीच्या जुन्या कल्पना व अपेक्षा पाहणें थोडें बोधप्रद ठरेल.

## जुन्या कल्पना

शाळा आणि शिस्त या दोन्ही गोष्टी एकच अशीच सामान्य माणसांची समजूत झालेली असते. 'मुलांना शाळेंत घाला, म्हणजे कांहीं वळण लागेल,' असे शब्द नेहमींच कानावर येतात. मुलें ऐकत नाहींत, उर्मट झालीं आहेत, वडीलधाऱ्यांचा मान ठेवीत नाहींत, या व असल्या अनर्थांचें मूळ शाळेच्या शिस्तींत आहे, असें अनेक पालकांचें आजहि प्रामाणिक मत आहे. शिस्त अंगीं बाणावयाला छडीचा उपयोग केला पाहिजे, लकडीशिवाय मकडी ठिकाणावर येत नाहीं, आणि आमच्या मुलाला जरूर बेदम चोपा, त्याची हड्डी नरम करा, मुळींच गय करूं नका, असें कांहीं पालक मोठ्या आग्रहानें मुख्याध्यापकांना सांगत असतात ! हा झाला पालकांचा, जुन्या शिस्तीच्या कल्पनेंत मुरलेल्या समाजाचा दृष्टिकोण. धाक, धास्ती, दरारा म्हणजे शिस्त ही त्यांची कल्पना असते.

शिस्तीबाबत जुन्या शिक्षकांच्याहि कांहीं कल्पना होत्या. लहान मुलांनीं हूं कीं चूं न करतां गप्प बसलें पाहिजे, अगदीं 'देवासारखें' ( कीं दगडा-सारखें ? ), जागचें हालायचें नाहीं, शिक्षक बोलत असतां बोलायचें नाहीं, विचारायचें नाहीं, 'हाताची घडी, तोंडावर बोट', टांचणी पडली तरी आवाज ऐकूं येईल अशी शान्तता नांदली पाहिजे, असा त्यांचा दंडक असे.

मोठ्या विद्यार्थ्यांच्या बाबतींत 'लष्करी' स्वरूपांची शिस्त राखण्यावर त्यांचा कटाक्ष असे. आणि असली 'शिस्त' राखण्यासाठीं खुर्ची, घोडी इ. सौम्य उपायापासून अनेक अघोरी उपायांचा अवलंब करण्यांत व यमराज्यांतील शिक्षांचा सौम्य मासला दाखविण्यांत जणूं त्यांचा हातखंडा असे. प्रत्येक ताल्या पंतोजीची स्वत:च्या शिक्षांत 'मौलिकता' राखण्याबद्दल अहमहमिका चाले. 'शाळेंतल्या पोरांना हा वाटे दुसरा यम' या उक्तीचें मर्म कळावयाला त्या जुन्या जमान्यांतल्या 'गुरु-चरित्रां'तील शिक्षाध्यायच ऐकले पाहिजेत !

## वर्गांतील शिस्त

वर्गांत जर शिस्त, शान्त – स्वस्थ वातावरण नसेल व विशिष्ट पद्धतीचा – चाकोरीचा विद्यार्थी अवलंब करणार नाहींत, तर शिक्षकाला काम करणें व मुख्याध्यापकांना शाळा चालविणेंच कठीण होऊन बसेल हें मात्र खरें आहे. वर्गांत पाऊल टाकतांच शान्तता प्रस्थापित करून कामाला अनुकूल असें वातावरण निर्माण करण्याची कला शिक्षकांनीं अभ्यासिली पाहिजे. आणि एकदां एका वर्गाची शिस्त बिघडली व वर्ग शिक्षकाच्या आटोक्याबाहेर गेला, कीं ती झळ सर्वच शिक्षकांना व इतर वर्गांनाहि लागते.

सामान्यतः शिक्षकांना जाणवणाऱ्या अडचणी व विद्यार्थ्यांच्या गैरशिस्तीचे प्रकार पुढीलप्रमाणें असतात.—

१. मुलें अभ्यासाकडे लक्ष देत नाहींत. त्यांचीं मनें अस्थिर झालेलीं असतात. लक्ष बावचळलेलें असतें.

२. मुलें आपसांत बोलतात व गोंगाट करतात.

३. दुसऱ्यांचीं पुस्तकें-वह्या यांची ओढाताण, फेंकाफेंक सुरू होते. चपला, पिशव्या इत्यादि दुसरीकडे सरकाविल्या जातात व पळविल्या जातात.

४. मुकाट्या मुकाट्या दुसऱ्यांच्या खोड्या काढल्या जातात.

५. शिक्षकांकडे इतरांच्या कागाळ्या खऱ्या वा खोट्या करून अभ्यासांत व्यत्यय आणण्यांत येतो, व सर्व वर्गाचें लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याचा विद्यार्थी प्रयत्न करतो.

वरील 'गैरवर्तणुकी'चीं व वर्गांतील गडबड – गोंधळाचीं जर आपण कारणें शोधूं लागलों तर तीं सामान्यतः पुढीलपैकीं कोणतीं ना कोणतीं तरी

असूं शकतात. तीं कारणें दूर झालीं तर शिस्तीचा प्रश्न वाटतो तितका अवघड नाहीं. आपल्या वर्गाची शिस्त बिघडत आहे असें दिसतांच शिक्षकानें चिडून न जातां त्या बिघाडाचीं कारणें शोधण्याचा प्रयत्न करणें व योग्य ती उपाययोजना करणें हेंच श्रेयस्कर ठरेल. निरीक्षण व आत्मनिरीक्षण हीं मोठींच साधनें आहेत.

## गैरशिस्तीचीं व गोंगाटाचीं कारणें

### १. सदोष भौतिक परिसर

शाळेची इमारत, भोंवतालचें परिसर, वर्गाची खोली, तिच्यांतील हवा व उजेड आणि वर्षाचें ऋतुमान या सर्वांचा परिणाम वर्गांतील अभ्यासावर, विद्यार्थ्यांच्या अवधानावर व कार्यशक्तीवर होत असतो. बाहेर गोंगाट चालू असेल, मोटारींचे कर्णकर्कश भोंगे किंचाळत असतील, हवेंत उष्मा वाढला असेल, खोलींत पुरेसा उजेड नसेल, कोठून दुर्गंधि येत असतील, बैठकीचा बाक असुखावह असेल, विद्यार्थ्यांची दाटी झाली असेल तर विद्यार्थ्यांचें लक्ष आपल्या कामाकडे न लागणें अगदीं नैसर्गिक आहे. त्याबद्दल विद्यार्थ्यांना जबाबदार धरणें अन्यायाचें ठरेल. या गोष्टीचें महत्त्व पुढें विवरिलें असल्यानें त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. निरामय वातावरण ही पहिली गरज आहे.

### २. सदोष वर्गरचना

वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित असेल तर स्वाभाविक रीतीनेंच शान्ततेचें पालन होऊं शकेल. तसेंच वर्गांतील विद्यार्थ्यांच्या कांहीं गरजा असतात. फळ्यावरचें दिसावें, तोंडावर उजेड येऊं नये, बोललेलें ऐकूं यावें, पुढल्या बाकावरच्या मुलाचें डोकें मध्यें येऊं नये, शेजारच्या मुलानें पुस्तकें, साधनें यासाठीं त्रास देऊं नये अशाहि गोष्टी वर्गांत शान्तता राहण्यास आवश्यक आहेत. वर्गांतील विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी जर समान नसेल, तरहि शिस्तीचे प्रश्न उद्भवतात. हुशार विद्यार्थ्यांच्या गतीनें चालल्यास सामान्य बुद्धीच्या मुलांचें लक्ष उडून ते गोंगाट करतात. कच्च्या विद्यार्थ्यांच्या चालीनें चालल्यास हुशार मुलांना खट्याळपणाला अवधि मिळतो.

### ३. विद्यार्थ्यांचीं व्यंगें

दृष्टिदोष व कर्णदोष यांमुळें विद्यार्थ्यांमध्यें अस्वस्थता निर्माण होते, व अभ्यासाकडे लक्ष लागत नाहीं. त्यांची योग्य व्यवस्था लागावयास हवी.

### ४. शिक्षकांचें व्यक्तिमत्त्व

शिक्षकांचें व्यक्तिमत्त्व आकर्षक असेल, व त्यांची अध्यापनाची तयारी उत्तम असेल तर इतर सर्व अडचणींवर मात होऊं शकते. शिक्षकांची अपुरी अर्धवट तयारी, अरोचक पद्धति याच गोष्टी प्रामुख्यानें वर्गांतल्या गोंगाटाला कारणीभूत असतात हें शिक्षक सोयीस्करपणें विसरतात. विद्यार्थ्यांच्या अनुभवाचा व पूर्वज्ञानाचा फायदा कसा करून घ्यावा, व त्यायोगें त्यांना गोडी कशी लावावी, आणि त्यांना कार्यमग्न कसें ठेवावें, त्यांसाठीं विविध तऱ्हा कशा हाताळाव्यात हें ज्यांना कळतें, आपल्या विषयाचें व तदनुषंगिक गोष्टींचें ज्यांना भरपूर ज्ञान असतें, आणि अध्यापनाच्या ओघांत भोंवतालच्या जीवनांतील घडामोडींशीं प्रस्तुत विषयांचा संबंध सहजगत्या जोडून त्याचा जिवन्तपणा ज्यांना न कळत पटवितां येतो, अशा शिक्षकांना शिस्तीचा प्रश्न कधींच जावणत नाहीं. उलट त्यांचा चटकन् प्रभाव पडतो. एकाच वर्गाला शिकवितांना भिन्नभिन्न शिक्षकांच्या बाबतींत भिन्नभिन्न प्रतिक्रिया विद्यार्थ्यांची आढळते त्याचें कारण याच गोष्टींत आहे. तसेंच, शिक्षकाची वृत्ति भाडोत्री नाहीं, त्याची स्वतःच्या विषयांत जशी तन्मयता असते, तशीच विद्यार्थि–जीवनाबद्दल आस्थेवाईक भावना आहे अशी विद्यार्थ्यांची श्रद्धा निर्माण झाली पाहिजे. नवशिक्या शिक्षकांच्या अंगीं–बोलण्याचालण्याच्या कांहीं विशिष्ट लकबी व खोडी असतात, त्या हास्योत्पादक ठरतात आणि खट्याळ विद्यार्थी मिस्किलपणें त्यांचा शिस्त बिघडविण्यास उपयोग करून घेतात. म्हणून आरंभीं आरंभीं स्वतःची बोलण्याचालण्याची ढब, हाताचे चाळे, पोशाखाची तऱ्हा इत्यादिबाबत जागरूक असावें.

शिक्षक जर चाणाक्ष असेल, मनाची चपलता त्याच्या ठायीं असेल तर त्याचें नियंत्रण प्रभावी ठरेल; वर्गांत अध्यापन करीत असतां त्याचें सर्व विद्यार्थ्यांवर सारखें लक्ष राहील, आणि खोडकर विद्यार्थ्याला आपण शिक्षकांच्या नजरेंतून सुटूं शकत नाहीं असा मनांतल्या मनांत धाक लागेल. दुसरें, विद्यार्थ्यांना वर्गांत कार्यव्यापृत ठेवण्याचा त्यानें यत्न केला पाहिजे.

विद्यार्थ्यांना जर काम नसेल तर ते वोलणार व गोंगाट करणार. विद्यार्थ्यांना आपल्या पाठांत गोडी वाटेल व ते त्यांत रंगून जातील अशी शिक्षकानें तयारी केलेली असावी. तसेंच विद्यार्थ्यांना झेपेल असेंच त्यांच्या ताकदीप्रमाणें सोपें, अवघड व कमी—अधिक काम त्यानें विद्यार्थ्यांना नेमून द्यावें. नेमून दिलेलें काम पार पडलेंच पाहिजे असा कटाक्ष ठेवावा, व कोणत्याहि चालढकलीला उत्तेजन देऊं नये.

पुष्कळदां शिक्षकांच्या आळसानें, अजागळपणानें, किंवा फाजील सलगीनें विद्यार्थी फाजील स्वातंत्र्य घेतात. शिक्षकांची तयारी नसेल, ते आळसावले असतील, पाठ कसा तरी घेऊं लागतील, किंवा मध्येंच विद्यार्थ्यांना खोंचक बोलून व नसत्या गोष्टी काढून त्यांना खिजवतील तरे शिक्षक आपलें वजन गमावून बसतील. पाठांत विनोद आणण्याच्या मोहानें शिक्षकांना वाटेल त्या कोट्या व मस्करी करण्याचा मोह होतो. आपल्या स्थानाचा, सत्तेचा, व वेळेचा तर अशानें शिक्षक दुरुपयोग करतातच, पण आपलें वजन गमावून बसतात.—सुटलेल्या बाणाप्रमाणें तें कायमचें हरपतें.

### ५. सदोष गृहसंस्कार

विद्यार्थ्यांचें गृहजीवन त्यांच्या मानसिक जीवनाचा मार्ग व घडण बनवीत असतें. घरांतलें सदोष वातावरण, अनुकरणानें झालेले कुसंस्कार, फाजील लाड व जाचक बंधनें, किंवा अज्ञानानें वा औदासीन्यानें झालेला संस्कारांचा सर्वतोपरी अभाव—यामुळें शान्त व सुव्यवस्थित अशी वागणूक तर मुलांकडून होत नाहींच, पण उच्छृंखल वृत्तींना ऊत येऊन नियमभंगाकडे, गैरवर्तणुकीकडे कल होतो. अशा विद्यार्थ्यांचा प्रश्न तडकाफडकी सुटत नसतो; त्याचा स्वतंत्रपणें विचार करावा लागेल.

### नियंत्रणांचा कडकपणा

शान्त व सुव्यवस्थित वातावरणासाठीं कांहीं नियम-नियंत्रणांची गरज आहे. पण त्यांचा अतिरेक शिस्तीला मारक ठरतो. जरूर त्या नियमांची आवश्यकता सर्वसामान्य विद्यार्थ्यांना पटते, पटवून देतां येते; बंधनांत सुरक्षितता आहे हें त्यांना जाणवतें. पण अनेकदां कोणते नियम पाळणें आवश्यक आहे, हेंच त्यांना कोणी सांगत नाहीं. हे नियम वास्तविक साध्या शिष्टाचाराचेच असतात. मध्यें बोलूं नये, दुसऱ्याला आपलें म्हणणें मांडण्यास

सांधि द्यावी, आपली पाळी येईपर्यंत थांबावें, आपल्या वागणुकीचा इतरांना उपसर्ग होऊं देऊं नये, इत्यादि—या साध्या गोष्टी असतात. वर्षाच्या आरंभीं याची विद्यार्थ्यांनां माहिती देऊन संवय जडेपर्यंत त्यांच्या पालनाबाबत दक्षता ठेवली तर वर्गानियंत्रणाचा प्रश्न सहसा उद्भवणार नाहीं.

हे नियम थोडे व विधायक असावेत; अकरणात्मक व निषेधात्मक ते नसावेत. कारण प्रतिबंध झाला कीं त्याविरुद्ध बंड करण्याची स्वाभाविक प्रवृत्ति होत असते, हा नियम लक्षांत ठेवावयास पाहिजे. गप्प बसा, बोलूं नका, घाण करूं नका, असल्या सूचनांपेक्षां 'आतां अमुक करा', 'अमुक रीतीनें ही गोष्ट व्हावी' अशी सूचना देणें श्रेयस्कर होय.

वर्गानियंत्रणाची कला आत्मसात् न करतां आल्यानें शिक्षकांना केवळ अपयशच येतें असें नव्हे तर आपल्या व्यवसायावरची श्रद्धाच उडते, आणि मानसिक अस्वस्थतेचें किंवा उदास वृत्तीचें नीरस जीवन त्यांच्या वांट्यास येतें. हा शाप टाळण्याचा प्रयत्न आरंभापासून करणें, आत्मपरीक्षण करणें, व कष्टानें ही विद्या शिकणें हाच यशस्वी जीवनाचा मार्ग.

वर्गानियंत्रण आणि त्यांतून साधावयाची विद्यार्थ्यांची प्रगति यांना शिक्षा च पारितोषिकें कितपत साहाय्य करूं शकतील याकडे आतां वळूं.

• • •

: १४ :

# शिक्षा आणि पारितोषिकें

## शिक्षांची आवश्यकता

सुव्यवस्थित, सुखी आणि स्वास्थ्ययुक्त समाजांत गुन्ह्यांचें प्रमाण अति अल्प असतें; ज्याला जें हवें तें मिळालें तर समाजांत चोरी, लबाडीसारखे गुन्हे सहसा होणार नाहींत असें मानलें जातें; पण तसें व्हावयास व्यक्ति संयमी हव्यात; सामाजिक नीतीच्या बंधनांत त्यांनीं स्वतःचा आचार व मन सुनियंत्रित केलेलीं हवींत. तसेंच, शरीराला योग्य अन्न व वातावरण मिळेल—कफ, वात, पित्त जर साम्यावस्थेंत राहतील तर औषधोपचाराची गरज नाहीं; कारण विकृतीचेंच भय नाहीं—तद्वतच, शाळेंत आदर्श वातावरण असेल, उत्कृष्ट हवेशीर इमारत, अभ्यासाला विपुल साधनें, ज्याला त्याला आपल्या कुवतीप्रमाणें व रोचक वाटेल असें काम, नैसर्गिक प्रवृत्तींना भरपूर अवसर, आत्माविष्काराला वाव, या सर्वांना योग्य दिशेनें उन्नत करणारे प्रभावी शिक्षक, विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाची योग्य बूज आणि त्यांना जबाबदारींत योग्य असा वांटा—अशा सर्व आदर्श गोष्टी जुळून आल्या तर शाळेंतील गुन्ह्यांचें व अपराधांचें प्रमाण जवळ जवळ लुप्त होईल, आणि शिक्षांना जागाहि राहणार नाहीं. कारण विद्यार्थ्यांत योग्य दिशेनें जर नैतिक गुणांची वाढ होत असेल, जबाबदारीची जाणीव आली असेल, स्वतःचें कल्याण व इतरांच्या हक्कांबद्दल समजूतदारपणा व उदार धोरण यांनीं ते स्वतःच्या बालिश, क्षुद्र प्रवृत्तीला आळा घालावयाला शिकत असतील, आणि स्वतःच्या कर्तव्यकर्मांना प्रवृत्त होत असतील—थोडक्यांत त्यांचीं मनें विकोप, निरोगी व निर्मळ असतील तर कटु उपचारांची गरजच काय!

पण तसें प्रत्यक्षांत असत नाहीं. मुलें वयानें लहान असतात. त्यांच्यांत राजसी व तामसी प्रवृत्ति बलवत्तर असतात. स्वार्थ-लोभ, स्वतःच्या पराक्रमाच्या कल्पना, संचय-प्रवृत्ति, आत्मगौरवाची लालसा, युयुत्सा इत्यादि

सहजप्रेरणा प्रबळ असतात. त्यांचें दमन-शमन करावयाला ते शिकलेले नसतात. घरांतील वातावरण अनेकदां संस्कारशून्य असतें. समाजांतील अनेक गोष्टींचा–सिनेमांतील भडक प्रसंगांचा, रहस्यकथांतील साहसांचा, कानावर येणाऱ्या 'चतुराई'च्या कथांचा त्यांच्या मनावर पगडा बसतो. त्यामुळें खोड्या करण्याकडे त्यांचा कल होतो; कधीं ते शाळेला 'बुट्टी' देतील आणि जवळपासच्या आंबराईत वा नदीतीरावर स्वच्छंदानें विहार करतील; अपराध वा न्यून लपविण्यासाठीं खोटें बोलतील; एखाद्या विद्यार्थ्याला नाहक चिडवतील; खजाळपणा करतील; किंवा याहून गंभीर असे गुन्ह्याचे प्रकार कांहीं थोड्यांच्या हातून घडतील. शाळेचें वातावरण सु–स्थ, शान्त राखावयाचें असेल, नैतिक मूल्यांची जोपासना करावयाची असेल तर शाळेंतील या बाल-समाज–कंटक तील दुष्ट संवर्यीना व प्रवृत्तींना आळा बसला पाहिजे, व त्यांचें निर्मूलनहि झालें पाहिजे. त्यासाठीं कांहींना कांहीं उपाय पाहिजेतच. शाळेबाहेरच्या समाजांत जोंपर्यंत 'राम-राज्य' नाहीं तोंपर्यंत ( आणि मनुष्यांतील उपजत प्रवृत्ति आजच्याप्रमाणें आहेत तोंपर्यंत कदाचित् ) शिक्षांची गरज आहेच. आधुनिक शिक्षणांत शिक्षांना स्थान नाहीं असा एक अपसमज अनेकांचा आहे. समाज म्हटला कीं 'शासनसंस्था' व 'दण्डयोजना' आलीच. फक्त त्यांचें स्वरूप रानटी व सुसंस्कृत समाजांत वेगवेगळें असेल एवढेंच.

## शिक्षेचें मानसशास्त्र

शिक्षांची उभारणी भीतीवर झालेली असते. शिक्षा म्हणजे शारीरिक वा मानसिक वेदना देणें, दुःख देणें. दुःख टाळण्याकडे सर्वांचा स्वाभाविक कल असतो. म्हणून दुःख वा वेदना यांचे प्रसंग टाळण्यासाठीं शिक्षेच्या भीतीनें मनुष्य कांहीं गोष्टींपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो. नवीन गोष्टी शिकण्याच्या बाबतींत थॉर्नडाइक या शास्त्रज्ञानें जे तीन सिद्धान्त शोधून काढले आहेत त्यांतील एक असा : विशिष्ट उत्तेजनेला साद दिल्यानें जर सुखद संवेदना अनुभवास येत असतील तर त्या उत्तेजनेच्या शक्तीच्या प्रमाणांत प्रतिक्रियांची तीव्रता वाढते. उलट, प्रतिकूल वा दुःखदायक संवेदना झाल्यास प्रतिक्रिया कमी होत जाते. परिणामांच्या अनुरोधानें माणसाची कार्याकडे प्रवृत्ति वा त्यापासून निवृत्ति होत असते. अमुक एक गोष्ट केली कीं

अमुक शिक्षा होते असें कळल्यावर त्या गोष्टी करण्याची भीति वाटते. या दृष्टीनें शिक्षांचें कार्य 'अकरणात्मक' आहे. भीति या मनोविकाराचें स्वरूपच तसें आहे. त्यामुळें कार्य-निवृत्ति होईल. खोटें बोलण्यानें शिक्षा होते म्हणून फार तर तो खोटें बोलणें वर्ज करील; पण म्हणून सत्यप्रीति त्यांच्या ठिकाणीं उद्भवणार नाहीं. याउलट, प्रशंसा–पारितोषिकांमध्यें साक्षात् कार्य-प्रवृत्त करण्याचें विधायक सामर्थ्य असतें. पण त्यांचा उपयोग मर्यादितच असतो. सर्वांनाच प्रशंसेची हांव नसते, अपेक्षा नसते, व शक्यता नसते. गौरवाची व पराक्रमाची मोहिनी सर्वसाधारण माणसांना पडत नाहीं. शालेय जीवनांत तींच तीं मुलें पारितोषिकें पटकावतांना दिसतात याचें कारण तरी हेंच. पण बडग्याची भीति टाळण्याकडे सर्वांचा कल असतो, व भीतीचें अस्त्र प्रभावी ठरतें.

## शिक्षेचे हेतु

अपराध्यांना शासन करण्याची प्रवृत्ति मनुष्यस्वभावांत बद्धमूल आहे. म्हणून सामाजिक शास्त्रांत व नीतिशास्त्रांत त्याबद्दल विचारहि खूप झाला आहे. रानटी समाजांत ( वा प्रतिष्ठित समाजांतहि ) विद्ध मनुष्य आक्रमकावर प्रत्याघात करतो. 'जशास तसें' किंवा बदला-सूड अशी भावना असते. सुशिक्षित मनुष्य तीच गोष्ट न्यायसंस्थेमार्फत करतो. हेतु असा कीं त्यांत वैयक्तिक मनोविकाराचा प्रभाव नसावा, अपराधाच्या प्रमाणांत निःपक्षपाती न्याय व्हावा. गुन्हेगारांना शिक्षा करण्यांत सामाजिक नियमनाचें महत्त्व प्रस्थापित करण्याचाहि एक हेतु असतो. तिसरा हेतु, गुन्हेगारांना बाजूस काढून गुन्ह्यांची पुनरावृत्ति टाळावी व इतरांचें संरक्षण व्हावें. चौथा हेतु, गुन्हेगाराला भीति बसावी, व इतरांनीं त्यांपासून धडा शिकावा व सर्वांनींच त्यापासून परावृत्त व्हावें. पण याहिपुढें जाऊन गुन्हेगारांत सुधारणा व्हावी हाच शिक्षकांचा हेतु सर्वमान्य झाला आहे. हीच खरी विधायक दृष्टि असून माणसांतील 'सत्' अंशावरील श्रद्धेंतून ती निर्माण झाली आहे. आजच्या सुसंस्कृत समाजांत याच दृष्टीनें गुन्हेगारांकडे पाहिलें जातें व त्यांचें आन्तरिक परिवर्तन होईल म्हणून प्रयत्न केला जातो.

अशी सुधारणा व्हावयाची असेल तर गुन्ह्यांच्या प्रवृत्तीचें बीज कशांत आहे, यांचेंच निदान करावें लागेल; आणि त्या बीजांचें निर्मूलन करून गुन्ह्याचा संभवच नाहींसा करण्याची परिस्थिति निर्माण करावी लागेल.

विद्यार्थ्यांतील सुधारणा म्हणजे तरी काय! त्यांना ताळ्यावर आणणें म्हणजे तरी काय! समाजांत व्यक्तीनें एका विशिष्ट पद्धतीनें वागावें, कांहीं ठराविक नियमांचें आचरण करावें, म्हणजे शान्तता व सुव्यवस्था राहून प्रत्येकाला आपल्या प्रगतीसाठीं काम करतां येतें, अशी सर्वांची, समाज-शास्त्यांची अपेक्षा असते. पण याउलट व्यक्तीच्या ठिकाणच्या स्वाभाविक प्रेरणा तिला आपल्या स्वार्थाकडे, मोठेपणाकडे, स्वतःचें महत्त्व प्रस्थापित करण्याकडे खेचीत असतात. तेव्हां या प्रवृत्तींना कह्यांत ठेवावयास शिकविणें, त्यांची गरज समजावून देणें, जाणीव उत्पन्न करणें, रूढ सदाचाराच्या नियमांशीं आपलें वर्तन सुसंगत होईल असा आचार त्यांच्या अंगवळणीं पाडणें, शिस्तबद्ध कामाची संवय लावणें व आवड निर्माण करणें, आणि त्यांतून उच्च ध्येयांची दृष्टि मिळवून देणें, हीं शिक्षांचीं उद्दिष्टें असावीं लागतील. मनःपूत स्वैर आचार, आणि सुव्यवस्थित समाजव्यवस्था यांतील अंतर भरून काढावयाचें, आणि व्यक्तिजीवन व समाजजीवन यांत 'ताल', 'संवाद' निर्माण करावयाचा—हाच त्यांचा प्रधान हेतु आहे. आणि अखेर अशा तऱ्हेनें अंगीं बाणलेली शिस्त एक साधन म्हणून उपयोगी पडली पाहिजे.

शाळेंतील शिक्षांचा हेतु शिक्षणाच्या ध्येयास धरून असावयास पाहिजे असेल तर त्यांचा उद्देश 'सुधारणा'—वागण्याची योग्य दृष्टि देणें, प्रवृत्तींना वळण लावणें हाच ठेवावा लागेल. दंडित व्यक्ति मानखंडना झाल्यानें अधिक समाजद्रोही बनते. तिरस्कारानें व अवमानानें तिची सूडबुद्धि मात्र प्रज्वलित होते, प्रतिबंधक उपाय हे तात्पुरते गुणकारी असतात. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या तर शाळेंतल्या शिक्षांचा उगम विद्यार्थ्यांबद्दलच्या प्रेमांत झाला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या हृदय-प्रवृत्तींचें 'शोधन' त्यांत होऊन दुष्ट वा अनिष्ट प्रवृत्तींचें निर्मूलन होईल आणि सदाचाराची आवड व प्रेरणा निर्माण होईल यावर त्यांचा कटाक्ष पाहिजे. हा दृष्टिकोण स्वीकारला तर गुन्हा घडला कीं शिक्षा झालीच पाहिजे, मग त्याचें स्वरूप कितीहि क्षुद्र असेना, किंवा त्याचें कारण कांहीं का असेना, या विचारसरणीला थारा नाहीं. उत्कृष्ट शालेय संचालनांत वा प्रशासनांत कमींत कमी नियम व शिक्षा असणें हीच त्याच्या सरसतेची कसोटी होय. विद्यार्थ्यांच्या गैरवर्तनामागें त्यांची विशिष्ट मनाची ठेवण, घरगुती वातावरण, त्याच्या भोंवतालचें वातावरण

ह्या गोष्टी असतात. त्याचा हेतु, त्याचें वय, समजशक्ति, त्याला मिळालेली चेतवणी इ. गोष्टी लक्षांत घ्यावयास पाहिजेत. विशिष्ट परिस्थितींत कसें वागणें इष्ट हें समजावून सांगावें लागेल, पटवून द्यावें लागेल. नुसत्या छडीनें वा चपराकीनें स्वभावपरिवर्तन होत नसतें. उलट आपल्याला अन्याय झाला अशीच अपराध्यांची धारणा होऊन बसते; आणि मग सुधारणा अशक्य होते.

## सुधारणानुकूल मनोवृत्ति

केवळ शिक्षांच्या भीतीनें सुधारणा होत नाहीं, याचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. शिक्षा ( अथवा जुना शब्द ' दण्ड ' ) केल्यामुळें होणाऱ्या वेदनांतून सुधारणेस अनुकूल अशी मनोवृत्ति निर्माण व्हावयास शिक्षांचा संबंध मनाशीं जाऊन पोहोंचला पाहिजे. विद्यार्थ्यांना आपली खरोखरच चूक झाली असें वाटून त्याबद्दल लज्जा वाटणें, दुःख व पश्चात्ताप वाटणें या गोष्टी आवश्यक आहेत; आपल्या हातून असें वर्तन पुनः होतां कामा नये असें त्यास मनःपूर्वक वाटून तसा त्यानें यत्न करण्यांची प्रतिज्ञा केली पाहिजे. अशी त्यांच्या अंतरंगांत कांहीं खळबळ निर्माण होऊन त्यांतून मन विशुद्ध–निर्मळ होऊन तावून सुलाखून निघालें पाहिजे. प्रौढ व जाणत्या विद्यार्थ्यांच्या बाबतींत थोड्याशा बोलण्याचा परिणाम होऊं शकतो याचें कारण हेंच, कीं आत्मभावना दुखावली गेल्यानें स्वतःच्या गैरवर्तनाची शरम त्यांना वाटूं लागते, व तसल्या प्रसंगाची पुनरावृत्ति सहसा त्यांच्या हातून होत नाहीं. शिक्षांच्या बाबतींत गुन्ह्याच्या स्वरूपापेक्षां विद्यार्थ्यांच्या मनाची संवेदनाक्षमता, हळवेपणा इत्यादि गोष्टी महत्त्वाच्या असतात. कारण हळव्या विद्यार्थ्यांना थोडी शिक्षा देऊनहि काम भागतें. अनेकदां गुन्ह्याची वा गैरवर्तनाची नुसती जाणीवहि खेद वा पश्चात्ताप निर्माण करण्यास पुरेशी होते आणि अशा वेळीं क्षमा केल्यानेंच अपराध्यास मेल्याहून मेल्यागत होतें.

## परिणामकारक शिक्षांचीं लक्षणें

वरील सर्व गोष्टी लक्षांत घेतल्यास शिक्षा परिणामकारक घडावयास आपण शिक्षेस पात्र आहोंत, आपल्याला अन्यायानें वा सूडबुद्धीनें छळण्यांत येत नाहीं अशी अपराध्यांना जाणीव झाली पाहिजे. तसेंच, शिक्षेच्या न्याय्यतेबरोबरच गुन्ह्याचें स्वरूप व शिक्षा यांच्या प्रमाणांत मेळ असला पाहिजे. क्षुल्लक

गुन्ह्यास अवास्तव शिक्षा झाल्यास अपराध्यास अन्याय झाल्यासारखें वाटतें. त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांचें वय, शारीरिक शक्ति, आणि मनःस्थिति यांचाहि विचार करावयास पाहिजे. शिक्षा देतांना शिक्षकाची मनोवृत्ति निर्विकार असली तर तिची न्याय्यता परिणामकारक रीतीनें पटते. अपराध वा गुन्हा झाल्याबरोबर लगेच जर शिक्षा झाली तर तिचा उपयोग होतो. कालगतीवर अपराधाची चौकशी व शिक्षा ढकलल्यास त्यांचें गांभीर्य अपराध्यास वाटेनासें होतें.

## शिक्षांचे प्रकार

### १. नैसर्गिक परिणाम अथवा कर्मविपाक

हर्बर्ट स्पेन्सर इत्यादि नीतिमीमांसकांनीं अशी विचारसरणी प्रतिपादन केली आहे कीं, व्यक्तीला आपल्या कृतकर्मांचें फळ कालाच्या ओघांत मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. प्रत्येक गैरवर्तनाला व दुष्कृत्याला कटु फळ येणार, व अपराध्याला तें भोगावें लागणार अशी ईश्वरी योजनाच आहे. तेव्हां मानवानें मध्यें पडण्याची, त्यांत ढवळाढवळ करण्याची, व आपली तटस्थता सोडण्याची गरज नाहीं. अशा तऱ्हेनें मिळणारें फळ हें हमखास वा निश्चित असतें; तें अपराधाच्या समप्रमाणांत असतें, आणि विशिष्ट अपराधाला विशिष्ट शिक्षा अशी एकसूत्रता तिच्यांत प्रत्ययास येते. तसेंच गुन्हा घडतांच ती तात्काळहि होते. त्या सर्व गुणांमुळें निसर्गाची शिक्षा होतांच डोळे तात्काळ उघडतात. अन्यायाची कुरकूर करण्यास जागा नसते. त्यामुळें ती शिक्षा परिणामकारक ठरते. या विचारसरणीला 'नैसर्गिक परिणामाची शिक्षापद्धति' अथवा 'कर्म-विपाक-वाद' असें म्हणतां येईल. दिव्याला हात लावतांच हात भाजणें, थंडींत वावरल्यास पडसें येणें, अति खाण्यानें आजारी पडणें, भलत्या ठिकाणीं उडी मारून हातपाय मोडून घेणें, हे व असे प्रकार पाहून मनुष्य विचारपूर्वक संयम व शिस्त शिकतो, असें त्यांचें म्हणणें आहे.

पण ही विचारसरणी सर्वस्वी निर्दोष नाहीं. विशिष्ट पदार्थांच्या वा कृत्यांच्या गुणधर्मांचे अमुक परिणाम होतात हें जर अनुभवानेंच शिकावयाचें असेल तर शाळेची व समाजबंधनांची, व सर्वच नियंत्रणांची गरज काय? पण त्याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे अमुक गोष्टीचा अमुक परिणाम हें कळण्याची पात्रता तरी बालकांत असते काय? शिवाय, निसर्ग वाटतो तसा निःपक्षपाती आहेच असें

नाहीं, व लगेच तो शिक्षा करतो असेंहि नाहीं. आंत जाग्रणाचें, धूम्रपानाचें, अनियमित आहाराचें फळ लगेच मिळेल असें नाहीं. झाडावरून पडल्यास इजा होईलच हें सर्वांच्या बाबतींत खरें नाहीं. मुख्य म्हणजे सामाजिक नियमांच्या व विशिष्ट संवयीसाठीं योजलेल्या पद्धतींच्या भंगाला या पद्धतीनें शिक्षा मिळेल ती इतक्या कालावधीनें कीं त्या वेळीं सुधारण्याचा संभवाहि नष्ट झाला असेल. बैल गेला नि झोपा केला अशीच स्थिति व्हावयाची. उशिरां येणें, शाळा बुडवणें, गृहपाठ न करणें, खोटें बोलणें—या व असल्या सामाजिक व नैतिक अपराधांच्या बाबतींत कर्मविपाक अपुरा व लुला आहे. शिवाय, शाळेचें वातावरण इतकें गुंतागुंतीचें असतें, कीं तेथें अशा परिणामांची वाट पाहात बसल्यास शाळेचें कार्य व उद्दिष्ट असफल होईल. या नीतिवाद्यांचा ग्राह्य मुद्दा एवढाच कीं शिक्षांमध्यें लहरीपणा, अवास्तवपणा, व अनिश्चितता नसावी; व त्यांची न्याय्यता व अपरिहार्यता अपराध्यांना पटावींत.

### २. देहदंड

मानसशास्त्राच्या अभ्यासाबरोबर आणि नैतिक कल्पनांच्या विकासाबरोबर शरीरदंडाविरुद्ध जोराची प्रतिक्रिया सर्वच देशांत झाली आहे. एके वेळीं त्यांचें प्रस्थ केवढें होतें हें पूर्वी आलेंच आहे. आतां कित्येक देशांतून ही शिक्षा कायद्यानेंच रद्द करण्यांत आली आहे; तर कांहीं देशांत अपरिहार्य कारणासाठीं शारीरिक शिक्षेचा अधिकार मुख्याध्यापकांना देण्यांत आला आहे. आपल्याकडे सर्वसाधारण शिक्षकांना ही शिक्षा करण्याला मनाईच आहे.

शारीरिक शिक्षांच्याविरुद्ध होणारी प्रतिक्रिया ही या शिक्षा परिणामदृष्ट्या असफल होतात या एकाच कारणानें नाहीं. शरीरदंडानें शरीराला वेदना होतात, आणि मनांत शिक्षा करणाऱ्याबद्दल त्वेष व चीड मात्र निर्माण होऊन बंडखोर प्रवृत्ति वाढते. दडपलेले मनोविकार अन्य रूपानें अनिष्ट रीतीनें उफाळून उठतात हें वेगळेंच. तसेंच त्याच त्या शिक्षांनीं विद्यार्थी कोडगे बनतात, इत्यादि गोष्टी त्यांची निष्फलता दाखविण्यास पुरेशा आहेत.

पण शारीरिक दंडाला जोराचा विरोध आहे तो बालकाबद्दल आणि मानवाबद्दल वाटणाऱ्या आदराच्या भावनेमुळें. शारीरिक दंडाचा अवलंब करून शिक्षा देणारा व घेणारा दोघेहि पशुतुल्य ठरतात, व हा एक प्रकारचा अधःपात आहे, अमानुषता आहे, हा विचार अनेकांनीं जोरानें पुरस्कारला आहे.

शिक्षणाचा खरा अर्थ संस्कार असेल तर शिक्षेची भीति निर्माण करणें हें शिक्षणच नव्हे.

पण अपवादादाखल परिस्थितींत या शिक्षेचा अवलंब करावा असें मानणारे कांहीं आहेतच. मानवांत 'पशुत्वा'चा अंश आहे, तो नाहींसा करण्याला त्यांचा उपयोग होतो असें ते म्हणतात! कांहीं विद्यार्थी बेरड व बेरके असतात, अपराध वा गैरवर्तन म्हणजे कांहीं अचाट शौर्याचें कृत्य असें त्यांना वाटतें. अशांचा नक्षा उतराविण्यास व त्यांची रग जिरवण्यास फटक्यासारखी शिक्षाच पाहिजे असें ते म्हणतात. शारीरिक शिक्षा झाल्यानेंच त्यांना शरम वाटते, आणि 'मानसिक तृप्ति' मिळते. केवळ गंभीर स्वरूपाच्या नैतिक गुन्ह्यासाठीं त्यांचा अवलंब करावा असें मात्र त्यांचें म्हणणें आहे. अशा शारीरिक दंडाच्या शिक्षा अत्यंत काळजीपूर्वक दिल्या जाव्यात; त्या चारचौघांत नव्हे, पण एका बाजूला आणि कोणा तरी प्रौढाच्या साक्षीनें द्याव्यात; शरीराच्या मर्मस्थानावर प्रहार होणार नाहीं असें पाहावें; वाटेल त्या साधनाचा उपयोग त्यासाठीं करूं नये; आणि शिक्षा करणाऱ्यानें मनाचा तोल सुटूं देऊं नये इत्यादि पथ्येंहि त्यासाठीं सुचविलीं जातात.

शारीरिक दंडाचा यत्किंचितहि अवलंब न करतां विद्यार्थ्यांना सुधारतां येईल कीं नाहीं हा श्रद्धेचा व स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग आहे. वास्तविक शाळेचें सामुदायिक जीवन व वातावरण असें असावें कीं गुन्ह्यांना अवसर मिळणार नाहीं. अतिशय नाजुक व गंभीर गुन्ह्यांना देह-दंडापेक्षां चिकित्सा-पद्धति व प्रवृत्तींचें शोधन हाच मार्ग उपयुक्त ठरेल; आणि गुन्हेगारीकडे प्रवृत्ति असणारांना अलग करणें व वेगळी उपाययोजना करणें हाच रास्त मार्ग होय.

### ३. कानउघाडणी

खरें म्हटलें तर सौम्य, प्रेमळ पण निश्चयी शब्दांनींच पुष्कळसें काम भागतें, व भागावें. कित्येकदां तर नुसत्या नजरेनें, कपाळावरच्या आंठीनें, काम होतें. पण जिव्हा हेंहि एक शस्त्र आहेच; आणि अनेकदां शारीरिक इजेपेक्षां तें प्रभावी असतें; म्हणूनच त्याचा उपयोग जपून करावयास हवा. पाठीवरचे वळ विरतात, पण हृदयाच्या जखमा भरून येत नसतात, हें ध्यानांत घेऊन उपहास, वक्रोक्ति, विडंबन यांचा अतिरेक शिक्षकांनीं टाळावा. विद्यार्थ्याला

एका बाजूस बोलावून, त्याचा अपराध समजावून सांगून, त्याच्यावर विश्वास टाकून त्याला चांगल्या गोष्टीस प्रवृत्त करणें हें कार्य शिक्षकाला आपल्या बोलण्यानें साधतां यावें. शिक्षकानें आपली पायरी सोडली नाहीं, आणि विद्यार्थ्याची स्वाभिमानाची भावना न दुखवितां ती योग्य रीतीनें चेतवली तर शिक्षकाचा अधिकार सहज मानला जाईल.

### ४. उभें करणें व वर्गत्याग

शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें अगदीं सौम्य अशाच या शिक्षा आहेत. विद्यार्थ्यांना उभें राहण्यांत जर कमीपणा वाटत असेल, यांत कांहीं मानहानि आहे अशी जाणीव असेल तर ती परिणामकारक होईल. तीच ती शिक्षा त्याच त्या विद्यार्थ्यांना दिल्यानें त्याचें महत्त्व उरत नाहीं हें ध्यानांत धरलें पाहिजे. तसेंच वर्गांत उभे करतांना, भिंतीकडे तोंड करून वा अशाच तऱ्हेच्या विचित्र रीतीनें उभे करून विद्यार्थ्यांची जी मानखंडना करण्यांत येते ती मानसिक दृष्ट्या अत्यंत अनिष्ट परिणाम घडविते हें कटाक्षानें ध्यानांत ठेवावें. वर्गांतून बाहेर काढणें ही अशीच निष्फळ व अनिष्ट शिक्षा आहे. तीमुळें विद्यार्थ्यांचा अभ्यास बुडविण्याला शिक्षकच कारणीभूत होतात; किंवा बाहेर मोकाट उनाडण्यास तीमुळें विद्यार्थ्यांना अवसर मिळतो. खोडकर विद्यार्थ्याला इतरांपासून अलग जरूर काढायला हवें, पण तें वर्गांतच. आणि इतर विद्यार्थ्यांना त्याच्याकडे मुळींच लक्ष न देण्याला बजावून. शिवाय, लेखनकामाच्या वेळीं योग्य त्या सवलती देण्याची समंजसपणाची दृष्टि ठेवावी.

### ५. स्थानबद्धता

शाळेच्या वेळेव्यतिरिक्त शाळेंत थांबविलें जाणें ही विद्यार्थ्यांना एक प्रकारचा कैदच वाटते. उशीरां येणें, गृहपाठ न आणणें, वर्गांत खोड्या करणें इत्यादि अपराधांसाठीं त्याचा अवलंब करण्यांत येतो. अनेकदां त्या वेळीं कांहीं तरी अभ्यासहि नेमून दिला जातो. अशा तऱ्हेच्या शिक्षेविरुद्ध अनेक आक्षेप घेण्यांत येतात. शाळेबद्दलची घृणा त्यामुळें निर्माण होते, शिक्षा भोगीत असलेल्या मनःस्थितींत केलेल्या कामाबद्दल अरुचि निर्माण होते, शिक्षकांनाहि स्वतःला डांबवून ध्यावें लागतें; आणि अनेकदां पालकांची गैरसोय होऊन पालकांना शिक्षा घडते.

पण बालकांच्या बाबतींत ही शिक्षा पुष्कळच निरागस आहे, व उपकारकहि ठरते. संवगड्यांबरोबर खेळण्यासाठीं त्यांचा जीव तळमळत असतो; आणि आपण एखाद्या हक्काला वा लाभाला मुकणें म्हणजे सामाजिक दृष्ट्या संवगड्यांच्या दृष्टीनें आपण हीन ठरणें ही बोंचहि त्यांत असते. त्यांतच जर कांहीं काम न करतां स्वस्थ बसण्याची खोडकर विद्यार्थ्याला शिक्षा केली तर उपयुक्त ठरते असाहि अनुभव आहे. एक प्रकारें आपल्या कृत्यांचा हा स्वाभाविक परिणाम आहे हें विद्यार्थ्यांना कळून येतें. 'कर्मविपाक-वादा'स अनुसरून नव्या विचारप्रणालींत या पद्धतीचा स्वीकार झालेला आहे.

### ६. शारीरिक परिश्रम

जमीन खणणें, क्रीडांगणावर फेऱ्या घालणें इत्यादि शारीरिक श्रमाच्या शिक्षांचा कांहीं वेळां अवलंब करण्यांत येतो. खोडकर विद्यार्थ्यांची मस्ती जिरविण्यास त्यांचा कांहीं वेळां उपयोग होतो. आपण 'गुन्हेगार' आहोंत याचें प्रदर्शन होणार हा विचारच बोचक ठरून अपराधी शरामिंधे होतात. पण स्थळ-काळ व व्यक्ति या सर्वांचा योग्य समन्वय त्यांत व्हावयास पाहिजे.

### ७. आर्थिक दंड

आर्थिक दंडाची शिक्षा ही विद्यार्थ्यांना नसून पालकांनाच आहे हें तर उघड आहे. पालकांना विद्यार्थ्यांच्या वागणुकीला आपण कसे जबाबदार आहोंत याची चुणूक कळण्यास कदाचित् तिचा उपयोग होईल. विद्यार्थ्यांच्या हातून पुस्तकें, फर्निचर इत्यादींची जर हानि व मोडतोड झाली, तर असा दंड समर्थनीय ठरेल.

### ८. स्थानभ्रष्टता व लाभत्याग

शालेय जगांत एका छोट्या समाजाचा घटक या नात्यानें विद्यार्थी कांहीं हक्क उपभोगतात. तसेंच स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर ते कांहीं अधिकाराच्या व मानाच्या जागा आणि चिन्हें प्राप्त करून घेतात. शालेय निवडणुकांत मतदान करणें, निवडणुकीला उभें राहतां येणें, विशिष्ट छंदांत वा संघांत भाग घेतां येणें, निरानिराळ्या प्रमुख पदांचा अधिकार असणें वगैरे गोष्टी असूं शकतात. अपराधी विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानावरून वा अधिकारावरून तात्पुरतें कमी करणें; विशिष्ट लाभापासून वंचित करणें ही एक मोठीच शिक्षा घडते.

### ९. उद्घोषण

विद्यार्थ्यांच्या अपराधाची जाहीर घोषणा करून त्यांना लाजविणें हा एक प्रकार कांहीं ठिकाणीं अवलंबितात. वर्गांतल्या वर्गांत विद्यार्थ्यांचें आपसांतलें भाषण, त्यांचें हास्योत्पादक लिखाण, इत्यादि सर्व वर्गाला विदित करून त्याला वेडावणें व लाजाविणें हा एक मार्ग. पण सर्व वर्गाच्या शिस्तीच्या व शिष्टाचाराच्या कल्पना सुदृढ असतील तरच ही पद्धति समाजमताचें दडपण आणण्याच्या दृष्टीनें प्रभावी ठरते. नाहींपेक्षां भुताहातीं कोलीत दिल्यासारखें होऊन खोडसाळपणाला प्रोत्साहन दिल्यासारखें व्हावयाचें. अपराधाची घोषणा सर्व विद्यार्थ्यांसमोर करणें मानसशास्त्रदृष्ट्या अपायकारक होय. त्यामुळें हळुवार विद्यार्थ्यांना जगणें नकोसें होईल आणि निर्लज्ज विद्यार्थी अधिकच आकसानें वागून बेडर होतील.

### १०. निर्वासन ( हकालपट्टी )

विद्यार्थ्यांना शाळेंतून काढणें ही सर्वोच्च शिक्षा होय. अगतिकपणें आचरावयाचा तो मार्ग. त्यांत नाहीं म्हटलें तरी पराजयाची कबुली आहे. केवळ हकालपट्टीनें विद्यार्थी सुधारेल हें कधींच शक्य नाहीं. केवळ स्वतःच्या शाळेचें अशा विद्यार्थ्यापासून संरक्षण एवढाच त्याचा मर्यादित अर्थ. विद्यार्थ्याचा गुन्हा नैतिक दृष्ट्या भयंकर असेल, शाळेंतील सामोपचाराच्या पलीकडे त्याची सुधारणा असेल तरच या मार्गाचा अवलंब श्रेयस्कर. पण त्या वेळींहि त्याला इतरत्र जाऊन उपद्रवाची संधि देण्यापेक्षां पालकांना मार्गदर्शन करून ' बाल-सुधार-संस्थें 'त रवानगी करणें हेंच सामाजिक कर्तव्य होय. शाळेंतून ' वाईट ' शेरा देऊन काढून टाकण्यानें विद्यार्थ्याचें सर्व जीवन बरबाद होण्याचा प्रसंग ओढवणारा असतो. म्हणून फार काळजीपूर्वक व दीर्घ विचारानेंच अशी गरज निर्माण होतांच पावलें टाकावयास हवींत.

## निदान-चिकित्सा

वर उल्लेखिलेले मार्ग म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे मानसिक दोषांवर केलेले इलाज-उपचार आहेत. बाजारांत मिळणाऱ्या तयार औषधांच्या गोळ्यांसारखाच त्यांचा उपयोग आहे. रोगाचें निदान शोधण्याचा त्यांत प्रयत्न नाहीं. विद्यार्थ्यांची गैरवर्तणूक - त्यांच्या या चुका टळाव्यात, त्यांकडे त्यांची

प्रवृत्तिच होऊं नये असें वाटत असेल तर त्यांच्या हातून असें कां घडतें याचाच मूलग्राही पद्धतीनें विचार करणें ही शास्त्रीय दृष्टि होय. वर्गानियंत्रणाच्या भागांत अशा कांहीं कारणांची मीमांसा केलीच आहे. विद्यार्थ्यांच्या हातून खोटें बोलणें, फसवणूक, यांसारखे जे 'नैतिक' गुन्हे होतात, शाळा बुडवणं, उर्मटपणानें उत्तर देणें, दुसऱ्याच्या लेखनाची नक्कल करणें, चोरून पाहून लिहिणें, चोऱ्या करणें – यांसारखे जे प्रकार घडतात त्यांचीं मुळें मनोविकृतींत असतात; किंवा सदोष गृहसंस्काराचा तो परिणाम असतो. घरांतलें दारिद्र्यः कलह, किंवा सहानुभूतिशून्य वागणूक यांमुळें शैशवांतील व विशेषत, पौगण्डदशेंतील भावजीवनावर अति विपरित परिणाम होतात; नैसर्गिक प्रवृत्तींना, आविष्काराला योग्य वाव न मिळाल्यास वाम-मार्गानें त्या प्रकट होतात; आणि या प्रकरणाच्या आरंभीं व वर सुचविलेलीं रूपें धारण करतात. असल्या विद्यार्थ्यांना 'समाज-कंटक' मानणें युक्त नव्हे. एक तर त्यांचे अपराध सहेतुक वा जाणूनबुजून नसतात. 'व्यवहारी' समाजाच्या दुटप्पी नीतीचे ते अनेकदां अनुकरण करीत असतात. पुष्कळदां शिक्षेच्या भीतीनें असत्याचा व फसवेगिरीचा आत्मसंरक्षणासाठीं त्यांनीं अवलंब केलेला असतो. तेव्हां विद्यार्थ्यांच्या मनःप्रवृत्तीचा थांगपत्ता लावणें, मनोविश्लेषण नसलें तरी बाह्य परिस्थितीचें विश्लेषण करणें, आणि विद्यार्थ्यांच्या शक्तीला इष्ट दिशा लावणें, सदाचाराची किंमत पटविणें, मनावर बिंबविणें व त्यावर श्रद्धा दृढ करणें हेंच कार्य उदार वृत्तीनें, गाढ सहानुभूतीनें शिक्षकांनीं करणें उचित आहे. शिक्षकांना कांहीं प्रमाणांत 'मनोवैद्य' बनलें पाहिजे. शिक्षणाचा खरा संबंध मनोवृत्तीशीं, मानसिक संवयींशीं, दृष्टिकोणाशीं व चारित्र्याशीं असल्यानें निदान–चिकित्सा–पद्धतीचा आश्रय करणें हें शिक्षकांचें क्रमप्राप्त कर्तव्य आहे.

ही चिकित्सा अनेकदां शरीरशास्त्रदृष्ट्या–वैद्यकीय दृष्ट्याहि आवश्यक असते, असें प्रयोगान्तीं आढळलें आहे. विद्यार्थ्यांच्या अनेक सुप्त व दडपून टाकलेल्या विकारांत गुन्ह्याचीं कारणें आढळतात, हें जसें मनोविश्लेषणानें आढळलें आहे, तसेंच शरीरांतील भिन्न भिन्न ग्रंथींच्या अनियमित कार्यामुळें केवळ त्यांचें आरोग्यच बिघडेल असें नव्हे तर विचित्र मनोविकार निर्माण होतात असें आढळलें आहे. मुलांचा रागीटपणा, चिडखोरपणा, आळस

वा उत्साहातिरेक, या गोष्टी त्यांच्या शरीरांतील कांहीं ग्रंथींच्या अल्प वा अति स्रावाचे परिणाम आहेत; योग्य वैद्यकीय उपचारानें तें कार्य नियमित करून विद्यार्थ्यांचें मन व आचार यांत सुधारणा घडवून आणतां येते.

## पारितोषिकें

### विधायक उत्तेजनांची गरज

शिक्षांचा जास्तींत जास्त उपयोग म्हणजे आपलें अमुक एक वर्तन व कृत्य अनिष्ट आहे याची अपराध्याला जाणीव देणें, व त्याची पुनरावृत्ति टाळण्याकडे त्याचा कल बनविणें हाच होय. पण शिक्षणाचा उद्देश यापेक्षां व्यापक आहे. विद्यार्थ्यांचें वर्तन केवळ दुर्गुणांपासून अलिप्त असावें अशी आपली दृष्टि नसून,—त्याचा निश्चितपणें सदाचाराकडे कल असावा, सत्कृत्याची आवड असावी, आणि विशिष्ट प्रसंगांत दिसून येणाऱ्या त्याच्या प्रतिक्रियांत सद्गुणांचाच आढळ व्हावा अशी आपली आकांक्षा असते. विद्यार्थ्यानें दुसऱ्याच्या अंगावर हात टाकूं नये एवढ्यानेंच आपलें समाधान होणार नसून, कुणी एखाद्या दुबळ्या—अशक्ताला त्रास दिला तर त्याच्या साह्याला त्यानें धांवत जावें अशी आमची अपेक्षा आहे. अपराध वा दुर्गुण याकडे तटस्थतेनें किंवा उपेक्षेनें पाहणें नव्हे तर त्यांचा प्रतिकार व त्या जागीं कांहीं विधायक कार्य अशी आपली दृष्टि आहे. पारितोषिकांचा उपयोग असा होऊं शकतो; चिकाटी, कष्टाळूपणा, परोपकारबुद्धि इत्यादींबद्दल आवड निर्माण करून, त्या गुणांच्या जोपासनेला विद्यार्थ्यांना प्रवृत्त करण्याचें कार्य कांहींसें पारितोषिकांनीं होऊं शकतें, म्हणून त्यांचा अवलंब करण्यांत येतो. त्यामागील मानसशास्त्रीय भूमिकेचें स्पष्टीकरण माग आलेंच आहे. येथें फक्त शालेय जगांत अवलंबिण्यांत येणाऱ्या पारितोषिकांच्या प्रकारांचा व त्यांचें सामर्थ्य काय, मर्यादा कोणती—याचा विचार करूं.

### १. प्रशंसोद्गार

विद्यार्थ्यानें वेळेवर यावें, दिलेलें काम करावें, स्वच्छता राखावी, यासाठीं त्यांना कांहीं गुण द्यावयाचे व त्यावर त्यांचा क्रमांक लावावयाचा, ही एक सामान्य पद्धति आहे. तसेंच, वक्तशीरपणा, नियमितपणा, अभ्यास—क्रीडा यांतील प्रावीण्य याबद्दल विद्यार्थ्यांना शाबासकी द्यावयाची, त्यांचा गौरव

करावयाचा अशी पण पद्धति आहे. लहान मुलांना त्यामुळें काम करायला उत्साह येतो, चीज झाल्यासारखें वाटतें, आत्मसंमानाची भावना जागृत होते. विशेषतः स्पर्धावृत्तीला तीत आवाहन असल्यानें विद्यार्थी प्रयत्नशील बनतात. पण वैयक्तिक स्पर्धेचें रूपान्तर हेव्या-दाव्यांत होतें, आणि प्रतिपक्षाला चीत करण्यांत किंवा त्याला अपयश मिळालेलें पहाण्यांतच आनंद मानण्याची आसुरी वृत्ति स्पर्धेच्या पोटीं जन्मास येते. भावी जीवनांत अशी वैयक्तिक स्पर्धा सामुदायिक जीवनाला विघातक आहे, हें नाकबूल करतां येणार नाहीं. गुण-दान व प्रशंसोद्गार यांचा उपयोग करणें अनिष्ट नाहीं, मात्र त्यामुळें फाजील अहंकार वाढीस लागणार नाहीं, आणि स्पर्धेपेक्षां सहकार्यावर भर दिला जाईल अशी काळजी असावी.

### २. पदक-पेले इ. मूल्यवान् बक्षिसें

शालेय जगांत बक्षिसांना मोठें स्थान परंपरेनें प्राप्त झालें आहे; आणि वार्षिक बक्षीस-समारंभ हा एक सोहळा होऊन बसला आहे. वरवर पाहिलें तरी बहुधा असें दिसतें कीं तेच ते विद्यार्थी अभ्यास, कला, क्रीडा यांत बक्षिसें मिळवीत असतात. हीं बक्षिसें आपल्या आटोक्यांतलीं नाहींत, आपणांसाठीं नाहींत अशी समजूत करून घेऊन बहुसंख्य विद्यार्थी त्यांविषयीं उदासीन असतात. त्यामुळें बक्षिसांची पद्धति ही निरुपयोगी आहे असें ठरतें. ज्यांच्या पदरांत यश पडतें त्यांच्या वांट्यास तीं येतात. पण ज्यांनीं प्रयत्न केला त्यांच्या गुणाचें चीज या पद्धतींत होत नाहीं. शिवाय, आम्हीं उच्चत्तम यश मिळविलें म्हणजे बक्षिसावर आपला हक्क निर्माण झालाच, आणि मिळणारें पदक, पेला वा पुस्तक मूल्यवान् असलेंच पाहिजे अशा दोन विकृत कल्पनाहि यश मिळविणाऱ्यांच्या ठिकाणीं निर्माण होतात. बक्षिसांचा व स्पर्धांचा उपयोग व्यक्तिशः न करतां सामुदायिक रीतीनें करावा, म्हणजे त्यांतले दोष टळतील अशी विचारसरणी आहे. स्पर्धा वर्गावर्गांत, पथकापथकांत व गटांत व्हाव्यात. आणि सर्व पथकांच्या वा गटांच्या स्पर्धांतून सर्व शाळेची त्या त्या क्षेत्रांतील प्रगति वाढविण्यासाठीं त्या व्हाव्या. तसेंच प्रत्येक गटानें वा पथकानें आपण मागच्यापेक्षां अधिक पुढें गेलों व स्वतःवरच जय मिळविला असें वाटून साभिमान आनंद उपभोगावा हीच दृष्टि श्रेयस्कर.

## सन्मान व अधिकार

शालेय जीवनांत उत्कृष्ट यश मिळविणारांचीं नांवें फलकावर लिहून त्या विद्यार्थ्यांचा गौरव करणें ही एक प्रथा आहे. आपला नांवलौकिक झाला तर तो कुणाला नको असतो ? अंतिम परीक्षेंत उज्ज्वल यश मिळविणारांचीं नांवें शाळेंत चिरंतन होतात, ही भावना कांहींना स्फुरण देईल व शाळेंची परंपरा अबाधित राहील. पण जे वर्ग अभ्यासांत, कला–छंदांत, स्वच्छता – टापटिपींत अग्रेसरत्व पटकावतील, त्यांचीं नांवें जाहीर रीतीनें लावणें, त्यांना सन्माननिदर्शक चिन्ह देणें,–सुटी, सहली, क्रीडा यांसारखी सवलत वा अधिकार देणें, वर्गनायक वा तत्सम अधिकार व्यक्तिशः विद्यार्थ्यांना देणें – या सर्वांचा चांगला उपयोग होत असल्याचें आढळतें.. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कृति सर्वांना पाहण्यासाठीं ठेवणें हाहि प्रोत्साहनाचा चांगला मार्ग आहे.

## कांहीं पथ्यें

पारितोषिकांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या खरोखरीच्या गुणांना मान्यता देण्यासाठीं व त्यामुळें त्यांच्या कर्तृत्वाला प्रेरणा मिळण्यासाठीं व्हावा. ती एक लालूच ठरूं नये, व खरें महत्त्व कार्याचें आहे हें त्यांना हळू हळू उमजावें. यासाठीं पारितोषिकांचा उपयोग जरा आखडता हात घेऊनच व्हावयास पाहिजे. तसेंच पारितोषिकाचें मूल्य हें महत्त्वाचें नसून गुणाचें मूल्य झालें व 'सन्मान' मिळाला ही स्पृहणीय गोष्ट असें विद्यार्थ्यांना पटलें पाहिजे. पारितोषिक हें सतत वा अखंड प्रयत्नासाठीं असावें. विशेष अडचणींतून ज्यांनीं मार्ग काढला असेल त्यांना, अनुकूल परिस्थितीच्या लाटेवर आरूढ होऊन पुढें आलेल्यांच्यापेक्षां विशेष श्रेय व कौतुक लाभावें. पारितोषिकांचा उपयोग लहान विद्यार्थ्यांच्या वाढतींतच व्हावा, आणि तोहि लहानसहान यशासाठीं. नियमितपणा, टापटीप इत्यादि गोष्टी सतत आचरून त्यांची संवयींत परिणति होणें हें उद्दिष्ट डोळ्यांसमोर असावें. शिक्षेप्रमाणेंच 'फळ' हि विद्यार्थ्यांना अविलंबें मिळावें, तरच त्यांत आनंद व प्रेरकत्व असतें.

## आदर्श स्थिति

पारितोषिकांची जागा स्वाभाविक आणि नैतिक आदर्श यांनीं घेतली तरच शिक्षणाचें कार्य होत आहे असें म्हणावें लागेल. पारितोषिकांमुळें ज्ञानावरची

दृष्टि उडते, म्हणून ती एक विपरीत प्रेरणा आहे, असा अनेकांचा आक्षेप आहे. शिक्षा-पारितोषिकांच्या कृत्रिम साधनांनीं शिक्षकाचें कार्य कदाचित् सोपें होत असेल, पण वर्तनाला बाह्य उपाधीपेक्षां आन्तरिक प्रेरणा ही महत्त्वाची बाब आहे हें विसरलें जातें. आपली अध्यापनपद्धति व शालेय वातावरण हीं अभ्यासाला प्रेरक ठरावींत, या जबाबदारीचें महत्त्वहि त्या साधनांचा उपयोग करतांना लक्षांत राहात नाहीं. पारितोषिकांनीं निर्माण होणारी चुरस असामाजिक प्रवृत्ति वाढविते हा तर आक्षेप आहेच; पण अभ्यासामध्यें खऱ्या प्रयत्नानें जी गोडी, रुचि निर्माण व्हावयाची, व तो विषय भावी जीवनांत आनंदाचें निधान बनावयाचा, तेंहि कार्य त्यामुळें साधत नाहीं. विशेषतः नैतिक आचरणाबद्दल ( खरें बोलणें, प्रामाणिकपणें वागणें, अडचणींत असलेल्यांना साहाय्य करणें ) पारितोषिकांची प्रथा अनिष्टच होय. सदाचार व सत्कृत्यें हा स्वभाव, व नियत नित्य कर्म आहे अशी भावना दृढ होणें ही आवश्यक गोष्ट आहे. आपण खरें बोललों, दुसऱ्याची वस्तु इमानानें परत दिली, गलिच्छ शब्द उच्चारले नाहींत, शिष्टाचाराचे व शाळेचे नियम पाळले, अनाथ-अपंगांना मदत केली, दिलेला शब्द पाळला आणि नेमून दिलेलें काम पार पाडलें—तर त्यांत मोठेपणा नाहीं, केवळ मानव-कर्तव्य केलें, समाजांत राहावयाचें म्हणजे या सर्व गोष्टी क्रमप्राप्त आहेत, जीवनाचा तो 'धर्म', धारकतत्त्व आहे अशी जाणीव विद्यार्थ्यांत यावयास पाहिजे.

शालेय व्यवस्थेची उभारणी जर निराळ्या दिशांनीं केली तर हीं नैतिक मूल्यें विद्यार्थ्यांच्या अंगीं लहानपणापासून बाणवितां येतील असा नवीन प्रयोगांचा निष्कर्ष दिसत आहे. तें कसें हें समजून घेण्यासाठीं 'शालेय स्वराज्य अथवा स्वयंशासनाची दिशा' म्हणजे काय तें पाहिलें पाहिजे.

अनुक्रम.....
विभाग.....
क्रमांक
नोंद दि.

# : १५ : स्वयंशासन व चारित्र्यविकास

## प्रास्ताविक

आतांपर्यंत सामान्यतः शिक्षक 'शिस्त' शब्दाचा जो मर्यादित अर्थ घेतात तो घेऊन तशी शिस्त म्हणजेच अभ्यासानुकूल वातावरण निर्माण करण्यास साहाय्यक घटक कोणते व अडथळा करणारीं कारणें कोणतीं याचा विचार केला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा आळस, कुसंस्कार व तत्सम कारणांनीं होणाऱ्या गैरशिस्त व अनिष्ट वागणुकीला पायबंद घालण्याचे जे सौम्य व रूढ मार्ग आहेत त्यांचें दिग्दर्शन केलें; आणि त्यांच्या मर्यादाहि स्पष्ट केल्या. आपणांस अनिष्ट वा गैर दिसणाऱ्या वागणुकीचीं पाळेंमुळें काढून टाकून नव्या सत्प्रवृत्तीचीं बीजें पेरावयाचीं असतील तर शिक्षा व पारितोषिक हे मार्ग अपुरे व दिखाऊ आहेत हें त्या विवेचनावरून ध्यानांत आलेंच असेल. शिस्तीचा संबंध व्यक्तित्वाच्या विकासाशीं आहे, आणि म्हणून त्याचा व्यापक दृष्टिकोणांतून विचार केला पाहिजे या विचारापर्यंत आतां शिक्षणशास्त्रज्ञ येऊन पोहोंचले आहेत. पूर्वीं जीवनाचा विचार अलग अलग कप्प्यांतून केला जाई; शरीर, मन, बुद्धि, हाताचें कौशल्य हे सर्व जणूं अलग आहेत, आणि त्यांच्या शक्तींची वाढ स्वतंत्र मार्गांनीं होते असें गृहीत धरून स्वतंत्र योजना आंखल्या जात.

याचा परिणाम असा होई कीं,—बौद्धिक शिक्षणासाठीं पाठशाळा, शारीरिक शिक्षणासाठीं तालीमखाने, नीतिशिक्षणासाठीं पोथ्यापुराणें व धर्ममंदिरें, आणि उपजीविकेसाठीं कारखाने— अशी विभागणी होई.त्यामुळें शरीरानें निस्तेज असलेले विद्वान्, बुद्धि नसलेले पहिलवान, चरितार्थासाठीं साधन नसलेले नीतिविशारद, चारित्र्य व नीति नसलेले कलावन्त समाजांत निर्माण होत! बुद्धि, अंतःकरण, शरीर व हस्तकौशल्य हे सारे एकाच व्यक्तित्वाचे पैलू आहेत; एकाच अखंड, अभंग पिंडांतून वा कोंबांतून बाहेर प्रकटणारे उन्मेष

वा अंकुर अहेत, आणि त्या त्या पिंडाच्या स्वभावासिद्ध शक्तीप्रमाणें ते प्रकट होतात, त्यांच्या प्रकटीकरणासाठीं त्या पिंडांत सदैव आन्तरिक प्रेरणा असते ही त्या कालांत कल्पना नव्हती.

आजच्या काळांत व्यक्तित्वाचा विकास, आन्तरिक शक्तींचा आविष्कार हें शिक्षणाचें ध्येय मान्य झालें आहे. त्याचबरोबर व्यक्तीचा बौद्धिक, शारीरिक, नैतिक विकास, परस्परावलंबी, परस्पराश्रयी आहे; त्या सर्वांचा 'समवाय' संबंध आहे; आणि म्हणून बालकांचा संपूर्ण व सर्वांगीण विकास होण्यास त्या सर्वांत सामंजस्य व समतोलपणा राखला पाहिजे,—अशी दृष्टि राखण्याचा प्रयत्न होत आहे. एकात्मता,एकसंधीपणा हा व्यक्तित्वाचा विशेष भाग आहे. म्हणून शरीराचा विकास व बुद्धीचा विकास, बुद्धीचा आणि हस्तकौशल्याचा, बुद्धीचा आणि नैतिक कल्पनांचा व आदर्शांचा विकास एकसमयावच्छेदें आणि एकाच कृतींतून व्हावा असा कटाक्ष आहे. हीच दृष्टि समाज व व्यक्ति यांच्या परस्पर संबंधांत व्यक्त होत आहे. व्यक्ति आणि समाज यांच्या हितसंबंधांत अविरोध तर आहेच, पण समाजानें प्रत्येकाच्या व्यक्तित्वाचा आदर करावा, स्वतंत्र विकासाला वाव द्यावा, आणि व्यक्तीनें आपल्या सामाजिक ऋणांची आठवण ठेवून इतरांच्या व्यक्तित्वाचें अस्तित्व मान्य करून स्वतःच्या प्रवृत्ति, लालसा यांना काबूंत ठेवावें व वळण लावावें,—हा सामाजिक नीतीचा आदर्श निर्माण होत आहे.

हा सर्व विस्तार करण्याचा उद्देश असा कीं, नीतिविषयक शिक्षण, शिस्तीचें वळण, आणि चारित्र्याचा विकास, याबद्दलच्या कल्पना व त्यांच्या सिद्धीचीं साधनें याबाबत पुष्कळच परिवर्तन झालेलें आहे हें लक्षांत यावें.

दुसरी एक गोष्ट या ठिकाणीं लक्षांत घ्यावयास पाहिजे, ती म्हणजे—सामाजिक आदर्शांप्रमाणें व्यक्तिजीवन घडत जातें. सामाजिक आदर्शांतून शिस्तीच्या कल्पना निघतात व त्यानुसार बदलतात. आपलें कुटुंब हेंहि त्या नमुन्यावरच उभारलेलें असतें, आणि शालेय समाजहि त्याची छोटी प्रतिमा व प्रतिकृति बनतो. उदाहरणार्थ, ज्या काळांत समाजशासकत्व एका व्यक्तीच्या हातीं होतें, नृप-सत्तात्मक पद्धति रूढ होती, त्या काळांत कुटुंबांतहि एकाच व्यक्तीच्या कुटुंबप्रमुखाच्या हातीं सारीं व्यवस्थेचीं सूत्रें होतीं; आणि व्यक्तिनिष्ठा, स्वामिभक्ति, आज्ञाधारकता या गुणांचें वर्चस्व होतें. राजापुढें गुडघे

टेकून वंदन करावयाचें, त्याला कधीं पाठ दाखवावयाची नाहीं, असा दंडक होता. तोंड असून बोलावयाचें नाहीं, डोळे असून पहावयाचें नाहीं, कान असून ऐकावयाचें नाहीं, हीं आदर्श सेवकाचीं लक्षणें होतीं. कुटुंबांतहि वडीलधाऱ्या माणसासमोर कामाशिवाय उभे राहावयाचें नाहीं, उलट उत्तर द्यावयाचें नाहीं, इतकेंच नव्हे तर साधें बोलणें, हंसणें, कुजबुजणें म्हणजे उद्धटपणा व अनादर असें मानलें जाई. 'हुकुमांची बिनचोभाट तामिली' हाच शिस्तीचा सारा अर्थ.

पण समतेच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनांचा उदय होतांच समाज व कुटुंब यांच्या जीवनांतले आचार बदलत गेले; आणि लोकशाही कल्पनेबरोबर सर्वच वातावरण बदललें.

## लोकशाहीचा अर्थ

लोकशाही कल्पनेचा आरंभ जरी राजकीय क्षेत्रांत झाला असला तरी त्या कल्पनेचा आतां एक जीवनमूल्य, जीवननिष्ठा म्हणूनच स्वीकार होत आहे. लोकशाही तत्त्वांचा व दृष्टीचा आचार जीवनाच्या सर्व क्षेत्रांत करणें ही उच्च नीति व तत्त्वज्ञान मानलें जात आहे, आणि मानवाच्या व समाजाच्या विकासाचा तोच एक सुसंस्कृत मार्ग होय अशी श्रद्धा निर्माण झाली आहे.

लोकशाहीचा व्यापक अर्थ म्हणजे 'स्वयंनिर्णयाचा अधिकार'—म्हणजेच पर्यायानें 'आत्मोद्धाराचें दायित्व'—मग तें व्यक्तीचें असो कीं समष्टीचें असो. प्रत्येक व्यक्तीला वा सामुदायिक गटाला समाजांत स्थान आहे, त्यांच्या जीवनाला अर्थ आहे, 'प्रयोजन' आहे; ही दृष्टि तींत असून व्यक्तित्वाचा आदर व व्यक्तीचें स्वातंत्र्य हें लोकशाहीचें प्राण—तत्त्व होय. स्वतःचा विकास स्वतःच्या इच्छेनुसार करण्याचें स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे आणि तसा तो करून घेतां येतो, आणि केवळ दैवाची शिकार न बनतां स्वतःच्या भविष्याचे शिल्पकार बनतां येतें अशी तींत श्रद्धा आहे. आध्यात्मिक स्वावलंबन हाच तिचा गाभा. या व्यक्तिस्वातंत्र्याची दुसरी बाजू म्हणजेच समता. त्या दोन्ही कल्पना अभेद्य आहेत, आणि सहिष्णुतेच्या गुणानें त्या सांधल्या गेल्या आहेत. सर्वच प्रकारच्या दास्यांतून मुक्तता असाहि तिचा अर्थ असल्यानें प्रत्येकाचें विचार-स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठीं विचारपरिवर्तन—देवाण-

घेवाण, तडजोड, व मनवळवणी – मनामिळवणी हेच मार्ग आहेत. या आत्म-स्वातंत्र्याच्या ध्येयासाठीं साधनहि आत्मस्वातंत्र्य हेंच. त्या ध्येयाचा साक्षात्कार त्या भावनेनें भारलेल्या वातावरणांतूनच व्हावयाचा असतो.

अशा लोकशाही आदर्शांची जोपासना करावयाची असेल तर तोच आदर्श समाज-जीवनाच्या विविध अंगांत, विविध संस्थांत ठेवावा लागेल. त्या गुणांचें बाळकडू भावी नागरिकांना प्रथमपासून द्यावें लागेल. आणि असें बाळकडू प्रत्यक्ष अनुभवाचेंच असावें लागेल. कोणताहि गुण व्यक्तीच्या ठिकाणीं बाणतो तो त्याचा प्रत्यक्ष आचार केल्यानें, प्रत्यक्ष वातावरणाच्या अनुभवानें. अनुभवांतून मनाच्या कलांना, अंत:करणाच्या वृत्तींना स्थिरता व दृढता येते. म्हणून प्रथमपासूनचे संस्कार या विचारांच्या अनुरोधानें असावयास हवेत.

## शिस्त म्हणजे काय ?

या नव्या दृष्टिकोणांतून पाहिलें कीं, शिस्तीचा अर्थ पार बदलतो. विद्यार्थ्यानीं राखलेलें अभ्यासानुकूल प्रशान्त वातावरण व विशिष्ट चाकोरीचा आचार म्हणजे शिस्त नव्हे,—तर शिस्तीचा परिणाम आहे. एखाद्या वर्गात विद्यार्थी मन लावून काम करीत असतील, आस्थेनें विषय समजावून घेत असतील—आणि हें स्वयंस्फूर्तीनें, 'आत्मसंयमा'नें, शिक्षकाच्या धाकानें नव्हे; तसेंच शालेय समाजाचे आपण एक घटक आहोंत व त्या समाजाच्या नीतिनियमांप्रमाणें आपण वागावयाचें, तींत आपलें कल्याण आहे; त्यामुळें आपण शाळेचे एक उत्कृष्ट घटक समजले जाऊं, शाळेचा नांवलौकिक व प्रतिष्ठा वाढविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे; ती पार पाडण्यानें आपलीहि कीर्ति होईल—या भावनेनें व जाणिवेनें शाळेच्या आवारांत, क्रीडांगणावर वा इतरत्र समाजांत आपल्याकडून असभ्य, उच्छृंखल वा गैर वर्तन घडूं नये म्हणून जेव्हां विद्यार्थी वागतात, तेव्हां खरी शिस्त ते पाळतात असें म्हणतां येईल. अंगीं बाणलेली ती एक वृत्ति आहे. सामान्य माणसांनाहि हा अर्थ ठाऊक असतो. 'स्वत:च्या मनाचा धाक' या शब्दांत तो अर्थ ते प्रकट करतात. या धाकानें मनुष्य स्वत:वर बंधनें घालून घेतो. हा धाक कांहीं तरी उच्च आदर्शाशिवाय निर्माण होत नाहीं. विद्यार्थिजीवनांतहि विद्यार्थ्यांनीं स्वत:च्या मनाच्या अवखळपणाचें–चांचल्याचें स्वत:च नियंत्रण करावें, आणि इतरांच्या हक्कांचा व व्यक्तित्वाचा आदर करावा असा तिचा अर्थ

होतो. खरी शिस्त ही अंतरंगांतून प्रकट होत असते; बाह्य नियंत्रणांनीं नव्हे—असें याचसाठीं म्हटलें जातें.

ही दृष्टि स्वीकारली म्हणजे मुख्याध्यापक वा शिक्षक यांच्या शासनापेक्षां विद्यार्थ्यांच्या 'स्वयंशासना'लाच अधिक महत्त्व येतें. अशी स्वयंशासनाची दृष्टि विद्यार्थ्यांना येणें, त्यांनीं ती जबाबदारी पेलण्यास समर्थ होणें, त्यांना त्या बाबतींत साहाय्य व नेतृत्व देणें हें शिक्षणाचें प्रमुख उद्दिष्ट आहे. कारण त्यांतूनच विद्यार्थ्यांचें चरित्र व चारित्र्य घडत जातें. असे जबाबदार, स्वयंस्फूर्तीनें पुढें येणारे व दायित्व स्वीकारणारे विद्यार्थी लाभले तर मुख्याध्यापकांना वा शिक्षकांना 'शासनाधिकार' चालविण्याची वेळच येणार नाहीं. समाजांतील नेत्याप्रमाणेंच मुख्याध्यापकांचे शासनाधिकारहि शास्त्यांच्या वा शिष्यांच्या सुरक्षिततेसाठीं, आणि त्यांना परावलंबी वा दास ठेवण्यास नसून त्यांना स्वावलंबी व प्रगमनशील बनविण्यासाठीं आहेत. याचसाठीं 'उत्तम शासन म्हणजे कमींत कमी अधिकाराचा वापर' असें म्हटलें जातें.

शालेय समाजांत हा स्वयंशासनाचा वा स्वराज्याचा प्रयोग कसा आचरला जातो, व त्याच्या मर्यादा आणि पथ्यें कोणतीं याकडे आतां वळूं. 'विद्यार्थी-समिति' या नांवानेंच या पद्धतीचा पुढील विवेचनांत निर्देश केला आहे.

## विद्यार्थी-समिति

### भूमिका

शालेय-स्वराज्य अथवा विद्यार्थ्यांचें स्वयंशासन वेगवेगळ्या स्वरूपांत व वेगवेगळ्या नांवानें आज पाश्चात्य देशांच्या शाळांत रूढ असून त्याचें नावीन्य तेथें उरलेलें नाहीं. आपल्याकडील कांहीं शाळांत ही पद्धति सुरू होऊन बाळसें धरूं लागली आहे. 'विद्यार्थि-सभा','स्वराज्य-सभा', 'सेवा-समिति' या किंवा अशा तऱ्हेचें नामाभिधान तिला मिळालें आहे. विद्यार्थ्यांवर त्यांच्या शिस्तपालनाची जबाबदारी टाकणें व तेवढीच आपली जबाबदारी कमी करणें, हा तिचा हेतु नाहीं; किंवा अशा तऱ्हेची पद्धति शाळेंत असणें ही कांहीं तरी आधुनिक 'चूष' आहे, व शिक्षणाधिकारी तिच्यामुळें खूष होतात, या विचारानें कांहीं खातीं विद्यार्थ्यांवर सोपविणें म्हणजे ह्या पद्धतीचें महत्त्व कमी लेखणें आहे; इतकेंच नव्हे तर तिच्या उद्दिष्टाबद्दल व सामर्थ्याबद्दल अज्ञान व अविश्वास प्रकट

करण्यासारखें होय. सामाजिक जबाबदारीचें, सामाजिक सद्गुणांचें व नैतिक मूल्यांचें शिक्षण प्रत्यक्ष अनुभवांतूनच मिळत असतें; लोकशाहीचीं ध्येयें साधावयाला साधनेंहि लोकशाही स्वरूपाचींच असावयास पाहिजेत; सामुदायिक जीवनांत सहभागी झाल्यानें व कामाचा वांटा उचलल्यानेंच जबाबदारीची जाणीव निर्माण होते, आणि सामाजिक सद्गुण बाणायला सामाजिक वा सामाजिक स्वरूपाचेंच वातावरण पाहिजे, अशा तर्कशुद्ध विचारसरणीनें, मानसशास्त्रीय दृष्टीनें व डोळस श्रद्धेनें या पद्धतीकडे पाहावयास पाहिजे, आणि तिचीं उद्दिष्टें समजून घेऊन क्रमाक्रमानें शालेय वातावरणांत तिचा आविष्कार केला पाहिजे.

**स्वरूप**

वर्गावर्गांचे किंवा गटांचे प्रमुख मुख्याध्यापकांनीं नेमावयाचे, त्यांतल्या-त्यांत दणकट बंडखोर विद्यार्थ्यांवर इतरांना गप्प बसविण्याची जबाबदारी सोपवावयाची ही जुन्या जमान्याची पद्धति पूर्वीच्या राजकीय आदर्शाला धरून होती. पण शालेय स्वराज्याचें उद्दिष्ट वेगळें असल्यानें त्याची पद्धति वेगळी आहे. शालेय समाजाची केवळ शिस्तच नव्हे तर बौद्धिक विषय, क्रीडा छंद, स्वच्छता–आरोग्य इत्यादिबाबतच्या सर्व गोष्टी आपल्याला पार पाडावयाच्या आहेत, त्या गोष्टी कशा व्हाव्या हें सांगण्याचें, त्यावर विचार प्रकट करण्याचें आपल्याला स्वातंत्र्य आहे, त्याला आपल्याला नेतृत्व करा-वयाचें आहे अशी जाणीव व भावना विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं निर्माण करणें हें उद्दिष्ट असल्यानें विद्यार्थ्यांना खरीखुरी सत्ता देणें, हें तिचें स्वरूप आहे. सत्तान्तराचा हा प्रयोग आहे. आपली सत्ता दिखाऊ आहे, आपण नामधारी प्रमुख आहोंत, वा बाहुली आहोंत अशी भावना विद्यार्थी–प्रमुखांत निर्माण झाल्यास हा प्रयोग फसेल. तेव्हां मुख्याध्यापक व शिक्षक यांची वृत्ति लोकशाही ध्येयास पोषक असल्यावांचून हा प्रयोग करण्यांत अर्थ नाहीं.

**उद्दिष्ट**

लोकशाही तत्त्वांनुसार चालविण्यांत येणाऱ्या विद्यार्थि–समितींनीं पुढील सर्वसामान्य उद्दिष्टें आपल्या डोळ्यांसमोर ठेवलीं पाहिजेत.

१. सर्व शाळा म्हणजे एक सुसंघटित, सहकार्यानें चालणारा समाज आहे अशी भावना विद्यार्थ्यांत दृढ करणें.

२. ' जबाबदार राज्यपद्धती 'चा — सामुदायिक जबाबदारीच्या जीवनाचा विद्यार्थ्यांना अनुभव आणून देणें.

३. ' शाळा चालविण्या 'च्या कार्यांत विद्यार्थ्यांना सहभागी करणें.

४. विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक शक्ति व रुचि यांना अवसर देऊन, त्यांच्या दृष्टिकोणाला योग्य स्थान देणें.

५. आपल्या उच्छृंखल प्रवृत्तींना आळा घालण्यास शिकविणें, विशिष्ट ध्येयांनीं प्रेरित होऊन व आदर्शांची जोपासना करून, स्वतःच्या व समुदायाच्या सेवेसाठीं व सेवेमध्यें स्वतःच्या चारित्र्याचा विकास करणें.

थोडक्यांत—संयम, सहकार्य, स्वावलंबन, सहिष्णुता इत्यादि सामाजिक सद्गुणांची जोपासना तर त्यायोगें होईलच, पण आपल्यामध्यें काय काय काम करण्याची शक्ति आहे याचाहि विद्यार्थ्यांना प्रत्यय येऊं लागेल. हा आत्मप्रत्यय आनंदाचें व मानसिक सुखाचें मोठें साधन आहे. आपले गुण प्रकट करावयाला, मोठें व्हावयाला, अवसर आहे ही भावना सुखद आहे. आणि म्हणून जुन्या ' अधिकारशाही ' पद्धतीपेक्षां ' लोकशाही ' प्रवृत्तीवर चाललेल्या शाळांतील मानसिक जीवन अधिक समृद्ध व सुखाचें आढळतें.

## प्रयोगाचा आरंभ व सातत्य

ह्या तत्त्वावर शालेय जीवनाची उभारणी करावयाची असेल तर, एक तर विद्यार्थ्यांकडून अशा ' स्वराज्या 'ची वा संधीची मागणी यावी, किंवा तशी गरज असल्याची जाणीव त्यांच्यांत निर्माण केली जावी; किंवा हा प्रयोग आपण कां करणार आहोंत, वा कां करीत आहोंत याची स्पष्ट जाणीव विद्यार्थ्यांना शिक्षकांनीं करून द्यावी. शिक्षक व विद्यार्थी यांच्या परस्पर विनिमयांतून या समितीचें स्वरूप निष्पन्न होणें केव्हांहि चांगलें. शिक्षक–विद्यार्थी यांचे संबंध कसे असणार हें आधीं निश्चित असावें. विद्यार्थ्यांचें कार्यक्षेत्र कोणतें, आणि त्याचें स्वरूप काय, विद्यार्थ्यांना पुढाकार घ्यावयाला, कार्याची दिशा ठरविण्याला व काम पार पाडायला स्वातंत्र्य व संधि भरपूर मिळणार असली तरी अखेर विद्यार्थी समितीचें स्वरूप सल्लागार मंडळाचेंच राहणार, आणि मुख्याध्यापकांचें मत हेंच अखेर निर्णायक असणार हीहि स्पष्ट जाणीव सर्वांना असावी.

## यंत्रणा व घटना

विद्यार्थी-समिति अथवा स्वराज्य-सभा अस्तित्वांत कशी आणावयाची व तिचे अधिकारी कसे निवडावयाचे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. प्रत्येक वर्ग हा घटक मानून प्रत्येक वर्गांतून संख्येच्या प्रमाणांत वा समान संख्येनें आपले प्रतिनिधि निवडावयाचे, व या प्रतिनिधींनीं शाळा लहान असेल तर स्वतःचेंच कार्यकारी मंडळ तयार करावयाचें; किंवा शाळा मोठी असल्यास पुनः निवडणुकीनें कार्यकारी मंडळ निवडावयाचें ही एक पद्धति; किंवा या प्रतिनिधींनीं आपला नेता – मुख्य मंत्री निवडावयाचा, व त्यानें स्वतःचें कार्यकारी मंडळ शिक्षक–मुख्याध्यापकांच्या सल्ल्यानुसार नियुक्त करावयाचें, ही दुसरी पद्धति; किंवा सर्व शाळेचा उभा छेद घेऊन तिची वेगवेगळ्या पथकांत, गटांत वा 'गृहां'त विभागणी करावयाची, आणि त्या पथक-प्रमुखांचें कार्यकारी मंडळ निवडावयाचें, ही एक पद्धति आहे. या सर्वांपेक्षां अधिक इष्ट वाटणारी पद्धति म्हणजे प्रत्येक वर्गाची पांच ते सात प्रतिनिधींची वर्गपंचायत निवडावयाची, आणि या सर्व वर्गसमित्यांमिळून विद्यार्थी-समिति तयार होईल. वर्गसमिति ही वर्गप्रमुख, क्रीडाप्रमुख, वाचनालयप्रमुख आणि इतर छंदप्रमुख यांची असावी. आपापल्या वर्गाचे सर्व प्रश्न त्या समितीनें सोडवावेत. विद्यार्थी-समितीला शाळेंतील छंद-मंडळाचें केवढें तरी कार्यक्षेत्र मिळेल. आणि शाळेंतील वेगवेगळ्या छंदांची आवड असणारे विद्यार्थी त्यामुळें एकत्र येतील. प्रातिनिधिक पद्धति व पथकपद्धति यांचा समन्वय या पद्धतींत होऊन जबाबदारीचें लोण वर्गापर्यंत पोंचवितां येतें.§

## शिक्षक-विद्यार्थी-संबंध

कार्यकारी मंडळाची निवड झाल्यानंतर आपापल्या कामाची वांटणी त्यांनीं आपसांत करावी, आणि मुख्याध्यापकांनीं सर्व शिक्षकांच्या सल्ल्यानें निरनिराळ्या विभागाला मार्गदर्शक वा संचालक म्हणून शिक्षकांची योजना करावी. आपण विद्यार्थ्यांना खरोखरी मार्गदर्शक होत आहोंत याची खबर-

§ रशियांतील शाळांत – 'वर्गपंचायत' क्लास–सोव्हिएट आहे. पायोनियर संघटनेचें लोण (आपल्याकडील बालवीर चळवळीसारखीच चळवळ) त्या द्वारां वर्गापर्यंत आलें आहे. अधिक माहितिसाठीं 'रशियांतील विद्यामंदिर' (ग. वि. अकोलकर) हें पुस्तक पहावें.

दारी शिक्षकांनीं घेऊन आपलें वजन टिकविलें पाहिजे. शिक्षकांनीं विद्यार्थी-प्रमुखांना सामान्य विद्यार्थ्यांहून वेगळ्या तऱ्हेनें वागविलें पाहिजे, व त्यांचा बोज राखला पाहिजे. सर्व विद्यार्थ्यांसमोर विद्यार्थी-प्रमुखांचा पाणउतारा झाला तर त्यांचा 'अधिकार' नाहींसा होईल, स्वाभिमान डिवचला जाईल, आणि विद्यार्थ्यांत कामाविषयीं अरुचि व शिक्षकांविषयीं कटुता निर्माण होईल. शिक्षकांनीं विद्यार्थ्यांच्या कार्यांत ढवळाढवळ करणेंहि अनिष्ट ठरेल. एकदां विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य द्यावयाचें ठरविल्यानंतर त्यांच्याकडून कांहीं चुका झाल्या तर त्यांकडे कानाडोळा करायलाच हवा. चुका करीत करीतच विद्यार्थी शिकतील. शिवाय, शालेय वातावरणांतील चुकांचे परिणामहि तितके भयानक नसतात. तसेंच कोणत्याहि कामांतील अडचणींचा बागुलबोवा उभा करून विद्यार्थ्यांना निरुत्साहित करणें हें तर फारच घातुकें ठरेल. प्रत्येक प्रश्नाच्या दोन्ही बाजूंचा विचार करायला शिकवावें, आणि अडचणी आल्या तर मार्ग कसा काढावा लागेल हें त्यांना न सुचल्यास सांगून त्यांच्याकडून काम करवून घ्यावें.

## कार्यक्षेत्र

विद्यार्थी-समितीला कार्य काय म्हणून प्रश्न पडण्याचें कांहींच कारण नाहीं. शाळेचें सर्वच जीवन सुनियंत्रित करण्याची जबाबदारी ( क्रमाक्रमानें कां होईना ) एकदां विद्यार्थ्यांवर सोपविली कीं शाळेचें आवार, शाळेंतलें सर्व जीवन हें त्यांचें कार्यक्षेत्र बनतें. विद्यार्थ्यांची प्रार्थना घ्यावयाची, एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत, वर्गांतून कीडांगणावर शिस्तीनें जावयाचें; वर्गांत शिक्षक नसतांना व असतांना शान्तता पाळावयाची; वार्तांफलक व सूचना-फलक यांची निगा राखावयाची; वर्ग-वाचनालय, शालेय वाचनालय यांची व्यवस्था पहावयाची; क्रीडांगण, आवार व वर्ग स्वच्छ ठेवायचे; वर्गांचें वातावरण चित्रें, तक्ते, नकाशे इत्यादींनीं प्रसन्न व अभ्यासानुकूल राखावयाचें; क्रीडाविभागांतील सामने, वक्तृत्वादि विभागांतील स्पर्धा यांचा कार्यक्रम आंखून ते पार पाडावयाचे, आणि उत्सव, समारंभ, छंद-मंडळें इत्यादि सर्व विभागांचा कारभार पहावयाचा—असें केवढें तरी विस्तृत क्षेत्र त्यांना उपलब्ध होईल. पण याखेरीज विद्यार्थ्यांचा अनियमितपणा, गडबड करण्याच्या संवयी, वागण्या-चालण्यांतील शिथिलता व घाणेरड्या संवयी, शालेय

सामग्रीची जपणूक, समाजसेवेचे कांहीं कार्यक्रम – या सर्वांचा सुसंघटितपणें विचार करतां येईल, प्रचार-मोहिमा काढतां येतील, आणि स्वतःची समाज-सेवेची आवड पुरी करून घेतां येईल.

## नियम व अंमलबजावणी

शालेय जीवनांत ( आणि शक्य तर बाहेरहि ) आचरावयाचे नियम करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर टाकली कीं ते आचरण्याची जबाबदारी स्वाभाविकपणें त्यांना वाटूं लागेल व पटूं लागेल. हे नियम शक्य तितके थोडे असावेत. इंग्लंडमधील एका शाळेंत विद्यार्थ्यांनीं तीनच नियम केले आहेत. १. सोजन्यानें वागा. २. सहकार्य करा. ३. समजूतदारपणा दाखवा ! पण सर्वसामान्य शाळेंत विद्यार्थ्यांची जबाबदारीची जाणीव वाढेपर्यंत अधिक नियमांची गरज आहे. केलेले नियम सर्वांना माहीत असावेत. त्याच्या प्रती सर्वांना मिळाव्यात. शाळेंतील प्रमुख ठिकाणीं त्या लावल्या जाव्यात. सतत नियमभंग करणारांची चौकशी वर्गसमितीनें करावी, किंवा त्यासाठीं शालेय न्यायालय असावें. शिक्षांचें स्वरूपाहि मुख्याध्यापकांच्या संमतीनें विद्यार्थ्यांनीं ठरवावें, निवाडे त्यांनींच करावे. पण केवळ शिक्षेपेक्षां अधिक खोल जाऊन संवयींचीं कारणें शोधून काढण्यावर भर असावा.

## शपथविधि

प्रमुख अधिकाऱ्यांची निवड झाल्यानंतर अधिकारसूत्रें त्यांनीं घेण्यापूर्वीं त्यांचा शपथविधि-समारंभ करण्याची प्रथा असणें इष्ट होय. हा समारंभ जितक्या गांभीर्यानें साजरा होईल तितकें त्या शपथविधीचें महत्त्व सर्वांवर ठसेल. निवृत्त विद्यार्थीमंत्र्यांचा सन्मान, त्यांच्या कार्याचा अहवाल, व नवीन कार्यकारी मंडळाच्या धोरणाचें निवेदन या गोष्टीहि या निमित्तानें व्हाव्यात.

## शिस्तीचें स्वरूप

या पद्धतीचा शालेय व्यवस्थेंत अन्तर्भाव करावयाचा म्हणजे जुन्या शिस्तीच्या व मानापमानाच्या कल्पना मुख्याध्यापक व शिक्षक यांना प्रथम बदलाव्या लागतील. विद्यार्थ्यांचा चिकित्सकपणा, शंकेखोरपणा, स्वमताविषयीं आग्रह, स्वाभिमान या गोष्टींचा शिक्षकांना राग न येतां स्वीकार करावा लागेल; आज्ञाधारकपणा, विनय, आपला अधिकार, यांबद्दलच्या जुन्या कल्पना

सुधारून घ्याव्या लागतील. मुख्याध्यापक किंवा शिक्षक यांची 'सर्वाधिकार-शाही वृत्ति' व 'शालेय लोकशाही' यांचा समन्वय अशक्य आहे. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिल्यानंतर ते मोकळेपणें वागणारच; पण त्याबरोबर आपली जबाबदारी, आपली पात्रता व दर्जा यांची जाणीव ठेवून त्यांनी मर्यादेंत वागावें हें रास्तच. पण त्यांचीहि वागणूक वागवून घेणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वावर व कौशल्यावरच अधिक अवलंबून असते असा अनुभव आहे. त्यासाठीं थोडी उदारवृत्ति, बरीच सहनशक्ति, आणि पुष्कळसा वाणीचा गोडवा यांची गरज आहे.

विद्यार्थ्यांमध्यें शिस्तीची भावना मुरूं लागते, ती जबाबदारीच्या जाणिवेनें आणि 'लोकमता'च्या दाबानें. आपली वागणूक समाजाला मान्य असावी, आणि आपण समाजाच्या उपहासाचा, अवहेलनेचा व टीकेचा विषय होऊं नये ही इच्छा सर्वांनाच असते. स्वयंशासनाच्या दिशेंत या समाज-मताला मोठें स्थान आहे. तसेंच, प्रत्येकानें आपल्या कृत्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे या तत्त्वावरहि या पद्धतींत भर आहे. जुन्या शिक्षांवर अविश्वास निर्माण झाल्यानें, आणि व्यक्तीच्या आचरणाचीं सारीं बीजें अन्तःप्रवृत्तींत, सामाजिक मान्यतेंत, आणि आत्मगौरवाच्या प्रवृत्तींत असल्यानें त्यांचा उपयोग करून व्यक्तीचा स्वाभिमान जागा करणें, निश्चयशक्ति वाढविणें, समाजमताची कदर करावयास शिकविणें,—आणि त्यांतून चारित्र्यविकास घडविणें हा या पद्धतीचा व प्रयोगाचा गाभा आहे.

या तऱ्हेचा प्रयोग सुरू केला कीं जागरूकतेनें त्याकडे पहावें लागेल व सातत्य राखावें लागेल. केवळ लोकशाही पद्धतीची यंत्रणा उभारणें हें बाह्यांग झालें. तिचा खरा जीव ज्या वृत्तीनें काम केलें जाईल, व जें काम होईल त्यावरच अवलंबून आहे. या बाबतींत पुढील शब्द सतत मनांत वागवले पाहिजेत. "आपण कांहीं खरेंखुरें काम करीत आहोंत, असें सर्वांना वाटलें पाहिजे. विद्यार्थी—शिक्षकांत खरे संबंध प्रस्थापित झाले पाहिजेत. विद्यार्थ्यांना आपल्या कार्याचें दृश्य फळ दिसलें पाहिजे, व त्यांना सामाजिक मूल्य—महत्त्व आहे हें पटलें पाहिजे. केवळ देखावा करणें हें अत्यंत घातुक ठरेल."

• • •

: १६ :

# गुणविकासमंडळें आणि चारित्र्यविकास

## प्रास्ताविक

शिक्षणाचें ध्येय, अभ्यासक्रमाचीं मूलतत्त्वें, आणि शाळा व समाज यांचा परस्पर संबंध – यांची चर्चा करतांना पुस्तकी ज्ञानाबरोबर आणि बौद्धिक विकासाबरोबर व्यावहारिक ज्ञान, व बालकांच्या भावनिक, शारीरिक व नैतिक शक्तींचा विकास हेंहि शिक्षणाचें उद्दिष्ट आहे;—नव्हे सर्वांगीण विकासांतूनच व्यक्तित्व उमलतें, बहरतें, आणि त्यासाठीं बौद्धिक विषयांना अभ्यासेतर अनेक कार्यक्रमांची जोड द्यावयास पाहिजे—असें अनेकदां प्रतिपादन केलें होतें. हे अभ्यासेतर कार्यक्रम म्हणजेच विविध प्रकारचीं छंदमंडळें अथवा गुणविकासमंडळें. त्यांचें स्वरूप व कार्यपद्धति यांचा ऊहापोह या प्रकरणांत करावयाचा आहे.

## कांहीं आक्षेप व उचित दृष्टि

पण आपल्या देशांतील गेल्या अनेक वर्षांच्या संस्कारांचा परिणाम असा झाला आहे कीं, ठराविक वेळापत्रक व ठराविक विषयांचें अध्यापन या-व्यतिरिक्त शाळेची जबाबदारी आहे असें आम्हांस वाटत नाहीं. पाश्चात्य देशांतून आलेलीं हीं कांहीं खुळें आहेत, व अधिकाऱ्यांना दाखविण्यासाठीं कांहीं तरी करावयाचें इतकेंच. असल्या कार्यक्रमांचें स्तोम माजाविल्यानें अभ्यासाचें मात्र खोबरें होतें अशी कांहीं जणांची प्रामाणिक समजूत असते. शिवाय शिक्षकांनीं काम किती व कोणकोणतें करावयाचें याला कांहीं मर्यादा असावी असें अनेकदां म्हटलें जातें.

कामाचा बोजा वाढतो म्हणून कांहीं गोष्टी नको म्हणणें वेगळें, व महत्त्वच वाटत नाहीं म्हणून कांहीं गोष्टी नको म्हणणें वेगळें. गुणविकास-मंडळांत

सर्वच शिक्षकांना प्रत्यक्ष काम करतां आलें नाहीं तरी मार्गदर्शनाची जबाबदारी घेणें मात्र सर्वांनाच शक्य आहे. निदान त्यांचें महत्त्व जाणून सहानुभूतीचा व प्रोत्साहनाचा दृष्टिकोण खास राखतां येईल. अर्थात् या अभ्यासेतर कार्यक्रमांत मोडणारा शिक्षकांचा वेळ त्यांच्या एकंदर कामाच्या तासांत अवश्य अन्तर्भूत केला पाहिजे हें कोणीहि मान्य करील. अशा प्रकारच्या कार्यक्रमांनीं अभ्यासांत व्यत्यय येईल हें मात्र निराधार आहे. त्यांची आंखणी व संचालन कसें केलें जातें यावर ही गोष्ट अवलंबून आहे. गुण-विकास-मंडळें हें खूळ नसून ती एक विद्यार्थी-जीवनांतील महत्त्वाची गरज आहे, आणि शिक्षणाचीं ध्येयें साध्य करण्याचें अमोघ साधन आहे, हा दृष्टिकोण मात्र शिक्षकांनीं मान्य करावयास हवा.

## मानसशास्त्रीय आधार

'कृतिद्वारां शिक्षण' आणि 'बालकांच्या गरजांनुसार शिक्षण' हीं दोन तत्त्वें एकदां मान्य केलीं कीं गुणविकास-मंडळांची आवश्यकता मान्यच करावयास हवी. सतत चळवळ, धडपड, प्रयोग ही मानवी जीवनांतील प्रबळ प्रेरणा आहे. तेव्हां विद्यार्थी-जीवनांत या 'उद्योग'वृत्तीला, सळसळणाऱ्या चैतन्याला योग्य वळण लावणें ही शाळेची जबाबदारी आहे. बौद्धिक अभ्यासक्रम केवळ अपुराच आहे असें नव्हे, तर विशिष्ट मर्यादेपलीकडे अनेकांना त्यांचा उपयोग नसतो. तेव्हां त्यांचा नैसर्गिक कल कोणीकडे आहे हें पाहणें व त्यासाठीं योग्य कार्यक्रम पुरविणें हें कार्य गुणविकास-मंडळें करूं शकतात. पौगण्ड अथवा कुमारदशेंत विद्यार्थ्यांना सामुदायिक जीवनाची आवड असते. त्या दशेंत विद्यार्थी साहसप्रियहि असतात. कोणतीहि गोष्ट स्वतःच्या मताप्रमाणें व स्वावलंबनानें करण्याची त्यांना हौस असते, आणि बाह्यनियंत्रणाचा त्यांना थोडा तिटकाराच असतो. संघप्रवृत्तीला योग्य वळण मिळून उत्कृष्ट मित्र मिळविण्याचेंहि हेंच वय असतें. शालेय जीवनांत जर संघभावनेची योग्य बूज राखली गेली नाहीं तर विद्यार्थी इतरत्र खेंचले जातात, कुठल्या तरी 'टोळीं'त सामील होऊन बेजबाबदारपणें वागूं लागतात, किंवा राजकीय संघटनांच्या हातांतलीं खेळणीं बनतात. त्यामुळें त्यांची शाळेवरील निष्ठा दुभंगते, इतकेंच नव्हे तर आंतरजीवनाच्या गरजा पुरविणाऱ्या या बाह्य संस्थाच शाळेपेक्षां जवळच्या व श्रेष्ठ वाटूं लागतात.

शिवाय, कामप्रवृत्तीच्या प्रादुर्भावामुळें कांहीं तरी चैतन्य अंगांत सळसळत असतें, त्याला मोकळी वाट करून द्यावयास पाहिजे. अंतरंगांत कोंडलेल्या त्या शक्तीचें उन्नयन व उदात्तीकरण करून नवानिर्मितीचे विविध मार्ग त्यांना खुले करून दिले पाहिजेत. आविष्कारासाठीं धडपडणाऱ्या शक्तींचा विनियोग करून त्यांचा आत्मविश्वास वाढविला पाहिजे. वाङ्मय आणि इतर ललितकला यांच्या द्वारां जीवनांतील सौंदर्याचा परिचय घडवून, आपलें जीवन विशुद्ध, सुंदर, भव्य, उदात्त बनविण्याचा मार्ग त्यांना दाखविला पाहिजे. अभ्यास-क्रमांतील वाङ्मय, इतिहास इत्यादि विषयांच्या अध्यापनांत ही संधि मिळते पण ती मर्यादित असते.

## नागरिकत्वाचें शिक्षण

शिक्षणांतला एकांगीपणा घालविण्यासाठींच नव्हे तर शिक्षण आणि जीवन यांमधील कृत्रिम भेद नाहींसा करण्यासाठीं या कार्यक्रमांची आवश्यकता भासते. अनुभवाच्या समृद्धतेंतूनच मनाच्या विविध शक्तींचा विकास व परिपोष कसा होतो हें चार गांवें हिंडून आलेल्या, विविध लोकव्यवहारांचें निरीक्षण केलेल्या, व त्यामुळें समयज्ञ, चतुरस्र, व चाणाक्ष बनलेल्या व्यक्तींच्या उदाहरणांवरून सहज कळून येतें. शिक्षणानें भावी जीवनाची तयारी करावयाची असेल तर विविध प्रसंगांत कसें वागावयाचें याचें प्रत्यक्ष अनुभव-गम्यच शिक्षण पाहिजे. नागरिकत्वाचें शिक्षण हें त्यांतूनच मिळेल. इतरांबरोबर कार्य कसें करावें, दुसऱ्याचा दृष्टिकोण कसा समजावून घ्यावा, स्वतःच्या आकांक्षांना कशी मुरड घालावी, योग्य व लायक व्यक्तिच कशा पारखाव्यात व निवडाव्यात, याची, थोडक्यांत—लोकशाही समाजव्यवस्थेंत नागरिकांना ज्या वृत्ति व जे गुण आवश्यक असतात त्या सर्वांची रंगीत तालीम यांतून मिळेल.

## रिकामपणासाठीं शिक्षण

फुरसदीचा वेळ कांहीं तरी आनंदप्रद व्यवसायांत घालवितां येणें ही एक गरज आहे, जीवनाची कला आहे. संस्कारी व असंस्कारी जीवनांतला भेद त्यावरच केला जातो. आत्मिक विकासांत काव्य, नाट्य, चित्रकला, गायन इत्यादि सांस्कृतिक विषयांचें फार मोठें स्थान आहे. उदार दृष्टि व उच्च अभिरुचि हीं त्यांतून प्राप्त होतात. संकुचितपणा व क्षुद्रता यांच्यावर तोच

एक इलाज आहे. दैनंदिन जीवनांतील कंटाळा, किरकिर आणि थकवा नाहींसा करून वृत्ति प्रफुल्ल बनविण्यास सच्छंदांचें अमोल साहाय्य होतें. त्यांचा उपक्रम विद्यार्थीदशेंतच व्हावयास पाहिजे.

## कांहीं मूलभूत तत्त्वें

अभ्यासेतर कार्यक्रमांपासून जें साधावयाचें तें साधण्याकरितां, आणि त्यांचें कार्य अभ्यासक्रमाला पोषक व पूरक व्हावें याकरितां या कार्यक्रमांची एकंदर आंखणी कांहीं विशिष्ट तत्त्वांनुसार झाली पाहिजे. तीं तत्त्वें पुढीलप्रमाणें होत :—

( १ ) हे कार्यक्रम शक्य तों शाळेच्या वेळांतच ठेवण्यांत यावे. रविवारीं अगर इतर सुटीच्या दिवशीं या कार्यक्रमांकरितां विद्यार्थ्यांना शाळेंत बोलाविल्यास अगर शाळा सुटल्यानंतर त्यांना शाळेंत ठेवून घेतल्यास त्यांच्या उपस्थितीवर परिणाम तर होईलच, पण शिवाय हे कार्यक्रम आणि नित्याचा अभ्यास या गोष्टी भिन्न आहेत, या 'अवान्तर' गोष्टी आहेत, कमी महत्त्वाच्या गोष्टी आहेत अशी त्यांची कल्पना होऊन या कार्यक्रमांविषयीं त्यांची आस्था कमी होईल. म्हणून शाळेच्या वेळापत्रकांतच दर आठवड्याला एखादा दुसरा तास या कार्यक्रमांकरितां राखून ठेवावा. तो तास शेवटचा असल्यास गांवांतल्या गांवांत असणाऱ्या सहलीहि त्याच तासांत आंखतां येतील. लांबच्या सहली किंवा क्रीडांगणावरील सामने असे कार्यक्रम मात्र शाळेच्या वेळांत होऊं शकणार नाहींत.

( २ ) या कार्यक्रमांची सांगड शक्य तों शालेय अभ्यासक्रमाशीं घालण्यांत यावी. त्यायोगें शालेय शिक्षणांत जिवंतपणा आणतां येईल. उदाहरणार्थ, वर्गांत एखाद्या नाटकांतील प्रवेशाचा अभ्यास भाषा-शिक्षक घेत असतील तर शालेय नाट्य-मंडळांत त्याचेंच नाट्यीकरण करतां येईल. भूगोलांतील नद्यांचें कार्य, जमिनीची झीज, भरती-ओहोटी, अशांसारखे विषय वर्गांत चालले असतील तर नदीचा कांठ किंवा समुद्रकिनारा अशा ठिकाणीं त्याच वेळीं सहली काढून तेथील या घडामोडी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवितां येतील. अशा सहलीच्या वेळीं इतर विषयांचाहि कांहीं भाग अभ्यासतां आला तर बरेंच होईल. एखाद्या सहलींत कांहीं ऐतिहासिक स्थळें पाहतां येतील, कांहीं कारखान्यांना भेटी देतां येतील व शास्त्रीय विषयाचें ज्ञान मिळवितां

येईल, भौगोलिक घटनांचाहि अभ्यास होऊं शकेल. मात्र अभ्यास-विषय आणि हे अभ्यासेतर कार्यक्रम याची सागड नैसर्गिक असावी, उगीच ओढा-ताण करून अनेक विषयांचें ज्ञान एकाच कार्यक्रमांत घालणें अशी कृत्रिमता येऊं नये.

( ३ ) या कार्यक्रमांत विविधता असावी; म्हणजे शाळेंतील प्रत्येक विद्यार्थ्याला या नाहीं त्या कार्यक्रमांत भाग घेतां येईल. कोणी नाट्यमंडळाचा सभासद होईल; कोणी लेखन-विकास-समितीचा सभासद होईल; कोणी बालवीर पथकांत नांव नोंदवील; कोणी चित्रकार-मंडळांत जाईल; कोणी क्रीडाविभागांत दाखल होईल.

(४) या कार्यक्रमांची व्यवस्था विद्यार्थ्यांनींच ठेवली पाहिजे. वादाविवादाची सभा असेल तर एकानें अध्यक्ष व्हावें, एकानें कार्यक्रमाची सूचना करावी; कोणीं शेवटचें आभाराचें काम आपल्याकडे घ्यावें. सहलीचा कार्यक्रम असेल तर तत्संबंधीं पत्रव्यवहार, गाडीचीं तिकिटें वगैरे काढणें, गाडीचा डबा राखून ठेवण्याची व्यवस्था करणें, फराळाचे जिन्नस विकत घेणें—या सर्व गोष्टी विद्यार्थी-प्रतिनिधींनींच कराव्यात. त्यांत फार मौलिक शिक्षण विद्यार्थ्यांना मिळतें. शिक्षकांनीं पुढाकार न घेतां विद्यार्थ्यांच्या पाठीशीं उभें असावें, त्यांना सल्ला द्यावा, मार्गदर्शन करावें, त्यांच्या कामावर देखरेख ठेवावी.

( ५ ) या कार्यक्रमांचा अतिरेक टाळावा. नाहीं तर शालेय अभ्यसावर त्याचा परिणाम होतो. शालेय अभ्यास या अभ्यासेतर कार्यक्रमां-इतकेच किंबहुना अधिकच महत्त्वाचे असतात हें विसरूं नये. एका शिक्षण-तज्ज्ञानें म्हटलें आहे, "ज्या शाळेंत असे अभ्यासेतर कार्यक्रम नसतात ती शाळा निकृष्ट होय; पण ज्या शाळेंत अभ्यास डावलून या अभ्यासेतर कार्य-क्रमांना अवाच्यासवा महत्त्व दिलें जातें ती शाळाहि तितकीच निकृष्ट होय." हें म्हणणें अगदीं सत्य आहे.

## गुणविकास-मंडळांचे विविध प्रकार

विद्यार्थ्यांच्या विविध प्रवृत्ति आणि सामाजिक जीवनाचीं विविध अंगें लक्षांत घेतां या अभ्यासेतर कार्यक्रमांचे म्हणजेच गुणविकास-मंडळांचे अनेक प्रकार शाळेंत योजितां येतात. शिक्षकांचा उत्साह व कार्यक्षमता

आणि स्थानिक सामाजिक वातावरणांतील अनुभव-केंद्रांची समृद्धि यांवरच कोणते उपक्रम शाळेंत सुरू करावयाचे हें अवलंबून राहील. साधारणपणें त्यांच्या विविधतेचें पुढील वर्गीकरण होऊं शकेल.—

वाङ्मय-विहार-मंडळ; कलोपासक मंडळ; अभ्यासपूरक मंडळ; सेवापथक; समाज-शिक्षण-मंडळ; सहलविभाग; क्रीडामंडळ. यांचा आतां क्रमशः स्थूल विचार करूं.

### ( १ ) वाङ्मय-विहार-मंडळ

या मंडळाच्या कार्यक्रमांत तीन प्रमुख विभाग येतील : वक्तृत्व-विभाग, लेखन-विभाग आणि वाचन-विभाग.

वक्तृत्वोत्तेजक सभा प्रत्येक शाळेंत अवश्य असावी. आपल्या इच्छा, आकांक्षा, भावना, विचार इत्यादि परिणामकारक रीत्या प्रकट करण्याचें, म्हणजेच आत्माविष्काराचें ' बोलणें ' हें बलवत्तर साधन आहे. या साधनाचा योग्य उपयोग करावयास शाळेनें शिकविलेंच पाहिजे. त्याकरितां वर्गांतील विषय शिकवितांना मिळणारी संधि अपुरी पडते, म्हणून या उपक्रमाची जरूरी भासते. सध्यांच्या लोकशाहीच्या काळांत तर वक्तृत्वगुणाची विशेषच आवश्यकता भासते. जरूर तेवढेंच बोलणें, उच्चार स्पष्ट करणें, बोलण्यांत अस्खलितपणा व योग्य चढउतार आणणें, विचार तर्कशुद्ध असणें, आणि त्यांची मांडणी सुसंगत करणें हे गुण विद्यार्थ्यांच्या बोलण्यांत दिसले पाहिजेत. तसेंच आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व हींहि भाषणांत दृग्गोचर झालीं पाहिजेत. वक्तृत्व याचा अर्थ केवळ सभेंत परिणामकारक भाषण करतां येणें एवढाच समजूं नये. तें तर अवश्य आहेच, पण चारचौघांत बसलें असतां संभाषणांत भाग घेऊन आपली छाप इतरांवर पाडतां येणें हाहि वक्तृत्वाचाच भाग आहे.

वक्तृत्व-मंडळाच्या कार्यक्रमांत विविधता असली पाहिजे. लहान बालकांच्या बाबतींत गोष्टी सांगतां येणें, अनुभवांचें कथन, पाहिलेल्या घटनांचें वर्णन, हे वक्तृत्वाचे कार्यक्रम होत. विद्यार्थी प्रौढ होत जातील तसतसें भाषण करणें, व्याख्यान देणें, दिलेल्या विषयावर अनुकूल वा प्रतिकूल बाजू मांडून साधक-बाधक प्रमाणें देऊन चर्चा करणें हे कार्यक्रम उपयुक्त होतील. पाठान्तराचें महत्त्व मात्र सर्वच विद्यार्थ्यांच्या बाबतींत उपकारक ठरतें. पाठान्तर म्हणजे गद्य आणि पद्य या दोही प्रकारच्या उताऱ्यांचें. वादविवादाच्या या सभा इयत्ता-

वारीनें असाव्यात. प्रत्येक इयत्तेची ( किंवा इयत्तेच्या प्रत्येक तुकडीची ) सभा असली म्हणजे त्या सभेच्या कार्यक्रमांत वर्गांतील सर्व, किंवा बहुसंख्य विद्यार्थ्यांना भाग घेण्याची संधि मिळते. शिवाय सर्व श्रोते—विद्यार्थी वर्गांतील म्हणजे परिचित असल्यामुळें आरंभीं वाटणारा संकोच वा भीति नाहींशी होऊन बोलण्याचा धीर येतो. मधून मधून शाळेंतील सर्व विद्यार्थी एकत्र आणून हे वादविवादाचे कार्यक्रम ठेवावे. त्यायोगें सभाधीटपणा अंगीं येण्यास मदत होते. वक्तृत्वाचे आन्तरवर्गीय किंवा आन्तरशालेय सामनेहि. या दृष्टीनें उपयुक्त होतात.

या सर्व कार्यक्रमांत मार्गदर्शन अत्यंत अवश्य असतें. चर्चेला विषय सुचविणें, त्याकरितां वाचावें काय हें दिग्दर्शित करणें, विद्यार्थ्यांची तयारी कितपत झाली आहे हें पाहणें, वक्तृत्वाचे प्रत्यक्ष पाठ देणें,—हें सर्व शिक्षकांनींच करावयास हवें. त्याकरितां स्वतः शिक्षकहि बहुश्रुत असून उत्कृष्ट वक्ते असावयास पाहिजेत. बाहेरचे नामांकित वक्तेहि मधून मधून शाळेंत बोलावून आणावे, व उत्कृष्ट वक्तृत्वाचे आदर्श विद्यार्थ्यांपुढें ठेवावे. इतर कलांप्रमाणेंच वक्तृत्वकलाहि साध्य होण्यास अनुकरण हें एक महत्त्वाचें साधन आहे.

वक्तृत्वाप्रमाणेंच लेखनहि आत्माविष्काराला उपयुक्त होतें. कोणाला आपले विचार-विकार परिणामकारक रीत्या बोलून दाखवितां येतील, तर कोणाला ते लिहून दाखवितां येतील. लेखनकलेनें सृजनशक्तीलाहि वाव मिळतो. बालवयांत वेड्यावांकड्या कविता करण्याची किंवा मोडकेतोडके लघुनिबंध, लंबुकथा लिहिण्याची संधि मिळाली तर त्यांतूनच निदान कांहीं जण तरी पुढें नामांकित कवि—लेखक होऊं शकतात. शालेय अभ्यासक्रमांत 'लेखन' हा विषय असतो हें खरें; पण वर्षांतून दहापांच निबंध लिहिले म्हणजे ही संधि पुरेशी होते असें नाहीं. म्हणूनच या अवान्तर लेखन-उपक्रमाची आवश्यकता भासते.

अवान्तर लेखनाला उत्तेजन द्यावयाचें तें शालेय नियतकालिकानें द्यावयाचें अशी सामान्य पद्धत असते. हें नियतकालिक वर्षांतून एकदां किंवा दर सहामाहीला एकदां असें प्रसिद्ध करण्याची प्रथा असते. शाळेची आर्थिक परिस्थिति बरी असेल तर तें छापण्यांत येतें व प्रत्येक विद्यार्थ्याला त्याची प्रत

मिळूं शकते. आर्थिक अडचण असली तर हें नियतकालिक हस्तलिखित असतें. विद्यार्थ्यांकडून लेख, कविता, चित्रें, चुटके वगैरे मागवून संपादक-शिक्षक त्यांतून निवडक लिखाणाला नियतकालिकांत स्थान देतात.

हें सर्व ठीक असलें तरी अपुरें पडतें. प्रत्येक विद्यार्थ्याला लिहिण्याची संधि मिळावी या दृष्टीनें वर्गावर्गाचें नियतकालिक असणें, इतकेंच नव्हे तर वर्गांतील प्रत्येक विद्यार्थ्यानें आपलें स्वतांचें नियतकालिक तयार करणें अधिक चांगलें. प्रत्येक विद्यार्थ्यानें एक स्वतंत्र वही करून त्यांत स्वतांच्या कविता, गोष्टी, निबंध, चुटके इत्यादि लिहून काढणें, चित्रें काढणें, संपादकीय मनोगत लिहिणें, काल्पनिक जाहिराती घालणें – हेंच त्याचें वैयक्तिक नियतकालिक. तें त्यानें सहामाहींत एकदां – किंवा वर्षांतून एकदां वर्गाला सादर करावें अशा वैयक्तिक नियतकालिकांतून निवडक लिखाण एकत्रित करून वर्गाचें नियतकालिक तयार करावें, आणि त्यांतूनच शाळेच्या छापील वा हस्तलिखित नियतकालिकाकरितां चांगले लेख निवडावे. यायोगें सर्व विद्यार्थ्यांना लेखनाकरितां उत्तेजन मिळतें. शाळेच्या नियतकालिकांत आपला लेख छापून आला याचें भूषण कोणाला वाटणार नाहीं ?

शालेय नियतकालिकाप्रमाणेंच शालेय वर्तमानपत्राचा उपक्रम कांहीं कांहीं शाळांतून केला जातो. हें वर्तमानपत्र दैनिक अथवा साप्ताहिक असतें. अर्थात् हें हस्तलिखित असून त्याची प्रत सर्व विद्यार्थ्यांना वाचण्याकरितां सोयीस्कर जागीं लावून ठेवण्यांत येते. या उपक्रमास मार्गदर्शक शिक्षक विशेष उत्साही असावयास पाहिजेत.

कांहीं शाळांतून वैयक्तिक प्रबंधाचा उपक्रम करण्यांत येतो. प्रौढ विद्यार्थ्यांनीं एखाद्या विषयाचा सर्व दृष्टींनीं विचार करून वर्षांतून एखादा प्रबंध म्हणजे स्वतःचें छोटें पुस्तकच तयार करावयाचें अशी ही पद्धत असते. हा उपक्रम वैकल्पिक ठेवल्यास बरें.

वर उल्लेखिलेल्या सर्व कार्यक्रमांकरितां शिक्षकांचें मार्गदर्शन अर्थात् हवें. लेखनाकरितां विषय सुचविणें, संदर्भ-ग्रंथ सुचविणें, कच्चें लेखन तपासणें, लिखाणाची निवड करणें,–हीं सर्व कामें शिक्षकांनींच करावयास हवीं. हें मार्गदर्शन करणारे शिक्षक स्वतः लेखक असलेले बरे.

लेखन आणि वक्तृत्व या दोन्हींकरितां वाचन हें अवश्य असतें. त्याकरितां शाळेंतील वाचनालय समृद्ध असावयास हवें. पण तेवढ्यानेंच भागत नाहीं. कांहीं विद्यार्थ्यांना वाचनाची विशेष आवड असते. एक तऱ्हेची वाचनाची तृष्णा, ज्ञानाची लालसाच त्यांच्या ठायीं असलेली दिसते. त्यांची जिज्ञासा तृप्त करण्याकरितां कांहीं खास सोय शाळेनें करावयास हवी. असे विद्यार्थी निवडून काढून त्यांचें वाचक-मंडळ बनवावें; त्यांना विविध विषयांवरील पुस्तकें सुचवावीं, पुरवावीं. पद्धतशीर वाचन कसें करावयाचें, प्रस्तावना, अनुक्रमणिका, सूचि, तळटीपा इत्यादींचा उपयोग कसा करावयाचा, वाचनाचीं टिपणें कशीं तयार करावयाचीं हें शिकवावें, आणि वाचनापासून जास्तींत जास्त ज्ञान व आनंद मिळविण्यास त्यांस साहाय्य करावें. देशांत विचारवंत नागरिक निर्माण करण्यास असें पद्धतशीर वाचन खास उपयुक्त होईल.

### २. कलोपासक मंडळ

या मंडळातर्फे विविध कलांची उपासना विद्यार्थ्यांना करतां येईल. या मंडळाचे नाट्य-मंडळ, चित्रकार-मंडळ, गायन-समाज, नृत्य-विभाग असे विविध विभाग होऊं शकतील, व त्या त्या विषयांची गोडी असणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी त्या विभागांचे सभासद होऊं शकतील. या कलांची उपासना हा आत्माविष्काराचाच भाग आहे. मूक अभिनय किंवा नृत्य यांच्या साहाय्यानेंसुद्धां कलावंत राग–लोभादि विकार, भावना कशा व्यक्त करतात तें पाहावयास मिळतें. मात्र या मंडळाचें कार्य पद्धतशीरपणें झालें पाहिजे.

अभिनयाची – नाट्याची आवड प्रत्येक माणसांत कमीजास्त प्रमाणांत उपजतच असते. तिला व्यक्त होण्यास योग्य वाव मिळाला नाहीं तर ती एक तर सुप्त राहते अथवा आडवळणानें जाऊं लागते. तिच्या योग्य आविष्काराकरितां नाट्यमंडळें उपयुक्त होतात. नाट्यमंडळ म्हटलें म्हणजे एकदम नाटकेंच बसवावयास लागावयाचें असें नाहीं. गोष्टी सांगणें, ऐतिहासिक अथवा भौगोलिक घटनांची माहिती सांगणें, यांतहि नाट्याला वाव असतो. वर्गांत चाललेल्या भाषाविषयक पाठांत केव्हां केव्हां नाट्यीकरणाला वाव असतो. प्राथमिक अवस्थेंत नाट्यमंडळाच्या सभासदांचें कार्य अशा तऱ्हेचें असूं शकेल. पण पुढें हळूहळू छोटे प्रवेश, छोटीं नाटकें बसविणें

इकडेहि सभासदांनीं आपलें लक्ष वळविलें पाहिजे. या नाटकांसंबंधींची सर्व व्यवस्था मंडळाच्या सभासदांनींच पाहावी. नाटकाची निवड, पात्रांची निवड, अभिनय, नाटकाचीं माहितीपत्रकें, नाटकाची रंगभूमि, पडदे, पात्रांकरितां कपडे वगैरे साहित्य, प्रेक्षकांची बसण्याची व्यवस्था इत्यादि सर्व गोष्टी मंडळाच्या सभासदांनींच कराव्या; कारण त्यांतच खरें शिक्षण असतें. अर्थात् तज्ज्ञ शिक्षकांचा सल्ला अवश्य घ्यावा.

चित्रकार-मंडळाचें कार्य शाळेंतील चित्रकला-शिक्षकांच्या मार्गदर्शनाखालीं चालावें. छायाचित्रण विभाग याच मंडळांत समाविष्ट व्हावा. त्याकरितां मधून मधून शाळेच्या बाहेर सहलीहि काढाव्या.

गायन–वादन-समाजाचें कार्य आणि नृत्य-विभागाचें कार्य वरीलप्रमाणेंच तज्ज्ञ शिक्षकांच्या सल्ल्यानें चालावें. मुलींकरितां हे विभाग विशेष सोयीचे वाटत असले तरी मुलांनींहि आपापल्या कलाप्रमाणें या मंडळाचे सभासद अवश्य व्हावें.

कलोपासक मंडळाच्या विविध शाखांतील सभासदांना लागणारें साहित्य शाळांनीं पुरविलें पाहिजे. उदाहरणार्थ, संगीत-शाखेला तबला, पेटी इत्यादि साहित्य लागेल. नाट्याकरितांहि कांहीं कायम स्वरूपाच्या वस्तु लागतील. त्या शाळांनीं पुरवाव्या. मात्र कांहीं वैयक्तिक खरेदी विद्यार्थीविद्यार्थिनींनीं करावयास हवी. स्वतःची बांसरी किंवा थोडी प्रगति झाल्यानंतर स्वतःचें फिड्ल असणें योग्य.

### ३. अभ्यास–पूरक मंडळें

शालेय विषयांच्या वर्गांत चाललेल्या अभ्यासानें कांहीं विशेष हुशार विद्यार्थ्यांची तृप्ति होत नाहीं, व त्या त्या विषयांसंबंधीं अधिक अध्ययन करावें असें त्यांना वाटतें. अशा विद्यार्थ्यांना शाळेनें अवश्य उत्तेजन द्यावयास हवें. त्याकरितां निरनिराळ्या विषयांचीं अशीं अभ्यासमंडळें स्थापितां येतील, व त्या त्या विषयांच्या तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखालीं सभासद आपली ज्ञान-लालसा तृप्त करून घेतील. या मंडळांचें कार्य केवळ पुस्तकी स्वरूपाचें न राहतां त्यांत विविधता असावी. उदाहरणार्थ, इतिहास-मंडळाचे सभासदांनीं ऐतिहासिक स्थळांना भेटी द्याव्या, जुन्या ऐतिहासिक

कागदपत्रांचा अभ्यास करण्यास शिकावें; ऐतिहासिक सुप्रासिद्ध व्यक्तींचे दिन साजरे करावे; ऐतिहासिक वस्तूंचा, फोटोंचा, चित्रांचा संग्रह करावा. शास्त्र-मंडाळाच्या सभासदांनीं शास्त्रीय उपकरणें तयार करण्यास शिकावें; शास्त्रज्ञांचीं चरित्रें वाचावीं; शास्त्रीय विषयांवर तज्ज्ञांचीं व्याख्यानें करवावीं; मराठी-मंडळाच्या सभासदांनीं कथा, निबंध लिहिण्याचा, कविता रचण्याचा प्रयत्न करावा. अशा तऱ्हेनें या मंडळाच्या सभासदांचें कार्य विविध तऱ्हेचें व मूळ विषयाच्या अध्ययनाला पूरक असें व्हावें.

### ४. सेवा-पथक

या पथकाचेहि कार्यक्रम-भिन्नत्वाप्रमाणें विविध प्रकार होतील; पण सर्व कार्यक्रमांच्या मागें 'सेवा' ही भूमिका असली पाहिजे. कांहीं विद्यार्थी–विद्यार्थिनी बालवीर-पथकांत जाऊन स्वावलंबन, शिस्त, चारित्र्य यांचे प्रत्यक्ष पाठ घेतील, व दुसऱ्यास साहाय्य करण्यास सदैव तत्पर राहतील. कांहीं जण प्रथमोपचार-विभागाचे सदस्य होतील, व शाळेच्या परिसरांत व इतरत्रहि स्वच्छता आणि आरोग्यवर्धक वातावरण ठेवण्यास साहाय्य करतील; आजारी बांधवांची शुश्रूषा करण्यास रुग्णालयांत जातील, गरिबांकरितां कपडे गोळा करतील,–आणि अशा तऱ्हेनें सर्वत्र बंधुभाव निर्माण करण्यास मदत करतील. कांहीं जण गरीब-साहाय्यक-मंडळाचें कार्य पत्करतील, व शाळेंतील सहाध्यायां-करितां पुस्तकें जमवतील, फीकरितां वर्गणी गोळा करतील. सेवापथकाची यशास्विता मार्गदर्शक शिक्षकांवर फार अवलंबून असते. योग्य मार्गदर्शन मिळालें तरच उपयुक्त कार्य होतें, नाहीं तर केवळ बाह्य देखाव्यापुरतीं कामें होतात.

### ५. समाज–शिक्षण–मंडळ

उपयुक्त सामाजिक कार्याची दीक्षा विद्यार्थ्यांना या मंडळातर्फे देतां येते. शाळेंत वस्तुभांडार सुरू करून, किंवा ग्रंथविक्रीची व्यवस्था करून, अथवा पतपेढी (बँक) काढून बरेंच समाज-शिक्षण शाळांतून देतां येतें. भांडारा-करितां कोणत्या वस्तु खरेदी करावयाच्या, कोठें खरेदी करावयाच्या, भावाची चौकशी कसोशीनें कशी करावयाची, माल मागविण्याचे विविध मार्ग कोणते, भांडारांत आलेला माल व्यवस्थित मांडावयाचा कसा, त्याच्या किंमती कशा ठरवावयाच्या, त्यांची विक्री कशी करावयाची, गिऱ्हाइकांशीं (म्हणजे

मुख्यतः विद्यार्थ्यांशीं ) हंसतमुख राहून अदबीनें कसें वागावयाचें, विक्रीची नोंद कशी ठेवावयाची, नफातोटा कसा काढावयाचा, वगैरे उपयुक्त शिक्षण वस्तुभांडारांच्या साहाय्यानें देतां येतें. शालेय पतपेढींत पैशाच्या व्यवहारांसंबंधीं असेंच विविध शिक्षण देतां येऊन पैशाची बचत करण्यासहि विद्यार्थ्यांना शिकवितां येईल. या दोन्ही तऱ्हांच्या व्यवहारांत आर्थिक घडामोडी असल्यामुळें यांत शिक्षकांचें मार्गदर्शन, त्यांची देखरेख आणि त्यांचें नियमन यांची विशेषच गरज भासते.

**६. सहली**

सहलींचे उद्देश दोन : मनोरंजन आणि ज्ञान. हे दोन उद्देश डोळ्यांपुढें ठेवूनच सहल-विभागाच्या सभासदांनीं आपले कार्यक्रम आंखले पाहिजेत. कांहीं सहली शाळेमार्फत विषयांशीं संबद्ध अशा ठिकाणीं सर्व विद्यार्थ्यांकरितां आंखल्या जातील. पण सहल-विभागातर्फे होणाऱ्या सहली सामान्यतः वैकल्पिक व सभासदांकरितांच असणार. सहलींची योजना वर्षारंभींच तयार व्हावी. प्रत्येक सहलीसंबंधीं सर्व तपशीलांचा बारकाईनें पूर्वविचार झाला पाहिजे. कोठें जावयाचें, केव्हां जावयाचें, कोणत्या मार्गानें प्रवास करावयाचा, बरोबर साहित्य काय काय घ्यावयाचें, खर्च किती येणार, तेथें गेल्यानंतर काय काय पहावयांचें, त्याचा शालेय विषयांशीं अथवा सामान्य ज्ञानाशीं संबंध काय, परत केव्हां यावयाचें – हें सर्व पूर्वनियोजित असावें. प्रत्येक सहल पूर्ण झाल्यानंतर तिचा वृत्तान्त प्रत्येक सदस्यानें लिहून काढावा, व शक्य तर तो सचित्र असावा; त्याकरितां सहल-मंडळाचा छायाचित्रें काढण्याचा कॅमेरा असावा. सहलींबरोबर शिक्षक असावेतच.

**७. क्रीडामंडळ**

क्रीडांगणावरील शालेय कार्यक्रमांचा संपूर्ण विचार पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत केला आहेच. पण ते कार्यक्रम शाळेंतील सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनी यांचेकरितां असणार. कांहीं मुलांना अथवा मुलींना एखाद्या शारीरिक कार्यक्रमांत अथवा खेळांत विशेष प्रावीण्य मिळवावयाचें असेल तर त्यांनीं या मंडळाचे सभासद व्हावें, व तें प्रावीण्य मिळविण्यास त्यांना शाळेनें साहाय्य करावें.

## समारोप

अभ्यासेतर कार्यक्रमांचे व गुणविकास-मंडळांचे होणारे लाभ व सुपरिणाम संकलितपणें पुढीलप्रमाणें सांगतां येतील :

१. विद्यार्थ्यांच्या विविध सुप्त शक्तींचा आविष्कार होतो.

२. विद्यार्थ्यांच्या निर्मिति-प्रवृत्तीला वाव मिळून त्यांच्यांत सदभिरुचीची जोपासना होते.

३. पुढाकार, जबाबदारी, सहकार्य, इत्यादि गुणांचें संगोपन होऊन उत्कृष्ट नागरिकत्वाचें शिक्षण मिळतें.

४. विद्यार्थी आणि शिक्षक यांत भरपूर जिव्हाळा निर्माण होऊन विद्यार्थ्यांची शाळेवरील निष्ठा दृढावते.

५. शाळा व समाज यांतील अंतर कमी होऊन शाळेच्या कार्याचें महत्त्व समाजाला पटूं लागतें, व शाळेच्या ध्येयाला पोषक असें सामाजिक वातावरण निर्माण होतें.

समारोपादाखल एक महत्त्वाचा विचार मांडावासा वाटतो तो असा :

शाळेंत चालणाऱ्या या विविध कार्यक्रमांत सहभागी झाल्यानें विद्यार्थ्यांचीं मनें शाळेंत रमूं लागतात. शालेय जीवनाबद्दल त्यांच्या मनांत आस्था निर्माण होते. आणि या कार्यक्रमांत विद्यार्थी उत्साहानें व्यक्तिशः, गटागटानें, अथवा सामुदायिक रीतीनें जेव्हां भाग घेतात, किंवा गणवेष घालून अथवा शाळेचें बोधचिन्ह कोटावर, सद्यावर लटकवून शालागीत गात गात शाळेच्या निशाणाखालीं एकत्र येतात, संचलन करतात,–तेव्हांचें दृश्य केवळ विलोभनीय, नेत्रदीपकच नव्हे तर उत्साहवर्धक आणि चारित्र्यविकसनास साहाय्यक असें होतें. आणि अशा तऱ्हेचे चारित्र्यसंपन्न विद्यार्थी जेव्हां पुढील आयुष्यांत 'ही **माझी** शाळा – ही **आमची** विद्यादात्री **माता**', 'हें **आमच्या** शाळेचें क्रीडांगण', 'हे **माझे** शिक्षक, माझे मार्गदर्शक, माझ्या उत्कर्षाला हे कारणीभूत', असें अभिमानानें, कृतज्ञतेच्या जाणिवेनें म्हणतांना ऐकूं येतात, तेव्हां खरा शिक्षक आपलीं सर्व दुःखें – आर्थिक अडचणी, सामाजिक अवहेलना – क्षणभर विसरून उच्च, स्वर्गीय वातावरणांत तरंगूं लागतो; आणि आपल्या हातून कांहीं तरी महत्त्वाचें सामाजिक, राष्ट्रीय कार्य घडत आहे अशी जाणीव होऊन स्वतःला धन्य मानतो.

• • •

९५५५३
दि.
एम.
सी. नं. २७/३१५४

# : १७ : इमारत-वर्ग—वर्गातील व्यवस्था

## प्रास्ताविक

इंग्रजी राजवटींत शिक्षणाला आरंभ होतांच शाळांसाठीं सुंदर इमारती बांधल्या जाऊं लागल्या. आतां खाजगी संस्थांनीं हजारों रुपये खर्चून प्रासाद-तुल्य इमारती बांधल्या आहेत. त्यांवर खर्च होणारा पैसा बघून पुष्कळदां असें म्हटलें जातें, आपला देश गरीब आहे; लोकांना पोटभर खायला मिळण्या-चीच जिथें पंचाईत तिथें शाळेच्या इमारतींवर पैसा खर्च करण्यापेक्षां शाळा उघड्यावर, झाडांखालीं भरविलेल्याच बऱ्या; त्यायोगें निसर्गाशींहि एकरूपता साधतां येईल,—असें केव्हां केव्हां सुचविलें जातें. पण आपल्या देशांतील भौगोलिक परिस्थिति—विशेषतः उन्हाळा आणि पावसाळा या ऋतूंतील (आणि कांहीं ठिकाणची हिंवाळ्यांतीलहि ) हवामानाची परिस्थिति पाहिली तर शाळेकरितां इमारत हवीच असें म्हणावयास हरकत नाहीं.

इमारत हवी; पण ती अगदीं टोलेजंग, अनेक मजल्यांची, भक्कम, शोभिवंत अशी कशाला बांधावयाची ? विद्यार्थी दिवसाच्या चोवीस तासांपैकीं फार तर पांच सहा तास तिचा उपयोग करणार. तेव्हां तिच्यावर विशेष खर्च न करतां तात्कालिक गरज भागविणारी, जुजबी इमारत बांधली तर खर्च कमी होऊन शिक्षण स्वस्त करतां येईल. निदान वांचलेला पैसा शिक्षण-साहित्याकरितां खर्च करावयास मिळेल, असा कांहींचा आग्रह असतो. या आग्रहांत थोडें तथ्य दिसलें तरी शालेय कार्यक्रमांत इमारतीचें शैक्षणिक दृष्ट्या जें महत्त्वाचें स्थान आहे त्याबद्दलचें कांहींसें अज्ञानच त्यांत असतें. इमारत ही केवळ सोयीची गोष्ट नसून एकंदर शिक्षणावर आधुनिक काळांत तिचा जो परिणाम होतो तो लक्षांत घेऊनच शिक्षणतज्ज्ञ शाळेच्या इमारतीचा प्रश्न महत्त्वाचा समजतात. स्थापत्यशास्त्र-दृष्ट्या निर्दोष आणि आकर्षक, प्रशस्त, हवेशीर, सुप्रकाशित, सुशोभित, स्वच्छ अशी इमारत शाळेकरितां असली तर त्या इमारतींत अध्ययन करतांना मुलांना जो आनंद होतो, उत्साह वाटतो, मन प्रसन्न झाल्यामुळें अभ्यास

करण्यास जो हुरूप वाटतो तो लक्षांत घेतां शाळेला चांगली इमारत असणें हें:किती आवश्यक आहे तें स्पष्ट होतें.

## इमारत भाड्याची कां स्वतःच्या मालकीची ?

शाळेची इमारत भाड्याची असण्यापेक्षां स्वतःच्या मालकीची असणें बरें. कारण भाड्याच्या इमारतींत ज्या सोयी–गैरसोयी असतील त्यांवर भागवून घ्यावें लागतें, तर स्वतःची इमारत असली तर ती बांधतांना आपल्या गरजा लक्षांत घेऊन हव्या त्या सोयी प्रथमपासूनच करून घेतां येतात. शिवाय वर्षानुवर्ष भाडें भरीत बसण्यापेक्षां इमारत बांधतांना आरंभीं बराचसा खर्च करावा लागला तरी अंतीं आर्थिक दृष्ट्या तेंच फायदेशीर होतें.

शाळेच्या इमारतीस लागणारा पैसा कोठून आणावयाचा ? पूर्वीच्या काळीं सरकारी शिक्षण-खात्याकडून शालेय इमारतींस लागणाऱ्या खर्चाचा कांहीं अंश मदत म्हणून मिळत असे. आतां तशी मदत सामान्यतः मिळत नाहीं. दानशूर धनिकांकडून मोठ्या रकमा एकहातीं मिळवावयाच्या, व त्याबद्दल त्यांचीं नांवें शिक्षणसंस्थेला द्यावयाचीं हा उपायहि महाराष्ट्रांतील अनेक शाळा–कॉलेजांचीं नांवें पाहतां एके काळीं किती यशस्वी ठरला तें दिसून येतें. पण आतां तो मार्गहि हळू हळू बंद होत चाललेला दिसतो.

वरीलपैकीं एखाद्या मार्गानें इमारतीस पैसा मिळाला तर तें बरेंच. पण तसा तो मिळाला नाहीं तर कर्ज काढूनहि शाळेची इमारत बांधावयास हरकत नाहीं. दर वर्षीं या कर्जावरील व्याज देऊन थोडें मुद्दलहि फेडण्याची दीर्घकालीन योजना आंखल्यास पंचवीस तीस वर्षांत सर्व कर्ज फिटून इमारत शाळेच्या मालकीची खऱ्या अर्थानें होऊं शकते. कांहीं नामांकित शिक्षणसंस्थांनीं या मार्गानें शाळेकरितां भव्य इमारती बांधल्या आहेत.

## इमारतीची जागा

इमारत बांधण्याकरितां जागा ( वास्तु ) निवडतांना विशेष काळजी घेतली पाहिजे. दाट वस्तींत इमारत न बांधतां शक्य तितक्या मोकळ्या जागेंत ती हवी. लहान शहर असेल तर शहराच्या बाहेर पण शहराला लागूनच ती बांधली तर अशी जागा थोड्या कमी किंमतींतहि मिळूं शकते. सरकारनें शिक्षण-संस्थांना मोफत जागा देऊन आपला वांटा जरूर उचलावा, किंवा धनिकांकडून 'भूदानयज्ञा'च्या रूपानें शाळेला जागा मिळाली तर

गांवकऱ्यांना तीव्रद्दल आपलेपणा वाटेल. इमारतीची जागा आरोग्यदृष्टया निर्दोष असावी. जागा ओलसर असली, किंवा पावसाळ्यांत आसपास पाणी सांचत असलें, किंवा धूळ फार असली, किंवा एखादा रासायनिक अगर तत्सम कारखाना जवळ असल्यामुळें हवा दुर्गंधित होत असली, तर अशी जागा आरोग्यास अपायकारक म्हणून शाळेच्या इमारतीस अयोग्य होय. शाळेला लागूनच नदी, तलाव असतील तर तें कांहींसें धोक्याचें होतें. एखादी धान्य दळण्याची गिरणी असली तर तिच्या यंत्रांच्या खडखडाटानें वर्गांत शिकविणें त्रासदायक होतें. तसेंच फार रहदारीचा रस्ता शाळेला लागून असला तर वाहनांचे आवाज आणि फेरीवाल्यांच्या आरोळ्या यांचाहि उपसर्ग होतो. हें सर्व लक्षांत घेऊनच इमारतीची वास्तु निवडली पाहिजे. शिवाय भरपूर हवा आणि मुबलक प्रकाश या दोन गरजांचाहि विचार या निवडीच्या वळीं केला पाहिजे.

शाळेच्या इमारतीकरितां जागा ठरवितांना केवळ इमारतीला किती जागा लागेल तेवढेंच पाहून भागत नाहीं. इमारतीला लागूनच क्रीडांगण करतां आलें, निसर्गाच्या अध्ययनाकरितां बाग ठेवतां आली, मुख्याध्यापक, कांहीं शिक्षक, कारकून, शिपाई यांची राहण्याची व्यवस्था करतां आली, किंवा विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहाची जरूरी असली तर तें बांधतां येण्यापुरती जागा असली तर पाहावी. केवळ तात्कालिक गरज किती आहे एवढेंच न पाहतां थोडी दूरदृष्टि ठेवून पांचपंचवीस वर्षांत शाळेची किती वाढ होण्याचा संभव आहे, त्या वेळेच्या गरजा काय असतील याचाहि विचार करून थोडी मोठी अशी जागा शाळेकरितां निवडतां आली तर पहावी. अशी एखादी सोयीची जागा गांवांत, गांवाला लागून रिकामी पडली असली तर तिची रास्त अशी किंमत देऊन सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीनें शाळेला ती मिळवितां येते. शाळेकरितां सोईस्कर जागा निवडतांना व तीवरील इमारत बांधतांनाहि स्थापत्यशास्त्रविशारदांचा सल्ला घ्यावाच,–पण त्याचबरोबर वैद्यकीय तज्ज्ञांचाहि सल्ला आरोग्यदृष्टया घ्यावा.

## इमारत ( आकार आणि आकारमान )

शाळेच्या इमारतीच्या चर्चेंत प्रथम विचार करावयाचा तो तिचा आकार आणि आकारमान यांचा. अर्थात् या दोन्ही गोष्टी शाळेचें ध्येय, तात्कालिक

गरज, आणि पुढील विकासाचा संभव यांवर अवलंबून आहेत. तरीहि सामान्यपणें विचार करून या गोष्टी निश्चित करतां येतील.



आकृति नं. २


शालेय इमारतीकरितां जे विविध प्रकार सोयीचे समजले जातात त्यांत हा आकार (आकृति १ली) विशेष सोयीचा मानतात. या आकृतींत केवळ तळ-मजला दाखविला आहे. यांतील सर्वांत मोठी खोली म्हणजे सभागृह. शाळेंतील कोणत्याहि वर्गांतून विद्यार्थ्यांना या मध्यभागांत चटकन जमतां येतें. सभा-गृहाला लागून पुढें असणारी मधली खोली म्हणजे मुख्याध्यापकांची कचेरी. तिला लागून एका बाजूला शाळेची कचेरी तर दुसऱ्या बाजूला शिक्षकांची विश्रान्तीची जागा. इमारतीच्या दोन्ही टोंकांना जे मोठे चार वर्ग दाखविले आहेत त्यांचा चित्रकला-वर्ग, शास्त्रीय प्रयोगशाळा, ग्रंथालय, भूगोलवर्ग, हस्त-व्यवसाय-वर्ग—अशा तऱ्हेनें उपयोग करतां येईल. बाकीच्या खोल्या म्हणजे वर्गाच्या व इतर खोल्या. शाळेंत एकंदर किती वर्ग असणार त्यावर यांची संख्या व शाळेचें आकारमान अवलंबून राहणार.

मुलांची सुरक्षितता आणि जिन्यांची चढउतर यामुळें त्यांना व शिक्षकांना होणारा त्रास यांचा विचार करतां शाळा एकमजलीच असणें योग्य. पण शहरांत अशी विस्तीर्ण जागा मिळणें कठीण व खर्चाचें. तेव्हां शालेय इमारत फार तर दुमजली असावी, पण त्यापेक्षां जास्त मजले असूं नयेत. शाळेंतील दैनंदिन कारभारावर मुख्याध्यापकांनीं लक्ष ठेवण्याच्या दृष्टीनेंहि इमारतीला दोनपेक्षां अधिक मजले असूं नयेत.

इमारत दुमजली असल्यास वरील आकृतींत दाखविलेले कांहीं वर्ग ( विशेषतः भूगोलवर्ग ) वरच्या मजल्यावर न्यावे. सभागृहाच्या वर मोठी गच्ची ठेवतां आल्यास विशेषच चांगलें.

सभागृह मध्यें घेऊन त्याला दोन्ही बाजूंना समान्तर अशा वर्गाच्या व इतर खोल्या घेणें ही रचनाहि सोयीची होऊं शकते. पुढील आकृतींत ही तऱ्हा दाखविली आहे. ( आकृति नं. २ )


या आकृतींत इमारतीच्या प्रवेशद्वारांतून कारंजाच्या बाजूनें सभागृहाकडे जाण्याचे दोन रस्ते, आणि वर्गांच्या व इतर खोल्यांकडे जाण्याचे दोन रस्ते दाखविले आहेत. खोल्यांना लागून असणाऱ्या व्हरांड्यांतून सभागृहाकडे विद्यार्थ्यांना जातां येईल. सभागृहाच्या मागील बाजूस थोड्या अंतरावर मुताऱ्या, संडास दाखविले आहेत, तर मागील दोन कोंपऱ्यांत पिण्याच्या पाण्याची सोय आहे. इमारतीच्या कोठल्याहि भागांतून इतर कोठल्याहि



आकृति नं. २

भागांत जावयाचें असल्यास व्हरांडा आहे, व त्यावर छप्पर घातलें म्हणजे पावसापासून संरक्षणहि मिळेल. जास्त वर्ग हवे असतील तर दुसरा मजला चढवितां येईल. सभागृहावर दुसरा मजला आवश्यक तर बांधावा; नाहीं तर सभागृह एक मजली व बाकीची इमारत दुमजली असें झालें तरी हरकत नाहीं. मागेंपुढें जागा असेल त्या मानानें बगीचा करतां येईल.

शालेयं इमारतीचा आणखी एक आकार हल्लीं बऱ्याच ठिकाणीं दिसूं लागला आहे तो पुढें दाखविला आहे.



आकृति नं. २

या इमारतींत मध्यभागीं मोकळी जागा असून तिच्या चारहि बाजूंस वर्गांच्या व इतर खोल्या आहेत. मोकळ्या जागेचा उपयोग समारंभाच्या वेळीं सभागृह म्हणून चांगला होऊं शकतो. प्रवेशद्वार बंद झालें म्हणजे इमारतींत कोणाला येतां यावयाचें नाहीं, कीं इमारतींतून कोणाला बाहेर जातां यावयाचें नाहीं. विद्यार्थी काबूंत ठेवण्याच्या आणि प्रसंगीं होणाऱ्या बाहेरच्या हुल्लडीला दूर ठेवण्याच्या दृष्टीनें ही इमारतीची कल्पना चांगली असली तरी हवा आणि प्रकाश या दृष्टीनें ही फारशी सोईस्कर वाटत नाहीं. शिवाय वर्गाच्या खोल्या समोरासमोर आल्यानें मधली मोकळी जागा जर लहान असेल तर एका वर्गांतील आवाज समोरच्या वर्गांत जाण्याचाहि कांहींसा संभव असतो.

शालेय इमारतींच्या आकारासंबंधीं विचार करण्यास सुगम व्हावें म्हणून दोन तीन प्रकारच्या आकारांसंबंधीं विवेचन वर केलें. अर्थात् केवळ मार्ग-दर्शनाकरितांच हे आकार सोयीचे म्हणून सुचविले आहेत. प्रत्यक्ष इमारत बांधतांना यांतील कोणता आकार घ्यावा, किंवा त्यांत कांहीं बदल करावा, अथवा अगदींच निराळा आकार घ्यावा, हें शाळा-चालकांनीं आपापल्या परिस्थिती-प्रमाणें आणि गरजेप्रमाणें पहावें.

शाळेची इमारत किती मोठी असावी? या प्रश्नाचें उत्तरहि एकदम देतां येणार नाहीं. शाळा प्राथमिक कीं माध्यमिक, मुलांची कीं मुलींची,—का संमिश्र, बौद्धिक अभ्यासावर भर देणारी कीं तांत्रिक, व्यावसायिक अभ्यासावर भर देणारी, खेड्यांतील कीं शहरांतील, शाळा—चालकांची आर्थिक परिस्थिति कशी आहे, शाळेंत किती विद्यार्थ्यांची सोय व्हावयाची आहे, वैकल्पिक विषय कोणते शिकवावयाचे आहेत, अशा अनेक गोष्टींचा विचार करूनच इमारत किती मोठी असावी तें सांगतां येईल. तरीहि सामान्य माध्यमिक शाळांकडून ज्या अपेक्षा असतात त्या लक्षांत घेऊन त्यासंबंधीं मार्गदर्शन करतां येईल तेवढेंच या ठिकाणीं केलें आहे.

## खास वर्ग

शाळेंतील मुलांच्या संख्येप्रमाणें व इयत्तांप्रमाणें वर्गाच्या खोल्या किती लागतील तें ठरवितां येईल. त्याशिवाय पुढील **खास वर्ग** किंवा सोयी

यांचाहि इमारत बांधतांना विचार करावा लागेल. चित्रकला-वर्ग, भूगोल-वर्ग, शास्त्रीय विषयांकरितां प्रयोगशाळा, हस्तव्यवसाय-वर्ग, ग्रंथालय आणि वाचनालय, शिवणकला-वर्ग, संगीत-वर्ग, सभागृह, वैद्यकीय तपासणी आणि वैद्यकीय मदत याकरितां खोली, मुलांच्या मधल्या सुटींतील फराळाकरितां खोली, गृहजीवनशास्त्राकरितां खोली, संमिश्र शाळा असेल तर मुलींकरितां स्वतंत्र खोली, शिक्षण–साहित्य ठेवण्याकरितां जागा, मुख्याध्यापकांकरितां खोली. शिक्षकांकरितां खोली, कचेरीकरितां खोली, क्रीडासाहित्य ठेवण्याकरितां खोली. यांशिवाय मुलांकरितां शाळेची पेढी ( बँक ) किंवा शालेय पुस्तकें, स्टेशनरी वगैरे विकण्याकरितां शाळेंत सोय करावयाची असेल तर त्याकरितां स्वतंत्र खोल्या लागतील;–आणि त्या त्या ठिकाणीं चालणाऱ्या कामांप्रमाणें त्या वर्गांचा आकार ठरवावा लागेल.

वरील लांबलचक यादी पाहिल्यानंतर भांबावून जाण्याचें कारण नाहीं. या सर्व खोल्यांची व्यवस्था प्रत्येक शाळेंत असावी हें योग्य. तरीहि ही सर्व व्यवस्था शाळेनें इमारत बांधतांना एकदम आणि प्रारंभींच केली पाहिजे असें नाहीं. जसजशी आर्थिक सवड होत जाईल, आणि गरजा वाढत जातील तसतशा या सोयी क्रमाक्रमानें करतां येतील.


## इमारतीसंबंधीं आणखी थोडा विचार

इमारत किती मजल्यांची असावी हा विचार मागें झालाच आहे. इमारत लहान–मोठी कशीहि असो, तिला दोन प्रवेशद्वारें असणें सोयीचें असतें. अपघाताच्या वेळीं शाळा चटकन रिकामी करतां आली पाहिजे. एखादें प्रवेशद्वार आग किंवा तत्सम कारणामुळें निकामी झालें तर दुसऱ्या प्रवेशद्वारांतून मुलांना बाहेर काढून बांचवितां येईल. असे प्रसंग क्वचितच येतात हें खरें; पण प्रसंग आल्यानंतर सोय असावी ही दूरदृष्टि बरी. हीं प्रवेश-द्वारें शक्य तर एक इमारतीच्या पुढील बाजूस व दुसरें मागील बाजूस असणें सोयीचें होतें.

इमारत थोड्या खर्चांत, जुजबी, कच्ची बांधून तिच्या दुरुस्तीकरितां वारंवार खर्च करावा लागण्यापेक्षां आरंभींच थोडा अधिक खर्च करून मजबूत बांधणें हेंच अंतीं आर्थिक दृष्टया फायदेशीर होतें, असें मागें म्हटलें आहेच. पण त्यांतहि आणखी एक विचार करावा लागतो. शिक्षणाचें उद्दिष्ट,

शिक्षणाच्या पद्धति, आणि शाळांकडून समाजाच्या अपेक्षा या कालानुसार बदलत असतात. हा बदल केव्हां केव्हां फार जलद जलद होतो. अशा वेळीं शिक्षणास साधनीभूत अशा इमारतीच्या रचनेंतहि केव्हां केव्हां बदल करावा लागतो. हा विचार करून इमारत अशी बांधली पाहिजे कीं गरजेप्रमाणें तिच्या स्वरूपांत किरकोळ बदल करतां येतील, व विशेष पाडापाड न करतां थोड्या खर्चांत तें साधेल.

इमारत मजल्यांची असल्यास तिला असणारे जिने मजबूत, दगडी, रुंद असावेत. वाटोळे जिने केल्यास जागेची थोडी बचत होते खरी, पण मुलांची



आकृति नं. ४

सुरक्षितता आणि असे जिने चढतांना त्यांना होणारा त्रास लक्षांत घेतां वाटोळे जिने शाळेच्या इमारतीला असूं नयेत असेंच म्हणावें लागेल. जिन्याच्या पायऱ्या योग्य उंचीच्या व रुंदीच्या असाव्यात; सात–आठ पायऱ्यांनंतर उभें राहण्यास रुंद जागा असावी व तेथें जिन्याची दिशा बदलती व्हावी. जिन्याला एका बाजूला भिंत व दुसऱ्या बाजूला कठडा असावा. जिन्यांत भरपूर प्रकाश असावा.

## इमारतींतील दोन महत्त्वाच्या सोयी

शाळेंत मुलांना पिण्याकरितां पाणी लागतें त्याची सोय शाळेच्या इमारतींतच एका बाजूला केली पाहिजे. हें पाणी स्वच्छ आणि भरपूर पाहिजे. विहिरीचें किंवा नळाचें पाणी गाळून मोठ्या पक्क्या टाकींत भरून ठेवलें व त्या टाकीला सोयीस्कर उंचीवर नळ लावून ठेवले तर ही सोय चांगली होते. अशी पक्की टाकी इमारत बांधतांनाच योग्य उंचीवर बांधावी. ही टाकी वरचेवर स्वच्छ केली पाहिजे. जर टाकी बांधणें जमलें नाहीं तर स्वच्छ अशा पिंपांत पाणी भरून ठेवून त्या पिंपांच्या नळांनीं विद्यार्थ्यांनीं भांड्यांत पाणी घेऊन प्यावें.

मुलांना जसें पिण्याकरितां पाणी लागतें तसें तोंड व हातपाय धुण्यासाहि पाणी लागतें. ती सोयाहि शाळेंत **पाणघर** बांधून करावी. या पाणघरांत आरसे लावून ठेवतां आले तर अधिकच उत्तम. स्वच्छतेची व टापटिपीची संवय मुलांना त्यायोगें लावतां येते.

पाण्याइतकीच दुसरी महत्त्वाची सोय म्हणजे **मुताऱ्या** व **संडास** यांची. मुताऱ्या व संडास भरपूर असावेत. नाहीं तर विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्यास मधली छोटी सुटी त्यांना या कामास अपुरी पडते. शिवाय हीं दोन ठिकाणें फिनाईल वगैरे टाकून नेहमीं स्वच्छ ठेवण्याची मुख्याध्यापकांनीं अगदीं कोशीस करावी. त्याकरितां कांहीं जादा व्यवस्था करावी लागली व त्यामुळें थोडा खर्च वाढला तरी तो करण्यास अनमान करूं नये. कारण मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीनें तें अत्यंत अवश्य असतें.

## वर्गाची खोली

ज्या वर्गांत अध्यापन चालावयाचें ते वर्ग शालेय इमारतीच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा भाग होय. कारण विद्यार्थ्यांचा शालेय जीवनांतील जास्तींत जास्त वेळ

त्या वर्गांत जावयाचा असतो. त्यामुळें त्या वर्गाच्या खोल्यांचा आणि त्यांतील एकंदर व्यवस्थेचा थोडा सविस्तर विचार करावयास हवा.

वर्गाच्या खोल्या चौरस आकाराच्या न ठेवतां आयत काटकोनाच्या आकाराच्या योजिल्या, म्हणजे त्यांच्या रुंदीपेक्षां त्यांची लांबी थोडी अधिक ठेवली तर मुलांच्या बसण्याच्या दृष्टीनें व शिक्षकांच्या शिकविण्याच्या दृष्टीनें त्या सोईस्कर होतात. प्रत्येक विद्यार्थ्याला सुमारें १० चौरस फूट जागा असावी असा संकेत आहे. शिवाय शिक्षकांच्या टेबल-खुर्चींकरितां व त्यांना इकडे तिकडे हिंडण्यास थोडी जागा लागणारच. तेव्हां वर्गांत सुमारें चाळीस विद्यार्थी असल्यास **खोलीचें एकंदर क्षेत्रफळ** ५०० चौरस फूट तरी असावें. वीस फूट रुंद व पंचवीस फूट लांब असा खोलीचा आकार घेतल्यास हें सर्व सोयीनें करतां येईल. थोडे जास्त विद्यार्थी असल्यास खोलीची रुंदी पंचवीस फूट व लांबी तीस फूट घ्यावी.

खोलीच्या लांबीरुंदीप्रमाणेंच खोलीची **उंची**हि महत्त्वाची असते. खोलींत भरपूर प्रकाश येण्याकरितां व विशेषतः खोलींतील हवा शुद्ध राहण्याकरितां उंची सुमारें १५ फूट असावी. खोलींत ४०–५० विद्यार्थी सुमारें चार पांच तास बसणार. त्यांच्या श्वासोच्छ्वासानें हवा सारखी दूषित होत राहणार. म्हणून नवीन शुद्ध हवा आंत येण्याकरितां व खोलींतील शुद्ध हवेचें प्रमाण योग्य तें राखण्याकरितां खोलीची उंची एवढी असावयास हवीच. यापेक्षां फार जास्त उंची असली तर आवाजाच्या दृष्टीनें तें सोईस्कर होणार नाहीं.

हवा आणि प्रकाश या दृष्टीनें वर्गाच्या खोलीला **खिडक्या**हि भरपूर असाव्यात. खिडक्या अशा उंचीवर असाव्या कीं त्यांतून येणारा उजेड मुलांच्या लिहिण्याच्या मेजावर ( डेस्कावर ) पडेल. उजेडाचा विचार करावयाचा तर खिडक्या मुलांच्या डाव्या बाजूला असाव्यात; म्हणजे त्यांच्या लिहिण्याच्या वेळीं त्यांच्या टाकाची सांवली टाकाच्या उजव्या बाजूलाच पडेल व लेखनांत टाकाच्या सांवलीचा अंधार पडणार नाहीं. शोभेच्या व प्रकाशाच्या दृष्टीनें खिडक्या कांचेच्या असलेल्या बऱ्या. मात्र खिडक्यांतल्या कांचा फुटल्यास अगर कोणी दांडगाईनें फोडल्यास त्यांच्या जागीं नव्या कांचा लागलीच बसविल्या पाहिजेत.

वर्गाची **जमीन** साधी मातीची किंवा मजला असल्यास लांकडाची असूं नये. मातींची जमीन स्वच्छ राहत नाहीं, उखळते व सारवण्याचा खर्च येतो; आणि लांकडी तक्तपोशीवरून चालतांना पायाचा आवाज फार होतो; म्हणून ती फरशीची असणें बरें. वर्गाला दरवाजा एक असलेला पुरतो. दरवाजाचीं झडपें वर्गांत न उघडतां बाहेर उघडणारीं असावीं. दारांना उंबरे असूं नयेत. त्यायोगें वर्गांतील केर पूर्णपणें निघत नाहीं. कांहीं केर उंबऱ्या-जवळ अडकून राहतो.

वर्गाच्या **भिंती** जाड असल्या म्हणजे एका वर्गांतील आवाज शेजारच्या दुसऱ्या वर्गांत जाऊं शकत नाहीं. भिंतींना रंग असा असावा कीं वर्गांतील वातावरण प्रसन्न राहण्यास त्यानें मदत होईल व प्रकाश कमी होणार नाहीं. त्या दृष्टीनें कोणताहि गडद रंग सोयीचा नसतो. फिकट पिवळा रंग सर्वांत चांगला.

भिंतींना चित्रें टांगण्याकरितां ठिकाठिकाणीं लांकडाच्या पट्ट्या मारलेल्या असाव्यात. नाहीं तर मागाहून खिळे मारावे लागतात व त्यामुळें भिंतींची शोभा जाते.

वर्गांतील खडू, हजेरीपत्रकें, दौत, टांक वगैरे साहित्य ठेवण्याकरितां एखादें छोटेंसें **कपाट** लागतें. असें कपाट स्वतंत्र करून वर्गांत ठेवण्या-पेक्षां भिंतींतच कपाट काढलेलें असलें तर वर्गांतील जागेची थोडीशी बचत होते.

## वर्गांतील फर्निचर ( साहित्य वगैरे )

वर्गांत शिक्षकांस बसावयास **खुर्ची** व लिहावयास किंवा खडू, पुस्तकें, चित्रें वगैरे अध्यापन-साहित्य ठेवण्यास **टेबल** लागतें. या दोन वस्तूंचा शिक्षक प्रत्येक तासांत उपयोग करतीलच असें नाहीं. कित्येक शिक्षक खुर्चीत न बसतां दररोजचे सर्व तास घेतात. पण तरीहि खुर्ची, टेबल या वस्तु वर्गांत असल्याच पाहिजेत. शिक्षकाच्या अधिकाराचें, मानाचें तें प्रतीक आहे. त्यावर बसण्याचा शिक्षकांशिवाय कोणाला अधिकार नाहीं. मुख्या-ध्यापक किंवा सरकारी शाळा-तपासनीस आले तरी त्यांनीं त्या खुर्चीवर बसतां उपयोगी नाहीं. वाटल्यास त्यांच्याकरितां दुसऱ्या खुर्च्या मागवाव्या.

ही खुर्ची व टेबल ठेवण्याकरितां कांहीं शाळांतून उंच प्लॅटफॉर्मचा उपयोग करतात. या प्लॅटफॉर्मचे दोन फायदे आहेत. शिक्षकांस सर्व वर्ग दिसूं शकतो; व वर्गांतील सर्व विद्यार्थ्यांस शिक्षकांच्या मागील बाजूस असलेला फळा पूर्णपणें दिसूं शकतो. पण हा प्लॅटफॉर्म फार उंच असल्यास आणि लांकडाचा केला असल्यास अडचणीहि येतात. त्याच्या खालीं धूळ सांचते ती वर्षानुवर्ष तशीच राहते. शिवाय उंच प्लॅटफॉर्मवर शिक्षक असले तर ते एका अर्थानें विद्यार्थ्यांपासून दूर राहतात. प्रश्न विचारतांना, चर्चा करतांना, मुलांचें मनोगत वाचन किंवा लेखन चालू असतांना शिक्षकांनीं वर्गांत हिंडून त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करणें जरूर असतें. पण उंच प्लॅटफॉर्मवरून मधून मधून खालीं उतरणें व वर्गांत हिंडणें शिक्षकांस सोयीचें होत नाहीं. म्हणून शिक्षक प्लॅटफॉर्मवरून उतरण्याचाच कंटाळा करतात.

याला उपाय म्हणजे प्लॅटफॉर्म दगडी कायमचे करावेत, आणि ते सहा इंच उंच ठेवावे, म्हणजे त्यांचा उपयोग होईल व शिक्षकांची अडचणहि दूर होईल.

**फळा** हें वर्गांतील एक अत्यंत महत्त्वाचें शिक्षण-साधन आहे. शिकवितांना मुद्दे स्पष्ट करण्यास, शिकवून झालेल्या भागाचा सारांश मुलांच्या साहाय्यानें तयार करण्यास, किंवा मुलांकडून कांहीं लिहवून घेण्यास व उदाहरणें सोडवून घेण्यास फळ्याची फार गरज लागते.

सामान्यतः हा फळा लांकडी असतो. तसा तो असल्यास लांकूड चांगलें आणि पूर्ण वाळलेलें असावें; त्याच्या फळ्या शक्य तितक्या रुंद असाव्या; आणि त्या एकमेकांना अशा बेमालूम जोडलेल्या असाव्या कीं दोन फळ्यांमधील फटी दिसूं नयेत.

कांहीं शाळांतून सीमेंटचे फळे तयार करतात. इमारत बांधतांना एका बाजूच्या भिंतींत फळ्याच्या आकाराच्या जागेभर सीमेंट घालावयाचें, व तें वाळलें म्हणजे त्या जागेला काळा रंग द्यावयाचा व फळा तयार करावयाचा. हा फळा लांकडी फळ्यापेक्षां स्वस्त होतो, जास्त टिकाऊ असतो हें खरें, पण खडूनें जितक्या सफाईचें अक्षर लांकडी फळ्यावर काढतां येतें तितक्या सफाईनें या फळ्यावर काढतां येत नाहीं. तसेंच सीमेंटवरील काळा रंगहि फार

लौकर फिका होतो; आणि फळ्याच्या एखाद्या भागांतील सीमेंट निघालें म्हणजे फळ्याची दुरुस्ती करणें थोडें कठीण जातें.


कांहीं शाळांतून पत्र्याचे फळे केलेले असतात. फळ्याच्या आकाराचा पत्रा घेऊन त्याला काळा रंग लावून हे फळे तयार करतां येतात. पण जशा पत्र्याच्या स्लेटपाट्या लिहिण्याच्या दृष्टीनें चांगल्या वाटत नाहींत तसे हे फळेहि लिहिण्यास सोयीचे होत नाहींत.

सर्वांत उत्तम फळे म्हणजे स्लेटपाटीच्या दगडाचे केलेले असतात ते. हे लिहावयाला उत्तम, त्यांवरील अक्षर चांगलें दिसतें, आणि टिकावयाला मजबूत. रंग देण्याचा खर्च मुळींच नाहीं. आणि वर त्याच आकाराची जाड कांच बसविली तर खराबहि होत नाहींत. वरील कांच पुसली कीं फळा लख्ख दिसतो. पण हे फळे इतके महाग असतात कीं सामान्यतः शाळांना ते परवडत नाहींत.

फळा आकारानें मोठा, निदान ४ फूट रुंद व ६ फूट लांब एवढा असावा. म्हणजे एकाच वेळेस मजकूर लिहिणें, स्पष्टीकरणार्थ आकृत्या काढणें, इ. करतां येईल. फळा लहान असला म्हणजे एका वेळेला फार मजकूर लिहितां येत नाहीं, वारंवार तो पुसावा लागतो. वरच्या वर्गांतील फळे तर आणखी थोडे मोठे घ्यावे, व त्यांच्या निम्म्या भागांत चौरस आंखून ठेवून जरूर पडेल तेव्हां आलेख काढण्याची व्यवस्था करून ठेवलेली असावी. शक्य झालें तर दोन फळे एकत्र ठेवून ते कप्पीच्या साहाय्यानें वर-खालीं सरकते असे लांकडी चौकटींत बसवावे. म्हणजे गरज पडेल त्याप्रमाणें मुलांसमोर त्यांपैकीं कोणताहि एक फळा आणतां येईल, वाटल्यास एका वेळीं दोन्ही फळेहि समोर आणतां येतील.

थोडक्या जागेंत दोन फळे ठेवण्याची आणखी एक योजना असते ती पुढील आकृतींत दाखविली आहे.

**अबकड** हा एक लांकडी स्टँड आहे. त्यामध्यें **गइफह** हा फळा असा बसविला आहे कीं, जरूर पडेल त्याप्रमाणें त्याच्या बाजूच्या खिट्या सैल करून तो फळा उलटा फिरवून त्याची मागची बाजू वर्गासमोर आणतां येते. मागील बाजूहि घासून पुसून गुळगुळीत केलेली व काळा रंग लावलेली





आकृति नं. ५

असल्यामुळें ती बाजू म्हणजेच दुसरा फळा होय. एका लांकडी फळ्याचा असा दुहेरी उपयोग फार सोयीचा होतो. हा फळा फारसा खर्चाचा नाहीं. मात्र तो शिक्षकांच्या मागल्या भिंतीस टेकून ठेवतां येत नाहीं. मागील बाजू फिरवून पुढें आणण्याकरितां त्याला थोडी जास्त जागा लागते.

एकाच फळ्याचा तिहेरी उपयोग करतां येईल असे फळेहि सुताराकडून करवून घेतां येतात. अशा एका फळ्याची आकृति खालीं दाखविली आहे. लहान आकाराचे तीन फळे एका भक्कम लाकडी खांब्रावर स्क्रूच्या साहाय्यानें असे बसविले आहेत कीं ते त्या लांकडी खांब्राभोंवतीं फिरवितां येतात, व एका वेळेला त्यांतील कोणताहि फळा वर्गांसमोर आणितां येतो. या योजनेंत आणखी एक फायदा होतो तो हा कीं, हे तीन फळे मिळून एका तऱ्हेचें मध्यवर्ती

कपाट तयार होतें, व त्यांत दौत, टांक, खडू, कागद, हजेरी-पत्रकें वगैरे साहित्य ठेवतां येतें. त्याकरितां मग स्वतंत्र अशा कपाटाची गरज राहत नाहीं. अशा तऱ्हेच्या फळ्यानेंहि वर्गांतील जागा थोडी जास्त अडविली जाते.

फळा कोणत्याहि तऱ्हेचा कां असेना, त्याच्या खालच्या बाजूला एक लांकडी पट्टी अशी बसवावी कीं फळा पुसल्यानंतर खडूची भुकटी इतस्ततः



आकृति नं. ६

न उडतां ती त्या पट्टीच्या साहाय्यानें फळ्याच्या तळाशीं एकत्र सांठविली जावी. मधून मधून पट्टी थोडी सरकवून ही सांचलेली भुकटी काढून टाकतां येईल अशी सोय असावी. तसेंच फळ्याच्या तळाशींच एका बाजूच्या कोंपऱ्यांत एक रुंद पण लहान फळी अशी बसवावी कीं तीवर खडूची पेटी व फळा पुसण्याचें साधन ठेवतां येईल. फळा पुसण्याकरितां कापडी रुमाल न वापरतां एका बाजूनें लांकडी पट्टी व दुसऱ्या बाजूनें जाड कापसाचा व।

तत्सम पदार्थाचा थर असें 'पुसणें' (डस्टर) मिळतें तें वापरावें. कापडी रुमालापेक्षां हें अधिक सोयीचें कसें तें स्पष्ट करण्याची आवश्यकता नाहीं. हें 'पुसणें' थोडें ओलसर केलेलें असलें म्हणजे फळा पुसतांना खडूची भुकटी इतस्ततः उडत नाहीं.

फळ्यावर सामान्यतः पांढऱ्या खडूनें लिहावयाचें असतें; मधून मधून रंगीत खडूंचाहि उपयोग करावयाचा असतो. त्या दृष्टीनें फळ्याचा रंग काळाभोर असावा हें रास्तच आहे. अलीकडे काळ्या रंगाच्याऐवजीं हिरवा रंगाहि फळ्याकरितां कोणी कोणी वापरतात.

फळा भिंतीला लावून ठेवावयाचा असला तर अर्थात् त्याचें स्थान शिक्षकांच्या मागें सोयीचें होतें. पण तो लांकडी घोड्यावर किंवा इतर तऱ्हेच्या स्टँडवर उभा करावयाचा असेल तर तो शिक्षकांच्या डाव्या किंवा उजव्या बाजूस घ्यावा लागतो. अशा फळ्यावरील मजकूर वर्गांतील सर्व विद्यार्थ्यांना दिसण्यास थोडी अडचण येते.

फळा कोठेंहि ठेवला तरी त्यावर प्रत्यक्ष प्रकाश पडून तो चमकतां उपयोगी नाहीं; कारण त्यामुळें वर्गांतील कांहीं विद्यार्थ्यांना त्यावरील लिखाण वाचतां येत नाहीं.

वर्गांत शिकवितांना शिक्षकांना फळ्याबरोबरच नकाशे, तक्ते, चित्रें यांचा उपयोग करावा लागतो. हें साहित्य फळ्यावरच लावलें तर फळ्यावरील मजकूर कांहीं काळ तरी विद्यार्थ्यांच्या नजरेआड होतो. शिवाय फळ्यावर पुन्हां मजकूर लिहिण्याची गरज आली म्हणजे हे नकाशे वगैरे फळ्यावरून बाजूला काढून ठेवावे लागतात. हें फार गैरसोयीचें होतें. म्हणून नकाशादि साहित्य टांगण्याकरितां फळ्याजवळच योग्य उंचीवर लांकडी पट्ट्यांना खिळे मारलेले असावेत.

वर्गांतील **विद्यार्थ्यांची बसण्याची व्यवस्था** शाळेनें दक्षतेनें केली पाहिजे; कारण त्यांना त्या ठिकाणीं दररोज चार-पांच तास बसावयाचें असतें. पूर्वीच्या काळीं ही व्यवस्था करणें विशेष त्रासाचें नव्हतें. प्राथमिक शाळेंत मुलें आपलीं बसकरें (बसण्याकरितां पोत्याचा अथवा सतरंजीचा लहानसा चौकोनी तुकडा) शाळेंत येतांना आपल्याबरोबर आणीत व सायंकाळीं घरीं जातांना तीं परत नेत. माध्यमिक शाळांत लांब बाकें असत. एका बाकावर


पांचसहा विद्यार्थी बसत. त्या बाकांना मागें टेंकावयाला आधार नसे, व पुस्तकें वह्या ठेवण्यास, लिहिण्यास पुढें मेज नसे. पण आतां ती पद्धत राहिली नाहीं. बसकरांची ने–आण करणें मुलांना सोयीचें होईना. शिवाय वर्गाच्या जमिनी पूर्वी मातीच्या असत त्या जाऊन त्यांच्या जागीं फरशी बसविण्याची पद्धत रूढ होऊं लागल्यामुळें बसकरांवर बसणें मुलांना त्रासदायक वाटूं लागलें, व मुलांच्या शारीरिक स्वास्थ्याच्या दृष्टीनें बसकरें आणि साधीं लांब बाकें गैर-सोयीचीं होऊं लागलीं. कारण त्या दोन्ही योजनेंत मुलांना बसतांना पाठीला कांहीं आधार नसल्यामुळें पाठीला पोंक येतें, त्यामुळें फुप्फुसांवर भार पडून तीं लहान होतात, श्वास घेतांना त्यांत कमी शुद्ध हवा राहते, व त्यामुळें त्यांच्या एकंदर आरोग्यावर वाईट परिणाम होतो असें दृष्टोत्पत्तीस आलें. त्यामुळें आतां माध्यमिक शाळांतून विद्यार्थ्यांकरितां **जोडबाक ( डेस्क )** वापरण्याची पद्धत रूढ झाली आहे, व हळूहळू कांहीं प्राथमिक शाळांतूनहि ती दिसूं लागली आहे.


जोडबाकाचे आवश्यक भाग चार: बसण्याची जागा (बैठक), टेंकण्याची पाठीची फळी, लिहिण्याकरितां समोर मेजासारखा उतरता भाग, आणि पाय लोंबकळत राहूं नयेत म्हणून त्यांना आधारभूत होणारी खालील फळी. याशिवाय पुस्तकें ठेवण्याकरितां एक फळी असली, पिशवी अडकविण्याकरितां खिळा वा खुंटी असली, किंवा दौत–टांक सुरक्षित राहण्याकरितां कांहीं सोय केलेली असली तर अधिकच बरें.

जोडबाकाच्या बाबतींतील आदर्श परिस्थिति म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या उंचीच्या मानानें सोईस्कर असें स्वतंत्र बाक असावें. त्यायोगें बसतांना अवघडणार नाहीं, आणि वाचनाकरितां, बोलण्याकरितां, किंवा फळ्यावर कांहीं लिहावयास अथवा नकाशावर कांहीं दाखविण्यास त्यास जावयाचें असेल तर चटकन् उठण्यास, हालचाली करण्यास सोयीचें होईल. पण अशा स्वतंत्र ( एकेरी ) जोडबाकांना वर्गांत जास्त जागा लागते व तीं महागहि असतात. त्यामुळें आपल्याकडे सामान्यतः दुहेरी जोडबाकें ( दोन विद्यार्थ्यांची एकत्र सोय होईल अशीं ) वापरावीं लागतात. तसें करण्यानें विशेष कांहीं बिघडत नाहीं. मात्र एक काळजी घ्यावयास पाहिजे ती ही कीं, शाळेंतील सर्वच जोडबाकें एका मापाचीं न करतां खालच्या वर्गोकरितां लहान आणि वरच्या

वर्गाकारितां त्या मानानें मोठा अशीं तीं करून घ्यावीं. विद्यार्थ्यांच्या उंचीच्या मानानें या जोडबाकांचा आकार असणें किती महत्त्वाचें आहे तें मागें स्पष्ट केलें आहेच.

जोडबाकांचे तीन प्रकार होतात. खालील आकृतींवरून ते स्पष्ट होतील.



आकृति नं. ७

या आकृतींतील ब म्हणजे बैठक आणि अ म्हणजे लिहिण्याकारितां टेबलवजा उतरतें मेज. पहिल्या आकृतीमध्यें अ आणि ब यांच्या कडांपासून काढलेल्या काल्पनिक ( तुटक ) रेषा यांमधील अंतर स्पष्टच दिसतें. त्याचा अर्थ असा कीं या जोडबाकावर बसलेला विद्यार्थी बाकाच्या मागील फळीला ताठ टेंकून बसला तर त्याच्या समोरील मेज (अ) त्याच्या छातीपासून दूर अंतरावर राहील. दुसऱ्या आकृतीमध्यें अच्या खालील कडेपासून काढलेली उभी सरळ काल्पनिक रेषा ब या बैठकीच्या बरोबर टोंकाला येऊन भिडते. म्हणजे मेज आणि बैठक यांच्या दरम्यान अंतर मुळींच राहत नाहीं. तिसऱ्या आकृतींत अच्या कडेपासून काढलेली रेषा बैठकीच्या मध्यास येऊन भिडते. म्हणजेच बाकावर बसलेल्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें समोरील मेज अगदीं छातीस येऊन भिडेल. जोडबाकाचे तीन प्रकार या विवेचनावरून स्पष्ट होतील.

खरा प्रश्न असा कीं यांतील कोणत्या तऱ्हेचें बाक सोयीचें? याचें उत्तर असें कीं,—लिहिण्याच्या दृष्टीनें तिसरा प्रकार सोयीचा; वाचनाच्या दृष्टीनें दुसरा

प्रकार सोयीचा; आणि उभें राहण्याकारितां व तत्सम हालचाली करण्याकरितां पहिला प्रकार बरा. प्रत्येक विद्यार्थ्याला वर्गांत वाचावें लागतें, लिहावें लागतें, आणि उभें राहून उत्तरें देण्याची पाळी येते. हें लक्षांत घेतां प्रत्येक बाकांत अशी रचना असावी कीं,—जशी गरज पडेल त्याप्रमाणें त्याचा टेबलवजा भाग किंवा बैठक मागेंपुढें सरकवून हवें त्या प्रकारचें जोडबाक विद्यार्थ्याला क्षणांत तयार करतां यावें.

आदर्श परिस्थिति म्हणून हें सर्व ठीक असलें (आणि इंग्लंड-अमेरिके-सारख्या देशांत अशीं जोडबाकें विद्यार्थी प्रत्यक्ष वापरत असले) तरी आपल्या देशांत शाळांना अशीं सरकतीं जोडबाकें परवडणार नाहींत; कारण सामान्य जोडबाकांपेक्षां अशी बाक जास्त महाग असतात. त्यामुळें आपल्याकडे जोड-बाक वापरावयाचें तें एका प्रकारचेंच वापरणें शक्य होतें. त्या दृष्टीनें सुवर्ण-मध्य म्हणून दुसऱ्या प्रकारचें वापरणें सोयीचें ठरेल. अशा बाकावर विद्यार्थ्यांना ताठ बसतां येईल, पाठीच्या कण्याला बांक येणार नाहीं, व एकंदरींत बसणें, उठणें, वाचणें, लिहिणें इत्यादि क्रिया सामान्यतः सुकर होतील.

अशीं जोडबाकें तयार करतांना एकदोन गोष्टींची काळजी मात्र आगाऊच घेतली पाहिजे. बाकाचा टेबलवजा भाग असतो त्याचा उतार योग्य प्रमाणांत असावा. हें थोडेंसें कठीण आहे खरें; कारण वाचतांना वाचन-पुस्तक वर ठेवतांना लागणारा उतार आणि लेखनकार्याकरितां लाग-णारा उतार हे भिन्न भिन्न असावे लागतात. पहिल्यास क्षितिजरेषेशीं ४५° चा कोन सोयीचा होतो, तर दुसऱ्या बाबतींत तो १५° चा कोन असावा लागतो. पण त्याहि बाबतींत सुवर्णमध्य काढणें योग्य ठरेल. दुसरी गोष्ट म्हणजे बैठक योग्य रुंदीची असावी, म्हणजे बसण्याचा शीण वाटणार नाहीं. पाठीमागील टेंकावयाची फळीहि योग्य रुंदीची असावी. त्या फळीचा पाठीला पूर्ण आधार मिळावा.

आतांपर्यंत केलेला सर्व विचार नेहमींच्या वर्गाच्या व्यवस्थेसंबंधीं झाला. चित्रकलावर्ग, शास्त्रीय प्रयोग-शाळा, भूगोल-वर्ग, संगीत-वर्ग, हस्तव्यवसाय-वर्ग हे सर्व खास प्रकारचे वर्ग होत. त्यांचा आकार आणि त्यांतील बाकें, टेबलें, फळे, शिक्षणाचें साहित्य—इत्यादींचा विचार अर्थात् निराळा करावा

लागेल. त्या त्या शिक्षकांच्या गरजा पाहून हा विचार मुख्याध्यापकांनीं करावयास हवा.

## शिल्प व स्थापत्य

पाश्चात्य देशांत धर्ममंदिरांचें बांधकाम विशिष्ट शिल्पाचेंच असतें. तेंच शाळा-कॉलेजांसाठीं उपयोगांत आणलें जातें. सीमेंट कॉंक्रीटच्या युगांत तें शिल्प मागें पडत आहे हें खरें; पण शाळेच्या बांधकामाचें शिल्प, कारखाने, राहत्या इमारती व सरकारी कचेऱ्या यांपेक्षां खास वेगळें असावें, असें कोणीहि म्हणेल. शाळेची भव्य व सुंदर इमारत ही विद्यार्थ्यांना व गांवाला अभिमानाची बाब तर वाटेलच; पण आसमंतांतील इमारतींच्या स्वरूपावरहि तिचा इष्ट परिणाम होईल. आधुनिक शैक्षणिक सोयींची सुसज्जता आणि प्राचीन आश्रमांची निरामयता व निसर्गसान्निध्य यांचा शाळेचें परिसर व इमारत यांच्या बाबतींत सुंदर समन्वय व्हावा असेंच कोणासहि वाटेल.

९५५५३
३४
२७/३१५४

: १८ :

# विद्यार्थ्यांचें आरोग्य

## प्रास्ताविक

व्यक्तीच्या जीवनांत आरोग्याचें महत्त्व किती तें स्पष्ट करावयास नकोच. तिच्या हातून जें आयुष्यांत कार्य व्हावयाचें असतें तें बरेंचसें तिच्या निरामयतेवर, आरोग्यावर, निरोगीपणावर, आणि कणखर शरीरयष्टीवर अवलंबून असतें. अप्रतिम बुद्धिसामर्थ्य असून, किंवा कार्य करण्याची तीव्र इच्छा असून केवळ शरीर रोगजर्जर असल्यामुळें उभें आयुष्य फुकट गेलेल्या व्यक्ति अनेक आढळतात. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' असें म्हणण्यांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं.

शरीर कमावण्याचें खरें वय म्हणजे वयाची १० ते २० या वर्षांचा काल. सामान्यतः शालेय जीवनाचा काल तो हाच. या वयांत मनाप्रमाणेंच मुलांमुलींचीं शरीरेंहि लवचिक असतात. त्यांना हवा तो आकार या वयांत देतां येतो. त्यांचीं शरीरें कार्यक्षम करण्याकरितां मुद्दाम प्रयत्न करावयाचे ते या वेळींच केले पाहिजेत. हा काल गेल्यानंतर करण्यांत आलेले प्रयत्न विशेष फलदायी होत नाहींत.

## जबाबदारी कोणाची ?

शाळेंत जाणाऱ्या मुलांमुलींच्या आरोग्याची जबाबदारी खरें म्हटलें तर त्यांच्या पालकांची होय. कारण दिवसाच्या चोवीस तासांपैकीं सतरा-अठरा तास तरी मुलें घरीं पालकांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष देखरेखीखालीं असतात. शिवाय त्यांचें आरोग्य बिघडल्यास आर्थिक, शारीरिक, वा मानसिक झळ लागावयाची ती पालकांनाच; आणि त्यांचें आरोग्य राखण्याकरितां अन्न, विश्रांति, इत्यादींची सोय करावयाची ती त्यांनींच.

पण अलीकडे जीवनकलह तीव्र होत चालल्यामुळें आपल्या पाल्यांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यास पालकांना इच्छा असली, ऐपत असली तरी-पुरेसा

वेळ मिळत नाहीं; आणि ज्यांना वेळ मिळतो अशांना या बाबतींत प्रत्यक्ष मार्गदर्शन कसें करावें याचें ज्ञान नसतें. कारण इतर क्षेत्रांप्रमाणेंच आरोग्य-व्यायाम-आहार इत्यादींचें आतां शास्त्रच बनलें आहे. व त्या बाबतींत मार्गदर्शन करण्यास तज्ज्ञांची गरज भासूं लागली आहे. म्हणून मुलांमुलींच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी उचलण्यास पुढें आलेल्या तज्ज्ञांची-म्हणजेच शिक्षकांची ही जबाबदारी बनत चालली आहे. या कामास लागणारा वेळ आणि ज्ञान यांच्याबरोबर कांहीं एका विशिष्ट वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांचा विश्वासहि पालकांपेक्षां अधिक प्रमाणांत त्यांना मिळूं शकतो. आणि म्हणून ही जबाबदारी शाळांनीं पत्करणेंच योग्य असें आतां जवळजवळ ठरल्यासारखेंच झालें आहे. त्यांना लागेल तें सहकार्य मात्र पालकांनीं द्यावयास हवें.

## पूर्वतयारी

विद्यार्थ्यांच्या आरोग्याची जबाबदारी आपणांवर पडणार आहे हें जाणून शाळा-चालकांनीं आणि शिक्षकांनीं विद्यार्थी शाळेंत दाखल होण्यापूर्वीच कांहीं प्राथमिक तयारी करून ठेवली पाहिजे. त्या तयारीचा उल्लेख मागील प्रकरणांत झाला आहेच. शाळेच्या इमारतींकरितां आरोग्यदृष्ट्या निर्दोष जागा कोणती; हवा आणि प्रकाश या दृष्टीनें शाळेची इमारत कशी बांधावी; धूळ, गोंगाट, दुर्गंधी इत्यादींपासून विद्यार्थ्यांना त्रास होऊं नये म्हणून काय काळजी घेतली पाहिजे; शारीरिक थकवा येऊं नये म्हणून शाळेच्या इमारतीला मजले किती असावे; जिने कसे असावे; खिडक्या, दारें, इत्यादींची व्यवस्था कोणती चांगली; विद्यार्थ्यांना बसण्यास बाकें कोणत्या तऱ्हेचीं असावीं, फळे कोठें ठेवावेत, खडू कसा वापरावा, पिण्याच्या पाण्याची सोय कशी करावी, लघुशंकादि नैसर्गिक गोष्टींची उत्तम व्यवस्था कोणती; शाळेची वेळ कोणती असावी, मधली सुट्टी केव्हां,—किती असावी; वेळापत्रकाची रचना आदर्श कोणती; गृहपाठांचा आणि आरोग्याचा संबंध काय,—या सर्व गोष्टींविषयीं मागें सविस्तर चर्चा झालेली असल्यामुळें येथें त्यांचा सोयीच्या दृष्टीनें पुन्हा एकदां थोडक्यांत उल्लेख करून ही पूर्वतयारी किती महत्त्वाची आहे याची आठवण करून दिली आहे.

## आरोग्यप्रद संवयी

विद्यार्थ्यांनीं शाळेंत प्रवेश केल्या दिवसापासून त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यास शाळेनें आरंभ केला पाहिजे. या बाबतींत पहिलें महत्त्वाचें कार्य म्हणजे त्यांना आरोग्यप्रद अशा संवयी लावणें. या वयांत लागलेल्या संवयी पुढील आयुष्यभर टिकतात व कल्याणप्रद होतात.

मुलांना सोईस्कर होतील अशीं बाकें वर्गांत ठेवलीं तरी त्यांचा योग्य उपयोग कसा करावयाचा तें त्यांना शिकवावें लागतें. बसतांना पाठीमागील फळीला टेंकून बसणें; लिहितांना योग्य इतक्या प्रमाणांतच पुढें वांकणें, कागद सरळ धरणें, टांक योग्य प्रकारें हातांत धरणें; पाय खालील फळीवर टेंकून ठेवणें; उभें राहतांना ताठ उभें राहणें, या सर्व गोष्टी संवयीवर अवलंबून आहेत. प्रथम थोडा त्रास वाटला तरी एकदां या संवयी लागल्या म्हणजे त्रास वाटत नाहीं. या संवयी आरोग्यदृष्ट्या किती महत्त्वाच्या आहेत तें सांगावयास नकोच.

वाचनाच्या बाबतींत बरेंच मार्गदर्शन करावयास हवें. वाचतांना पुस्तकांतील अक्षरें किती मोठीं असावींत; कोणत्या वेळीं वाचावें, कोणत्या वेळीं वाचूं नये; फेऱ्या घालीत वाचण्याची संवय वाईट कां; आगगाडींत, बसमध्यें, ट्राममध्यें कां वाचूं नये; वाचतांना पुस्तक डोळ्यांपासून किती अंतरावर धरावें; वाचनाचा अतिरेक वाईट कोणत्या दृष्टीनें – हें समजावून सांगितलें तर विद्यार्थ्यांना वाचनाचें आरोग्य समजतें, व वाचनाच्या चांगल्या संवयी योग्य वेळींच लागल्या तर दृष्टिदोषांपासून त्यांचें संरक्षण होतें.

शरीर आणि कपडे स्वच्छ ठेवण्याची संवय आरोग्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे. कपडे मौल्यवान् नसले तरी स्वच्छ ठेवण्यास गरीबी आड येत नाहीं. शरीर-स्वच्छतेला साबणाची गरज आहेच असें नाहीं. केवळ पाण्याच्या साह्यानें राखतां येणारी ही स्वच्छता कोणालाहि शक्य आहे. मात्र ही स्वच्छता आपण आपल्या स्वतःच्या कल्याणाकरितां राखली पाहिजे – ही जाणीव विद्यार्थ्यांनां उत्पन्न करून दिली पाहिजे, आणि तशी संवय लावली पाहिजे.

जें कपड्यांसंबंधीं तेंच अन्नासंबंधीं म्हणतां येईल. अन्न पौष्टिक, भरपूर असेल तर उत्तमच; पण तसें तें नसलें तरीहि अन्नविषयक योग्य संवयी विद्यार्थ्यांना लागल्या तर त्यांचें आरोग्य टिकावितां येतें. सकाळीं शाळेंत

येतांना जेवावयाचें तें सावकाश, अन्न पूर्ण चावून जेवावें; मधल्या सुटींत रस्त्याच्या कडेला बसलेल्या फेरीवाल्यांकडून धुळीनें भरलेले, माशांनीं आच्छादलेले, शिळे, दिसण्यांत आकर्षक पण आरोग्याला विघातक असे पदार्थ खाऊं नयेत; पाणी प्यावयाचें तें स्वच्छ असावें आणि स्वच्छ भांड्यानें प्यावें; कोणाचेंहि उष्टें खाऊं नये; चहा – कॉफीसारखीं पेयें पिण्यांत अतिरेक करूं नये; सर्वच खाणें–पिणें नियमित वेळीं, योग्य प्रमाणांत असावें;—या सर्व गोष्टी संवयीच्या आहेत.

विश्रांति आणि झोप यांसंबंधींच्या संवयी तर आरोग्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाच्या आहेत. शरीराला जशी अन्न–पाण्याची गरज असते, वाढीकरितां–मजबुतीकरितां व्यायामाची गरज असते, तशीच गरज, विश्रांति आणि झोप यांची असते. यांचें प्रमाण बिघडलें—म्हणजे कमी किंवा जास्त झालें तर शरीराला विघातक होतें. कामानंतर विश्रांति ही पाहिजेच. कारखान्यांतील निर्जीव यंत्रें घेतलीं तरी त्यांनाहि विश्रांति लागतेच. ती दिली नाहीं तर यंत्रें तापतात, बिघडतात, काम देईनाशीं होतात. मानवी शरीर हें तर सजीव यंत्र आहे. त्याला योग्य वेळीं योग्य प्रमाणांत विश्रांति मिळाली नाहीं तर तें असें बिघडेल कीं त्याची दुरुस्तीहि करतां यावयाची नाहीं.

किती वयाच्या मुलानें किती वेळ काम करावें, किती विश्रान्ति घ्यावी, किती झोप त्याला हवी, याचा शास्त्रज्ञांनीं पूर्ण विचार करून वयोमानाप्रमाणें प्रमाण ठरवून दिलें आहे. तें प्रमाण ( देशपरत्वें थोडें थोडें भिन्न भिन्न असतें ) शिक्षकांनीं जाणून घ्यावें व मुलांच्या मनावर तें बिंबवावें, आणि योग्य विश्रान्ति–झोपेची त्यांना संवय लावण्यांत मार्गदर्शन करावें. अर्थात् या बाबतींत पालकांचें सहकार्य अवश्य हवें.

व्यायामाची संवय तर शरीर वाढीच्या दृष्टीनें फारच महत्त्वाची. तीहि याच वयांत लागावी. त्याकरितां शाळेनें जें काय करावयास हवें तें विशेष महत्त्वाचें असल्यामुळें त्याची पुढें स्वतंत्र प्रकरणांत विस्तारानें चर्चा केली आहे.

## सर्वसामान्य स्वच्छतेची संवय आणि आवड

सर्वसामान्य स्वच्छतेची संवय आपल्याकडील विद्यार्थ्यांत ( आणि त्यामुळें प्रौढांत ) फार कमी असते. वाटेल तेथें थुंकावें; कोठेंहि नाक शिंकरावें;

कागदाचे कपटे, केळ्यांचीं सालें, शेंगांचीं फोलपटें कोठेंहि टाकावीं; लघवीस कोठेंहि बसावें – या समाजांत दिसणाऱ्या ओंगळ दृश्यांचा नायनाट करावयाचा असेल तर तशी संवय शाळांतूनच लावावयास हवी. या गोष्टींमुळें वैयक्तिक आरोग्य तर बिघडतेंच, पण त्यामुळें आपल्या समाजाचा, राष्ट्राचा दर्जा जगांत कमी होतो याची जाणीव विद्यार्थ्यांना द्यावी. वैयक्तिक आरोग्याच्या दृष्टीनें नखें, दांत, हात, पाय, तोंड, केंस, कान यांची निगा राखावयास विद्यार्थ्यांना प्रवृत्त केलें पाहिजे. आपण जेथें बसतों ती जागा, तो वर्ग, तें क्रीडांगण हें सर्व स्वच्छ कां व कसें राखलें पाहिजे तें विद्यार्थ्यांना कळलें पाहिजे; व विद्यार्थ्यांकडून तें करूनहि घेतलें पाहिजे.

## आरोग्यशिक्षणाचे कांहीं मार्ग

वैयक्तिक आणि सामाजिक स्वच्छतेच्या व आरोग्याच्या या संवयी शाळांनीं विद्यार्थ्यांना लावावयाच्या त्या योजनापूर्वक लाविल्या पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे यांचें महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिलें पाहिजे. केवळ नियम करून, किंवा शिक्षेचा धाक अथवा बक्षिसाचें आमिष दाखवून हें साधणार नाहीं.

### १. उपदेश, चित्रें, चित्रपट, बोलपट

हें महत्त्व पटवून देण्याचें पहिलें साधन म्हणजे उपदेश. हा तोंडी करतां येईल. योग्य प्रसंगीं तो केल्यास परिणामकारक होतो. क्रमिक पुस्तकांतील कांहीं पाठांच्या अध्यापनाच्या वेळींहि अशी संधि मिळते. विशेषतः भाषा आणि शास्त्र या दोन विषयांच्या अध्यापनाच्या वेळीं ही संधि मिळते. क्रीडांगणावरहि असे प्रसंग येतात. या उपदेशाकरितां – मार्गदर्शनाकरितां चित्रांचाहि उपयोग करतां येईल. अलीकडे तर चलच्चित्रांचेंहि या बाबतींत चांगलेंच साहाय्य मिळूं लागलें आहे. करमणुकीबरोबरच होणारें हें ज्ञान उपयुक्तच ठरतें.

### २. आरोग्य-दिन

अलीकडे शाळांतून आरोग्य-दिन साजरा करण्याची प्रथा पडत चालली आहे तीहि योग्यच आहे. त्या दिवशीं रोजचें अध्ययन बाजूला ठेवून आरोग्य, स्वच्छता याच विषयांचें अध्ययन विविध उपायांनीं दिवसभर करतां येतें.

आरोग्यविषयक प्रदर्शन भरविणें (यांत वाईट संवयींचा आरोग्याच्या दृष्टीनें दुष्परिणाम काय होतो हेंहि दाखवावयास हवें), विद्यार्थ्यांचीं, शिक्षकांचीं, बाहेरच्या वक्त्यांचीं या विषयावर भाषणें ठेवणें, विद्यार्थ्यांकडून निबंध लिहून घेणें, शाळेची सफाई विद्यार्थी आणि शिक्षक मिळून करणें, विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेकडे वैयक्तिक लक्ष पुरवून त्यांना स्वच्छ होण्यास प्रवृत्त करणें, इत्यादि कार्यक्रम ठेवावे.

### ३. विद्यार्थी-प्रतिनिधि

आरोग्य-दिनाचा कार्यक्रम वर्षांतून एखादा दिवसच होऊं शकतो; पण हें सर्व काम वर्षभर सतत चाललें पाहिजे. त्या बाबतींत विद्यार्थ्यांचें सहकार्य अवश्य घ्यावें. विद्यार्थ्यांची स्वराज्य-सभा शाळेंत स्थापन झालेली असेल तर त्यांतील प्रतिनिधींची एक स्वच्छता-समिति नेमावी. प्रत्येक वर्गांतील प्रतिनिधि या समितीवर घ्यावे, आणि सर्वत्र स्वच्छता राखण्याची जबाबदारी त्यांवर कांहींशी टाकावी. वर्गाच्या खोलीची स्वच्छता आणि वर्गांतील सहाध्यायांची स्वच्छता इकडे या समितींतिल सभासदांनीं विशेष लक्ष द्यावें.

### ४. पालक-शिक्षक-संघ

अन्न, विश्रान्ति, झोप, कपडे, गृहपाठ यांसंबंधीं ज्या आरोग्याविषयक चांगल्या संवयी विद्यार्थ्यांना लावावयाच्या त्या पालक–शिक्षक–संघामार्फत लावतां आल्या तर उत्तम. पालकांना केवळ चिठ्या पाठवून–अमुक करा, तमुक करा–असें सुचाविण्यापेक्षां त्यांना विश्वासांत घेऊन तुम्ही–आम्ही आपल्या पाल्यांकरितां हें करूं या असें सुचविणें अधिक उपयुक्त ठरतें.

### ५. साधनांचा पुरवठा

शाळेन एक गोष्ट मात्र केली पाहिजे. विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता राखण्याच्या बाबतींत प्रत्यक्ष साधनें पुरवून साहाय्य केलें पाहिजे. नखें कापण्याकरितां कातरी; हातपाय, तोंड धुण्याकरितां भरपूर पाणी व साबण; केस विंचरण्याकरितां कंगवे, आरसे वगैरे साधनें; दांत साफ करण्याकरितां दंतमंजन, वर्गांतील कचरा एकत्र टाकण्याकरितां टोपल्या; व्यायामाकरितां क्रीडांगण, क्रीडासाहित्य; मधल्या सुट्टींत योग्य खर्चांत स्वच्छ, ताजें, कसदार अन्न पुरविणारें फराळघर,–इत्यादि साधनें पुरवून स्वच्छ कसें राहावें, व्यायाम

कोणता, किती घ्यावा, अन्न केव्हां, किती, कोणतें घ्यावें, इत्यादि बाबतींत मार्गदर्शन केलें पाहिजे.

### ६. शिक्षकांचा आदर्श

पण या सर्व साधनांपेक्षांहि अत्यंत महत्त्वाचें व परिणामकारक साधन म्हणजे शिक्षकांचा स्वतःचा आदर्श. शिक्षणक्षेत्रांत शिक्षकाच्या आदर्शाचें महत्त्व कोणतें त्याची चर्चा मागें तिसऱ्या प्रकरणांत सविस्तर केलेली असल्यामुळें येथें त्याची पुनरुक्ति न करतां एवढें म्हणावेंसें वाटतें कीं, या बाबतींत शिक्षकाचा बरावाईट जसा आदर्श असेल तसे विद्यार्थी बनतात हें लक्षांत ठेवून शिक्षकांनीं आपलें कर्तव्य करावें.

## वैद्यकीय तपासणी

विद्यार्थ्यांच्या आरोग्याकरितां शाळेने सामान्यपणें काय उपाययोजना आंखावी याचा आतांपर्यंत विचार झाला. पण एवढें केल्यानें हा प्रश्न पूर्णपणें सुटला असें मानूं नये. विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक रीत्या लक्ष पुरवून त्यांच्यामधील शारीरिक दोष कोणते याचाहि विचार करावा लागतो; आणि त्याकरितां पद्धतशीर वैद्यकीय तपासणीची व्यवस्था शाळेला करावी लागते.

पाश्चिमात्य देशांत शाळेचेच डॉक्टर आणि नर्स असतात; आणि त्यांच्याकडे हें काम सोंपाविलें जातें. ते शाळेचे नोकर असल्यामुळें विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे सदैव लक्ष देणें त्यांना शक्य होतें. अर्थात् त्यांच्या कामांत शाळेंतील शिक्षकांचेंहि सहकार्य लागतेंच.

असे पगारी डॉक्टर नेमणें आपल्याकडील शाळांना सामान्यतः परवडणार नाहीं; पण गांवांतील कांहीं डॉक्टरांना शाळेनें विनंती केली तर विनावेतन ( किंवा थोडें सन्माननीय वेतन घेऊन ) ते शाळेंतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी वर्षांतून एकदां करण्यास सहज तयार होतील. शाळेचे माजी विद्यार्थी असणाऱ्या डॉक्टरांचें सहकार्य तर नक्कीच मिळूं शकेल.

मुलांची ही वैद्यकीय तपासणी जर नेहमींच पालकांच्या समक्ष करतां आली तर फार उत्तम. त्यायोगें किरकोळ शारीरिक दोषांची दुरुस्ती चटकन होऊं शकते. आणि विशेष गंभीर स्वरूपाच्या दोषांकडे पालकांचें लक्ष वेधून उपाययोजना करण्यासहि लागलीच सुरुवात होऊं शकते. प्रत्येक वेळीं

जर पालकांना उपस्थित होतां आलें नाहीं तर निदान शाळेंत मुलाचा प्रवेश होतांच पहिली वैद्यकीय तपासणी होईल त्या वेळीं तरी पालकांनीं ( आई आणि वडील या दोघांनीं ) अवश्य येण्याचा शाळेनें आग्रह धरावा.

डॉक्टरांनीं करावयाची वैद्यकीय तपासणी वर्षांतून निदान एकदां व्हावी. पण दर तिमाहीला ( अगर सहामाहीला ) कांहीं बाबतींतील तपासणी शिक्षकांनींहि करावी. उदाहरणार्थ : शारीरिक स्वच्छता ( दांत, केस, नखें, कान, डोळे इ. अवयवांची ), उंची, वजन, छातीचा घेर इत्यादि बाबतींतील नोंदी शिक्षकांना सहज करतां येतील. त्याकरितां तज्ज्ञ डॉक्टरांचा वेळ घेण्याची आवश्यकता नाहीं. विशेष गंभीर स्वरूपाची कांहीं विकृति आहे असें शिक्षकाला वाटलें तर तेवढ्या बाबतींत मात्र विद्यार्थ्याला डॉक्टरांकडून तपासून घ्यावा.

डॉक्टरांनीं करावयाची तपासणी मात्र अगदीं बारकाईनें व्हावी. त्या तपासणींत पुंढील बाबींकडे विशेष लक्ष असावें. उंची आणि वजन ( वयोमानाप्रमाणें योग्य प्रमाणांत आहे किंवा नाहीं ); हृदय व छातीचा घेर ( यावरून विद्यार्थी किती निरोगी आहे, फुप्फुसें योग्य प्रमाणांत काम करतात कीं नाहीं यांचा बोध होतो ); दृष्टि ( कांहीं नेत्रदोष आहेत काय, दृष्टि अधु आहे काय ); कान ( ऐकूं बरोबर येतें कीं कर्णदोष आहे; कान फुटलेला आहे काय; त्यांतून पाणी, पू वगैरे बाहेर येतात काय ); दांत ( स्वच्छ कीं किडलेले; योग्य प्रकारें वाढ आहे कीं नाहीं ); घसा ( आंतून सुजलेला आहे काय; घशाला गांठी आहेत काय ); नाक ( आंतून सुजलेलें आहे काय; नाकानें श्वासोच्छ्वास होतो कीं तोंडानें मधून मधून श्वासोच्छ्वास करावा लागतो ); पाठीला पोक आलें आहे काय; चालतांना अशक्तता वाटते काय; शारीरिक स्वच्छता ( अंग स्वच्छ आहे कीं नाहीं; खरूज, गजकर्ण, इसब असे त्वचारोग आहेत काय; लैंगिक विकृति अथवा लैंगिक रोग आहेत काय). मुलींच्या बाबतींत त्यांची मासिक पाळी नियमित आहे किंवा नाहीं – याचाहि विचार व्हावा. या नियमितपणावर मुलींचा निरोगीपणा आणि त्यांची योग्य प्रकारें होणारी शारीरिक वाढ फार अवलंबून असतात. मुलींच्या बाबतींतील सर्व वैद्यकीय तपासणी स्त्री-डॉक्टरांनीं करावी, आणि त्यांना स्त्री-शिक्षकांनीं मदत करावी.

वैद्यकीय तपासणी संपतांच कांहीं शारीरिक दोषांची दुरुस्ती करण्यास शाळेंतच प्रारंभ व्हावा. उदाहरणार्थ, शारीरिक अस्वच्छता आढळली तर शाळेंत उपाययोजना करतां येईल. खरूज वगैरे साधे त्वचा-रोग असतील तर शाळेनेंच किरकोळ औषधें पुरवून ते बरे करणें शक्य आहे. पाठीच्या कण्याला वांक आला असेल तर विद्यार्थ्याला सरळ बसण्याची, चालण्याची संवय शाळेंत लावतां येईल. वजन कमी असेल तर व्यायामाची सोय करतां येईल. श्वासोच्छ्वास नीट होत नसला तर त्यांतहि व्यायामाच्या कांहीं विशिष्ट प्रकारांनीं दुरुस्ती करतां येईल. जेवढें शाळेला करतां येईल तेवढें शाळेनें करावें.

पण कित्येक गोष्टी अशा असतात कीं त्या बाबतींत पालकांनींच उपाययोजना करणें रास्त असतें. म्हणून या वैद्यकीय तपासणीचा संपूर्ण अहवाल पालकांकडे पाठवून त्यांनीं पुढील उपाययोजना करावी अशी त्यांना विनंति केली पाहिजे. ही उपाययोजना कशी करतां येईल यासंबंधीं वाटल्यास शाळेनें सूचना कराव्या. शक्य तर शिक्षकांनीं पालकांची गांठ घेऊन या बाबतींत मोकळेपणानें चर्चा करावी. उपाययोजनेच्या बाबतींत पालकांची एक अडचण असते ती ही कीं, उपाययोजना कशी, कोठें होऊं शकेल याबद्दलचें अज्ञान. त्यामुळें शिक्षकांचें या बाबतींतील मार्गदर्शन त्यांना हवें असतें. वजन वाढण्यास, अंगांत तरतरी येण्यास योग्य अन्न लागतें. तें कोणतें; विश्रान्ति व झोप किती घ्यावयास हवी; त्वचारोग अथवा लैंगिक दोष असल्यास काय करावें, इत्यादि बाबतींतील मार्गदर्शन उपयुक्त ठरतें.

पण खरी अडचण येते ती आर्थिक बाबतींत. उपाययोजना कळली तरी ती करण्याकरितां पैसा लागतो तो कोठून आणावयाचा हा पालकांचा मुख्य प्रश्न असतो. मुलाचे डोळे बिघडत चालले आहेत; त्याला चष्मा घेऊन दिला नाहीं तर ते अधिकच बिघडतील हें कळतें; पण जेथें फीचे पैसे वेळच्या वेळीं देण्याची पंचाईत, तेथें चष्म्याला पैसे कोठून आणावे हा पालकांचा प्रश्न असतो. शरीरप्रकृति सुधारण्याकरितां मुलाला दूध द्यावें हें कळतें; पण जेथें घरांतील तान्ह्या मुलालाच दूध मिळण्याची पंचाईत, तेथें शाळेंत जाणाऱ्या प्रौढ मुलाला दूध कसें देतां येणार !

ही आर्थिक समस्या कठीण असली तरी कठीण म्हणून निराश होऊन चालणार नाहीं. त्यांतून कांहीं मार्ग काढलाच पाहिजे. हा प्रश्न केवळ व्यक्तीच्याच कल्याणाचा नसून त्यावर राष्ट्राचें भवितव्य अवलंबून आहे, हें लक्षांत घेऊन पाश्चिमात्य देशांत सरकारच्च या प्रश्नाची जबाबदारी आपल्यावर प्रामुख्यानें घेतें. विद्यार्थ्यांना वैद्यकीय सल्ला मोफत मिळणें, वैद्यकीय मदत विनामूल्य किंवा थोड्या पैशांत मिळणें, त्यांना ताजें, सकस अन्न अल्प पैशांत मिळणें या गोष्टींकरितां शाळांना सरकारी साहाय्य देण्यांत येतें. कांहीं पौर्वात्य देशांताहि आतां सरकारची हीच दृष्टि दिसून येऊं लागली आहे. इजिप्तमध्यें विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी सरकार तज्ज्ञ डॉक्टरांकडून करवून घेतें, आणि ज्यांना चष्मा लागेल असें कळतें त्यांना तो चष्मा अल्प किंमतींत किंवा विनामूल्य मिळण्याची सरकारकडून व्यवस्था होते. मुलांचें आरोग्य सकस अन्नावर फार अवलंबून असतें हें जाणून त्रावणकोर संस्थानांत 'वांची गरीब-विद्यार्थी-साहाय्यक-निधि' गोळा करण्यांत येतो. त्या निधीला सरकार प्रतिवर्षी साहाय्य करतेंच, पण धनिक लोकहि साहाय्य करतात. त्या निधींतून गरीब विद्यार्थ्यांना दूध आणि केव्हां केव्हां एक वेळचें जेवण विनामूल्य पुरविलें जातें. ही योजना तेथें आज अनेक वर्षें यशस्वी रीतीनें चालू आहे. मुंबई शहरांतहि कांहीं वर्षांपूर्वी असाच एक प्रयत्न झाला होता. मुंबई महानगरपालिकेनें आपल्या प्राथमिक शाळांतील गरीब मुलांना आपल्या खर्चानें दूध देण्याची योजना सुरू केली होती. दुर्दैवानें ती थोडक्याच काळांत बंद झाली.

हें सर्व लिहिण्याचा उद्देश हाच कीं, सरकार, धनिक लोक, नगरपालिका, जिल्हाबोर्डें इत्यादींच्या सहकार्यानें ही आर्थिक अडचण अंशतः दूर करतां येईल. तसें कांहीं झालें तरच या शालेय वैद्यकीय तपासणीचा खरा उपयोग होईल. नाहीं तर शाळांनीं तपासणी करावयाची, तिचा अहवाल पालकांकडे पाठवावयाचा आणि पालकांनीं तो वाचून (किंवा न वाचतांहि) बाजूला टाकून द्यावयाचा असेंच त्याला स्वरूप येईल.

पालकांकडे जो अहवाल पाठवावयाचा तो शक्य तितका सविस्तर असावा. तसेंच त्या अहवालावरून आपल्या पाल्याची आरोग्यदृष्ट्या प्रगति होत आहे किंवा नाहीं हेंहि पालकांना (व शिक्षकांनाहि) कळलें पाहिजे. तेवढ्याकरितां या अहवालाचें पत्रक दर तपासणीस निराळें असें न ठेवतां दर वर्षींचा अहवाल

एकापुढें एक दिसेल अशा तऱ्हेनें प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरितां चार (किंवा सात) वर्षांच्या नोंदी, व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या सात-वर्षांच्या नोंदी एकत्र करतां येतील असा पत्रकाचा नमुना असावा. अशा पत्रकाचा एक नमुना मार्गदर्शनाकरितां पुढें दिला आहे.

## वैद्यकीय तपासणी ...

शाळेचें नांव _____

विद्यार्थ्यांचें नांव _____ जन्मतारीख _____

पालकाचें नांव व पत्ता _____

| विद्यार्थ्याच्या आरोग्याची सामान्य माहिती | वर्ष आणि महिना | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| देवी केव्हां काढल्या ? ... | | | | | |
| पुढील रोगांपासून कधीं त्रास झाला ?... | | | | | |
| डांग्या खोकला ... | | | | | |
| कांजण्या ... | | | | | |
| देवी ... | | | | | |
| दोन्ही ताप ... | | | | | |
| हिंवताप ... | | | | | |
| घटसर्प ... | | | | | |
| आमांश ... | | | | | |
| संसर्गजन्य रोग ... | | | | | |

कुटुंबांत कांहीं विशेष प्रकारचा रोग आहे काय ?

| विद्यार्थ्याची माहिती | वैद्यकीय तपासणी – वर्ष आणि महिना | | | | |
|---|---|---|---|---|---|
| इयत्ता ... | | | | | |
| वय ... | | | | | |
| उंची ... | | | | | |
| वजन ... | | | | | |
| (मुलांकरितां) छाती-साधी | | | | | |
| ( ,, ) छाती-फुगवून | | | | | |
| (मुलींकरितां) मासिक-पाळीचा नियमितपणा... | | | | | |
| दृष्टि–उजवा डोळा ... | | | | | |
| –डावा डोळा ... | | | | | |
| नेत्ररोग ... | | | | | |
| कर्णरोग ... | | | | | |
| त्वचारोग ... | | | | | |
| दंतरोग ... | | | | | |
| जिव्हादोष (तोतरेपणा वगैरे) | | | | | |
| घसा ... | | | | | |
| नाक ... | | | | | |
| हृदयक्रिया ... | | | | | |
| मज्जासंस्था ... | | | | | |
| पचनसंस्था ... | | | | | |
| शरीराचा एकंदर बांधा ... | | | | | |
| सामान्य स्वच्छता ... | | | | | |
| (पोषाख) ... | | | | | |
| (हातपाय) ... | | | | | |
| (कान) ... | | | | | |
| (केस) ... | | | | | |

| विद्यार्थ्यांची माहिती | वद्यकीय तपासणी – वर्ष आणि माहिना | | | | |
|---|---|---|---|---|---|
| डॉक्टरांची सही ... | | | | | |
| पालकांस माहिती पाठविल्याची तारीख ... | | | | | |
| पालकांचें उत्तर(तारीख) ... | | | | | |

## रोगांच्या सांथी आणि शाळांचीं कर्तव्यें

प्लेग, कॉलरा, देवी, कांजण्या, दोषी ताप, खरूज, डांग्या खोकला अशांसारख्या रोगांच्या सांथी गांवांत पसरूं नयेत, आणि पसरल्या तर त्यांपासून शाळेंतील मुलांचें रक्षण व्हावें अशी काळजी शाळेनें घेतली पाहिजे. त्याकरितां शाळांनीं पुढील योजना आंखावी.

१. **पूर्वमाहिती**—या रोगांचीं लक्षणें कोणतीं, ते होतात कसे, ते पसरतात कसे, ते होऊं नयेत म्हणून आपण कोणती काळजी घेतली पाहिजे, झाल्यास प्राथमिक उपाय कोणते, डॉक्टरांची मदत कशी मिळवावी, इत्यादि माहिती शास्त्राच्या तासांनाच त्यांना देऊन ठेवावी. त्याकरितां तक्ते व चित्रें वापरावीं, तज्ज्ञ डॉक्टरांचीं व्याख्यानें ठेवावीं, प्रदर्शनें भरवावीं, इस्पितळांना भेटी देऊन तेथील काम प्रौढ विद्यार्थ्यांना दाखवावें.

२. **पूर्वतयारी**—कांहीं बाबतींत या रोगांच्या प्रसाराला आळा घालण्याची पूर्वतयारीहि शाळांतून करतां येईल. प्रत्येक मुलानें देवी काढल्या आहेत कीं नाहीं तें पहावें; प्लेग, कॉलरा, मुदतीचा ताप, यांसारखे रोग गांवांत सुरू होण्याचा संभव दिसतांच त्या त्या रोगांच्या लसी शाळेंत मागवून त्या सर्व विद्यार्थ्यांना टोंचून घेण्याची व्यवस्था शाळेमार्फतच करावी. हिंवतापाची सांथ आली तर डांसांचा नायनाट, घरांतील स्वच्छता व शेवटीं औषधें आणि टोंचणें हे उपाय योजावे. वर्गांतील एखाद्या विद्यार्थ्याला खरूज झालेली दिसली तर ती बरी होईपर्यंत त्याला वर्गांतच पण जरा बाजूच्या बाकावर बसावयास सांगावे. एखाद्या विद्यार्थ्याचे डोळे आले असले तरीहि हा उपाय योजावा.

३. अनध्याय ( शाळाबंदी )—डांग्या खोकला, कावीळ, देवी, कांजण्या, गालफीं ( गालगुंद ), घटसर्प, वगैरे रोग सह-वासानें ( जवळ जवळ बसल्यानें ) पसरतात. म्हणून या रोगांनीं पछाडलेल्या विद्यार्थ्यांना त्यांतून पूर्णपणें बरें होईपर्यंत शाळेंत येण्याची बंदी करावी. 'पूर्णपणें बरें' याचा अर्थ केवळ ते विद्यार्थी बरे होणें असा नाहीं. कांहीं रोगांचीं बीजें रोगी बरा झाला तरी कांहीं दिवस त्याच्या शरीरांत मुरलेलीं असतात, व त्याच्या सहवासांत येणाऱ्या इतर मुलांना ते रोग जडण्याचा संभव असतो; हें लक्षांत घेऊन बरे झाल्यानंतर कांहीं विशिष्ट मुदतीपर्यंत त्या मुलांना शाळेंत येऊं देऊं नये ही मुदत त्या विशिष्ट रोगाप्रमाणें कमीजास्त असते.

जेव्हां प्लेग, कॉलरा, अशांसारख्या रोगांची जोराची सांथ गांवांत येते तेव्हां हे वरील सर्व उपाय अपुरे पडतात. त्या वेळीं शाळेचा परिसर जंतुनाशक द्रव्यांनीं निर्दोषित करणें आणि शेवटीं कांहीं मुदतीपर्यंत शाळा बंद ठेवणें हाच उपाय राहतो. शाळेंतील अभ्यासाच्या दृष्टीनें यांत जरी मुलांचें नुकसान होत असलें तरी त्यांच्या आरोग्याच्या, जीविताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें हा उपाय करणें आवश्यक असतें.

महारोग, क्षय अशांसारख्या दुर्धर रोगांनीं पीडिलेल्या दुर्दैवी मुलांना शाळेंत येऊं न देणें इतर सर्व मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीनें जरूर असतें. हें म्हणणें कठोर दिसेल खरें, पण त्याला इलाज नाहीं.

• • •

: १९ :

# शारीरिक शिक्षण

## आवश्यकता

मुलांमुलींच्या आयुष्यांतील सहाव्या वर्षापासून सुमारें अठराव्या वर्षापर्यंतचा काल त्यांच्या शरीराच्या वाढीच्या दृष्टीनें अत्यंत मौलिक असतो. शरीराचे सर्व अवयव कार्यक्षम होणें, शरीराला मजबुती येऊन तें सुश्लिष्ट, बांधेसूद होणें या दृष्टीनें जे प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रयत्न या वयांत होतील त्यांवर त्यांच्या पुढील आयुष्याची एकंदर उभारणी व यशस्विता अवलंबून असते. त्यामुळें त्यांच्या शारीरिक शिक्षणाकरितां जे कांहीं प्रयत्न करावयाचे असतील ते या काळांतच होणें अवश्य आहे.

शिवाय शिक्षण म्हणजे केवळ बौद्धिक विकास ही जुनी कल्पना जाऊन, शिक्षण म्हणजे विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास – ही कल्पना मान्य झाल्यानंतर शालेय कार्यक्रमांत शारीरिक शिक्षणाची तरतूद करणें ओघानेंच आलें. आणि बौद्धिक विकासाहि कांहीं अंशीं शारीरिक विकासावर अवलंबून असतो; इतकेंच नव्हे तर आत्मसंयमन, इतरांशीं सहकार्यानें वागण्याची कला, खिलाडू वृत्ति इत्यादि सामाजिक गुणांचा विकास, व एकंदरींत माणसाचें व्यक्तिमत्त्व – हीं शारीरिक सुस्वास्थ्यावर अवलंबून असतात, असें आढळून आल्यानंतर तर मुलांमुलींच्या शारीरिक शिक्षणाची कांहीं व्यवस्था करणें समाजाला आवश्यक वाटूं लागलें. आणि शिक्षणाचेंहि तंत्र असतें, त्यांत कांहीं विशेष योजना असावी लागते, हें कळून आल्यानंतर बौद्धिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षणाची जबाबदारी पालकांकडून निघून तज्ज्ञांकडे म्हणजे शाळाचालक आणि शिक्षक यांच्याकडे आली.

## सामान्य उद्दिष्टें

शाळेनें द्यावयाच्या शारीरिक शिक्षणाचीं दोन सामान्य उद्दिष्टें मानतां येतील. पहिलें म्हणजे विद्यार्थ्यांचें आरोग्य. हें आरोग्य अशा दर्जाचें हवें कीं,

विद्यार्थ्यांचे निरानिराळे अवयव पूर्ण कार्यक्षम होतील, शारीरिक व्याधींपासून त्यांना त्रास होणार नाहीं, शरीरावर तजेला दिसेल, आणि त्यामुळें काम करण्यास त्यांना उत्साह वाटेल, व कोणतेंहि अवघड काम आपण सहज करूं शकूं असा एक तऱ्हेचा आत्मविश्वास त्यांच्या ठिकाणीं निर्माण होईल. दुसरें उद्दिष्ट म्हणजे – शरीराला योग्य आकार येऊन तें बांधेसूद, पिळदार दिसूं लागणें.

याचाच अर्थ पाठीला बांक आलेला आहे, मान लांब निघाली आहे, पोट सुटलेलें आहे, छाती बारीक झालेली आहे—असे, भेकड वृत्तीचे, स्वाभिमानशून्य विद्यार्थी ( विद्यार्थिनीहि ) शाळांतून न दिसतां त्या जागीं विद्यार्थी दणकट, भरदार छातीचे, पिळदार दंड आणि पोटऱ्या असलेले, शारीरिक हालचाली सहजतेनें, चपलतेनें करणारे, कणखर वृत्तीचे, स्वाभिमानी पण विनम्र असे दिसावे; व विद्यार्थिनीहि निकोप प्रकृतीच्या, आरोग्याचें तेज तोंडावर,—सर्व शरीरावर दिसणाऱ्या, आत्माविश्वास रोमरोमांत भरलेला आहे, आचार-विचार-उच्चारांत व्यक्तिमत्त्व स्पष्ट दिसून येत आहे,—अशा दिसाव्या.

## साध्य व साधनें

पूर्वीच्या काळीं ( म्हणजे सुमारें ३०–४० वर्षांपूर्वीं ) शालेय शारीरिक शिक्षणाची व्यवस्था फक्त मुलांकरितां असे, व ती कवाईत ( ड्रिल ) आणि तालीम या दोन साधनांच्या द्वारां करण्यांत येत असे. मुलींकरितां शारीरिक शिक्षण ही कल्पनाच त्या वेळीं मान्य होण्यासारखी नव्हती.

मुलांकरितां असणारीं साधनेंहि तुटपुंजीं असत. आठवड्यांतून एखादा दुसरा दिवस कवाईत असे; आणि सायंकाळीं लहानशा अंधाऱ्या तालीमखान्यांत थोड्या विद्यार्थ्यांकरितां मल्लखांब, जोर–बैठका, कुस्ती यांची सोय असे. कवायतीचा तास चाळीस पंचेचाळीस मिनिटांचा असल्यामुळें कवायतीमुळें विद्यार्थ्यांना मानसिक शीण येत असे; पण तो दुष्परिणाम दिसण्यांत येत नसे. तालमींतील वातावरण आकर्षक नसे;–त्यामुळें तेथें जावें, व्यायाम घ्यावा, असें सामान्यतः मुलांना वाटत नसे.

शारीरिक शिक्षणाचे मार्ग आतां मात्र बदललेले आहेत. पूर्वीच्या कवायतीची जागा आतां संचलनानें घेतलेली आहे. त्यांतील मुख्य हेतु म्हणजे ताठ उभें राहतां–चालतां यावें, आणि शरीराच्या सर्व अवयवांच्या हालचाली

सहजतेनें, चापल्यानें, आणि नेत्रांस आल्हादकारक होतील अशा तऱ्हेनें करतां याव्या. त्याकरितां डंबेल्स, लाठ्या अशीं साधनेंहि वापरलीं जातात. पूर्वीसारखी तालमीची व्यवस्था असतेच. शक्य तों तालमीचें अंतरंग आकर्षक होईल असें पाहिलें जातें, आणि शरीराला सुस्ती व मनाला आळस येईल इतका तालमीचा अतिरेक न करतां, शरीराला बांधेसूदपणा येईल व अंगांतील रग वाढूनहि चापल्य कायम राहील हें पाहिलें जातें.

पण हल्लीं सर्वांत जास्त भर दिला जातो तो मैदानी खेळांवर. हे खेळ दोन प्रकारचे असतात. लंगडी, आट्यापाट्या, खोखो, हुतूतू वगैरे देशी—व क्रिकेट, हॉकी, फूटबॉल, व्हॉली बॉल अशांसारखे विलायती खेळ. खेळांचा दुसरा प्रकार म्हणजे धांवणें, लांब अथवा उंच उडी, दोरीवरच्या उड्या, चेंडू-फेंक, भाला-फेंक, तिपायी शर्यत, अडथळा शर्यत अशांसारखे खेळ.

## भूमिका

शालेय शारीरिक-शिक्षण-कार्यक्रमांत सध्यां या मैदानी खेळांना जें प्राधान्य दिलें जातें त्यामागील भूमिका स्पष्ट केली पाहिजे. शारीरिक शिक्षण महत्त्वाचें असलें तरी तें आकर्षक करतां आलें पाहिजे. केवळ संचलनानें ( कवाइतीनें ) म्हणजे रांगेंत चालणें, शिस्तींत हातापायांच्या हालचाली करणें यानें किंवा तालमींतील कुस्ती, जोर, बैठका, अशांसारख्या कार्यक्रमांनीं तें शिक्षण सामान्य विद्यार्थ्यांस आकर्षक वाटत नाहीं, व त्यामुळें तें टाळण्याचीच त्यांची प्रवृत्ति होते. खेळांच्या साहाय्यानें मात्र तें आकर्षक होऊं शकतें. क्रीडाप्रवृत्ति ही मुलांमुलींत या वयांत निसर्गतःच असते. खेळांत एक तऱ्हेची सुखद संवेदना असते. त्यामुळें त्या प्रवृत्तीचा फायदा शैक्षणिक कार्यांत येतां आला तर मुलांचे खेळण्या खेळ होऊन शिक्षणाचें कार्यहि होतें.

शिवाय हे खेळ उघड्या मैदानांत, मोकळ्या हवेंत होतात हें फार महत्त्वाचें असतें. मुलांच्या घरीं ( विशेषतः शहरांत ) आणि शाळेंतहि कांहींसें कोंदट वातावरण असतें. वर्गाची खोली योग्य आकाराची असली तरी तीमध्यें चाळीस पन्नास विद्यार्थी पांचसहा तास बसलेले असतात; त्यामुळें तेथील हवा सारखी अशुद्ध होत असते, व त्याचा परिणाम शरीरावर, मनावर होत असतो. पण मैदानांतील हवा भरपूर, स्वच्छ अशी असल्यामुळें त्या ठिकाणीं घालवलेला वेळ आरोग्यदृष्ट्या उपयुक्त होतो.

पण या मैदानी खेळांचें खरें महत्त्व आहे तें चारित्र्य-विकसनास त्यांचें जें साहाय्य होतें त्यामुळें. मागें एका ठिकाणीं खिलाडू वृत्तीचा उल्लेख केला आहे. त्या वृत्तीमध्यें किती तरी गुणांचा अन्तर्भाव होतो. खेळांचे सामने चालले असतांना यश मिळविण्याकरितां लागणारा आत्मविश्वास, केवळ वैयक्तिक उत्कर्षाकरितां न खेळतां सर्व संघाकरितां आपण खेळावयाचें ही भावना सारखी मनाशीं बाळगल्यामुळें होणाऱ्या सहकार्याच्या भावनेची जोपासना, सामन्यांतील जयापजयाकडे समबुद्धीनें पाहण्याच्या वृत्तीची वाढ, प्रतिपक्षाच्या जयाकडे कौतुकानें, आदरानें पाहण्याच्या दृष्टिकोनाचें शिक्षण, खेळाचे नियम पाळण्याची आणि पंचांनीं दिलेला निकाल विनतक्रार मान्य करण्याची तयारी,–हे सर्व गुण अत्यंत मौलिक असून त्यांची जोपासना क्रीडांगणावर ज्या तऱ्हेनें होऊं शकते त्या तऱ्हेनें वर्गांत किंवा घरीं होऊं शकत नाहीं. सामन्यांत चढाओढ असते, जय मिळविण्याची ईर्षा असते, त्याकरितां श्रम केले जातात, त्यामुळें वैयक्तिक विकास होतो हें खरें; पण त्याहीपेक्षां ही जी खिलाडू वृत्तीची जोपासना या मैदानी खेळांनीं, सामन्यांनीं, शर्यतींनीं होते ती खरी मौलिक असते. याकरितांच इंग्लंड-सारख्या पाश्चिमात्य देशांत मैदानी खेळांना वर्गांतलि अभ्यासापेक्षांहि केव्हां केव्हां जास्त महत्त्व दिलें जातें.

## शाळेची जबाबदारी

शारीरिक शिक्षणाच्या बाबतींतील शाळेची जबाबदारी विविध प्रकारची आहे. पहिली गोष्ट म्हणजे या शिक्षणाकरितां **भरपूर जागा** पुरविली पाहिजे. ही जागा शाळेला लागूनच असणें अवश्य आहे. तालीमखान्याची व्यवस्था, कवायतीची व्यवस्था, आणि विविध तऱ्हेचे मैदानी खेळ व सामने घेण्यास भरपूर होईल अशी ही जागा असावी. खेळांचें मैदान स्वच्छ व साफसूफ केलेलें असावें; खांच-खळगे असल्यास खेळतांना मुलांना अपाय होण्याचा संभव असतो. तसेंच ही जागा दलदलीची असतां कामा नये. पावसाळ्यांत पाण्याचीं डबकीं सांचलीं तर त्या मैदानांत खेळणें आरोग्यदृष्ट्या अहिताचें होतें. तालीम-खाना सुप्रकाशित, स्वच्छ असावा; आणि आंत पाऊल टाकतांच मन प्रसन्न होईल असें तेथील वातावरण असावें.

खेळ, सामने आणि वैयक्तिक शारीरिक विकास यांना लागणारें **साहित्य** शाळेनें पुरविलें पाहिजे. त्याकरितां आतां निराळी फी विद्यार्थ्यांकडून घ्यावी

लागत नाहीं. दर सहामाहीला जी जादा फी घेण्याची परवानगी शाळांना दिलेली असते त्या फींतूनच ही साहित्याची खरेदी व्हावयास पाहिजे, आणि सामन्यांकरितां वगैरे होणारा खर्च भागविला पाहिजे. या एकंदर फीचें उत्पन्न किती, तींतून शारीरिक शिक्षणाकरितां आपण किती खर्च करावा याचा विचार तारतम्यानें करून, कोणते मैदानी खेळ आपल्या शाळेंत सुरू करावयाचे तें शाळांनीं ठरवावें. क्रिकेटसारखा खेळ आकर्षक वाटत असला तरी तो थोड्याच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करूं शकतो, व फार महाग असतो. त्याऐवजीं हुतूतू, लंगडी, खोखो, आट्यापाट्या असे देशी खेळ, किंवा फुटबॉल, व्हॉली बॉल, हॉकी असे परदेशी खेळ खेळण्याची व्यवस्था आपल्याकडील शाळांनीं केलेली बरी. आपले बरेच देशी खेळ मुलांकरितां आणि मुलींकरितांहि सोयीचे आहेत.

शारीरिक शिक्षणाच्या बाबतींतील तिसरी जबाबदारी म्हणजे त्याचा **अभ्यासक्रम** आणि **वेळापत्रक** ठरविण्यासंबंधींची. वाटेल त्यानें वाटेल तेव्हां लहर येईल त्याप्रमाणें वाटेल तो खेळ खेळावा, किंवा कधीं भरपूर व्यायाम करावयाचा, खेळ खेळावयाचे, आणि नंतर कांहीं दिवस कांहींच करावयाचें नाहीं,—असें केल्यास शारीरिक शिक्षणापासून फायदे होण्याऐवजीं अपायच होईल. शरीराला ज्याप्रमाणें रोज नियमितपणें अन्न–पाणी हें पाहिजे, त्याच-प्रमाणें व्यायामहि रोजचा हवा. जशी जेवण्याची वेळ ठरलेली असते, तशी व्यायामाचीहि ठरलेली असावी. शालेय शारीरिक शिक्षणाच्या दृष्टीनें सायंकाळची शाळा सुटल्यानंतरची वेळ मैदानी खेळांना सोयीची असते. तालीमखान्यांतील व्यायाम सोयीप्रमाणें सकाळीं घेतलेला चांगला. हा सर्व व्यायाम मर्यादित प्रमाणांत हवा. शरीराची वाढ झाली असेल त्या प्रमाणांत जसें अन्न लागतें – कमी किंवा जास्त अन्न घेतलें तर तें हितकारक होत नाहीं, त्याचप्रमाणें वय, शरीराची वाढ, शरीराचें सामर्थ्य हें पाहून व्यायामाचें प्रमाण ठरलें पाहिजे. आणि त्याकरितां शारी-रिक शिक्षणाचा अभ्यासक्रम इयत्तावार ठरविला पाहिजे. सध्या कांदिवली येथें शारीरिक शिक्षणाचें जें महाविद्यालय सरकारनें स्थापन केलें आहे, त्या ठिकाणीं शिक्षण घेऊन तयार झालेले जे शिक्षक असतात त्यांना या अभ्यासक्रमाची कल्पना असतेच. असे **तज्ज्ञ शिक्षक** शाळेंत विद्यार्थ्यांच्या

संख्येप्रमाणें असावेत; आणि त्यांच्या साहाय्यानें मुख्याध्यापकांनीं आपापल्या शाळेकरतां असा इयत्तावार अभ्यासक्रम आंखावा, व त्याप्रमाणें शिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

शाळेची शेवटची जबाबदारी म्हणजे – हें शिक्षण देण्याची प्रत्यक्ष व्यवस्था करणें. त्याकरितां तज्ज्ञ शिक्षक योग्य त्या प्रमाणांत शाळेंत हवेच; पण त्याशिवाय इतर शिक्षकांनीं आणि मुख्याध्यापकांनींहि दररोज क्रीडांगणावर उपस्थित राहावें; मुलांच्या खेळांत भाग घ्यावा, त्यांना मार्गदर्शन करावें, आणि योग्य उत्तेजन द्यावें. चारित्र्यवर्धन हें जें शारीरिक शिक्षणाचें महत्त्वाचें उद्दिष्ट आहे त्या दृष्टीनें शिक्षकवर्गाची ही क्रीडाक्षेत्रावरील रोजची व सामन्यांच्या वेळची उपस्थिति फारच उपयुक्त होते.

## कांहीं अवान्तर प्रश्न

शालेय शारीरिक शिक्षणाची व्यवस्था करतांना कांहीं अवान्तर प्रश्न उपस्थित होतात. त्यांचा क्रमशः आतां थोडक्यांत परामर्श घेऊं.

शारीरक शिक्षण सर्वांना सक्तीचें असावें काय ? या प्रश्नाचें उत्तर 'होय' असेंच द्यावें लागेल. याचा अर्थ मात्र सर्वांना सारख्याच प्रकारचें किंवा सारख्याच प्रमाणांत तें द्यावयाचें असा नाहीं. वर उल्लेख केल्याप्रमाणें प्रत्येक विद्यार्थ्याची शारीरिक तपासणी करून त्यानें कोणता व्यायाम, किती प्रमाणांत घ्यावा हें शाळांनीं ठरवावें. कांहीं विशेष शारीरिक व्यंग ( उदा० कमकुवत हृदय ) असेल तर मात्र अपवाद करावयास हवा. तरीहि अशा विद्यार्थ्यानें खेळांच्या वेळीं मैदानांत मोकळ्या हवेंत निदान येऊन बसणें, जमल्यास मैदानांत फिरणें आवश्यक करावें. पण किरकोळ व्यंगांकरितां अशी सवलत देऊं नये. मुलांना आणि मुलींना एकाच तऱ्हेचें शिक्षण द्यावें काय ? कांहीं मैदानी खेळ किंवा कवायतीचे प्रकार मुलांमुलींना सोयीचे असले तरी मुलींच्या शरीराच्या वाढींतील टप्पे मुलांच्या शरीराच्या वाढींतील टप्प्यांपेक्षां कांहींसे निराळे असतात; त्यामुळें सारख्याच वयाच्या मुलांमुलींना तेच खेळ वा व्यायाम-प्रकार सोयीचे होतीलच असें नाहीं. विशेषतः प्रौढ मुलींच्या बाबतींत मासिक पाळीमुळें हा प्रश्न अधिकच बिकट होतो. त्यामुळें मुलींची शारीरिक वाढ आणि शारीरिक सामर्थ्य हीं लक्षांत घेऊन त्यांच्याकरितां कांहीं खेळ निराळे असणें जरूर असतें.

शारीरिक शिक्षणाच्या वेळीं, विशेषतः सामुदायिक संचलन, मैदानी खेळांचे सामने अशा प्रसंगीं मुलांमुलींनीं गणवेष वापरणें दोन दृष्टींनीं उपयुक्त होतें. एक म्हणजे हे गणवेष आटोपशीर असल्यामुळें खेळतांना सुटसुटीतपणा वाटतो; आणि दुसरें म्हणजे – त्यायोगें आपण सर्व एका शाळचे घटक आहोंत ही भावना दृढ होते. चारित्र्यवर्धनास ही भावना कशी उपकारक होते तें आपण मागें पाहिलेंच आहे.

शारीरिक शिक्षण आणि सकस–पौष्टिक अन्न यांचा कितपत संबंध आहे, असा प्रश्न उपस्थित केला जातो. व्यायामानंतर दुधासारखें पौष्टिक पेय घेतां आलें, किंवा केवळ शाकाहारी नसलेल्या विद्यार्थ्यांना अंडीं घेतां आलीं, किंवा जेवणांत ताज्या भाज्या व जेवणानंतर उत्कृष्ट फळें मिळालीं तर अर्थातच फार उत्तम. पण तशी आर्थिक परिस्थिति नसली तरी रोजचा योग्य प्रमाणांत व्यायाम घेण्यास प्रत्यवाय असूं नये. आपलें रोजचें भाजी–भाकरीचें साधें अन्न असतें त्यांतहि कस असतोच; व शरीरवाढीला त्याचाहि उपयोग होऊं शकतो. तेव्हां पौष्टिक अन्न नाहीं – खुराक नाहीं, मग व्यायाम कशाला घ्या,—अशी वृत्ति विद्यार्थ्यांत निर्माण होऊं देऊं नये.

अलीकडे सैनिकी शिक्षणाचे वर्ग शाळेला जोडून काढण्यांत येतात. त्यांनीं विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाला मदत होते, त्याच्या अंगांत रग निर्माण होते, आणि आपण देशाच्या रक्षणाकरितां कांहीं करूं शकूं असा आत्म-विश्वास त्याच्या मनांत निर्माण होतो. त्या दृष्टीनें हे वर्ग उपयुक्त होतात. सरकारनें अशा वर्गांना जास्तींत जास्त उत्तेजन द्यावयास हवें. मात्र अशा वर्गांत विद्यार्थी घेतांना त्यांची निवड फार कसोशीनें व्हावयास पाहिजे; त्यांचीं शरीरें आणि मनें बळकट आहेत हें पाहावयास पाहिजे. कारण वाटेल त्याला झेपेल असें हें शिक्षण नसतें. आणि या सैनिकी शिक्षणाच्या बाबतींत शाळेनें घ्यावयाची खबरदारी म्हणजे या वर्गांतील विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण मिळावें, सैन्यांतील शिस्त त्यांच्या अंगीं बाणावी हें पाहावेंच, पण सैन्यांतील दुर्गुण मात्र या मुलांत निर्माण होऊं नयेत. त्या दृष्टीनें या वर्गांचें चालकत्व ज्यांच्याकडे द्यावयाचें ते शिक्षक चारित्र्य-संपन्न असावेत.

• • •

: २० :

# वसतिगृह

## आवश्यकता

माध्यमिक शाळांना जोडून वसतिगृहें स्थापन करण्याची प्रथा महाराष्ट्रांत सुमारें ७० वर्षांपूर्वीच निर्माण झाली म्हणावयास हरकत नाहीं. त्या काळांत माध्यमिक विद्यालयें फार थोडीं असत, आणि तीं सामान्यतः जिल्ह्यांच्या व तत्सम मोठ्या शहरींच असत. त्यामुळें माध्यमिक शिक्षण आपल्या मुलांना मिळावें अशी इच्छा असणाऱ्या पालकांना, गांवांत ती सोय नसल्यामुळें मुलांना शाळेच्या गांवांत शिक्षणाकरितां पाठवावें लागे. हीं मुलें केव्हां भाड्याच्या खोलींत रहात, केव्हां नातेवाइकांकडे रहात, आणि तशी कांहीं सोय होण्यासारखी नसली तर शाळेच्या वसतिगृहांत रहात. मुलींच्या कांहीं शाळांना जोडूनहि अशीं थोडीं वसतिगृहें स्थापन झालीं.

आतां तो काळ बदलला आहे. माध्यमिक शाळांची संख्या खूपच वाढली आहे, आणि तालुक्याच्या गांवींच नव्हे तर कांहीं मोठ्या खेड्यांतूनहि मुलां-करितां ( आणि मुलींकरितांहि ) माध्यमिक विद्यालयें निघालीं आहेत. तेव्हां केवळ राहण्याची सोय या दृष्टीनें आतां अशा वसतिगृहांची गरज राहिली नाहीं.

पण दुसऱ्या एका दृष्टीनें वसतिगृहांची आवश्यकता आहे; आणि जेवढे जास्त विद्यार्थी–विद्यार्थिनी अशा वसतिगृहांत राहून आपलें अध्ययन पुरें करतील तेवढें चांगलें. याचें कारण असें:—

मुलांमुलींना शिक्षण मिळतें तें केवळ शाळेंत नसून घरीं, दारीं, क्रीडां-गणावर, समाजांत, सर्वत्र तें मिळत असतें. ज्या वेळीं जीवनकलह तीव्र नव्हता, आणि शिक्षणाची व्याप्ति मोठी नसून तें देण्याकरितां तज्ज्ञांची विशेष गरज नव्हती, त्या काळांत शाळेबाहेरील शिक्षण देण्याचा बराचसा वांटा पालक उचलीत असत. मुलांमुलींना उपयुक्त असे संस्कार घडविण्याचें आणि पुढील

आयुष्यांत उपयोगी पडतील असे अनुभव देण्याचें हें शिक्षणकार्य असे. पण आतां बदलत्या काळाबरोबर वेळेचा अभाव आणि अध्यापन-तंत्राचें अज्ञान यामुळें पालकांना तें कार्य करतां येत नाहीं. तेव्हां पालकांची जागा शिक्षकांनीं भरून काढणें अवश्य झालें; आणि त्याकरितां विद्यार्थी जेवढा जास्त वेळ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखालीं राहूं शकतील तेवढें बरें असें वाटूं लागलें. केवळ सकाळचे अकरा ते सायंकाळचे पांचसहा एवढाच वेळ विद्यार्थी शाळेंत आणि क्रीडांगणावर शिक्षकांच्या सहवासांत राहिले तर बाकीचे सतरा अठरा तास त्यांना मार्गदर्शनाशिवाय राहावें लागणार; आणि केव्हां सदोष सामाजिक परिस्थितींतहि राहावें लागेल. तेव्हां ते वसतिगृहांत राहिल्यास चोवीस तास शिक्षकांसमवेत राहूं शकतील; व त्यांचा बौद्धिक, शारीरिक, नैतिक विकास करण्यास अवश्य तें मार्गदर्शन शिक्षक करूं शकतील, सुसंस्कृत पालकांची जागा ते घेतील,—या कल्पनेनें वसतिगृहांची आवश्यकता आधुनिक काळांत भासूं लागली आहे. आपल्याकडील आर्थिक परिस्थितीमुळें किती मुलांमुलींना वसतिगृहांत राहतां येईल हा प्रश्न निराळा; पण वसतिगृहांतील त्यांचें वास्तव्य पुढील आयुष्याची तयारी करण्यास उपयोगी होईल हें मात्र निश्चित.

## वसतिगृहाची जागा व इमारत

वसतिगृह शक्य तों शाळेला जोडूनच असावें; म्हणजे तें शालेय परिसरांतच असावें; मात्र शाळेच्या इमारतींत तें नसावें. शाळा आणि वसतिगृह यांचें अंतिम ध्येय विद्यार्थ्यांचा विकास हेंच असलें तरी कार्यक्रमाच्या तपशिलांत फरक असल्यामुळें शाळा आणि वसतिगृह यांच्या इमारती निरनिराळ्या असाव्या. शालेय इमारतीप्रमाणेंच वसतिगृहाची इमारत आरोग्यदृष्ट्या उत्कृष्ट असावी. आसपास दलदल असूं नये, गडबड—गोंगाटाचा त्रास असूं नये, धुळीचा उपद्रव होऊं नये, इमारतींत हवा आणि प्रकाश भरपूर असावा, पाण्याची व नैसर्गिक विधींची सोय चांगली असावी.

## वसतिगृहांतील सोयी

वसतिगृहांत पुढील सोयींची व्यवस्था प्रामुख्यानें व्हावयास पाहिजे. मुलांचें राहणें व झोंपणें; अभ्यास; स्नान, भोजन, फराळ इ.; व्यायाम; सामुदायिक जीवन.

मुलांना राहण्याकरितां व झोंपण्याकरितां स्वतंत्र खोल्या असणें अत्यंत अवश्य आहे. एकापेक्षां अधिक विद्यार्थी एका खोलींत झोंपण्याची व्यवस्था केल्यास किंवा सर्वच विद्यार्थ्यांनीं एकत्र झोंपण्याची मोठ्या दिवाणखान्यांत सोय केल्यास अनैतिक—अनैसर्गिक वर्तनाचा मोह मुलांना होतो असा वसतिगृह-व्यवस्थापकांचा ( आपल्याकडे आणि पाश्चिमात्य देशांतहि ) अनुभव आहे. त्या दृष्टीनें स्वतंत्र खोल्या अगदीं जरूर असाव्या. या खोल्या लहान असल्या तर त्यांची एकत्र अभ्यासाची कांहीं व्यवस्था मोठ्या दिवाणखान्यांत करतां येईल. स्नानाची व्यवस्था उघड्यावर न करतां छोटीं स्नानगृहें असावीं. भोजनाच्या वेळा ठरलेल्या असाव्या; मधल्या वेळच्या फराळाची सोयाहि करण्यांत यावी. भोजन, फराळ यांकरितां पदार्थ साधे असले तरी ते ताजे आणि शक्य तों सकस असावेत. व्यायामाची सोय शाळेच्या क्रीडांगणावर किंवा तालीमखान्यांत होईलच. पण थोडी सोय वसतिगृहांतहि असावी. वसतिगृहांतील सामुदायिक जीवन फार मोलाचें असतें. सर्व भेद विसरून एका कुटुंबांतल्या माणसांप्रमाणें एका वसतिगृहाचे घटक म्हणून राहावयाचें, एकमेकांशीं सहकार्यानें, बंधुभावानें वागावयाचें, अडीअडचणीला एकमेकांच्या मदतीस धांवावयाचें – हें शिक्षण भावी आयुष्याच्या दृष्टीनें फार उपयुक्त होतें. एकत्र अभ्यास, एकत्र खेळ, एकत्र सहली, एकत्र भोजन, एकत्र प्रार्थना– इत्यादींमुळें हें सामुदायिक जीवन मोठें आनंदाचें होतें. वसतिगृहांतील रम्य आठवणी पुढील आयुष्यांत याव्या, त्या वेळीं जमलेले स्नेह चिरकाल टिकावे यांतच वसतिगृहांतील जीवनाची सार्थकता, यशस्विता असते.

## अन्तर्गत व्यवस्था

वसतिगृहांतील अन्तर्गत व्यवस्था दोन तऱ्हांनीं करतां येते. एक म्हणजे वसतिगृहाकरितां जे व्यवस्थापक नेमण्यांत आले असतील त्यांनीं दर महिन्याला खर्चाकरितां ठराविक रक्कम प्रत्येक विद्यार्थ्याकडून घ्यावयाची; आणि आचारी नेमून त्यांच्या भोजनाची, गडी नेमून स्नानाची, खोल्या स्वच्छ ठेवण्यासंबंधींची वगैरे सर्व व्यवस्था पहावयाची. या व्यवस्थेनें विद्यार्थ्यांचा वेळ वांचतो हें खरें असलें तरी स्वयंशिक्षण, स्वावलंबन या दृष्टीनें ही व्यवस्था आदर्श नाहीं. त्यापेक्षां विद्यार्थ्यांनीं व्यवस्थापकांच्या सल्ल्यानें आचारी व गडी नेमावयाचे, स्वतः पाळीपाळीनें बाजारहाट करावयाचा, हिशेब ठेवावयाचे, स्वतःच्या खोल्यांच्या

स्वच्छतेकडे पहावयाचें. महिनाअखेर सर्व खर्च पाहून प्रत्येक विद्यार्थ्याकडून त्या खर्चाच्या प्रमाणांत पैसे वसूल करून घ्यावयाचे,—यांत विद्यार्थ्यांना मौलिक शिक्षण मिळतें, व भावी आयुष्यांत तो अनुभव फार उपयोगी पडतो. शिवाय काटकसरीची संवय लागते, आणि वसति-गृहाबद्दल भाडोत्री व्यवहाराची भावना निर्माण न होतां आत्मीयतेची भावना वाटूं लागते. चारित्र्य-विकसनाच्या दृष्टीनें ही व्यवस्था चांगली.

।

**व्यवस्थापक**

अर्थात् मार्गदर्शन करण्यास, देखरेख ठेवण्यास, आणि जरूर पडली तर नियंत्रणास व्यवस्थापक हवेतच. हे व्यवस्थापक केवळ तेवढ्या कामाकरितांच न नेमतां शाळेंतील एखाद्या अनुभवी, पोक्त, समंजस शिक्षकांकडे हें काम द्यावें. या शिक्षकांना विद्यार्थ्यांविषयीं जिव्हाळा वाटला पाहिजे, त्यांच्या पालकांच्या ठिकाणींच आपण आहोंत या भावनेनें त्यांनीं काम केलें पाहिजे. त्यांनीं वसतिगृहाजवळच सहकुटुंब राहावें; वसतिगृहांतील भोजनव्यवस्था, मुलांचें आरोग्य, मुलांचा अभ्यास, मुलांचे खेळ—यांकडे जातीनें लक्ष द्यावें; आणि विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवून त्यांना मार्गदर्शन करावें. या सर्व कामा-करितां त्यांना कांहीं जादा मुशाहिरा मिळणें न्याय्य आहे.

● ● ●

# : २१ : नव्या प्रवृत्ति आणि नवे प्रवाह

मानवी समाजाच्या भवितव्याबद्दल सतत चिंता बाळगणाऱ्यांनीं नव्या पिढीवरच्च आपली आशा केंद्रित केली आहे, आणि बालकांच्या नैसर्गिक प्रवृत्तीला उच्च नैतिक वळण कसें मिळेल याचा सदैव विचार केला आहे. रूसो, पेस्टॉलॉझी, फ्रोबेल, मॉंटेसरी, हर्बार्ट, डयूई आणि गांधीजी – या सर्वांच्या शैक्षणिक विचारांचा उगम जीवनाच्या व्यापक तत्त्वज्ञानांत आहे. त्यांतूनच बालोद्यानपद्धति, ऐंद्रिय शिक्षणपद्धति, बालकमंदिर, योजना-संयोजन पद्धति व मूलोद्योगी शिक्षणपद्धति अशा विविध पद्धति निर्माण झाल्या आहेत.

पण याशिवाय ज्ञात-अज्ञात, सुधारक व प्रयोगशील संशोधक अनेक आहेत. शालेय व्यवस्था, परीक्षा, अभ्यासयोजना, शिस्त इ. अनेक अंगोपांगांसंबंधीं योजना आंखून नवीन निष्कर्ष त्यांनीं काढले आहेत. त्यांतील प्रमुख विचारांचा येथें परामर्श घेण्याचें योजिलें आहे.

## बालोद्यान पद्धति

### प्रास्ताविक

बालकांचें व्यक्तित्व ही एक आदरणीय वस्तु आहे; आणि तिचा विकास कांहीं आन्तरिक नियमांनीं होतो; तसेंच कृतिद्वारांच बालकांच्या विचार-शक्तीचाहि विकास होतो; ही विचारसरणी जर्मनींत अठराव्या शतकांत चांगलें मूळ धरूं लागली होती. पेस्टॉलॉझी या प्रसिद्ध जर्मन शिक्षणशास्त्रज्ञानें त्या दृष्टीनें स्वतंत्र शाळाहि काढल्या होत्या. या विचारसरणीला फ्रोबेल या शिक्षणतज्ज्ञानें मूर्त स्वरूप दिलें व नवीन विचाराची जोडहि दिली. इ. स. १८३७ मध्यें त्यानें स्वतःची अशी एक 'किंडरगार्टन' ( बालकांचें उद्यान ) शाळा स्थापन करून स्वतःच्या कल्पना आचारांत उतराविण्यास आरंभ केला. तीन ते सहा वर्षांच्या बालकांच्या शिक्षणासाठीं त्याची ही योजना होती.

### मूलतत्त्वें

प्रत्येक बालक म्हणजे एक लहानसें बीज. बीजाला अंकुर फुटून त्याचें रोप व्हावयाचें, व त्याचें रूपान्तर फुलांफळांनीं बहरलेल्या वृक्षांत व्हावयाचें – ही सारी निसर्गाची योजना आहे. तें सारें सामर्थ्य बीजांतच असतें. तद्वतच, बालकांच्या ठिकाणीं असलेल्या गुप्त, दैवी सामर्थ्याचा आविष्कार शिक्षणानें व्हावा. शिक्षकाचें कार्य फुलझाडाची व चिमुकल्या कळ्यांची जोपासना करणाऱ्या, संरक्षण करणाऱ्या, योग्य खतपाणी पुरविणाऱ्या माळ्याचें. बालकाच्या ठिकाणीं उपजतच चैतन्यशक्ति असते. विविध क्रिया, हालचाली, खेळ यांच्या द्वारां ती प्रकट होत असते. त्या खेळाला सुव्यवस्थित रूप देऊन त्यांतूनच बालकांचा विकास घडवून आणतां येईल. हात, पाय, डोळे इत्यादि कर्मेंद्रियांच्या द्वारां बालकांची ही धडपड चाललेली दिसते. या कर्मेंद्रियांना योग्य काम द्यावयाचें. त्यांतून त्यांचीं ज्ञानेंद्रियें व ज्ञानकेंद्रें सुदृढ होऊं लागतात. हातांनीं काम करतांना विचारशक्ति, तर्कशक्ति, निर्णयशक्ति हीं जागृत होतात. बालकांची सतत हालचाल म्हणजे त्यांचे खेळ म्हणून तालबद्ध खेळ, तालबद्ध गाणीं यांच्या द्वारां बालकांचा ऐंद्रिय विकास साधण्याकडे फ्रोबेलनें लक्ष दिलें.

### पद्धत

बालोद्यानपद्धतींत वर्गपद्धतींचा त्याग केलेला नाहीं. मात्र जुन्या कंटाळवाण्या पद्धतीचें स्वरूप पालटलें आहे. निरानिराळ्या आकारांचे ठोकळे, रंगीत मणी, व चेंडू इत्यादि क्रमाक्रमानें हाताळावयाचें साहित्य अथवा 'देणग्या' बालकांना दिल्या जातात. शिक्षिकेच्या सांगण्याप्रमाणें व अनुकरणानें मुलें कृति करतात. पण बालकांना ज्या कृति, जे खेळ मनापासून आवडतात, त्यांचाच अवलंब शिक्षिकेनें करावयाचा असतो. बालकांना प्रत्यक्ष न शिकवितां, किंवा माहिती न देतां, सहजस्फूर्त हालचालींतून व खेळकर, सहानुभूतिपूर्ण प्रेमळ वातावरणांतून वेगवेगळ्या सद्गुणांची कल्पना बालकांना येऊं शकते, व त्यांचें चारित्र्य बनतें,–असें फ्रोबेलचें म्हणणें होतें. चारित्र्याची बैठक बौद्धिक ज्ञान नसून, स्वयंप्रेरित वा ऐच्छिक क्रिया व भावनामय जीवन हेंच आहे, असें त्याचें मत असल्यानें समाजाची छोटी प्रतिकृति शाळेंत निर्मिण्याचा त्यानें यत्न केला.

## मॉंटेसरी पद्धति–बालकमंदिरें

### आरंभ व विकास

तीन ते सहा वर्षांच्या बालकांना शिक्षण देण्याच्या ज्या विविध पद्धति पुढें आलेल्या आहेत त्यांत मॉंटेसरी पद्धतीचें स्थान स्वयंपूर्ण आहे. डॉ. मारिया मॉंटेसरी यांची जवळ जवळ चार तपांची दीर्घ तपस्या त्या पद्धतीमागें आहे. बालकांचें इतकें सूक्ष्म व मूलग्राही निरीक्षण करून त्यांच्या शरीर-मन-बुद्धीच्या विकासाचे मार्ग निश्चित करण्याचे इतर प्रयत्न क्वचितच झाले असतील. फ्रान्समध्यें होऊन गेलेल्या इटार्ड ( १७७५–१८३१ ) व सेग्विन ( १८१२–१८८० ) या दोन शास्त्रज्ञांचे प्रयोग व पद्धति अभ्यासून मॉंटेसरींनीं आपली पद्धति अस्तित्वांत आणली. बुद्धिमंद, पंगु व वेडसर बालकांच्या बाबतींत शारीरिक व बौद्धिक सुधारणा घडवून आणण्यास जी पद्धति उपयोगी पडते असें अनुभवानें सिद्ध झालें, ती सामान्य वा अविकृत मुलांच्या बाबतींत खासच उपयोगीं पडेल, अशा विश्वासानें त्यांनीं इटलींत रोममधील सॅन लॉरेन्झो विभागांत १९०७ च्या जानेवारींत पाहिलें 'बालकमंदिर' उघडलें; व ३५–४० वर्षांच्या आपल्या प्रयोगाचें व निरीक्षणाचें सार व स्पष्टीकरण 'डिस्कव्हरी ऑफ द चाइल्ड' ( बालकाचा शोध अथवा मॉंटेसरी पद्धति ), 'बालपणाचें रहस्य' ( द सीक्रेट ऑफ चाइल्डहुड ) व 'उद्यांच्या जगासाठीं शिक्षण' इत्यादि पुस्तकांतून जगापुढें मांडलें. भारतांत मद्रास राज्यांतील अड्यार येथें मॉंटेसरी अध्यापन-पद्धतीचें एक केंद्र आहे.

### दृष्टिकोण

बालकांच्या विकासाबाबत मॉंटेसरी यांचा कांहीं निश्चित दृष्टिकोण आहे. प्रत्येक बालकाचा विकास अगदीं स्वतंत्रपणें होतो, आणि त्या विकासाची दिशा व नियम प्रत्येक बालकाच्या आन्तरिक चैतन्यशक्तीच्या गरजेंतून निश्चित होतात. तेव्हां सर्वांना समान व एकत्र अशी शिक्षण-पद्धति म्हणजे त्यांच्या व्यक्तित्वाचा केवळ कोंडमाराच नव्हे तर निश्चितपणें हानि होय, असें त्या मानीत.

### ऐंद्रिय शिक्षण आणि आत्मविकास

मॉंटेसरी प्रत्येक बालकाकडे व त्याच्या स्वाभाविक प्रवृत्तींकडे असीम पावित्र्याच्या भावनेनें पहात. प्रत्येक बालकाचें स्वतंत्र जीवितकार्य आहे,

प्रत्येक बालक इतर प्राण्याप्रमाणें स्वतःच्या जगण्याच्या हक्कासाठीं झगडत असतें; त्याच्या अन्तःकरणांतील गूढ ऊर्मीच्या द्वारां प्रकट होणाऱ्या निसर्गाच्या आदेशाचें तें पालन करूं इच्छितें, आणि त्याच्या आड येणारा-विरुद्ध बंड करीत असतें.

तीन ते सहा वर्षांच्या वयोमर्यादेंत बालकाची स्वतःच्या स्नायूंवर प्रभुत्व मिळविण्याची धडपड असते. मज्जातंतु व त्यांतील ज्ञानमार्ग अजून विकसित झालेले नसतात, आणि नीतिविषयक बऱ्या-वाईट विचारांचा गंधाहि असूं शकत नाहीं. बालकाचा परिसराशीं संबंध येतो तो इंद्रियद्वारांच, म्हणून इंद्रिय-शिक्षणाला प्राधान्य द्यावयास हवें. त्यासाठीं विविध साधनांचे व्यवसाय त्यांना दिले जातात.

इंद्रियांना खरें शिक्षण मिळतें तें व्यवसायांच्या पुनरावृत्तींतून. वस्तूंचा रंग, आकार किंवा विविध गुणधर्म यांचें ज्ञान व्हावें असा त्यांचा हेतुच नसतो. तर अवधान, तुलना आणि निर्णय यांच्या द्वारां इन्द्रियांची तीव्रता वाढावी अशीच अपेक्षा असते. हे व्यवसाय म्हणजे त्यांच्या बुद्धीला खरा व्यायाम होय.

ही बौद्धिक कसरत मन आणि बाह्य इंद्रियांच्या पुरतीच मर्यादित नाहींत, तर त्यांतून कल्पनांचें साहचर्य निर्माण होतें; निश्चित ज्ञानांतून विवेकशक्ति जागृत होते; बुद्धीचा प्रमाणबद्ध विकास होतो; आणि अखेरीस एखादें फळ आंतून परिपक्व व्हावें त्याप्रमाणें स्वाभाविक परिपाकाच्या प्राक्-येनें लेखन-वाचनाच्या सामर्थ्याचा मनांत आपोआप उदय होतो.

मॉंटेसरी यांची विचारसरणी व्यक्तिवादी असली तरी सामुदायिक जीवनाचें व वातावरणाचें महत्त्व त्या मान्य करतात. समाजांत वावरतांना जी शिस्त, जी नैतिक वृत्ति बालकांच्या ठिकाणीं पाहिजे, त्या शिस्तीचा व नैतिक सद्गुणांचा उदय व विकास हा कार्यमग्न असतांना अंतरंगांतूनच होतो असें त्यांचें म्हणणें. बालकांच्या इच्छाशक्तीच्या व आज्ञापालनवृत्तीच्या वाढीस व्यवसायच साह्यभूत होतात. आपले व्यवसाय वरचेवर करून त्यांच्या ठिकाणीं चिकाटी व धीरवृत्ति येते. दुसऱ्याचा हेवा न करणें, त्यांच्या आनंदांत आनंद मानणें, इतरांच्या इच्छेला मान देणें,—या गोष्टी विशिष्ट वातावरणामुळें व

कार्यपद्धतीमुळें त्यांच्या अंगीं बाणतात. सौजन्य, आनंदीपणा व शान्ति हीं त्यांच्या जीवनांत आढळतात. आणि ही नैतिक उच्चता आपण मिळाविल्याची जाणीवहि या वयांत नसल्यानें तीं खऱ्या अर्थानें सद्‌गुणी बनतात.

**कार्यपद्धति**

बालकमंदिराचें वातावरण प्रसन्न व सुंदर असतें. प्रत्येक बालकाला इच्छेनुसार घेतां येईल अशीं व्यवसायाचीं विविध ऐंद्रियबोधाचीं साधनें तेथें असतात. आपली टेबल–खुर्ची आपण मांडून घ्यावयाची, व्यवसायाचें साहित्य आणावयाचें व त्यांत स्वतःला गुंतवून घ्यावयाचें; शिक्षिका फक्त मार्गदर्शनाचें कार्य करते, किंवा व्यत्यय निर्माण करणाऱ्या बालकाला अलग करते. तिचें लक्ष सर्वांवर असतें; व त्यांच्या प्रगतीची नोंद ती ठेवीत असते. मधल्या वेळच्या उपाहाराची व्यवस्थादेखील बालकेंच करतात. त्यांची शिस्त, जबाबदारीची जाणीव हीं मोठीं वाखाणण्यासारखीं असतात.

बालकांना सहजस्फूर्त व्यवसायाचें स्वातंत्र्य हा या पद्धतीचा प्राण आहे. तसेंच बालकांना स्वावलंबी व सहकार्य-प्रेमी बनविण्यावर तिचा कटाक्ष आहे. बालकांचें आरोग्य, निकोप मन, निकोप शरीर – यांचें संरक्षण व विकास हें या पद्धतीचें प्रधान उद्दिष्ट असल्यानें त्यांना पूरक असेंच सारें वातावरण व पद्धति अवलंबिण्यांत येतात. क्रियाशीलता हा बालकांचा स्वभाव लक्षांत घेऊन त्यासाठीं त्यांना भरपूर संधि देऊन त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत करावयाचा हें मुख्य तत्त्व आहे. त्यांतून उच्चतम सात्त्विक आनंदाची प्रतीति त्यांना येते.

**समारोप**

ही पद्धति प्रामुख्यानें गरीब मजुरांच्या मुलांसाठीं व निराश्रित अर्भकांसाठीं म्हणून अस्तित्वांत आली. पण आपल्या देशांत ती उच्चवर्गीयांचीच आरंभीं मिरासदारी बनली. आपल्या परिस्थितीनुसार तिच्यांत फेरबदल करून ती सर्वांना उपलब्ध होईल अशी तिची रचना करण्याचें कार्य गुजरायेंत श्री. गिजुभाई व मुंबईंत श्री. ताराबाई मोडक यांनीं केलें आहे. 'बालवाडी' हें नवें नांव 'बालकमंदिरा' ऐवजीं त्यांनीं घेतलें आहे.

## संयोजन-पद्धति ( प्रोजेक्ट मेथड )

शिक्षणांत बालकाला प्राधान्य द्यावयाचें, या विचारसरणींतून अमेरिकेंत शैक्षणिक सुधारणेला एक नवीनच दिशा लागली. बालकाला प्राधान्य याचा अर्थ बालकाच्या प्रवृत्ति, नैसर्गिक प्रेरणा यांना प्राधान्य, व त्याच्या अनुरोधानें अभ्यासक्रमाची मांडणी. त्यांतहि 'क्रियाद्वारां शिक्षण' हें मानसशास्त्रीय तत्त्व शिक्षणतज्ज्ञांनीं मान्य केल्यानंतर अभ्यासक्रमाची पुनर्मांडणी होणें अटळ होतें. डॉ. किल्पॅट्रिक यांनीं पुरस्कारलेल्या या पद्धतीला संयोजनपद्धति – प्रोजेक्ट मेथड – असें नांव मिळालें आहे.

'संयोजन' अथवा प्रोजेक्ट याचा अर्थ बालकांना ज्याची गरज वाटेल, जिला कांहीं विशिष्ट प्रयोजन वा हेतु आहे अशी एखादी कार्य-योजना. बालकांनीं ती अंगावर घेऊन सर्वस्वीं सामाजिक वातावरणांत, नैसर्गिक रीतीनें ती पार पाडावयाची. ही कार्ययोजना जीवनांतील नित्याच्या उद्योगाबद्दल अथवा व्यवसायाबद्दलच असावी. आणि अशा रीतीनें घर व सामाजिक जीवन यांपासून शाळेनें आपलें जीवन अलग न करतां शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृतिच व्हावी. या निवडलेल्या व्यवसायांतून शक्य तेवढ्या विषयांचें बौद्धिक, तांत्रिक, सांस्कृतिक शिक्षण सहजगत्या द्यावयाचें. त्यामुळें ज्ञान भारभूत होत नाहीं, व तें कृत्रिमहि वाटत नाहीं.

उदाहरणार्थ, एखादें कारंजें बांधणें, एखादें दुकान चालविणें, कांहीं सुंदर वस्तु बनविणें, एखादें जहाज कसें चालतें तें समजावून घेणें, यांतील कोणतेंहि काम करावयाचें झालें तर त्याच्या तपशीलवार योजना आंखाव्या लागतील. कोणत्या वस्तु घ्याव्या लागतील, किती प्रमाणांत, त्या कोठें मिळतील, जगांत त्या कोठें निर्माण होतात, तसे नमुने कोठें आहेत, इत्यादि प्रश्न पावलोपावलीं निर्माण होतील, निर्माण करावे लागतील; आणि त्यांचीं उत्तरें मिळाल्यावांचून योजना फलद्रूप व्हावयाची नाहीं. हीं उत्तरें मिळवावयाचीं म्हणजे इतिहास, भूगोल, गणित, चित्रकला आणि प्रत्यक्ष जीवनव्यवहार – या सर्वांचें कमीअधिक ज्ञान मिळवावें लागेल. अशा रीतीनें विद्यार्थ्यांना मिळणारें ज्ञान 'सार्थ' वाटूं लागेल. प्रत्यक्ष हातानें तें काम विद्यार्थी करतील, आणि त्यांतून त्यांच्या विचाराला खाद्य मिळेल. परस्पर सहकार्यानें काम कसें करावयाचें याचें अनुभवानें शिक्षण मिळेल. पार पाडलेल्या कामानें नवीन कार्याला प्रोत्साहन मिळेल.

कोणता व्यवसाय वा योजना निवडावयाची हें ठरविण्याचें स्वातंत्र्य बालकांनाच असणार; कारण त्यांच्या गरजेंतून ती निर्माण होणार. योजनेचा तपशील आंखतांना दूरदृष्टि, तर्कशक्ति, निर्णयशक्ति इ. अनेक मानसिक शक्तींचा विकास सहजच होतो. एक मोठी योजना हातीं घेतली तरी तिचे लहान लहान भाग पडतात. ते सहकार्यानें पार पाडावे लागतात. योजना पुरी होईपर्यंत चिकाटीनें प्रयत्न करावा लागतो, व मागाहून तिच्या गुणदोषांची चर्चा करून आत्मनिरीक्षणाची संवय लावतां येते. 'अभ्यास कां करावा ?' 'कां शिकावें ?' यांचीं उत्तरें या प्रयत्नाला लागणारी प्रचोदना गरजेंतूनच निर्माण होऊन मिळाल्यानें शिकण्याचें काम सोपें होतें.

या पद्धतीनें सर्व विषय व्यवस्थित कसे शिकवतां येतील अशी शंका घेतली जाते. या पद्धतीनें विषय शिकवावयाचे म्हणजे वेळापत्रकें, वर्ग इत्यादि जुन्या कल्पना प्रथम सोडाव्या लागतील; शाळा हें व्यवसाय-केंद्रांचें माहेरघर बनवावें लागेल. पण तसें झाल्यानेंच शिक्षणांत उत्साह, चेतना, जिवंतपणा येईल असें या पद्धतीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे.

रूसो, फ्रोबेल, मॉंटेसरी इत्यादि विचारवंतांनीं केलेल्या विचारांचीच ही एक परिणति आहे. जॉन डयूई या शिक्षणशास्त्र्यानें व तत्त्वज्ञान्यानें शाळेला समाजाच्या सन्निध आणण्याच्या आपल्या कल्पनेला मूर्तस्वरूप देण्याचा प्रयत्न करून ही पद्धति विकसित करण्याचा पुष्कळच प्रयत्न केला. अखेर बालकाला समाजाचा एक कार्यक्षम व स्वावलंबी, स्वतंत्र विचाराचा, व सहकार्यप्रवण घटक बनवावयाचा असल्यानें त्याला पोषक असेंच शिक्षण हवें. सर्वच शिक्षण समाजाभिमुख असावें, आणि सामाजिक सद्गुणांची जोपासना सामाजिक वातावरणांत प्रत्यक्ष अनुभवानें व्हावी, यावर या पद्धतीचा सारा कटाक्ष आहे. अनेक मानसशास्त्रीय सिद्धान्तांवर तिची उभारणी असल्यानें वेगवेगळ्या स्वरूपांत हिचा स्वीकार अनेकांनीं केला आहे.

## गेरी योजना

शाळेची इमारत केवढी असावी ? तिचा उपयोग किती वेळ व्हावा ? कोणाकोणाला इमारतीचा वापर करतां यावा ? हे प्रश्न साधे असले तरी आर्थिक दृष्ट्याच नव्हे तर सामाजिक जीवनाच्या दृष्टीनें त्यांना महत्त्व आहे.

अमेरिकेंतील वर्ट नांवाच्या एक प्रमुख शाळाचालकाच्या डोक्यांत याबाबत प्रयोग करून पाहण्याचें आलें. प्रत्येक इयत्तेला व वर्गाला टराविकच खोली– जागा दिली पाहिजे या दंडकाविरुद्ध त्याचें मन बंड करूं लागलें. आणि म्हणून 'गेरी' या गांवीं या नव्या कल्पनेचा प्रयोग करण्यांत आला.

शाळेला खरोखरी जेवढ्या खोल्यांची वर्गांच्या संख्येनुसार गरज होती, त्याच्या निम्म्याइतक्याच खोल्या बांधण्यांत आल्या. त्याला जोडून एक सभागृह व सुसज्ज क्रीडांगण निर्माण करण्यांत आलें. खोल्यांचा उपयोग वर्गांनीं आळीपाळीनें करावयाचा, कांहीं वर्ग अभ्यासाच्या खोल्यांतून, कांहीं क्रीडांगणावर, व कांहीं सामुदायिक कार्यक्रमासाठीं सभागृहांत, अशी व्यवस्था करण्यांत आली. सायंकाळच्या वेळीं गांवकऱ्यांना शाळेच्या इमारतीचा उपयोग करावयास मिळे.

वेळापत्रक, शाळेच्या वेळा, क्रीडांगणावरील कार्याची आंखणी इत्यादि गोष्टी तपशिलाच्या असल्यानें त्यांचा येथें विचार करण्याचें कारण नाहीं. पण या योजनेचे कांहीं निश्चित फायदे आहेत ते दृष्टिआड करतां येणार नाहींत. ते फायदे असे:

१. इमारतीवर अवास्तव खर्च करण्याचें टाळतां येतें.

२. इमारतीचा जास्तींत जास्त फायदा घेतां येतो. एकाच इमारतींत सकाळीं प्राथमिक शाळा, दुपारीं माध्यमिक शाळा, रात्रीं समाजशिक्षणाचे वर्ग घेतां येतील.

३. क्रीडांगणावर व मोकळ्या हवेंत निश्चित वेळ घालविण्याच्या योजना आंखतां येतील.

४. जनतेचें सहकार्य मिळवून ही 'लोक-शाळा' आहे अशी भावना निर्माण करतां येईल.

५. समाज-शिक्षणाच्या कार्याला त्यांतून निश्चित वळण मिळेल.

## डाल्टन योजना

समान वयाचीं व सामान्यतः सरासरीनें समान पात्रता असणारीं मुलें एकत्र करावयाचीं, व त्यांचा 'वर्ग' बनवून त्यांना एका ठिकाणीं विषय समजावून द्यावयाचे, हें वर्गपद्धतीचें तत्त्व आहे. शिक्षकाचे श्रम, वेळ आणि साधन-

सामुग्री यांचा मितव्यय यांत साधतो, व कांहीं अंशीं सामुदायिक जीवन कसें जगावें याचें ज्ञानहि विद्यार्थ्यांना होतें. हे या पद्धतीचे लाभ असले, तरी या पद्धतीच्या मुळाशीं असलेलीं गृहीत कृत्यें मानसशास्त्रदृष्ट्या समर्थनीय नाहींत. वर्गांतील सर्व विद्यार्थ्यांची आकलनशक्ति आणि धारणशक्ति, विकासाची दिशा आणि प्रगतीचा वेग सारखाच असत नाहीं. हुशार विद्यार्थ्यांची कुचंबणा व मागें पडलेल्यांची कुतरओढ हे दोन प्रमुख दोष या पद्धतींत आहेत. शिवाय वर्गाची 'सरासरी बुद्धिमत्ता' अशी कांहीं तरी काल्पनिक गोष्ट घेऊन शिक्षक चालत असतात.

हे दोष टाळावेत, विद्यार्थ्यांना आपल्या आवडत्या विषयांत वेगानें प्रगति करतां यावी, आणि कच्च्या विषयाकडे अधिक लक्ष देतां यावें, तसेंच स्वावलंबनानें त्यांना काम करण्याची संवय लागावी — यासाठीं 'डाल्टन योजना' ही एक पद्धति कांहीं ठिकाणीं अवलंबिली जाते.

या नवीन योजनेची कल्पना प्रथम हेलेन पार्खर्स्ट या अमेरिकन शिक्षिकेला सुचली. डाल्टन या गांवीं तिचे प्रयोग करण्यांत येऊन तींत पुढें सुधारणा करण्यांत आल्या. इंग्लंडमधील कांहीं शाळांनीं ही पद्धति स्वीकारली आहे.

## पद्धतीचें स्वरूप

या पद्धतींत शाळेंत इयत्तांच्या अनुक्रमानें वर्गाच्या खोल्या असत नाहींत; अर्थात् वेळापत्रकहि नाहीं. त्याऐवजीं इतिहास, भूगोल, शास्त्र, अशा प्रत्येक विभागाची स्वतंत्र खोली असते. त्या त्या विषयाला लागणारीं पुस्तकें, नकाशे, आणि इतर वस्तु त्या त्या खोलींत असतात. त्यांना 'प्रयोगालय' —लॅबोरेटरी असें म्हणतात. कोणत्या वेळीं कोणत्या विषयाचा अभ्यास करावयाचा यावाबत निर्बंध नसतात. आपल्याला हवें असेल त्या वर्गांत जाऊन त्या विषयाचा अभ्यास करण्याचें विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य असतें. सबंध वर्षांत किती अभ्यास विद्यार्थ्यांनीं संपवावयाचा याचा आराखडा आधीं तयार केलेला असतो. त्याचे महिन्यावारी व आठवड्यावारी क्रमशः विभाग पाडलेले असतात. प्रत्येक आठवड्यासाठीं किंवा विषयानुरूप जो तुकडा निश्चित केला असेल त्यावर 'स्वाध्याय' दिले जातात. विद्यार्थ्यांनीं कोठें, काय, किती वाचावयाचें, कोणत्या साधनांचा किती उपयोग करावयाचा

याच्या तपशीलवार सूचना त्यांना दिल्या जातात. पाठ्य-पुस्तकें, संदर्भग्रंथ, कोश, आकृत्यांचे तक्ते,–इत्यादींच्या साह्यानें विद्यार्थ्यांनीं 'स्वाध्याय'–प्रश्न लिहून काढावयाचे; अडचणींच्या वेळीं 'मार्गदर्शक' शिक्षकांचें साहाय्य घ्यावें. विद्यार्थ्यांचे स्वाध्याय तपासून त्यांच्या प्रगतीची नोंद आलेखरूपानें शिक्षक ठेवतात. एक स्वाध्याय-गट समाधानकारक रीतीनें पुरा केल्याशिवाय पुढचा स्वाध्याय दिला जात काहीं. विषयतज्ज्ञ स्वाध्याय तयार करतात, आणि विद्यार्थी 'प्रतिज्ञालेखा'वर सही करून स्वाध्याय-गट अभ्यासासाठीं उचलतात. परस्पर सहकार्यानें, स्वावलंबनानें व आत्मविश्वासानें काम करण्याची संवय त्यांच्या अंगीं यामुळें बाणते, व नैतिक सामर्थ्यहि वाढीस लागतें.

साधारण प्रौढ अशा विद्यार्थ्यांना ही पद्धति केव्हांहि इष्टच ठरेल. पण त्यासाठीं मुबलक जागा; मुबलक सामुग्री, ग्रंथभांडार; तज्ज्ञ शिक्षक, व कौशल्य-पूर्ण योजना यांची आवश्यकता आहे. लेखी कामावर तींत अधिक भर आहे हें खरें; पण त्याला पूरक अशा सामूहिक वर्गपद्धतींची जोड देऊन तो दोष टाळण्यांत येतो.

डाल्टन पद्धति ही शाळेच्या मांडणीची विशिष्ट पद्धति आहे. तिचा मुख्य गाभा – प्रत्येक विद्यार्थ्याला विकासाचें स्वातंत्र्य कसें देतां येईल हा आहे. स्वावलंबन, चिकाटी, जबाबदारी, आणि स्वाभिमान इ. गुण व संवयी यांची जोपासना त्यांतून होते, खरीखुरी प्रगति व अध्ययन केल्याचा आनंद विद्यार्थ्यांना तींत लाभतो, हीं तिचीं वैशिष्ट्यें आहेत. सोयीप्रमाणें एखाद्या वर्गांत व विषयांत हा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. त्यासाठीं शिक्षक व पालक यांचें सहकार्य हवें,–आणि परीक्षेबाबतचा दृष्टिकोण बदलला पाहिजे.

## मूलोद्योगी शिक्षण अथवा वर्धा-योजना

भारतांत नवसमाज निर्माण करण्याच्या हेतूनें भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर आला असतांना या योजनेचा जन्म झाला.

इंग्रजी राजवटींत सुरू असलेली केवळ अध्यापनपद्धतिच नव्हे तर सर्वच शिक्षणपद्धति अत्यंत सदोष होती. ध्येयशून्यता हा तिचा महत्त्वाचा दोष. बोलून चालून परकीय राज्यकर्त्यांनीं राज्ययंत्र चालविण्याला उपयोगी पडतील

असे मूठभर कारकून तयार करण्याच्या इराद्यानें ती येथें सुरू केली होती. अशी पद्धति राष्ट्राभिमुख व स्वसमाजाभिमुख असणें शक्यच नव्हतें. तिला 'जीवनसंपर्क'च नव्हता. शिक्षण जीवनासाठीं आहे. त्यांच्यांत कांहीं निकट संबंध आहे अशी जाणीव नव्हती. सारा भर पुस्तकी ज्ञानावर, पाढिकतेवर. पुस्तकी ज्ञान म्हणजे सुशिक्षितपणा, आणि उच्च वाङ्मय-शास्त्रादींचें अध्ययन म्हणजे सारी सुसंस्कृतता अशी या नवाशिक्षितांची दृष्टि झाली. हस्तव्यवसायाची कोणतीच कला त्यांस अवगत नसे, इतकेंच नव्हे तर स्वतः काम करणें, शरीरकष्ट करणें म्हणजे कमीपणा अशी विकृतता त्यांच्यांत आली. स्वाभाविकच शरीरश्रमाची प्रतिष्ठा लोपली. शहरांतून व खेड्यापाड्यांतून कसेबसे जीव धरून असलेले असंख्य उद्योगधंदे लोप पावूं लागले. या शिक्षणपद्धतीत धड ना विचारशक्तीची वाढ, ना हाताच्या कौशल्याचा विकास. ना शरीराच्या सामर्थ्याचा विचार, ना हृदयधर्माचें पोषण. स्वभाषा, स्वदेश, आणि स्वधर्म यांपासून दूर अशा या पद्धतीनें सर्वत्र औदासीन्याची कळा आली. राजकीय गुलामगिरीला वैचारिक गुलामगिरीची जोड मिळाली. ज्याच्यांत स्वतंत्र विचाराचें सामर्थ्य होतें, त्यांना या 'वाघिणीच्या दुधां'तून नवजीवनाची दृष्टि आली हें खरें; पण बहुसंख्य 'साक्षर' 'मुकीं बिचारीं कुणी हका' या सदरांतच जमा होणारे होते. निष्क्रियता, स्वाभिमानशून्यता, पाढिकता आणि पोकळ अभिमान सर्वत्र फैलावणें आणि बालकांतील जिवंत मन, नवनिर्मितीची लालसा नष्ट करणें,—असा या शिक्षणपद्धतीचा परिणाम झाला. स्वातंत्र्याच्या आंदोलनाला सक्रिय सुरुवात होतांच हिच्याविरुद्ध प्रतिक्रिया सुरू झाली होती. पण विधायक स्वरूपांत जुन्या विचारप्रणालीची जागा घेणारी व प्रयोगानुकूल अशी विचारधारा इ. स. १९३७ मध्यें विचारवंतांसमोर गांधीजींनीं प्रथम मांडली.

वर्धा-शिक्षणाचें बाह्य स्वरूप अगदीं साधें आहे. तें असें:

(१) सर्व शिक्षण उद्योगाच्या द्वारें द्यावयाचें. त्यासाठीं मूलोद्योग शिकवावयाचा.

(२) बौद्धिक विषयांचें शिक्षण उद्योगाच्या अनुषंगानें द्यावयाचें.

(३) आणि या उद्योगांतून निर्माण झालेल्या वस्तु शाळेला स्वावलंबी बनविण्यासाठीं नसल्या तरी त्यांना बाजारांत योग्य किंमत येईल

अशा दर्जाच्या त्या असाव्यात. वर्धा-शिक्षण-योजनेप्रमाणें प्राथमिक शिक्षण सात वर्षेंपर्यंत सर्वांना सक्तीचें पण मोफत असावें, आणि त्यांत सर्वत्र मातृभाषेलाच प्राधान्य असावें अशी विचारसरणी आहे.

असंख्य खेड्यांनीं बनलेल्या व विपुल निसर्गसंपत्ति असलेल्या या देशांत साक्षरता, आणि बेकारी यांचा प्रश्न सोडविण्याच्या कामीं या योजनेचें खूपच साहाय्य होणार आहे, ही गोष्ट विचारवन्तांना पटली. पण हें तिचें अगदीं वरवरचें मूल्यमापन झालें. वर्धा-योजनेच्या मुळाशीं एक व्यापक व सुसंगत जीवनाविषयक तत्त्वज्ञान आहे, आणि शिक्षणाचें खंबीर व प्रयोगसिद्ध मानसशास्त्रहि आहे. प्रचलित जीवनमूल्यामध्यें आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची तिची बैठक असल्यानें ती खरी 'क्रान्तिकारी' योजना आहे. 'शान्ततेच्या मार्गानें घडवून आणावयाच्या सामाजिक क्रान्तीचें साधन' या शब्दांत गांधीजींनीं तिचें वर्णन केलें आहे.

शिक्षण हें जीवनाचें साधन आहे, जीवनांतील विविध अनुभवांची ओळख, ज्ञान, शिक्षणांतूनच मिळालें पाहिजे. उदरंभरणाला लागणारें कौशल्य, व्यक्ति व समाज यांच्या संबंधाचें ज्ञान, आपली समाज-घटक या नात्यानें असलेली जबाबदारी पेलण्याची पात्रता, सदाचरणाची संवय, धैर्य, इमान आणि निष्ठा यांवर आधारलेलें चारित्र्य – या सर्वांची प्राप्ति शिक्षणानें झाली पाहिजे. समाजांतील सर्व घटकांत प्रेमभाव व बंधुता, सौजन्य आणि सहृदयता हीं तत्त्वें बाणलीं पाहिजेत. थोडक्यांत, समाजाच्या हितासाठीं व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक विकास झाला पाहिजे. समाज-जीवनाची उभारणी सत्य, अहिंसा वा प्रेम, सेवा आणि श्रम या नैतिक मूल्यांवर झाली तरच आजच्या जगांत मानवाला भेडसावणारे प्रश्न सुटणार आहेत. तसें करावयास शरीर, बुद्धि व हृदय यांचा समतोल विकास व्हावयास पाहिजे.

खरें शिक्षण कृतीतून, अनुभवांतून, क्रिया करीत असतां निर्माण होणाऱ्या गरजांतून मिळतें. 'हात हें ज्ञानाचें, विचाराचें इंद्रिय आहे. तें बुद्धि आणि भावना यांना जागृत करणारें प्रभावी साधन आहे' हें स्टॅन्ले हॉल या पाश्चात् शिक्षणतज्ज्ञाचेंहि मत आहे. 'एखाद्या शारीरिक कलेच्या

शिक्षणानें मनुष्याचें शरीर सजीव व सतेज बनतें. ज्या विद्यार्थ्यांना आपण जड बुद्धीचे समजतों, त्यांची सुप्त असलेली बुद्धिशक्ति बहुधा या शरीराच्या अथवा हस्तव्यवसायाच्या शिक्षणानें जागृत होते – असें रवीन्द्रनाथांनीं प्रतिपादन केलें आहे. " व्यक्तींना राष्ट्रीय उद्योगधंद्यांचें शिक्षण अशा प्रकारें देण्यांत यावें कीं त्या त्या उद्योगधंद्याच्या माहितीबरोबरच सफल, समृद्ध, आणि सर्वांगपरिपूर्ण अशा जीवनाला आवश्यक असणाऱ्या सर्व विषयांचें ज्ञान त्याच वेळीं आणि त्याच उद्योगधंद्याच्या द्वारां विद्यार्थ्याला प्राप्त करून घेतां येईल इतकेंच नव्हे तर तें पचवून त्याच्या द्वारां आपली आकलनशक्ति व कौशल्याहि तो वाढवूं शकेल." ( कालेलकर )

वर्धा-शिक्षण-योजनेंत पुस्तक हें शिक्षणाचें माध्यम नसून ' उद्योग ' हें माध्यम आहे. पुस्तकी ज्ञानावरचा भर काढून तो कृतीवर, कौशल्य व ज्ञानपूर्वक कृतीवर दिला आहे. वर्धा-शिक्षण-योजनेचा अभ्यासक्रम हा उद्योगकेंद्रित असला तरी त्या उद्योगाचा आणि दैनंदिन जीवनांतलि कार्यक्रमाचा संबंध ओळखून, शारीरिक आरोग्य, भाषाज्ञान, गणित, समाजपरिचय, व सामान्य ज्ञान या द्वारां गांव, समाज, राष्ट्र व मानव यांचा इतिहास भूगोल व विज्ञान या सर्वांची सुसूत्र सांगड त्यांत घातली आहे. सन–समारंभाच्या निमित्तानें सांस्कृतिक शिक्षणाची योजना केली आहे आणि शालेय व्यवस्थेंत ' स्वयं-शासनाचा ' अथवा ' स्व-राज्या 'चा उपक्रम करून जबाबदारीच्या, नेतृत्वाच्या व नैतिक विकासाच्या शिक्षणाची तरतूद केली आहे. या विविध विषयांची सांगड घालण्यासाठीं ' समवाय ' वा ' अनुबंध ', उद्योगांतील एखादा उपक्रम वा प्रक्रिया आणि त्यांच्याशीं एकजीव असलेला गणित, इतिहासादि विषयांचा धागा वा सूत्र यांची योजना केली जाते.

वर्धा-योजनेचा कटाक्ष विद्यार्थ्यांनीं बुद्धि–चातुर्यपूर्वक काम करून आपल्या क्रियाशील वृत्तींचा विकास करून घेतलेल्या खऱ्या संस्कारी व समाजपरायण युवकांची नवपिढी निर्माण करण्यावर आहे. यंत्रयुगानें निर्माण केलेल्या स्पर्धा, कलह व वर्गविग्रह इत्यादि विकृति टळाव्यात, सदैव हालचाल, धडपड करणाऱ्या सृजनशील आत्म्याची भूक भागवून शरीर, बुद्धि व हृदय यांचा समग्र विकास व्हावा, निसर्ग आणि व्यक्ति यांच्या जीवनांत मेळ राहावा व

शिक्षण आणि जीवन यांच्यांत संवाद राहून व्यक्तिजीवनाची सुफलता व्हावी हें तिचें अंतिम उद्दिष्ट आहे. समता, सहकार्य व श्रमनिष्ठ प्रामाणिकपणा यांवर व्यक्तिजीवनाची व समाजजीवनाची उभारणी करणें हें तिचें ध्येय होय. या पद्धतीची यशस्विता शिक्षकांच्या अध्यापनचातुर्यावर आणि उत्साहावर फार अवलंबून आहे.

## 'अलीकडची पायरी'–राजाजी-योजना

भारतांत अनेक ठिकाणीं मूलोद्योगी शिक्षणाला आरंभ झाला असला तरी सर्वत्र सक्तीचें प्राथमिक मोफत शिक्षण देणें शक्य झालेलें नाहीं. मनुष्यबलाचीं उणीव कदाचित् दूर करतां येईल. पण द्रव्यबलाचा प्रश्न मोठा आहे. अनेक ठिकाणीं एक-शिक्षकी अशा जुन्याच शाळा चालू आहेत. सार्जंट-योजनेप्रमाणें सर्व देशांत साक्षरता यावयास चाळीस वर्षें लागणार होतीं. एक-शिक्षकी शाळेंत सर्वच मुलांना काम मिळत नाहीं; तीं कंटाळून, कोमेजून जातात, सुस्तावतात, आणि त्यांची स्वाभाविक आकलनशक्ति गंजून नष्ट होते. तेव्हां मूलोद्योगी शिक्षणाचें ध्येय साध्य होण्यापूर्वीं एक अलीकडील पायरी म्हणून एक व्यवहार्य योजना मद्रासचे मंत्री चक्रवर्ति राजगोपाळाचार्य यांनीं पुढें मांडली असून शिक्षणतज्ज्ञांनीं तिला मान्यता दिली आहे. त्या योजनेचें स्वरूप असें :

१. इयत्ता १ ते ५ पर्यंत शाळा तीनच तास राहील. चाळीस मिनिटांचे चार तास असून १० मिनिटांच्या दोन सुट्या असतील.
२. शाळेंत त्यामुळें दोन पाळ्या करतां येतील. सकाळीं एक विद्यार्थी-गट व दुपारीं दुसरा गट. त्यामुळें एका शिक्षकाला एका वेळीं एकच वर्ग शिकवावा लागेल.
३. शाळेव्यतिरिक्त उरणाऱ्या वेळेचा उपयोग आपल्या घरांत व गांवांत जे व्यवसाय चालतात त्यांचें निरीक्षण करण्यांत, व झेपतील ते शिकण्यांत करावयाचा हें या योजनेचें मुख्य वैशिष्ट्य आहे. त्यामुळें व्यवसायांचें महत्त्व लहानपणापासून त्यांना पटेल; ग्रामीण व्यवसायाबद्दल तुच्छता वाटणार नाहीं, श्रमाची प्रतिष्ठा वाटेल व नवनिर्मितीचा आनंद उपभोगावयास मिळेल.

परुळेकर समितीनें या शिक्षणपद्धतीला मान्यता देऊन तिची उपयुक्तता वाढविण्यासाठीं पुढील सूचना केल्या आहेत.—

१. ज्या कारागिरांच्या हाताखालीं मुलें शिक्षण घेणार आहेत त्यांच्यावरहि प्रौढ-शिक्षणद्वारां संस्कार केले पाहिजेत.

२. शाळेबाहेर घ्यावयाच्या शिक्षणांत योजनाबद्धता आणली पाहिजे.

३. या योजनेंत विद्यार्थ्यांचें सामुदायिक जीवन कमी प्रमाणांत होईल, त्याची अवान्तर कार्यक्रमानें, बालवीर संघटना यासारख्या कार्यक्रमांनीं भरपाई करावी.

४. शिक्षकांवर व व्यावसायिकांवर जो कामाचा बोजा पडेल, त्यासाठीं त्यांना आर्थिक साहाय्य द्यावें.

या योजनेमुळें कमी खर्चांत अधिक शिक्षणाची सोय होईल, शिक्षणाच्या कामीं पालकांची जबाबदारी आहेच, याची त्यांना जाणीव होईल, मरूं लागलेले ग्रामोद्योग टिकून व्यावसायिक शिक्षणाचा मार्ग सुकर होईल, आणि बालकांच्या क्रीडा-प्रवृत्तीला व नवनिर्मितीच्या प्रेरणेला अवसर मिळेल.

• • •

: २२ :

# समारोप

शालेय व्यवस्थेचें शास्त्र हें कांहीं निश्चित तत्त्वांवर आधिष्ठित असलें तरी त्याचें बाह्य स्वरूप परिस्थितिसापेक्ष आहे हें मान्य केलें पाहिजे. सर्व शाळांची परिस्थिति सारखी असणें शक्य नाहीं. तसेंच नवनवे प्रवाह व योजना यांमुळें शाळेच्या बाह्य स्वरूपांत पुष्कळच परिवर्तन होत आहे – आणि होईल. त्यांतून आपल्याकडील शिक्षणपद्धति संक्रमणावस्थेंत आहे. प्राथमिक शिक्षणांत सुरू झालेल्या मूलोद्योगी पद्धतीचें मूल्यमापन व्हावयाचें आहे; तिचें स्वरूप निश्चित व्हावयाचें आहे. तिच्या अनुषंगानें माध्यमिक शिक्षणांत हस्त-व्यवसायाचें स्वरूप ठरावयाचें आहे. सार्जेंट योजनेप्रमाणें प्राथमिक शिक्षणोत्तर माध्यमिक शिक्षणांत विविध प्रकारांच्या शाळांची निर्मिति व्हावयाची आहे. परीक्षापद्धतीबद्दल असंतोष पसरलेला आहे. विद्यार्थ्यांमधील उथळ व असामाजिक प्रवृत्तींबद्दल चिन्ता व्यक्त करण्यांत येत आहे. या सर्व जंजाळांत शिक्षकाचा दृष्टिकोण कसा विशाल असावा याचा येथें ओझरता निर्देश करावयाचा आहे.

शाळा हें एक चिमुंकलें जग आहे; आणि तेथील वातावरण आनंदी, प्रसन्न व समाधानी राहील असेंच वर्तन शिक्षकांकडून व्हावें. विद्यार्थ्यांमध्यें निर्भयता, स्वातंत्र्य, सहकार्य व सहिष्णुता या गुणांची जोपासना होईल अशी दृष्टि असावी. त्या दृष्टीनें आपली वागणूक आहे कीं नाहीं याचा त्यांनीं विचार करावा. अनेकदां ठोकळेबाज सिद्धान्तांच्या व घोषणांच्या आहारीं जाण्याचा धोका असतो; तो प्रथम टाळला पाहिजे. त्यासाठीं शिक्षकांनीं कांहीं गोष्टी ध्यानांत धरणें इष्ट ठरेल.

१. शालेय जीवन हेंच बालकाचें सर्व जीवन नियंत्रित करूं शकत नाहीं. अनेक शक्ति, प्रवाह, मतें बालकावर संस्कार करीत असतात.

२. शालेय जीवनांतील यश हेंच बालकांच्या भावी यशाचें एकमेव गमक नाहीं. जीवनांत कशा संधि मिळतील व त्या कशा घेतां येतील हें अनिश्चित

असतें. शाळा फक्त धडाडी, जागरूकता इ. गुणांचा परिपोष करूं शकेल; जीवनाचें व्यापक स्वरूप समजावून देऊं शकेल.

३. परीक्षा हेंच कांहीं बालकांच्या शक्तीचें मोजमाप घेण्याचें एकमेव साधन नव्हे. परीक्षेंतील यशापयशाचे घटक विविध आहेत. त्यांतील अनेक शिक्षकांच्या आटोक्याबाहेरचे आहेत.

४. भीति व प्रलोभनें यांवर आधारलेली नीतिमत्ता ही कमकुवत असते, व ती केव्हां कोसळेल याचा नियम नसतो. कर्तव्यभावनेवर आधारलेला आचार व नीति हींच खरी टिकाऊ असतात.

५. ज्ञान व कौशल्य यांतील अग्रेसरत्व यांना स्वयंसिद्ध असें फार थोडें महत्त्व आहे. हें ज्ञान वा कौशल्य संपादन करतांना जडलेल्या संवयी, तयार झालेला दृष्टिकोण यांनाच खरें महत्त्व आहे. कारण नैसर्गिक, सहज-प्रवृत्तींना लागलेलें वळणच अखेर संवयींचें रूप घेतें, आणि त्यांतून व्यक्तित्व व विशिष्ट ध्येयवाद निर्माण होतो. तसेंच संपादिलेलें ज्ञान व कौशल्य यांचा इतरत्र उपयोग करण्याची शक्ति व दृष्टि किती आहे, नवीन प्राप्तीसाठीं तें ज्ञान किती साधनीभूत होऊं शकतें यावरच त्यांचें मूल्य ठरेल.

६. प्रयोगशीलता व वैज्ञानिक दृष्टि हीं मानवाच्या श्रेष्ठतेचीं खरीं लक्षणें आहेत. आपल्या शालेय पद्धतींत व जीवनांत शिक्षकांनीं त्यांचा अवलंब केला पाहिजे.

७. शालेय जीवन हें सामुदायिक जीवनाचा एक प्रयोग आहे. तेथील वातावरणांत जितकें सौहार्द व सहकार्य आणतां येईल तितकें तें यशस्वी व परिणामकारक ठरेल.

शाळा ही समाजयंत्रणेंतील आपलें कार्य करून कृतार्थ झाली आहे कीं नाहीं हें ठरविण्याच्या कांहीं कसोट्या तज्ज्ञांनीं ठरविल्या आहेत. पूर्वीच्या विवेचनांत त्यांचा विस्तार झालाच आहे. साररूपानें त्या अशा सांगतां येतील :—

१. विद्यार्थ्यांना जीवनविषयक मूलभूत गोष्टी व कौशल्य अधिकाधिक सरसतेनें शिकवावयाचें, व ज्ञानाच्या विविध दालनांचा त्यांचा परिचय सखोल करून द्यावयाचा.

२. विद्यार्थ्यांमधील व्यक्तिगत सुप्त सामर्थ्य शोधून, त्यांच्या आविष्कारास व विकासास अनुकूल असें वातावरण निमाण करावयाचें.

३. विद्यार्थ्यांमध्यें निरोगी जीवनाची आवड निर्माण करावयाची व आरोग्याच्या संवर्यीची वाढ करावयाची.


४. विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाचा विकास साधून त्यांचें चारित्र्य घडवावयाचें.

५. विद्यार्थ्यांना स्वतंत्र बुद्धीनें विचार करायला शिकवावयाचें.

६. विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट नागरिक निर्माण करावयाचे.

७. गृह व समाज यांचें सहकार्य घेऊन शिक्षणक्षेत्रांतील प्रगतीचें पाऊल पुढें टाकावयाचें.

उत्कृष्ट व्यवस्था ही सतत प्रगातिशीलच असणार. आरंभीं म्हटल्याप्रमाणें स्थळ–काळानुसार तिचें बाह्य स्वरूप पालटलें तरी तिचें आंतरिक स्वरूप कांहीं शाश्वत तत्त्वांनींच बनलें आहे. त्यांचा आविष्कार प्रत्यहीं नवनवाच्र भासून समाजाचा जिवंतपणा त्यांतून दृग्गोचर होईल.



# परिशिष्ट

## मुंबई राज्यांतील शैक्षणिक कारभार

### प्रास्ताविक

आधुनिक कालांत सर्व स्वतंत्र व पुढारलेल्या देशांत जनतेचें शिक्षण ही सुरक्षितता, व्यापार-उद्योग—इत्यादींप्रमाणें सरकारची जबाबदारी समजली जाते. त्यासाठीं स्वतंत्र अधिकारी-वर्ग असतो, संस्था असतात, व सरकारी तिजोरींतून त्यावर भरपूर खर्चहि होत असतो. तेव्हां शैक्षणिक कारभार कसा चालतो हें पाहणें म्हणजे—शैक्षणिक धोरणें कोण आंखतें, तीं पार पाडणारी यंत्रणा कोणती, देखरेख करणारा अधिकारीवर्ग कोणता, आर्थिक साहाय्याची योजना कशी, व शिक्षणाचें प्रत्यक्ष काम करणारी सोपानपरंपरा कोणती,– हें समजावून घेणें होय.

मुंबई राज्यांतील शैक्षणिक कारभाराचें स्वरूप समजावून घेण्यास गेल्या दीडशें वर्षांची ऐतिहासिक उत्क्रान्ति पाहणें आवश्यक आहे.

### ऐतिहासिक पर्यालोचन : पहिला कालखंड : ( १८५४ ते १८८२ )

आज अस्तित्वांत असलेली सर्व राज्यांतील शैक्षणिक कारभाराची व्यवस्था पाहणारी डायरेक्टरची कचेरी व ग्रँट-इन्-कोडची पद्धति यांचा पाया १८५४ च्या प्रसिद्ध 'वुड्स-डिस्पॅच'—वुड साहेबांच्या खलित्यानें घातला गेला. इ.स. १८१३ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीला मिळालेल्या सनदेप्रमाणें हिंदुस्थानांत शिक्षणाची योजना करण्याची जबाबदारी तिच्यावर येऊन पडली होती, व त्यासाठीं दरसाल एक लाख रुपये मंजूर करण्यांत आले होते; पण हें शिक्षण कोणतें द्यावें याचा विचार करण्यांत चाळीस वर्षें निघून गेलीं. इ. स. १८३५ मध्यें मेकॉलेचा खलिता तयार होऊन पाश्चात्य शिक्षण या देशांत सुरू करण्याचा निर्णय घेण्यांत आला. १८५४ मध्यें वुडच्या खलित्यांत चार इलाख्यांत चार डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनचीं ऑफिसें स्थापावींत, एतद्देशीय शिक्षण-संस्थांना उत्तेजन द्यावें, आणि सरकारी संस्थांतून 'ज्ञानाचे झिरपे' तयार व्हावेत, अशी

योजना होती. १८५७ मध्यें ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानचा कारभार आपल्याकडे घेतल्यावर त्या शिफारशींची अंमलबजावणी झाली. १८५७ मध्यें मुंबई-विद्यापीठाची स्थापना झाली. बहुतेक जिल्ह्यांच्या गांवीं हायस्कुलें निघालीं. मुंबई राज्यांत एतद्देशीय शिक्षणसंस्थांची मात्र आबाळच झाली, व त्या बंद पडल्या. खाजगी शिक्षणदानाचा प्रयत्न फक्त मिशनरी लोकांकडूनच झाला. पण त्यालाहि सरकारची सहानुभूति विशेष नव्हती.

देशांत राजकीय ध्येयांचा उदय होऊं लागतांच खाजगी प्रयत्नानें शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण होऊं लागल्या. नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी ही संस्था पुण्यास १८७४ मध्यें निघाली. त्यामागोमाग डेक्कन एज्युकेशन सोसायटी निघाली. आर्यसमाज, प्रार्थनासमाज, ब्रह्मसमाज इ. विविध संस्था – व न्या. मू. रानडे, ज्योतिबा फुले, चिपळूणकर, टिळक, आगरकर इ. समाजधुरीण यांच्या प्रयत्नानें हें शिक्षणाचें कार्य नव्या जोमानें सुरू झालें.

## दुसरा कालखंड : ( १८८२ ते १९२० )

इ. स. १८६८ मध्यें लोकलफंड कमिट्यांची स्थापना होऊन लहान गांवांतील प्राथमिक शिक्षणाकडे सरकारनें लक्ष पुरविलें. इ. स. १८८२ मध्यें नेमलेल्या हंटर कमिशननें शिक्षणक्रमांत मूलग्राही सुधारणा सुचविल्या होत्या. त्यांतील एक महत्त्वाची सूचना म्हणजे माध्यमिक शिक्षणक्रमांत एखाद्या व्यवसायाच्या शिक्षणाचा अंतर्भाव ही होय. तसेंच, माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारनें घेऊं नये अशीहि सूचना कमिशननें केली होती. १८८२ ते १९०२ च्या कालांत खाजगी प्रयत्नानें माध्यमिक शिक्षणाचा प्रसार या देशांत खूपच झाला. राष्ट्रीय चळवळींत राष्ट्रीय शिक्षण हें महत्त्वाचें साधन असल्यानें तळेगांवच्या समर्थ विद्यालयासारख्या संस्थाहि निघाल्या. १८८२ नंतर स्थानिक स्वराज्य संस्थांकडे प्राथमिक शिक्षणहि सरकारनें सोपविलें. मोर्ले मिंटो सुधारणेचा हप्ता मिळाल्यानंतर देशांत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें व्हावें म्हणून नामदार गोखले यांनीं अनेकदां प्रयत्नांची शिकस्त केली, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. १९०२ मध्यें नेमलेल्या लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीतील युनिव्हर्सिटी कमिशनच्या शिफारशीप्रमाणें १९०४ चा कायदा होऊन माध्यमिक शाळांना विद्यापीठाची मान्यता घेणें, व मॅट्रिकचा विद्यापीठानें आंखलेला अभ्यासक्रम स्वीकारणें आवश्यक झालें. १९०४ ते १९१२

पर्यंतच्या कालांत खाजगी शिक्षणसंस्थांकडे सरकार डोळ्यांत तेल घालून पाहात होतें, व निर्बंध वाढवीत होतें. या देशांतील शिक्षणपद्धतींत पाश्चात्य विचाराचा व संस्कृतीचा होत चाललेला अतिरेक यांत्रविण्यासाठीं पं. मदन मोहन मालवीय व डॉ. ॲनी बेझंट यांनीं बनारस येथें स्वतंत्र विद्यापीठहि या कालखंडांत स्थापलें. टागोरांच्या शान्तिनिकेतन–विश्वभारतीची स्थापना १९०१ मध्यें झाली.

या कालखंडाचे अखेरीस म्हणजे १९१७ मध्यें कलकत्ता विश्वविद्यालयाची चौकशी करण्यासाठीं कमिशन नेमलें गेलें होतें. त्यानें माध्यमिक शिक्षणाचाहि विचार केला होता. हायस्कुलांत मातृभाषा हें शिक्षणाचें माध्यम असावें, कॉलेजांतील पहिल्या दोन वर्षांचे वर्ग हायस्कूलला जोडावेत, परीक्षा-पद्धतींत सुधारणा व्हावी, स्त्रीशिक्षणाकडे लक्ष द्यावें, विद्यापीठाचें शालांवरील नियंत्रण जाऊन सेकंडरी एज्युकेशन बोर्डाकडे शालान्त परीक्षांची व्यवस्था जावी – अशा त्याच्या शिफारशी होत्या. त्यानुसार कांहीं प्रांतांत बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन स्थापन झालें; आणि बहुतेक राज्यांत मातृभाषेच्या माध्यमाचा विकल्प देण्यांत आला.

## तिसरा कालखंड : (१९२१ ते १९३५)

इ. स. १९१९ चा मॉंटफर्ड सुधारणांचा हप्ता मिळतांच शिक्षणखातें लोकांच्या हातीं आलें, व लोकनियुक्त प्रतिनिधींतून शिक्षणमंत्र्यांची निवड झाली. मुंबईचे पहिले शिक्षणमंत्री रॅं. र. पु. परांजपे हे होत. प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यांत सुधारणा होऊन प्राथमिक शिक्षणाचा संपूर्ण कारभार –अर्थव्यवस्था, नेमणुका, देखरेख – स्थानिक स्वराज्य-संस्थांच्या ताब्यांत गेला, पण मॉंटफर्ड सुधारणांखालीं शिक्षणावर होणारा मध्यवर्ती सरकारचा खर्च थांबला. अबकारी उत्पन्नावर शिक्षणाला अवलंबून राहावें लागलें. कारभाराची द्विदलपद्धतीहि सरकारच्या उपेक्षेस कारणीभूत झाली. १९२९ सालीं सायमन कमिशनला पूरक म्हणून शैक्षणिक परिस्थितीची पाहणी करण्यासाठीं ब्रि. पार्लमेंटनें 'हार्टोग कमिशन'ची नेमणूक केली. त्या समितीनें व्यापक दृष्टीनें आढावा घेऊन आपला अहवाल तयार केला होता. अभ्यासक्रमांत विविधता असावी, शिक्षकांची वेतनश्रेणी सुधारावी, शिक्षकांच्या अध्यापनाचा दर्जा वाढविण्यासाठीं योजना आंखावी, इ. सुधारणा कमिशननें शिफारशिल्या होत्या. १९३६–३७ मध्यें केंद्र-सरकारनें नेमलेल्या ॲबट-वुड समितीचा

अहवाल बाहेर पडला. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची योजना आंखण्यासाठीं ही समिति नेमली होती. हिच्या शिफारशींचा जणुं एक सुपरिणाम म्हणजे जिल्ह्यांच्या ठिकाणीं असलेल्या कांहीं हायस्कुलांचें शेतकी-व्यापारी-तांत्रिक शिक्षण देणाऱ्या हायस्कुलांत मुंबई सरकारनें रूपान्तर केलें.

## चौथा कालखंड : ( १९३५ ते १९५४ )

इ. स. १९३७ मध्यें अकरा प्रांतांत काँग्रेस मंत्रिमंडळें अस्तित्वांत आलीं. त्याचा फायदा घेण्यासाठीं राष्ट्रीय दृष्टिकोणांतून आंखलेली 'वर्धा-शिक्षण-योजना' ही राष्ट्रीय शिक्षण-योजना — मूलभूत व आवश्यक शिक्षणाची योजना — 'बुनियादी शिक्षा' अथवा 'बेसिक एज्युकेशन' शिक्षणतज्ज्ञां-पुढें म. गांधींनीं मांडली. अभ्यासक्रमांत पुनर्घटना व नवचैतन्य आणणें हें तिचें उद्दिष्ट होतें. इ. स. १९४३–४४ मध्यें सेंट्रल ॲड्व्हायसरी बोर्डानें आपली प्रसिद्ध 'सार्जंट योजना' राष्ट्रास सादर केली. पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, अध्यापन इ. विभागांचें शिक्षण, तरुणांच्या संघटना, शारीरिक शिक्षण, समाजशिक्षण इ. सर्व अंगोपांगांच्या उद्दिष्टांचा, निर्माण कराव्या लागणाऱ्या यंत्रणेचा व त्यासाठीं येणाऱ्या खर्चाचा विस्तृत अहवाल या सल्ला-गार मंडळानें तयार केला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणाचा विचार पुनः नव्या गरजांच्या व ध्येयांच्या अनुरोधानें होत आहे. १९४८ मध्यें पुण व नंतर कर्नाटक, गुजरात, बडोदें, विद्यापीठांची प्रतिष्ठापना झाली. १९४८–४९ मध्यें विद्यापीठ-शिक्षणाबद्दल डॉ. राधाकृष्णन् यांच्या समितीनें प्रचंड अहवाल तयार केला आहे. माध्यमिक शिक्षणाचा पुनः एकदां विचार मध्यवर्ती सरकारनें नेमलेल्या मुदालियार समितीनें नुकताच १९५३ मध्यें तयार केला आहे.

मुंबई राज्यांतील प्राथमिक व माध्यमिक अभ्यासक्रमाची पुनर्घटना करण्याचें काम मुंबई सरकारनें पुनः अंगावर घेतलें आहे.

## केंद्रीय सरकार आणि शिक्षण

भारतांत शैक्षणिक प्रगति किती झपाट्यानें व किती विविध दिशांनीं व्हावयास पाहिजे हें सांगावयास नकोच. या दृष्टीनें भारतीय राज्यघटनेंत योग्य ती तरतूद करण्यांत आली आहे. अखिल भारताचें शैक्षणिक धोरण एकाच सूत्रांत गोंवलें जावें यासाठीं केंद्रीय मंत्रिमंडळांत शिक्षणमंत्र्याची जागा आहे. घटनेच्या कलम ४५ अन्वयें "प्रत्येक बालकाला सक्तीचें व

मोफत शिक्षण वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत देण्याची योजना दहा वर्षांच्या अवधींत प्रचारांत आणली जाईल '' असें नमूद केलें आहे. घटक राज्य-सरकारबरोबरच मध्यवर्ती सरकारनें व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणांच्या योजनांची जबाबदारी स्वीकारली आहे. निरक्षरतेचें उच्चाटन, सामाजिक (प्रौढ) शिक्षण, हिंदीचा प्रसार, शान्तिनिकेतन, अलिगड इ. विद्यापीठांचा कारभार,– इ. राष्ट्रव्यापी कार्यांची व राष्ट्रीय संस्थांची जबाबदारी केंद्रीय शिक्षाविभागाचें खास कार्यक्षेत्र आहे.

केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या दिमतीस स्वतंत्र नोकरवर्ग असून त्या विभागावर सेक्रेटरीची नेमणूक आहे. मंत्र्यांना सल्लामसलत देण्यासाठीं मध्यवर्ती सल्लागार मंडळ ( सेंट्रल ॲडव्हायसरी बोर्ड ) आहे. १९२३ मध्येंच या मंडळाची निर्मिति झाली होती. मध्यंतरीं तें बंद पडलें होतें, पण १९३५ पासून तें पुनः अस्तित्वांत आलें आहे. ' सार्जेंट समितीचा अहवाल ' या नांवानें प्रसिद्ध असलेली योजना या समितीचेंच कार्य आहे.

केंद्रीय शिक्षणविभाग एका बाजूनें घटक राज्यांशीं व दुसऱ्या बाजूनें राष्ट्र-संघाच्या ( यूनोच्या ) सांस्कृतिक विभागाशीं ( यूनेस्को ) संबंध ठेवून दोघां-मध्यें दुवा म्हणून काम करतो. राष्ट्रसंघानें काढलेल्या मानवी हक्कांच्या सनदेंतील कलमें भारतीय घटनेंतच नमूद झालीं आहेत. राष्ट्रसंघाच्या सांस्कृ-तिक चळवळींत सहभागी होऊन विविध क्षेत्रांतील शैक्षाणिक प्रगतीचा वेग वाढविण्याच्या कामीं त्यांचें साहाय्य केंद्रीय शिक्षाविभाग विविध तऱ्हेनें घेत आहे. परदेशांत अभ्यासासाठीं शिष्यवृत्त्या देऊन विद्यार्थी पाठविणें, सांस्कृतिक शिष्टमंडळें धाडणें, विविध वाङ्मय प्रसिद्धिणें इ. कामें या दृष्टीनेंच चालतात. वर्षांतून एकदां सर्व राज्यांतील शिक्षणमंत्र्यांची परिषद बोलावण्याचा पायंडा पाडण्यांत आला आहे.

## मुंबई राज्याची स्वायत्तता

भारतांतील राज्यांची विभागणी अ, ब, क, ड अशा गटांत आहे. त्यांतील 'अ' गटांत मुंबई राज्य मोडतें. 'अ' गटांतील राज्यांना शैक्षणिक ध्येय-धोरणांच्या बाबतींत केंद्रीय शिक्षाविभागावर अवलंबून राहण्याचें कारण नाहीं. ह्या स्वातंत्र्याचा फायदा घेऊनच इंग्रजीचें महत्त्व कमी करून हिंदीचा दर्जा वाढविणें यासारख्या सुधारणा मुंबई राज्यानें केल्या आहेत.

मुंबई राज्यांत शैक्षणिक कारभार ज्या सरकारी यंत्रणेनें चालतो, तिची स्थूल रूपरेषा पुढीलप्रमाणें आहे :

## मुंबई राज्य

### शैक्षणिक कारभाराची यंत्रणा

# मुंबई राज्य

## शिक्षणक्रमाची सोपानपरंपरा

## शिक्षणमंत्री

लोकशाही पद्धतींत मंत्रिमंडळ हें लोकमतावर आधारलेल्या विधिमंडळाला जबाबदार असल्यानें पर्यायानें लोकमत व जनतेच्या गरजा लक्षांत घेऊन राज्यांतील शिक्षणविषयक कारभाराची धोरणें आंखण्याची जबाबदारी शिक्षण-मंत्र्यालाहि पार पाडावी लागते. शिक्षणाविषयक कारभारांतील सर्वोच्चपदस्थ व्यक्ति म्हणजे शिक्षणमंत्रीच. पण त्यानें ठराविलेलें धोरण सर्व मंत्रिमंडळाच्या संमतीनेंच पुढें येतें, व म्हणून तें 'सरकारी धोरण' म्हणून समजलें जातें. मंत्र्यांचा कारभार हा सचिवालयद्वारां चालत असल्यानें कोणत्याहि प्रश्नाबाबत अंतिम निर्णय देणें, नवीन हुकूम वा आदेश काढणें, मार्गदर्शन करणें – हीं कामें राज्यसचिवालयामार्फत चालतात. राज्यसचिवालयांत शिक्षणाकरितां एक चिटणीस ( सेक्रेटरी ) असून, शिक्षणखातें व विधिमंडळ यांच्यांत दुवा जोडणें, आणि अर्थव्यवस्था, हिशोब, आंकडेवार माहिती व इतिवृत्तें इत्यादि व्यवस्था बघणें हीं कामें त्याला करावीं लागतात.

मुंबई राज्यांत माध्यमिक शालान्त – परीक्षा – मंडळ, ( एस्. एस्. सी. एक्झॅमिनेशन बोर्ड ) व प्रादेशिक विद्यापीठें या कायद्यानें निर्माण केलेल्या 'स्वायत्त' संस्था आहेत. त्यांच्यावर शिक्षणखात्याचें कार्यपद्धति व अभ्यासक्रम या बाबतींत नियंत्रण नसलें तरी तपासणी व शिफारसवजा सूचना शिक्षणखातें करूं शकतें, व आर्थिक साहाय्यहि देतें. बोर्डाचा नोकरवर्ग व सरकारी कॉलेजांतील नोकरवर्ग हा शिक्षणखात्याच्या नियंत्रणाखालीं सरकारी नोकरवर्ग असतो.

सचिवालयाशीं संबंध असलेले दोन शिक्षणाविभाग म्हणजे – डायरेक्टर ऑफ एज्युकेशनच्या ताब्यांत असलेलें प्रमुख शिक्षणखातें, आणि दुसरें – तांत्रिक शिक्षणावर देखरेख करणाऱ्या डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशनच्या अधि-कारांतलें खातें. याशिवाय, कला व हस्तव्यवसाय, शेतकी शिक्षण, सामाजिक शिक्षण, टक्-शिक्षण इ. यांवर देखरेख करणारे अधिकारी असतात.

## डायरेक्टर ऑफ एज्युकेशन

मुंबई राज्यांतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था पाहण्याची खास जबाबदारी असलेला अधिकारी म्हणजे डायरेक्टर ऑफ एज्युकेशन. शाळांतील अभ्यासक्रम, हिशोब, शैक्षणिक दर्जा यांवर तपासणीद्वारां प्रत्यक्ष

नियंत्रण याचेंच असतें. तसेंच, राज्यांतील विविध प्रकारच्या शिक्षणसंस्था, शारीरिक शिक्षण, गायन-वादन, चित्रकला, आंधळे–बहिरे यांच्याबद्दल कार्य करणाऱ्या शैक्षणिक संस्था, शिक्षकांसाठीं चालणारे वर्ग, हिंदी सनद परीक्षांचे वर्ग इत्यादींची तपासणी करणें, त्यांना सरकारमान्यता देणें, व शक्य तर आर्थिक साहाय्य देणें—हीं याच अधिकाऱ्यांचीं कामें होत. तसेंच, प्राथमिक शिक्षण प्रमाणपत्र-परीक्षा, एस्. टी. सी. परीक्षा, हिंदी शिक्षक सनद परीक्षा, इ. ची व्यवस्था करून यशस्वी उमेदवारांना प्रमाणपत्रें देण्याचा अधिकार याच्याकडेच आहे.

सर्व राज्यांतील हा शिक्षणाचा पसारा मोठा असल्यानें डायरेक्टरच्या मदतीस डेप्युटी डायरेक्टर्स असतात. कामाच्या पसाऱ्याप्रमाणें त्यांची संख्या कमीजास्त होते. हल्लीं ती संख्या सहा आहे. शिक्षणाचे प्राथमिक, माध्यमिक, व उच्च शिक्षण असे तीन प्रमुख विभाग करून ते त्या त्या डेप्युटी डायरेक्टरकडे सोपविले आहेत. डायरेक्टरचा संबंध प्रत्येक जिल्ह्यांतील शिक्षणाशीं येतो तो तीन अधिकाऱ्यांमार्फत – म्युनिसिपॅलिटीतर्फें चालणाऱ्या शाळांची व्यवस्था पाहणारे ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, जिल्हा स्कूल बोर्डाची व्यवस्था पाहणारे ॲड. ऑफिसर, व प्रत्येक जिल्ह्याचा मुख्य तपासणी अधिकारी – डिस्ट्रिक्ट एज्युकॅशनल इन्स्पेक्टर.

## पूर्व–प्राथमिक शिक्षण

मुंबई राज्य-सरकारनें पूर्व–प्राथमिक शिक्षणासाठीं कोठेंहि संस्था चालविलेल्या नाहींत. पण लोकप्रयत्नानें चालविलेल्या बालक-मंदिरांची जिल्हाधिकारी स्वतः किंवा आपल्या साहाय्यकांमार्फत तपासणी करून शिक्षणखात्याची मान्यता व आर्थिक साहाय्य यांसाठीं वरिष्ठ अधिकाऱ्यांना शिफारस करतात.

## प्राथमिक शिक्षण

मॉंटफर्ड सुधारणांन्वयें ( १९१८ ) प्राथमिक शिक्षण ही बाब स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारांत दिली होती. सध्यां या संस्था प्राथमिक शिक्षणांत शिफारसवजा कार्य करतात. शिक्षकांच्या नेमणुका, जिल्हाशिक्षणाधिकारी व स्कूल बोर्डाचे चेअरमन यांच्या सल्ल्यानें ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर करतो. बदल्या बोर्ड करतें; पुस्तकें शिक्षणखात्यानें शिफाराशिलेल्या पुस्तकांतून

बोर्ड निवडतें; रजा, कर्जे इ. वर बोर्डाचा अधिकार चालतो. शाळेची तपासणी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर आणि जिल्हाशिक्षणाधिकारी व त्यांचे साहाय्यक करतात, आणि शिक्षकांची व शाळेची कार्यक्षमता यावर अभिप्राय देतात. खर्चाचें अंदाजपत्रक ॲड. ऑफिसर करतात; स्थानिक स्वराज्यसंस्था तें मंजूर करतें; व डायरेक्टरकडून शें. ५० पर्यंत त्याला साहाय्य मिळतें. शहरांतून प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी म्युनिसिपालिटीला सांभाळावी लागते. तालुका व खेडीं यांमधील शिक्षण जिल्हाबोर्ड सांभाळतें. पण खाजगी संस्थांनाहि या क्षेत्रांत कार्य करण्याला अवसर आहेच. नाममात्र फी घेऊन खाजगी संस्था शाळा चालवितात, व येणारी तूट स्थानिक स्वराज्य संस्थांकडून ग्रँटच्या रूपानें मिळते.

प्राथमिक शिक्षणाची – वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत निःशुल्क व आनिवार्य (मोफत व सक्तीचें) शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारनें खास आपली म्हणून मानली आहे. १९४७ च्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यान्वयें हा कारभार चालतो. प्राथमिक शिक्षणाच्या वरच्या तीन इयत्ता या हायस्कुलांतील पहिल्या तीन इयत्तांशीं समान्तर असल्यानें त्या बाबतींत अभ्यासक्रम, फी, शिक्षकांची वेतनश्रेणी इ. प्रश्नांबाबत एकसूत्रीपणा आणण्यासाठीं आचार्य भिसे यांच्या अध्यक्षतेखालीं सरकारनें एक समिति नेमली होती. तिचा अहवाल प्रसिद्ध झालेला आहे.

## माध्यमिक शिक्षण

माध्यमिक शिक्षण ही आपली जबाबदारी मानण्यास सरकार आज तयार नाहीं. त्यामुळें सरकारनें आपलीं हायस्कुलें एक तर बंद केलीं आहेत, किंवा त्यांचें व्यापारी व औद्योगिक हायस्कुलांत रूपान्तर केलें आहे. मुलींसाठीं मात्र अजून हायस्कुलें आहेत तीं सरकार चालवितें. जनतेनें पुढाकार घेऊन माध्यमिक शिक्षणसंस्था चालवाव्यात अशी सरकारची इच्छा आहे. महाराष्ट्रांत नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी, डेक्कन एज्यु. सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी, इ. पुण्यांतील नामवंत संस्थांच्या संस्थापकांनीं स्वदेशप्रेम व सेवा या भावनांनीं प्रेरित होऊन या बाबतींत पुढाकार घेऊन इतरांना धडा घालून दिला, आजीव-सदस्यसंस्था-पद्धति निर्माण केली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनींहि पुणें, मुंबई, नगर वगैरे ठिकाणीं आपलीं हायस्कुलें काढलीं. सरकार या संस्थांना मान्यता

देतें; मान्य असणाऱ्या खर्चावर शें. ३०–३३ पर्यंत ग्रँट देतें. त्यासाठीं सरकारप्रणीत अभ्यासक्रम, सरकारमान्य पाठ्य पुस्तकें, सरकारमान्य वेतनश्रेणी, इ. बंधनें शाळांना स्वीकारावीं लागतात.

शिक्षकांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि नोकरीची शाश्वति व नियम याबाबत सरकारनें घाटे–परुळेकर समिति नियुक्त केली होती. तिच्या बऱ्याचशा शिफारशी सरकारनें मान्य केल्या आहेत. माध्यमिक शिक्षणांतील खाजगी मालकीचा सरकारनें प्रतिबंध केला असून लोकशाही तत्त्वांवर चालणाऱ्या आणि कंपनी कायद्याखालीं व सार्वजनिक ट्रस्ट कायद्याखालीं नोंदल्या गेलेल्या संस्थांनाच सरकार मान्यता देतें.

शाळांची तपासणी जिल्हाशिक्षणाधिकारी, त्यांचे उपप्रमुख व साहाय्यक अधिकारी घेतात. डेप्युटी एज्यु. इन्स्पेक्टर, असि. डे. ए. इन्स्पेक्टर इ. साहाय्यक अधिकारी आहेत. शैक्षणिक दर्जा, शिस्त, आरोग्य, साधन-सामुग्रीची समृद्धि, अद्ययावतपणा, व कार्यालयाच्या दप्तराचा कारभार इतक्यांची तपासणी होते. शारीरिक शिक्षणाची तपासणी या अधिकाऱ्यांकडेच आतां आहे. चित्रकला–हस्तव्यवसाय-विभागाची तपासणी मात्र सरकारच्या त्या विभागाच्या स्वतंत्र इन्स्पेक्टरकडेच आहे.

## माध्यमिक शालान्त–परीक्षा-मंडळ

माध्यमिक शिक्षणाची अखेर ज्या अंतिम परीक्षेनें होते, ती परीक्षा मुंबई विश्वविद्यापीठाकडे होती. त्यामुळें त्या परीक्षेचें स्वरूप विश्वविद्यालयांत प्रवेश मिळण्याच्या दृष्टीनें पात्रता पारखणें एवढेंच होतें. ही परिस्थिति बदलून माध्यमिक शिक्षण हा शिक्षणक्रमांत स्वयंपूर्ण टप्पा असावा, आणि या शिक्षणांत जीवनोपयोगी विविध विषयांचा समावेश व्हावा, शिक्षणाच्या अखेरीस जीवनाच्या भिन्न भिन्न क्षेत्रांत पाऊल टाकण्याचें सामर्थ्य विद्यार्थ्यांत यावें, अशा दृष्टीनें विश्वविद्यालयाकडून ही परीक्षा काढून सेकंडरी स्कूल सर्टिफिकेट एक्झॅमिनेशन बोर्ड या नांवाच्या कायद्यानें निर्माण केलेल्या स्वायत्त संस्थेकडे ती सोंपविण्यांत आली.

या बोर्डाचे ३६ सभासद असून, त्यांतील २४ सरकारनियुक्त असतात. त्यांत मुख्याध्यापक, शिक्षक यांना प्रतिनिधित्व मिळावें अशी योजना आहे.

बारा प्रतिनिधि राज्यांतील विश्वविद्यालयांनीं निवडून द्यावयाचे असतात.. डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन, डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर, डायरेक्टर ऑफ आर्ट अँड क्रॅफ्टस् हे त्या बोर्डाचे पदसिद्ध ( एक्स – ऑफिशिओ ) सभासद असतात. बोर्डाचे मुख्य अधिकारी म्हणजे चेअरमन. हे गृहस्थ डायरेक्टरच्या दर्जाचे असतात. सर्व कारभार सेक्रेटरी पाहतात. बोर्डाच्या दैनंदिन कामासाठीं स्टँडिंग कमिटी, अर्थविषयक कामावर देखरेखीसाठीं फिनॅन्स कमिटी, परीक्षाविषयक कामासाठीं एक्झॅमिनेशन कमिटी, अभ्यासक्रम, पाठ्य पुस्तकें इ.साठीं कमिटी ऑफ कोर्सेस अशा उपसमित्या आहेत.

एस्. एस्. सी. परीक्षेच्या अभ्यासक्रमांत आज जवळ जवळ ७८ विषय आहेत. परीक्षा घेणें व प्रमाणपत्र देणें एवढेंच या बोर्डाचें काम आहे. अकराव्या इयत्तेचा अभ्यासक्रम व पाठ्य पुस्तकें यावर बोर्डाचें नियंत्रण आहे. शाळांना बोर्डाशीं संलग्न-शुल्क म्हणून वार्षिक दहा रुपये भरावे लागतात.

बोर्डाच्या कामाचा पसारा खूप वाढला असल्यानें गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटक अशा तीन प्रादेशिक विभागांत त्याच्या तीन समित्या असाव्यात अशी सूचना पुढें आलेली आहे.

मुंबई राज्यांत माध्यमिक शिक्षणाची एकंदरीनें आबाळच होत आहे. एस्. एस्. सी. परीक्षेसाठीं विषयांची विविधता असली तरी त्यांची तरतूद करण्याचें सामर्थ्य शिक्षणसंस्थांना नाहीं. लहान लहान शाळांची संख्या भरमसाठ वाढलेली आहे. कांहीं शाळा खूपच्च मोठ्या झालेल्या आहेत. लहान शाळांना सध्यांचा आर्थिक भार झेपेनासा झाला आहे. मग नवीन सुधारणांचें नांव कशाला ? सरकारची प्रवृत्ति आर्थिक साहाय्य न देतांच आंपली पकड दृढ करण्याकडे आहे.

लहान संस्थांचें जिल्हाव्यापी एकीकरण, स्थानिक गरजांप्रमाणें भिन्नभिन्न विषय शिकविणाऱ्या शाळांची योजना, वसतिगृहाची शाळांना जोड, सरकारी मदतींत वाढ इत्यादि अनेक अंगांनीं माध्यमिक शिक्षणांत पुनर्रचना करण्याची वेळ आतां आली आहे.

## विश्वविद्यालयीन शिक्षण

मुंबई राज्यांतील पहिलें विश्वविद्यालय मुंबईस १८५७ सालीं स्थापन झालें. तेव्हांपासून १९४७ पर्यंतच्या नव्वद वर्षांत उच्च शिक्षणाची व्यवस्था पाह-

ण्याचें काम करणारें हें एकटेंच सरकारमान्य विश्वविद्यालय होतें. या काळांत विश्वविद्यालयीन कामाचा पसारा फार वाढल्यानें राज्यांत आणखी विश्वविद्यालयें काढण्याची आवश्यकता भासूं लागली. शिवाय मुंबई राज्य हें गुजराथ, महाराष्ट्र आणि कर्नाटक अशा तीन प्रमुख विभागांचें बनलेलें असल्यामुळें, व त्या तीन विभागांतील भाषा, संस्कृति व इतिहास यांत भिन्नता असल्यामुळें, व त्या त्या विभागांतील उच्चशिक्षणविषयक आकांक्षा तृप्त करणें एकट्या मुंबई विश्वविद्यालयास शक्य होईना म्हणून १९४७ पासून प्रादेशिक विश्वविद्यालयें स्थापन होऊं लागलीं. आतां अशीं विश्वविद्यालयें पुणें (महाराष्ट्र), धारवाड (कर्नाटक), अहमदाबाद (गुजरात) येथें आहेत. त्याशिवाय बडोद्यास एक स्वतंत्र विश्वविद्यालय असून नुकतेंच श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विश्वविद्यालय (केवळ स्त्रियांकरितां) सरकारी कायद्यानेंच मान्य करण्यांत आलें आहे. इ. स. १९१६ सालीं डॉ. धों. के. कर्वे यांच्या प्रयत्नानें हें स्थापन करण्यांत आलें होतें; पण सरकारी मान्यता खऱ्या अर्थानें आतांच त्याला मिळाली. उच्च शिक्षणाचें माध्यम मातृभाषा हें या विश्वविद्यालयाचें वैशिष्ट्य आहे. मुंबई विश्वविद्यालय हें आतां फक्त बृहन्मुंबईकरितां आहे.

हीं सर्व विश्वविद्यालयें आणि त्यांना संलग्न असलेलीं महाविद्यालयें यांमार्फत राज्यांतील उच्च शिक्षणाचें प्रत्यक्ष कार्य चाललें आहे. हीं महाविद्यालयें कांहीं सरकारी, कांहीं खाजगी संस्थांचीं आणि कांहीं मिशनरी संस्थांचीं आहेत. त्यांना सरकारी मदत खर्चाच्या मानानें मिळते.

विश्वविद्यालयीन शिक्षणाचे प्रमुख विभाग पुढीलप्रमाणें आहेत:—वाङ्मय आणि तत्सम विषय; शास्त्र; स्थापत्य; व्यापार; शिक्षण; कायदा; वैद्यक; शेतकी. ज्ञानाच्या या विविध शाखांतील ज्ञान या महाविद्यालयांतून आणि विश्वविद्यालयांतून विद्यार्थी घेतात, व त्यांच्या परीक्षा घेऊन विश्वविद्यालयें त्यांना विविध पदव्या देतात. विश्वविद्यालयांमार्फत ज्ञानाच्या विविध शाखांतून संशोधनहि होऊं लागलें आहे.


विश्वविद्यालयें या स्वायत्त संस्था आहेत. तरीहि सर्व विश्वविद्यालयांचे कुलगुरु (चॅन्सेलर) हे राज्यपाल असल्यामुळें एका अर्थानें त्यांवर सरकारी अंमल चालतो. पण त्या अंमलाची बजावणी फारशी न होतां गरज लागेल तेव्हांच विश्वविद्यालयाच्या सुस्वास्थ्याकरितां होते.

विश्वविद्यालयांचा कारभार सरकारी कायद्यानें प्रस्थापित केलेल्या विविध समित्यांमार्फत चालतो. या समित्यांवर कांहीं निवडलेले प्रतिनिधि असतात, तर कांहीं सरकारनियुक्त सभासद असतात. दैनंदिन कारभार उपकुलगुरु ( व्हाइस-चॅन्सेलर ) राजिस्ट्रारच्या साहाय्यानें पाहतात.

विश्वविद्यालयांना राज्य-सरकारची आणि कांहीं प्रमाणांत केंद्र-सरकारचीहि आर्थिक मदत मिळते.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विश्वविद्यालयाशिवाय राज्यांतील इतर सर्व विश्वविद्यालयांत शिक्षणाचें माध्यम इंग्रजी आहे. तें तसेंच ठेवावयाचें, कीं राष्ट्रीय भाषा हिंदी माध्यम करावयाचें, कीं मातृभाषेंतूनच सर्व उच्च शिक्षण द्यावयाचें – हा तूर्त विश्वविद्यालयांपुढील महत्त्वाचा प्रश्न आहे.

• • •




REFBK-0008177

# वर्गाचें वेळापत्रक

## इयत्ता ५ वी ( मुलांची माध्यमिक शाळा )

| तास | वेळ | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ७-२० ते ७-३० | निवेदन | मुख्याध्यापकांचें | किंवा | प्रार्थना | सामुदायिक | — |
| | ७-३० ते ८-१० | शास्त्र | इतिहास | इतिहास | मराठी | मराठी | मराठी |
| १ | ८-१० ते ८-५० | गणित | गणित | गणित | गणित | गणित | ११-३० ते १२-१० |
| २ | ८-५० ते ९-१० | — | सुट्टी | छोटी | गणित | गणित | १२-१० ते १२-५० |
| | ९-१० ते ९-५० | मराठी | मराठी | मराठी | नागरिक शास्त्र | भूगोल | १२-५० ते १-१० |
| | ९-५० ते १०-३० | चित्रकला | सामान्यज्ञान | हिंदी | हस्त-व्यवसाय | हिंदी | १-१० ते १-५० |
| | | — | सुट्टी | मोठी | मधली | मोठी | १-५० ते २-३० |
| | | | शास्त्र | भूगोल | इतिहास | मराठी | २-३० ते ३-१५ |
| | | | वक्तृत्व, पाठांतर चढाओढी, अनुभवांचें कथन किंवा सहल आलटून पालटून | हस्तव्यवसाय | हिंदी | हस्तव्यवसाय | मराठी | ३-१५ ते ३-५० |
| | | | | शास्त्र ( निरीक्षण ) | बागकाम | नागरिक शास्त्र (प्रात्यक्षिक) | भूगोल (निरीक्षण व प्रात्यक्षिक) | ४-२५ ते ५ |

( शा. व्य. ९६ )